म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ९२६

१९४७

इन ४७ वें

काव्य-विहार

कवि-परिचय आणि काव्य-चिकित्सा

लेखक

कै. डॉ. माधव त्र्यंबक पटवर्धन

(माधवज्यूलियन),

एम्. ए., डी. लिट्.



REFBK-006844

किंमत ४ रुपये

मनोहर ग्रंथमाला प्रकाशन ४७ वें

काव्य विहार

कवि-परिचय आणि काव्य-निवड



लेखक

के. डॉ. माधव त्र्यंबक पटवर्धन

(माधवज्यूलियन),

एम्. ए., डी. लिट्.





REFBK-0006844

किंमत ४ रुपये

: प्रकाशक :

मनोहर महादेव केळकर

१९६।८५ टिळक रोड, पुणें २.

: मुद्रक :

न. वि. सरदेशपांडे,

आदर्श मुद्रणालय, पुणें २.

प्रथमावृत्ति २९—११—४७

अनुक्रमणिका

		पृष्ठांक
१	काव्यविषयक भ्रामक कल्पना (महाराष्ट्र कविसंमेलन नाशिक १९३३)	१
२	तांबे यांची कविता	२३
३	कवि तांबे परिचय व गुणनिदर्शन	३७
४	रुद्रास आवाहन	६२
५	गोविंदाग्रज	७१
६	राजकवि चंद्रशेखर	८१
७	चंद्रशेखर व त्यांची कविता	९०
८	कवि यशवंत	१२६
९	दत्तात्रेय कोंडो घाटे (कवि दत्त)	१३६
१०	उमर खय्याम	१४५
११	विठ्ठलराव घाटे	१५१
१२	झेंडूची फुलें	१५८
१३	पांखरा येशिल का परतून्	१६६
१४	गाई घरा आल्या ...	१७४
१५	आधुनिक मराठी कविता : म. सा. संमेलन, बडोदें . (१९३४)	१७९

आरंभीं

दोन वर्षांपूर्वीं कै. डॉ. माधवराव पटवर्धनांचें चरित्र मला वाचकांच्या हातांत देतांना जो आनंद व समाधान वाटलें त्याच प्रकारचें समाधान निराळ्या विषयांवर लिहिलेलें हें गद्य लेख देतांना होत आहे. माधवरावांच्या मनांत त्यांच्या हयातींतच हे लेख एकत्रित करून ग्रंथरूपानें प्रसिद्ध करावयाचे होते परंतु दुर्दैवानें त्यांच्या अल्पायुष्यामुळें ही गोष्ट घडून आली नाहीं.

त्या ग्रंथाचे एकंदर तीन भाग होतील. ते सर्व भाग मिळून त्यांत साधारण १९१३ सालपासून १९३९ सालपर्यंतचे निवडक लेख आलेले आहेत. ते निरनिराळ्या मासिकांतून व वर्तमानपत्रांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झालेले आहेत. ज्यांत त्यांतील कांहीं लेख प्रसिद्ध झाले होते त्यांतील कांहीं मासिकें आतां अस्तित्वांतही नाहींत. परंतु त्या सर्वांचा एकत्र संग्रह असावा असें आज कित्येक दिवस माझ्या मनांत घोळत आहे. त्याला मूर्त स्वरूप यायला माधवरावांच्या मृत्युनंतर आठ वर्षें लागलीं. वास्तविक हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत मला स्वतःला कांहींच श्रम करावे लागले नाहींत. माधवरावांनीं स्वतःच आपल्या हातानें चिकट वहींत निरनिराळ्या वेळीं लिहिलेले हे लेख चिकटवून ठेविलेले होते. १९३७ सालनंतरचे कांहीं लेख मला एकत्र करावे लागले इतकेंच. त्यांत माझे स्वतःचे श्रम फार थोडे आहेत. त्या ग्रंथाचे आणखी दोन भाग होतील; माझ्या मनांत ते नवव्या व दहाव्या स्मृतिदिनाला प्रसिद्ध करावे असें आहे.

१९४५ सालीं 'आमचीं अकरा वर्षें' हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर मध्यंतरीं दोन वर्षांचा काल गेला. स्मृति-दिनाच्या आगें मागें हें पुस्तक मला प्रसिद्ध करतां आलें असतें; परंतु माझी स्वतःची इच्छा व आग्रह हें पुस्तक स्मृतिदिनालाच प्रसिद्ध व्हावें असा असल्यामुळें हा ग्रंथ आज आठव्या स्मृतिदिनाला प्रसिद्ध होत आहे.

आजकाल आपण प्रसिद्ध पुरुषांची पुण्यतिथी करतों, स्मृति–दिन साजरे करतों, त्यासंबंधीं ज्यांना आस्था असते असे चार लोक एकत्र जमतात, जोंपर्यंत कालाच्या दाट पडद्याचें आवरण त्यांवर पडलेलें नसतें तोंपर्यंत लोकांत त्यासंबंधीं जास्त उत्साह असतो परंतु जसजसा काल जातो तसतसें त्यांतील नावीन्य संपतें व लोकांच्या उत्साहालाही ओहोटी लागते. कित्येक वेळीं तर लोक त्या दिवशीं जास्त जमणें न जमणें हें त्या दिवशींच्या व्याख्यात्यावर अवलंबून असतें. व्याख्यात्याच्या लोकप्रियतेवर स्मृति दिनाचें यशापयश अवलंबून राहतें. व ज्या व्यक्तीचा स्मृतिदिन असतो त्या व्यक्तीबद्दल बेताचीच आस्था मनांत बाळगली जाते. स्मृति–दिनांत कांहीं नावीन्य आढळलें नाहीं कीं लोक त्याबद्दल उदासीनच रहातात; अशी स्थिति आपल्या महाराष्ट्रांत अनेक स्वर्गवासी प्रसिद्ध लेखक व कवी संबंधानें झालेली आपण पहातों. असें वास्तविक होऊं नये. परंतु आम्हां सुशिक्षित जबाबदार लोकांत ज्यांना त्याचें महत्त्व कळतें त्यांचीच ही स्थिति आहे मग इतरांबद्दल बोलावयासच नको!! अशी स्थिति माधवरावांच्या बाबतींत होऊं नये अशी माझी मनापासूनची इच्छा असल्यामुळें व आपण स्वतः त्या स्मृतिदिनांत कांहीं नावीन्य उत्पन्न करावें या हेतूनें त्या प्रसंगीं मी त्या ग्रंथाच्या पाहिल्या भागाचें प्रकाशन व्हावें असा आग्रह धरला.

माधवराव पटवर्धनांच्या मृत्यूला आज आठ वर्षें झालीं तरी त्यांच्या त्याही लेखांतील नावीन्य कांहीं कमी झालें आहे असें मला वाटत नाहीं. त्याला कारण त्यांतील बरेचसे लेख तर माझ्या समोरच लिहिले गेले आहेत. माधवरावांच्या डोळ्यांत एखादा विषय घोळूं लागला कीं त्या वेळची त्याची ती तळमळ, दोनदोनदां एखाद्या लेखाचें वाचन, लेखन व रोजच्या व्यवहाराकडे होणारें दुर्लक्ष हें सर्व माझ्या डोळ्यापुढें आजही जसेंच्या तसें दिसं लागतें. त्यांचे स्नेही आजही महाराष्ट्रांत कांहीं कमी नाहींत. ज्यांच्याशीं त्यांचा दाट परिचय होता ज्यांनीं त्यांना जवळून पाहिलें आहे त्यांना माझ्या म्हणण्याची सत्यता पटेल. त्यांचे चहाते व स्नेही यांच्या दुःखाची तीव्रता कालाबरोबर कमीही झाली असेल; परंतु त्यांच्या वाङ्मयाबद्दलची त्यांची आस्था खात्रीनें कमी झालेली नाहीं. त्यांना त्या ग्रंथाचें महत्त्व खात्रीनें तितकेंच वाटेल.

माधवराव—' माधव ज्यूलियन ' या नांवानें तर प्रसिद्धच आहेत; परंतु त्यांनीं निरनिराळ्या क्षेत्रांत अनेक प्रकारचें लेखन केलेलें आहे हें कांहीं मला नव्यानें सांगायला पाहिजे असें नाहीं. आजपर्यंत त्यांचें गद्य वाङ्मय हातांच्या बोटावर मोजण्याइतकेंच प्रसिद्ध झालेलें आहे. त्यांत या ग्रंथानें भर पडली आहे. वाचकांना व विद्वानांना त्याचा उपयोग होईल अशी मला आशा आहे.

माझ्या मनांत हा ग्रंथ सातव्या स्मृति-दिनालाच प्रसिद्ध करावा असें फार होतें. परंतु प्रकाशकाच्या अभावीं ही गोष्ट घडून आली नाहीं. आज ह्या स्मृतिदिनप्रसंगीं हा ग्रंथ प्रसिद्ध झाला त्याचें बरेचसें श्रेय मनोहर ग्रंथमालेचे चालक रा. मनोहर महादेव केळकर यांना आहे. वास्तविक तात्यासाहेब केळकरांच्या मृत्यूमुळें ते दुःखांत आहेत. असें असूनही आपलें दुःख बाजूला सारून त्यांनीं हा ग्रंथ या दिवशीं प्रकाशित केला याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

प्रा. गं. भा. निरंतर ह्यांनीं ग्रंथांतील लेखांची निवड करण्यापासून तों मुद्रितें तपासण्यापर्यंत अनेक प्रकारची मदत मला केली आहे. त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहें. त्यांच्या मदतीशिवाय हें काम झालें नसतें.

ता. २९-११-४७.
' निवान्त- ' डेक्कन जिमखाना, पुणें ४. } लीलाबाई पटवर्धन

या ग्रंथांत समाविष्ट केलेल्या लेखांपैकीं दोन लेख संमेलनप्रसंगीं झालेलीं अध्यक्षीय भाषणें आहेत. बाकीच्या लेखापैकीं कांहीं प्रगति, ज्योत्स्ना, लोकशिक्षण इत्यादि नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. चंद्रशेखर व त्यांची कविता हा लेख काव्यचर्चा या ग्रंथांतील आहे.

लेख पूर्वी जसे प्रसिद्ध झाले तसेच छापले आहेत. त्यांतले कांहीं उल्लेख त्या लेखनाच्या कालाच्या दृष्टीनें वाचकांनीं लक्षांत घ्यावेत.

तांबे यांच्यावरील लेखांतील अवतरणांत दिलेले पृष्ठांक ' तांबे यांची कविता भाग १ व २ ' या ग्रंथांतील आहेत.

लेखांची निवड करतांना पृष्ठसंख्येचें बंधन पाळणें महत्त्वाचें होतें. तें पाळण्यासाठीं निवड करतांना शक्यतितकी विविधता आणण्याच्या हेतूनें निवड केली आहे.





काव्यविषयक त्रामक कल्पना : : १

स्वागताध्यक्ष, कवि आणि काव्यप्रेमी जनहो,

नाशिक येथील या महाराष्ट्र कविसंमेलनाच्या अध्यक्षपदावर माझी योजना करून या उच्च पीठावरून आपणांशीं चार शब्द बोलण्याची जी ही संधि आपण मला दिली आहे तिच्याकरितां मी आपला अत्यंत ऋणी आहें. अशा प्रसङ्गीं आणि नाशिकांत एका कविवर्याची आठवण मला न होणें अशक्य आहे. आपल्या या जन्मभूमींतील विविध स्थळांचें—या गोदावरीच्या परिसरांतील मोहक दृश्यांचें दर्शन मला त्यांनीं वीस बावीस वर्षांपूर्वीच आपल्या संस्मरणीय काव्याच्या द्वारां घडविलें. त्या वेळीं मी नुकताच महाविद्यालयांत प्रवेश मिळविला होता आणि कुतूहलानें टला ट जोडण्याचा खेळ खेळूं लागलों होतों. कविमन हें कसें संस्कारक्षम व रसिक असतें याचा अनुभव मला त्यांच्या सहवासांत मिळाला. रचना निर्दोष व सफाईदार असावी, आणि शब्दांची योजना करितांना त्यांच्या नादमाधुर्यापेक्षां अर्थानुकूलतेकडे अधिक लक्ष असावें या दोन गोष्टी त्यांच्या सम्भाषणानें व विशेषतः त्यांच्या उदाहरणानें माझ्या मनावर बिंबल्या. आज त्यांच्या माझ्या भाषारीतींत आणि काव्यस्वरूपांत कितीही वैधर्म्य दिसलें तरी या दोन गोष्टींपुरते ते मला गुरुस्थानीं आहेत यांत किमपि संदेह नाहीं. म्हणून आज माझा, वस्तुतः माझ्या पद्यपाइकीचा जो गौरव आपण केला आहे त्याचें श्रेय राजकवि चन्द्रशेखर यांना अर्पण करून व्यवहारदृष्ट्या तरी मी गुरुऋणांतून मुक्त होऊं इच्छितों.

हें माझें कर्तव्य तर आहेच, पण यापासून एक लाभही आहे. महाराष्ट्र कविसम्मेलनाच्या अध्यक्षपदाला मी अद्यापि पात्र नाहीं असें ज्यांचें ज्यांचें

प्रामाणिक मत असेल आणि मीही त्यांच्यापैकींच एक आहे, त्या सर्वांचें या माझ्या कृतीनें समाधान होईल अशी मला आशा आहे.

पण कविसम्मेलनाच्या अध्यक्षपदांत आतां बहुमान आहे कीं नाहीं याविषयींच मतभेद असण्याचा सम्भव आहे. मोकळ्या मनानें विचारविनिमय करावयाला आपण जमलों आहों, तेव्हां स्पष्ट सांगावयाला प्रत्यवाय नाहीं कीं कवीला समाजांत आज मान नाहीं; किम्बहुना कवि हा एक अवहेलनेचा व अनुकम्पेचा विषय होऊन बसला आहे. ज्याला कवि म्हणतात असा मीही एक पद्यकार आहें. याची जाणीव ठेवून मी सांगतों कीं कवि हा शब्दच निन्दागर्भ होत चालला आहे. पद्यरचनेच्या बालिश व निष्फळ नादाला लागून विक्षिप्तपणानें वागणारा व कामांतून गेलेला असा एक प्राणी म्हणजे कवि अशी समजूत सुशिक्षितांचीही दिसते. एकाचें कवित्व त्याला आचार्यांची जागा मिळण्याच्या आड आलें, आणि दुसऱ्या एकाचें कवित्व त्याची आचार्यांची जागा जाण्याला अंशतः कारणीभूत झालें ! " आपण काव्याच्या नादीं लागून विद्येची हानि करीत आहां " असें नुकतेंच (२९ $\frac{6}{33}$) मला वन्द्य असलेल्या एका विद्याव्यासंगी गृहस्थांनीं मला लिहिलें आहे. मला असा अनुभव अनेकदां येतो कीं, एखाद्या सद्गृहस्थांशीं माझी ओळख करून देतांना कोणीं म्हटलें कीं हे एक सुप्रसिद्ध कवि आहेत कीं त्या सद्गृहस्थांचा चेहरा मोठा चमत्कारिक होतो. त्यांच्या मनांत येत असेल, " सुप्रसिद्ध ! आणि माझ्या तर कधींहि नांव ऐकिवांत नाहीं ! आणि कवि ! तो तर भिकार धंदा ! " शिष्टाचारामुळें हे विचार त्याला बोलून दाखवितां येत नाहींत तेव्हां, " काव्य, आपल्याला कांहीं कळत नाहीं. तो विषय मात्र अगदींच भिन्न—पण ठीक ! " अशी कांहीं तरी सम्पादणी त्याला करावी लागते. विनोदी वाङ्मयाचा तर काय कवि हा मूर्धाभिषिक्त विषय झाला आहे. काव्यप्रान्तांत पदार्पण केलेल्या एका धाडशी व बुद्धिमान् तरुणानें आपल्या प्रतिष्ठेचा पायाच कवींची विटंबना करून घातला. काव्य, नाटक, लघुकथा इत्यादि वाङ्मयाच्या विविध प्रान्तांत बहुजनांचें चांगलेंच मनोरंजन होईल अशा रीतीनें कवींचा समाचार घेण्यांत येत आहे. कवींची हा अवस्था शोचनीय आहे. कवींचें वैयक्तिक वर्तनवैचित्र्य हें जरी या अधःपाताचें एक कारण असलें तरी तें मौलिक व महत्त्वाचें नाहीं, तेव्हां त्याची चर्चा कितीहि

मनोरंजक होण्यासारखी असली तरी तिचें येथें तादृश्य प्रयोजन नाहीं. जीं कारणें महत्त्वाचीं आहेत, पण वर वर पाहून दिसण्यासारखीं नाहींत, त्यांचा विचार येथें कर्तव्य आहे. कारणें एकदां निश्चित झालीं म्हणजे त्यांचें निराकरण करतां येईल.

आधुनिक कविता तुच्छ व असार वाटते म्हणूनच आधुनिक कवींच्या-विषयीं तुच्छता वाटत असावी. प्राचीन कवि हे आधींच प्राथितयश, त्यांतून त्यांच्याशीं परिचयहि परिमितच असतो, त्यांच्यावर खरें मत देण्याचें कर्तव्य क्वचितच कोणी करितो. त्यांतून प्राचीन कवि हे सदेह कधीं डोळ्यांपुढें येत नसल्यामुळें त्यांच्या विषयींची भावना तशी व्यक्त करण्याचा प्रसंग क्वचितच येतो. आतां आधुनिक कविता ही उत्कृष्ट व भव्य नाहीं हें खरें, तथापि तिच्याविषयीं जी तुच्छता लोकांना वाटते तिच्या बुडाशीं अभिरुचीचा अभाव आणि भ्रामक कल्पनांचा प्रभाव अशीं दोन कारणें आहेत.

लोकांना कवितेची अभिरुचि नाहीं हें विधान एकदम पटणार नाहीं. बाह्यतः तरी जिकडे तिकडे काव्यपठण व काव्यश्रवण चाललें आहे असा देखावा कोणालाही दाखवून देतां येईल.

पन्नाशी उलटलेले साक्षर लोक गुरुचरित्र, दासबोध इत्यादि ग्रंथांतून कांहीं भाग तरी आन्हिक कर्म म्हणून वाचल्याविना अन्नग्रहण करीत नाहींत, आणि ज्ञानेश्वरी, एकनाथ भागवत इत्यादि ग्रंथांवर जेथें प्रवचन असेल तेथें ते उपस्थित रहातात. पुढारलेल्या वर्गांतील स्त्रिया निरक्षर असल्या तरी स्नानोत्तर, एकीकडे गृहकृत्यें करीत असतांना व्यंकटेशस्तोत्र, मनाचे श्लोक, 'भीमरूपी महारुद्रा'सारखीं स्तोत्रें यांपैकीं कशाचा तरी पाठ म्हणतात. त्यांना वाचतां येत असल्यास त्या शनिमाहात्म्य, शिवलीलामृत वाचतात, आणि चातुर्मासांत हरिविजय, पाण्डवप्रताप, सन्तलीलामृत, भक्तविजय इत्यादि ग्रंथांचें श्रवण करितात. मंगळागौरीच्या व हरतालिकेच्या रात्रीं स्त्रियांच्या बैठकींत परम्पराप्राप्त स्त्री-गीतांची उजळणी होते. शाळेंत जाणाऱ्या मुला-मुलींना तर क्रमिक पुस्तकांतील कविता शिकाव्याच लागतात. यामुळें त्यांचें ज्ञान 'चिमुकला वहु बालक हा असे' पासून तों 'असार जीवित केवळ माया रडगाणें हें गाउं नका' पर्यंत वाढतें. आणि अलीकडे कवि कविता-गायन करूं लागल्यामुळें व तें बोलपटांतूनही बाहेर पडूं लागल्यामुळें 'हा

हिंद देश माझा,' 'न्हारिचा वखुत' 'मराठा गडी यशाचा धणी,' 'शूर्पणखा' 'फसल्यें ग बाई' 'गोकुळिंचा कान्हा माझा' इत्यादि कविता तरुण मुलांच्या जिव्हाग्रीं निनादूं लागल्या आहेत. अगदीं लहान मुलींच्यासाठीं ओव्या, हदग्याचीं गाणीं हीं आहेतच; कांहींही नाहीं असें नाहीं.

शिक्षण सम्पवून अर्थसंपादनांत व्यग्र असलेले वकील, वैद्य, तत्सम लोक कविता वाचतांना आढळत नाहींत हें खरें असलें तरी काय झालें? हा कदाचित् त्यांचा काव्यमननाचा काळ असेल. त्यांना प्राचीन मराठी कवितेचा कांहीं थोडा अभिमान नसतो. पण पंडित, तुकाराम यांच्या ज्या उक्ति स्मरणांत रहातात त्यांचा ते संभाषणांत सफाईनें उपयोग करितात. अलंकारांचींही उदाहरणें ते सांगू शकतात आणि पंतपंडितांच्या ग्रंथगुरुत्वाचें गुणगान करावें तर त्यांनींच!

कवितेचे सूर पांढरपेशांच्याच घरांत ऐकूं येतात असें नाहीं. माळ घातलेले खेडवळ लोक ज्ञानोबारायांचे, नामदेवांचे. तुकोबारायांचे अभंग मोठ्या प्रेमळपणानें म्हणून भजन करितात. जोंधळा उपटावयाला म्हणजे 'मलरी' घालावयाला गडी निघाले कीं 'भलंरे दादा भलं भलं' असें गाणें चालूं होतें. जात्यावर बसलें कीं जुन्या नव्या ओव्या सुचतात. अशाच पेषणी-स्फूर्तींत भागू नामक एका आधुनिक कवियित्रीनें

"तुकाराम म्हणे जीजा, तूं माझी बायकू
वैकुण्ठाला चल, नको कुणाचें आयकू
आयकूं ग बाई"

अशा सहस्रावधि ओंव्या रचिल्या आहेत. शेतकऱ्यांच्या बायका फळभाजीच्या जड पाट्या डोक्यावर घेऊन नगराची वाट चालूं लागल्या कीं श्रमपरिहारार्थ

"कुण्या सटवीनं नेलं ग पाखरूं माझं?
लाल लाल तूं पाखरा,
लाल लाल तुझी चोंच;
इङ्गुळवाणी तुझा डोळा,
कुण्या सटवीनं नेलं ग पाखरूं माझं?"

असें एखादें गाणें म्हणत म्हणतच अंतर तोडतात. प्रसंगाविशेषीं म्हणावयाचीं परंपराप्राप्त अशीं 'वरमायी' सारखीं गाणीं त्यांचीं असतातच. गोंधळासाठीं माणसें जमलीं आणि धार्मिक विधि आटोपला कीं, गोंधळयाला उमाजी नाइकाचा पोवाडा म्हणण्याचा आग्रह व्हायचाच. अशाच जनसमूहापुढें पूर्वी अगिनदास, तुळशीदास यांनीं आपले पोवाडे गाऊन ख्यात केली. 'शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्दानें ऐकावा,' 'विलासाचा रङ्गहि शूर वीराच्याच शृङ्गाराचा,' होनाजी बाळा, सगनभाऊ, प्रभाकर, राम जोशी यांच्या शृङ्गारिक लावण्या समाज आजही तल्लीनतेनें ऐकतो. डफावर थाप कडाडली, तुणतुण्याची तार तुंइ तुंइ असा सूर काढूं लागली कीं, तमाशाभोंवतीं शेंकडों माणसांचें कोंडें पडलेंच! मग काय पहाटपर्यंत भर रंग आहे! छे छे! महाराष्ट्रांत कवितेची अभिरुचि नाहीं हें म्हणणें चुकीचें आहे. कविता ही किती विविध रूपांनीं नटून किती विविध वृत्तीच्या लोकांना आजहि गुंगवून टाकीत आहे!

पण, इतक्या ठिकाणीं जें हें कवितेचें पठनश्रवण होतें तें काव्यानन्दासाठीं का इतर कांहीं हेतूसाठीं? आणि इतक्या ठिकाणीं विलास करणारी व्यक्ति ही कामरूपिणी कविताच आहे का कोणी दुसरी भलतीच? हें जें काव्याचें पठनश्रवण होतांना दिसतें तें जेथें मनोरंजनासाठीं होत नाहीं, तेथें पुण्यप्राप्तीसाठीं होतें आणि जेथें तें मनोरंजनासाठीं होतें तेथें तें मुख्यतः श्रवणतृप्तीसाठीं होतें हें सहज ध्यानांत येईल. गुरुचरित्र नित्यनेमानें वाचणारा मनुष्य फादर स्टीफनचें ख्रिस्तपुराण अथवा नारायण वामन टिळकांचें ख्रिस्तायन यांचें पारायण करील काय? वस्तुतः हे दोन्ही ग्रंथ सरस मराठींतच असून ओवीछन्दांत रचिलेले आहेत. शिवलीलामृत वाचणारा चक्रधरलीलासङ्ग्रह हातीं धरील काय? तुकोबारायांचे अभंग म्हणून दाखवितांना अश्रुपात करणारा एखादा भक्तिपरायण वैष्णव 'अभङ्गांजलीनें—' तन्मय होईल काय? हे अभङ्गहि भक्तिरसानेंच ओथम्बलेले आहेत. पण नाहीं, परधर्मविषयक ग्रन्थ कदाचित् सरस असल्यास त्यांच्या वाचनानें जरी आनन्द होण्यासारखा असला तरी त्यापासून कर्तव्यपालनाचें पुण्य तर नाहींच उलट पापच लागण्याची भीति असते. म्हणून धर्मदृष्ट्या 'दासबोध' वाचणारा मनुष्य ख्रिस्ताची गिरिगीता वाचण्याची इच्छा करणार नाहीं.

रसिकता ही अशी स्वधर्मैकदृक् नसते. ती व्यापक व उदार असते. भक्ति हा रस आहे असें मानिलें तरी अमुकच भक्ति सरस असते असें सांगतां येत नाहीं. प्रीति ही जशी जातिनिविष्टच असते असें नाहीं त्याचप्रमाणें भक्ति ही स्वधर्मनिष्ठच असली पाहिजे असें नाहीं. भक्ताला ज्याच्याविषयीं भक्ति वाटते तोच त्याचा स्वधर्म आणि तोच धर्म जरी रसिकाचा नसला तरी भक्ताला त्याच्या स्वधर्माविषयीं वाटणारी भक्ति, भावनेची उत्कटता ही पाहून रसिकाला, परधर्मीय रसिकालाहि, काव्यानंद सहानुभूतीचा आनंद होऊं शकतो. वासुदेव बळवंत पटवर्धन हे कट्टर नास्तिक असले तरी रसिक असल्यामुळें तुकारामाच्या अभंगवाणीनें सद्गदित होत असत. खरें काव्य याप्रमाणें धर्मभेदातीत रसिकतेस पटतें व तसेंच तें पटणारें पाहिजे.

शङ्कराला बेल प्रिय असतो म्हणून एखादा शङ्करभक्त आपल्याला पूजेच्या वेळीं कधीं अडचण पडूं नये म्हणून परसांत बेलाचें एक झाड साक्षेपानें लावील, तर कट्टर विष्णुभक्त कदाचित् त्या बिचाऱ्या झाडाच्या सावलीचाहि विटाळ मानील आणि तो दोष घालवायला तुलशीदल-स्पर्श समर्थ आहे असें मानील. या दोघांत तितका विरोध असला तरी ते दोघे जर उद्यान सिद्ध करूं लागले तर त्यांचें धर्मवेड क्षणभर कडेलाच राहील आणि लावणीसाठीं ते ज्या तरुवेलींची निवड करतील तिच्यांत एकवाक्यताच दिसून येईल. सोनचांफा, पारिजातक, मोगरा, निशिगंध इत्यादि देशीच काय पण गुलाब, सब्जा वगैरे विदेशी वनस्पतींचीहि ते सारख्याच प्रेमानें निवड करतील. उद्यान करतांना ते जी ही दृष्टि ठेवतील तीच काव्याकडे, वाङ्मयाकडे पाहण्याची दृष्टि होय. तीच रसिकतेची साक्ष होय. 'रघुवंश' वाचणाऱ्या रसिकाला अश्वघोषाचें 'बुद्धचरित' ही वाचनीय वाटेल. तुकारामाचे अभंग वाचून जो सद्गदित होतो त्या रसिकावर प्राचीन प्रमाणांतील स्तोत्रसंहिताहि तोच परिणाम करील परंतु रसिक मनाला हलवून सोडायला जातिवंत काव्य पाहिजे. काव्याचें सोंग कामाचें नाहीं; पुष्पवाटिका पाहिजे, बेलबाग–तुळशीबाग चालणार नाहीं. मानवी अंतर्बाह्य संसाराचें जींत हृद्य चित्र आहे, मानवी भावनांचा जींत सुंदर विलास आहे, मनुष्याला मनुष्यप्राणी या नात्यानें जींत गम्यता व आपुलकी वाटते, ती कविता होय. केवळ स्वधर्मविषयक गोष्टींची पद्यांत मांडणी म्हणजे कविता

नव्हे. भावनेनें विकृत न झालेली अशी तर्कगम्य विचारसरणी ही एरवीं उपयुक्त असली तरी ती कविता नव्हे. अलंकारिक भाषेच्या मंडनानें ती फार तर शर्करावगुंठित कोयनेल–गुटिकेप्रमाणें रुचिकर होईल, काव्यमधूची अंतर्बाह्य सतेज माधुरी तिच्यांत येणें अशक्य आहे. भावनेचें आनंददायक संक्रमण करण्याचें सामर्थ्य जर पद्यरचनेमध्यें नसेल तर ती स्वधर्मविषयक असली, स्वदेशविषयक असली, वा निर्लेप गूढगुंजनी असली तरी ती व्यर्थ होय. पुण्यासाठीं पठन हा धार्मिक हेतु जर नाहींसा झाला तर किती तरी ग्रंथराजांचें काव्यदृष्ट्या खरें स्वरूप उघड होऊन त्यांचें माहात्म्य संपेल, आणि वाङ्मयदृष्ट्या टाकाऊ असलेले किती तरी ग्रंथ ज्यांचीं आज पारायणें होत आहेत, ते सांदीकोपऱ्यांत पडून वाळवीच्या व घुळीच्या भक्ष्यस्थानीं पडतील ! पुढें मागें त्यांचें संशोधन व वाचन झालें तर तें केवळ तत्कालीन भाषा व समाज यांचें ज्ञान मिळविण्याकरितां होईल.

कीर्तनाला आणि गोंधळाला लोक जागतात त्यांत धार्मिक दृष्टि थोडी असते, नाहीं असें नाहीं. लावण्यांत सुद्धां नीतिबोध व वेदान्त कोंबलेला केव्हां केव्हां आढळतो. पण लोक मुख्यत्वेंकरून कानांचें व डोळ्याचें पारणें फेडण्यासाठींच जमतात. तुकारामी अभंग, वामनी श्लोक, मोरोपंती आर्या, मध्वमुनीश्वरी पद, तुलशीदासी पोवाडा किंवा कविरायी लावणी यांतील अर्थसौष्टवापेक्षां ते अनुप्रास, तीं यमकें, ते श्लेष, तो हरिदासी विनोद, तो आवेश, तें ठसकेबाज गाणें, त्या शृङ्गारचेष्टा यांनींच लोकांचें मनोरंजन होतें आणि वस्तुतः या आगंतुक गोष्टींनीं जो रंग भरतो त्यांचें श्रेय पद्याला मिळतें. असाच प्रकार कवितागायनाच्या बैठकींतही होतो. वाङ्मयिक मूल्याची उणीव स्वरमाधुर्य व नखरेदार गायन यांच्या भिलाफानें भरून निघते आणि कविता लोकांच्या तोंडीं होऊं लागते. लोक अर्थापेक्षां चाली-करितांच बहुशः गाणें गुणगुणतात. अशा लोकप्रिय कवितांच्यामध्यें काव्यरस किती आहे हें एकान्तांत त्या वाचून पाहिल्या असतां ताबडतोब प्रत्ययास येईल. उत्कृष्ट कवितेपासून ती एकान्तांत केवळ वाचल्यानेंहि हृदय हाललें पाहिजे, आनंद झाला पाहिजे. सङ्गीतानुकूलता हा भावगीताचा एक आल्हाददायक गुण आहे, पण तो त्याचा प्राण होऊं शकत नाहीं. धर्म-माहात्म्याप्रमाणेंच संगीतमाहात्म्य एकीकडे ठेविलें तर समाजांत काव्याभिरुचि

किती आढळेल ! शिक्षण समाप्त झालेले लोक काव्यें वाचीत नाहींत, आणि स्त्रीवाचकही मासिकांतील गोष्टी वाचतात पण कवितांचीं पानें तशींच उलटून पुढें जातात यावरून काय समजावयाचें ? काव्याभिरुचि दुर्मिळ आहे आणि त्या अभिरुचीस पटतील अशीं काव्येंहि दुर्मिळ आहेत हेंच नव्हे का !

पुण्यप्राप्तीसाठीं व श्रवणतृप्तीसाठीं काव्याचें पठनश्रवण करणारे निदान स्वेच्छेनें तरी तें करितात. परंतु एका मोठ्या वर्गाचा कवितेशीं परिचय सक्तीनें करून देण्यांत येतो. प्रणयाचा परिणय व लावून दिलेलें लग्न यांत जें अंतर तेंच काव्यपठण व काव्यशिक्षा यांत दिसतें. वस्तुतः काव्य ही संगीताप्रमाणेंच एक ललितकला आहे. तेव्हां शिक्षणक्रमांत गायन हा एक ऐच्छिक विषय आहे, हें युक्तच आहे; पण काव्य हा त्याचप्रमाणें ऐच्छिक विषय कां नसावा ? कवितेंत शब्दार्थ असतो त्याच्या बळावर तिची ज्ञानवाहक गद्याशीं सांगड घालून देण्यांत आली आहे. वसंतसेना निकोप प्रकृतीची व सशक्त दिसते यासाठीं शिक्षणशकारांनीं तिला मोलकरिणीप्रमाणें घाण्यास जुंपिली आहे. हे शिक्षणशास्त्री म्हणतात कीं विद्यार्थ्यांनीं कवितांचा अभ्यास केलाच पाहिजे. कारण त्या योगानें चतुर्थ साधतात :—

(१) अपरिचित व दुर्बोध शब्दांशीं परिचय होऊन शब्दसंपत्ति वाढते, (२) सुभाषितरत्नांच्या लुटीवर वक्तृत्वाचा बाजार थाटतां येतो, (३) नीतिज्ञान झाल्यानें व्यक्ति आणि समष्टि दोघांचीहि समुन्नति होते, (४) आणि अन्वयार्थाच्या व्यायामानें बुद्धि सशक्त होते. काव्यानंदांत या शिक्षण-शास्त्र्यांना कांहीं अर्थ दिसत नाहीं.

शब्दसंपत्ति वाढविण्यासाठीं ग्रंथवाचन केल्यानें भाषाप्रभुत्व येतें ही समजूत चुकीची आहे. आपल्या आवडत्या विषयावरील ग्रंथ बारकाईनें म्हणजे अपरिचित शब्द भेटले कीं त्यांचें अर्थौचित्य समजून घेत घेत वाचल्यानेंच शब्दसम्पत्ति वाढते. योग्य शब्दांची उपस्थिति होऊन मार्मिक-पणानें त्यांची योजना करितां यायला शब्दांची ओळख अशीच व्हावी लागते. असें नसतें तर अमरकोश पाठ करून कोणालाहि ' बाण ' होतां आलें असतें. शब्दांचा भरणा व्हावा म्हणून कवितेची शिक्षा कष्टानें सहन करणारा काव्यानन्दाला तर पारखा होतोच पण शब्दसम्पत्तीच्या दृष्टीनें शेवटीं अकिन्चनच राहतो.

सुभाषितरत्नें गोळा करण्यासाठींच कवितांचा अभ्यास करणाऱ्याचीही स्थिति अशीच चमत्कारिक होते. वाऱ्याच्या झुळकीसंगें येणारा सुगन्ध ग्रहण करीत फुललेल्या वनश्रीचें दर्शनसुख अनुभवून प्रसाद म्हणून, स्मारक म्हणून घरच्या दिवाणखान्यांतील मेजावरील फुलपात्रांत ठेवण्याकरितां चार दोन फुलें नेणारा रसिक कोठें, आणि देवाला लक्ष वहावयाचा आहे या निमित्तानें लोकांच्याही बागेंत घुसून, उपवनश्रीची लाज न ठेवितां तरुलतांना नागवून जाणारा भाविक कोठें ! एखाद्या भुवनसुन्दरीशीं चार घटका संभाषण करण्याचा योग आला असतां तिचें मन आकर्षण करून घेण्यापेक्षां तिचे दागिने कसे पळवून नेतां येतील याचा विचार करणारा परम अभागी होय. आपलें विचारदारिद्र्य लपविण्यासाठीं सुभाषितरत्नांची उसनी ऐट आणूं इच्छिणाऱ्यांच्याकरितां 'सुभाषितरत्नभांडागारा' सारखे सूचि ग्रंथ आहेतच. त्यांनीं काव्याच्या हेतूचा विपर्यास करूं नये.

ग्रंथांत एखाद्या ठिकाणीं तळमळीचा उपदेश असला तर त्याचा मनावर तेवढ्यापुरता परिणाम होतो, नाहीं असें नाहीं; पण मनुष्य शिकवून शहाणा होत नाहीं; तो अनुभवानें शहाणा होतो. म्हणूनच तर सन्तवचनामृतापेक्षां सन्तसमागमाचा महिमा अधिक सांगितला आहे. मनुष्याला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अनुभव पाहिजे, सहवास पाहिजे. वाङ्मयांत त्याला हा जिवन्त व्यक्तींचा सहवास अप्रत्यक्षपणें लाभतो तेव्हां नीतिबोध व्हावा अशी इच्छा असेल तर तीसुद्धां कल्पनासृष्टींतील जिवन्त व हृद्गम्य व्यक्तींच्या सहवासाच्या द्वारांच झाल्यास सफल होईल. एरव्ही नीतीची शिकवणूक फोल आहे. मूर्खाचीं लक्षणें वाचून कोणाला आत्मज्ञान झालें आहे ? वेदान्ताच्या गप्पांनीं कोणाला वैराग्य आलें आहे ? ' शाळेंत जातांना मुलांनीं वाटेंत तमाशा पहात राहूं नये ' हें वर्गांत तोंडपाठ केल्यानें कोणत्या मुलानें निर्भय स्थितींत असतांना इकडे तिकडे पहात कांहीं कुतूहलजनक दिसलें कीं, तेथें थोडा वेळ थांबून, रमतगमत जाण्याचें सांडिलें आहे ?

काव्याला व्यायाम मानणाऱ्यांचीही चूकच झाली आहे. काव्यांतील सारा चटकदारपणा पटायला अर्थ आधीं चट्कन ध्यानांत यायला पाहिजे.तसें व्हायला बुद्धीची ग्रहणशक्ति वाढलेली पाहिजे. ती वाढायला परिश्रमांची आवश्यकता आहे; पण ते परिश्रम न कळत व्हावेत हेंच इष्ट आहे. कविता वाचतांना

तिच्यांतील चटकदारपणा एकदां थोडा पटला कीं, मग तिच्यांतील सारीं सुंदर रहस्यें शोधून काढायला जे परिश्रम पडतील ते वाचक हंसत खेळत करील. कविता ही सरस क्रीडा असावी. क्रीडेंत काय श्रम होत नाहींत? होतात. पण खेळतांना श्रमांची जाणीव होत नाहीं आणि मागाहून त्यांची क्षिति जाचत नाहीं, मन सारखें उल्लसित व रमलेलें राहतें.

आतां कवितेचा रसास्वाद मोठ्या प्रीतीनें चाखतां चाखतां सहजगत्या बुद्धीस मध्यम श्रम पडून ग्रहणशक्ति वाढली, शब्दसम्पत्तींत भर पडली, थोडासा नीतिबोध झाला, कांहीं सुभाषितरत्नें स्मृतिमन्जूषेंत ठेवितां आलीं, प्रसंगविशेषीं वेदांतासारख्या एखाद्या गहन विषयाचें ज्ञान झालें, आणि थोडेंफार पुण्यहि लाभलें असें वाटलें तर या गोष्टी नको आहेत असें नव्हे. पण या गौण हेतूंना प्राधान्य दिलें जाऊं नये. तें दिलें जाऊं लागलें कीं, त्यांच्या सिद्धीसाठीं ज्या कवितांची निवड अपरिहार्यपणें होते त्यांच्यामुळें कवितेविषयीं अरुचि उत्पन्न होते. इतकेंच नव्हे तर काव्याच्या स्वरूपासंबंधीं चुकीचे ग्रह दृढमूल होतात. ज्या काव्यांत स्वधर्मपरायणता नाहीं तें काव्यच नव्हे असें ज्याला वाटतें तो 'शनिमाहात्म्यास' हि काव्य म्हणूं लागतो. देशभक्त हा स्वदेशाच्या वेडगळ व खुळचट स्तुतीलाच कविता मानतो. शिक्षक विचारतो कीं, ज्यांत शिकवावयाला वाव नाहीं तें काव्य कसचें? सुबोध स्वभाव्योक्तीच्या काव्यानें त्याचा धंदाच बसेल अशी त्याला भीति वाटते. करुणाष्टकापेक्षां त्याला निरंजनमाधवाच्या स्तोत्रसंग्रहाची व मोरोपंती रामायणाचीच चाड अधिक असते. चमत्कृति आणि काठिणता हे त्याला काव्याचे मौलिक गुण वाटतात. पद्यरचना म्हणजे सुद्धां ज्यांना एक चमत्कार वाटतो अशा बहुजन समाजाला वाटतें कीं वृत्त जितकें दुर्घट, तितकी त्यांतील रचना अधिक काव्यमय. गायनही याप्रमाणें जितकें नीरस व क्लिष्ट तितकें तें अधिक शास्त्रीय! पौराणिक वा क्वचित ऐतिहासिक आख्यानाचें खोकें घेऊन तें वृत्तबद्ध शब्दसंग्रहानें गुण्डाळून अगडबंब बनविलें, आणि कांहीं शब्दार्थालङ्कारांनीं व पांडित्याच्या टिकल्यांनीं सजविलें कीं, झालें मूर्तिमंत काव्य! तें वाचून हृदयाला कांहीं संवेदना झाली नाहीं तरी चिंता नाहीं.

बहुमान सदा सावरि साधू निका महित सज्जन व नौका
बहुमानस दासावरि साधुनि कामहित सज्ज नव नौका

—मोरोपंत

सं. मं. 1870
रेखाचित्र प्रत

अथवा

धरा धराया महती समान
धरा धरा या मह तीसमान
धरा धरायाम–हतीस मान
धराधरा या महती समान

—राघारमण

अथवा

भूषा-भुंजग भक्ता-भीतिद भव्यप्रभाव भुज भार
भावी भयें भवानीभर्ता भगवान भुले भला फार

—मोरोपन्त

अथवा

न दिसे अग नगं मग तग गगनीं खग नीच काय काढील ?

—मोरोपन्त

अशा कष्टसाध्य गमती असल्या, पद्यपर्वत सह्याद्रीसारखा प्रचंड (व रुक्ष) असला वा अर्णवाप्रमाणें अफाट (व लावण्ययुक्त) असला कीं' झाले बहु होतील बहु, आहेतही बहु, परंतु यासम हा !' अशी झाली प्रशस्ति म्हणून समजावी. मग त्या पर्वतप्रसारांत रसाचा–जवितं रसाचा–झरा किती का दुर्मिळ असेना ? जेथें निरोष्ठ सेवन व्हावयाचें आहे तेथें रस अगोचरच असलेला बरा नाहीं का ? खरोखर प्राचीन व अर्वाचीन पद्यसम्भारापैकीं किती थोडा भाग उत्कृष्ट सरस, काव्यमय आहे आणि काव्यानन्दासाठीं जाणिवेनें त्याचा रसास्वाद किती थोडे लोक घेत आहेत हें पाहिलें कीं, लोकांना काव्याभिरुचि नाहीं व जी थोडी आहे ती विकृत झालेली आहे हें खेदानें व निरुपायानें मान्य करणेंच प्राप्त होतें.

काव्याच्या नांवावर विकणारें बहुतेक पद्य रुक्ष, नीरस व क्षुद्र असल्यामुळें परंपरेतील कांहीं स्वार्थी भगतांविना इतरांना त्याच्याविषयीं मुळींच जिव्हाळा वाटत नाहीं. आज जरी प्रवेशपरीक्षेच्या पुढेंमागें असणाऱ्या नवव्ययस्थ लोकांत आधुनिक कवितेविषयीं आवड अधिक दिसत असली तरी या रसिकांतील पुष्कळ स्वतःच कवि असतात. म्हणजे ती आवड व्यवसायमम्त्वा-

मुळें असते. इतरांच्यामध्यें ती आवड म्हणजे नववयाची एक अल्पजीवी लहर असते. पद्यरचनेचा द्राविडी प्राणायाम हा क्षणभर जरी कुतूहलजनक वाटला तरी एकंदरीनें तो कोणालाही क्षम्य पण रिकामटेकडेपणाचा व्यवसाय वाटणार. व्यावहारिक लोकांना, मराठी वाङ्मयाच्या सध्याच्या मंदीच्या काळांत पद्यलेखनच काय लघुकथालेखनही अर्थप्रद नाहीं म्हणून व्यर्थच वाटणार. पण लघुकथालेखकांनीं स्वतःच्याविषयीं भलभलत्या हास्यास्पद कल्पना करून घेतल्या नाहींत.

वेडगळपणावर साधुत्वाचा छाप मारवून घेऊन प्रतिष्ठा मिळविणें हिंदुस्थानांत फार सोपें आहे. पण ही युक्ति कवींच्यापैकीं क्वचितच कोणी करून पाहिली आहे. सन्तपरंपरेंत प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न न करितां ते अलौकिकत्वाची ऐट मिरवूं पाहतात, यामुळेंच कीं काय, त्यांच्याविषयीं जी तुच्छता लोकांन । अन्तर्यामीं वाटते, तीस तीव्रता येते. उत्कृष्ट कवींना जी प्रशंसा कदाचित् शोभूं शकेल ती हे पद्यकार अंगावर मिरवितांना पाहून त्यांच्याविषयीं आदर वाटणें शक्य नाहीं. जी गोष्ट सरळ सुबोध गद्यांत सांगितली असतां सहज कार्यभाग होईल ती पद्यांत दुर्बोध करून सांगणाऱ्या पद्यकारांना वाटतें कीं, हा व्यापार जर बंद पडला, तर जगत्उद्धाराचें कार्य अडून राहील. आम्ही शब्दसृष्टीचे ईश्वर आहोंत. आम्ही जगाचे दक्कोन आहोंत आमचा संचार शास्त्रज्ञांच्या, तत्त्वज्ञांच्या पलीकडे दिक्कालानें अप्रतिहत अशा ठिकाणीं आहे. अनंताला गवसणी आम्हींच घालू शकतों. "आम्हांला वगळा गतप्रभ झणीं होतील तारांगणें" आम्ही स्वयंभू अवतरतों. "आमचे उद्गार म्हणजे हृदयस्थ ईश्वराचेच उद्गार होत." "आम्ही कोण म्हणूनि काय पुसतां ?" याला उत्तर "आम्ही वेडे" असें या बहुतेक कवींनींच आत्मबोधाच्या स्फूर्तींत देऊन ठेविलें आहे म्हणून बरें आहे. आपल्या स्पष्टोत्तराचें कारण नाहीं अशा आत्मप्रतिष्ठेची जाणीव ठेवणारा एखादा द्योतकरू पद्यकार जेव्हां वस्तुतः खुळचट, विक्षिप्त, मेषपात्र व कर्तृत्वशून्य असा आढळतो तेव्हां त्याची सम्भावना मनांतल्या मनांत कशी होत असेल याचा विचारच करणें बरें.

या भ्रामक कल्पनांनीं कवींनीं आपलें हंसें करून घेतलें आहे येवढेंच नव्हे तर आपल्या प्रगतीचा सम्भवहि नष्ट करून टाकला आहे. कवीला ज्ञानाची,

व्यासंगाची, परिश्रमाची कांहीं आवश्यकता नाहीं. कारण, कवि हा स्वयम्भू रससिद्ध असतो. स्फूर्ति झाली, प्रतिभेचें वारें संचरलें कीं, काव्यें आपोआप बाहेर पडतात. प्रतिभा ही ईश्वरी आहे. तिच्या वाग्विलासाचें कवि हें केवळ एक माध्यम, एक निमित्त आहे. जणूं काय कवि म्हणजे प्लॅञ्चेटवर बोटें टेकून बसलेला एक स्वेच्छाशून्य प्राणीच ! प्रतिभा ही वाटेल त्याच्या द्वार आपले उद्‌गार प्रकट करील. ज्ञानेश्वरानें नाहीं का रेड्याकडून वेद वदविले ?

ईश्वरी शक्तीचें विलसित हें निर्दोष व जन्मसिद्ध सौन्दर्यानें युक्त असें असलेंच पाहिजे. स्फूर्तीच्या आवेगांत जी निर्मिति झाली, ती प्रातिश्रुतिच ! तिचें परिष्करण करणें म्हणजे हंसाला सफेता लावण्यासारखें आहे. तिच्यांत कोणाला कांहीं दोष आढळला तर तो बघणाऱ्याच्या दृष्टीचा विकार म्हटला पाहिजे. कवितेंत कदाचित् अर्थाचाहि पत्ता न लागण्याचा संभव असतो. "ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति." गूढगुंजनांत तर वागर्थांची अशीच शिवाशिवी चालू असते. "व्यर्थी अधिक अर्थ असे;" पण त्याचा शोध काढायला मनुष्य अधिकारी पाहिजे. वैय्याकरण, छन्दःशास्त्री, साहित्य-समीक्षक यांची सत्ता जर कवींवर चालली तर "निरंकुशाः कवयः" याचा काय अर्थ ! कवि स्वतःसाठीं लिहितो, त्याला इतरांच्या स्तुतिनिंदेची क्षिति नाहीं. आणि आम्ही 'नव-नवोन्मेषशालिनी प्रतिभे'चे प्रभु ही ज्यांची ऐट ते वस्तुतः अंतरूर्मीवर तरंगतांना दिसत नाहींत; तर जी नवी टूम निघेल व यशस्वी होण्याचा संभव दिसेल तिचें अनुकरण करितांना दिसतात. वर्डस्वर्थ, शेलीच्या कल्पना आणूं, का निसर्गाशीं तादात्म्य झाल्याचीं गीतें गाऊं, विश्वव्यापी अतिशयोक्तीनें आत्मप्रौढी मारूं, का गूढगुञ्जन करूं, शाहिरी शब्दांच्या पेरणीनें शब्द-विलास दाखवूं, का राष्ट्रीय गाणीं गाऊं, आणि सुनीत गज्जल रचूं, का जानपद भाषा वापरूं, का अभिनव चालीवर कविता रचूं, का विडंबन करूं, का समाजसमतावादी पद्यें लिहूं, काय करूं म्हणजे लोक मला कवि म्हणतील या विचारांत कवि आढळतात. एकानें तुतारी वाजविली कीं, दुसऱ्यानें शिंग वाजविलेंच, तिसऱ्याचा चौघडा सुरू झालाच, तर चौथा कबूनाद करूं लागतो, एकूण काव्याचा ध्वनि नव्हे तर महाध्वनि होतो !

वस्तुतः वाग्वैजयन्त का चिद्घन चपलेच्या क्षाणिक स्फुरणासरशीं अस्तित्वांत आले आहेत? कलेचें कैलासलेणें का अशिक्षित कल्पना कोरूं शकली आहे! प्रतिभेला, उपजत योग्यतेला, योजकतेला जेव्हां खडतर परिश्रमाची जोड मिळते तेव्हांच उत्कृष्ट, भव्य आणि दीर्घायु अशा कलाकृति निर्माण होतात.

प्रतिभेची उणीव अभ्यासानें कॅव्हांहि भरून निघूं शकत नाहीं.

प्रतिभा ही जरी निसर्गदत्त असते, ती जरी कष्टसाध्य नाहीं, तरी ती संस्कारक्षम व विकसनशील नसते असें नाहीं. स्वानुभवानें आणि ज्ञानार्जनानें, म्हणजे भिन्नभिन्न स्थळीं व काळीं होऊन गेलेल्या व्यक्तींच्या अनुभवांचें सार ग्रहण करण्यानें प्रतिभा परिणत होत जाते. मूळ कल्पना ही कशी सुचते हें गूढ आहे. पण त्या कल्पनेला मूर्तस्वरूप द्यायला जें कर्मकौशल्य लागतें तें कष्टाविना, दीर्घव्यासङ्गावांचून सिद्ध होत नाहीं. चित्रकार, मूर्तिकार, नृत्यकार, गवयी कोणीहि दीर्घ परिश्रमावांचून आपल्या कलेंत निष्णात होत नाहीं. पण कोणी म्हणेल कीं, काव्य म्हणजे कांहीं हस्ताक्षर नव्हे, कीं कित्ते गिरवून आणि खर्डे काढून तें वळणदार व्हावें. काव्यरचना तर मनांतच सिद्ध होते आणि स्फुरित कल्पना ही मूर्तस्वरूप धारण करूनच बाहेर पडते. तथापि या मूर्तस्वरूपावर मागाहून संस्कार करितां येत नाहीं असें नाहीं. तसेंच ज्या मनांत हें मूर्तस्वरूप सिद्ध होतें तें स्वतःच संस्कारक्षम असल्यामुळें, जननीच्या प्रकृतीचा जसा गर्भावर परिणाम होतो तसाच प्रकार काव्योत्पत्तीच्याही बाबतींत होतो व कवीच्या मनावरील संस्कार अपरिहार्यपणें कवितेंत उतरतात. कवीच्या अभ्यासाचा, ज्ञानाचा व अनुभवांचा परिणाम कवितेवर असा अप्रत्यक्षपणें पण निश्चयानें होतो. काव्य हें कवीला ज्ञात असलेल्या गोष्टीचेंच एक नवीन रसायन असतें.

मग स्फूर्ति ही काय चीज आहे? एखादी अभिनव क्रिया प्रथम साध्य होतांक्षणींच नादावून जाऊन कांहीं कालपर्यंत ती सफाईनें करितां येऊन तिच्यांतील नाविन्य नाहींसें होईपर्यंत ती पुनःपुनः करीत राहणें हा मनुष्यस्वभाव आहे. ती क्रिया करायला श्रम थोडे पडत नाहींत; पण त्यांची जाणीव नादाच्या भरांत रहात नाहीं. उदाहरणार्थ, लहान मुलाला प्रथम उभें रहातां आलें कीं, त्याला उभें रहाण्याचा नादच लागतो.

मग कितीदां तें पडलें, त्याला कितीहि परिश्रम झाले तरी त्याच्या खिसगणतींत नसतें. आरंभीं आरंभीं पद्यकाराची अशीच स्थिति होते. पद्यरचनेचाच त्याला चमत्कार वाटतो; आणि तो न कळत परिश्रम घेऊन निरनिराळ्या विषयांवर बहुतांशीं अनुकरणपर अशी पद्यरचना करितो. या वेळीं स्फूर्ति प्रबल असते असें त्याला वाटतें. दृष्टि संकुचित आणि तीहि 'दोषांचेही गुण करणाऱ्या' ममत्वानें विकृत झालेली; मग त्या वेळीं आपल्या कृतीचें फाजील महत्त्व वाटून त्याचा उत्साह अभंग राहिल्यास नवल तें काय! एखादी गोष्ट करण्याचें मनांत आलें कीं, ती करायला लागणारी तत्परता तेव्हां शरीराच्या व मनाच्या निकोपतेमुळें सिद्धच असते. येयें स्फूर्ति म्हणजे केवळ नादिष्टपणा व तनुमनाची हुशारी यांची युति होय असें म्हणतां येईल.

जसजसा काळ लोटतो तसतशी ही स्फूर्ति क्षीण होते. दृष्टि व्यापक होऊन तुलनेनें आपल्या कृतीची हीनता पटूं लागली कीं नादिष्टपणा कमी होतो. चरितार्थासाठीं अधिक निकडीच्या गोष्टी करण्यांत काळ आणि शक्ति यांचा व्यय होऊं लागला कीं, रिकाम्या वेळीं स्वस्थ पडावेंसें वाटतें. मूळ प्रवृत्तीच जर प्रबळ असली तर तुलनेनें सुधारणेची दिशा दिसून त्या दिशेनें प्रयत्न होऊं लागतात. विविध कृतींच्या तौलनिक अभ्यासानें हृदयंगम काव्य कसें असावें याचें अप्रत्यक्ष शिक्षण मिळतें, आणि अभ्यासानें सफाईदार पद्यरचना करिता येऊं लागते. दीर्घाभ्यासानें मोरोपन्ताप्रमाणें शब्दश्रीमंत व पद्यप्रभु होतां आलें तरी, होणारी रचना कितीहि चमत्कृतिजनक झाली तरी ती स्वतंत्र, पृथगात्म होईलच असें नाहीं. निसर्गदत्त प्रतिभेच्या अभावीं कष्टसिद्ध कर्मकौशल्याच्या बळावर जी रचना होते ती उघडपणें अनुकरणपर अशी जरी नसली, आणि लेखनतंत्रान्वयें पाहतां कितीहि ठाकाठिकीची ती दिसली, तरी ती कोणताच खोल परिणाम करूं शकत नाहीं. या तऱ्हेचें पुस्तक आगगाडींत कंटाळवाणा वाटणारा वेळ घालविण्यापुरतेंच वाचून, फेंकून देण्याच्या योग्यतेचें असतें. प्रत्यहीं उत्पन्न होणाऱ्या पुस्तकांपैकीं बहुतेक याच प्रतीचीं असतात. उलट-पक्षीं, स्फुरलेली कल्पना कोणतें रूप धारण करील हें लेखकाच्या संस्कारावर व ज्ञानावर अवलंबून असल्यामुळें ललितलेखनाच्या अभ्यासाच्या म्हणजे कर्मकौशल्याच्या अभावींही अंगीं प्रतिभा असल्यास जी कृति निर्माण होते ती सदोष असूनही फार परिणामकारक होऊं शकते. हे दोष परिष्करणानें

दूर होण्याजोगे असतात. आणि त्यांच्यामुळें कितीही सौंदर्यहानि झाली तरी ती कृति जिवंत व चटकदार वाटल्यावांचून रहात नाहीं. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या कादंबऱ्यांतील कित्येक संस्मरणीय स्थळें या विधानाची सत्यता पटवितील. पण जिवंत सर्वांगीण सुंदरता हें कलेचें उद्दिष्ट असल्यामुळें अशा सदोष कृति जिवंत व संस्मरणीय असल्या तरी त्यांची कलेच्या उत्कृष्ट विलासितांत गणना होऊं शकत नाहीं.

हीं प्रतिभेचीं विलसितें कशीं निर्माण होतात? अनिच्छया अन्तरूर्मि उठून ती अनिवार्य होऊन बाहेर पडते काय? होय, असें वैरल्यानें पण केव्हां केव्हां घडतें खरें! डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकरांसारखा लेखक असेंच सांगतो कीं, पैक्याची अडचण होती, एका ग्रंथकाराकडून कादंबरी लिहून द्या म्हणून मागणी आली, तेव्हां द्रव्यार्जनाकरितां कांहींतरी ठोकळ संविधानक योजून निश्चयानें लेखन सुरू केलें. जात्यावर बसलें कीं जशी ओवी सुचते त्याप्रमाणें निश्चयाने मेजाशीं लिहायला बसलें कीं कथा सुचते. पण हें सहेतुक मारून-मुटकून लेखन करितांकरितां मध्येंच मन रंगतें आणि प्रतिभा चमकून जाते. प्रत्येक परिणामकारक लिखाणांत कांहीं भाग असा असतो कीं, तो तसा कसा वठला याचें लेखकांसच मोठें गूढ पडतें व तो भाग कांहींतरी केवळ समाधींत लिहिला गेला असावा असें तो म्हणतो. पण एखादी कृति, विशेषतः भव्य कृति ही केवळ समाधींत सामग्र्यानें अवतीर्ण झाली असें क्वचितच घडतें. ती अंशतः सहजस्फुरित व स्वाभाविक असते आणि अंशतः बुद्धि-घटित व कृत्रिम असते. निश्चयानें परिश्रम केल्याविना ती पूर्ण होत नाहीं. आतां वयपरत्वें एक प्रकारची निवृत्ति, विमुखता येते. एखादी उत्कृष्ट कल्पना सुचूनहि तिला मूर्तस्वरूप देण्याचे कष्ट घ्यायला मन पुढें होत नाहीं. कृतीस प्रवृत्त करणारी तनुमनस्थिति नसते. अशाहि स्थितींत अंतःक्षोभ जर अनिवार्य असेल तर तोच कार्यप्रेरक होतो आणि दिसायला अगदीं प्रतिकूल अशा स्थितींतहि कलानिर्मिति होत असते. कारण तसें केल्यावांचून जीवाला हलकें वाटतच नाहीं. परंतु एरव्हीं कर्तव्यनिष्ठा तीव्र नसल्यास फक्त आळस झाडा-यला, निवृत्ति उडायला यशाची व अर्थाची लालूच लागते. म्हणून "काव्यं यशसेऽर्थकृते" असें म्हटलें आहे. या रीतीनें यशासाठीं वा पैक्यासाठीं

लेखनक्रिया चालूं झाली कीं, प्रतिभा असल्यास ती जागृत होऊन आपलें गूढ दिव्य कार्य करून जाते.

कोणत्याहि कलाकृतींत स्फूर्ति आणि सहेतुक परिश्रम यांचा संगम असतो. कोणत्याहि महाकवीच्या प्राथमिक कविता बघायला मिळाल्यास त्या कमी-अधिक अनुकरणपर किंत्तेगिरवणुकीच्या आहेत असें दिसून येईल. आणि त्याच्या उत्कृष्ट कवितांचीं मूळ हस्तलिखितें बघायला मिळतील तर त्यांत त्यानें मागाहून विचार करून कशा सुधारणा केल्या आहेत हें दिसून येईल. टेनिसन-सारखा इंग्रजी कवीच काय, पण मी शारदेचाच कानमंत्र अनुवादित आहें अशी प्रौढी मारणारा केशवसुतही वारंवार आपल्या कवितांवरून हात फिरवितांना दिसतो. टॉल्स्टॉयच्या जगद्विख्यात कादंबऱ्यांच्या हस्त-लिखितांत मुद्रणापूर्वी कितीतरी फिरवाफिरव व संस्करण होत असे. अनायासें व अनिच्छया सहज स्फूर्तीनें जें बाहेर पडेल तेंच कलायुक्त असा आग्रह धरल्यास, आपल्या चोखंदळ मनाचें पूर्णपणें समाधान होईपर्यंत चित्रावरून कुंचली फिरवीत राहणाऱ्या चित्रकाराच्या चित्रांची कलाभुवनांतून हकाल-पट्टी करावी लागेल. दुसऱ्याचा हात कितीहि कोमल कौशल्यानें नटला असला तरी त्यानें आपल्या कवनाला स्पर्श करण्यापेक्षां जीव गेलेला बरा असें म्हणण्यांत स्वाभिमान स्पृहणीय आहे यांत शंका नाहीं; पण अशा स्वाभिमानी कवीनें सर्वांगीण निर्दोष सौंदर्य हें ध्येय पुढें ठेवावें. स्वतःच स्वतःच्या कृतीचें परीक्षण करावें, दुसऱ्यांच्या टीकांचा योग्य तो विचार करावा आणि आपली कृति कलापूर्ण करावी, म्हणजे मूळ कल्पनेची विकृति तर होणारच नाहीं, उलट तिचें स्वरूप अधिक सुंदर होईल. एखाद्याच्या कृतींवर दुसऱ्यानें हात फिरवूं नये या सर्वमान्य नियमालाही कांहीं प्रतिभासंपन्न लोक अपवाद मानिले पाहिजेत. आदर्शभूत ग्रंथाचेंही भाषान्तर करतांना वाटेल ते फेरफार करण्याचे अधिकार जर अनुवादक बजावतात तर ज्यांच्या अंगीं वानराचा विनायक बनविण्याचें सामर्थ्य आहे त्यांनीं दुसऱ्यांच्या सामान्य नीरस कृतींवरून आपली संजीवनी लेखणी फिरवून तींस सुंदर पृथगात्मता कां देऊं नये ? ही आकृति होत नाहीं, ही स्वतंत्र निर्मितीच असते. मागाहून परिष्करण कर-ण्याची आवश्यकताच पडूं नये अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं आधींच

अशी तपश्चर्या करावी कीं, सहजस्फुरित अशी जी कृति निर्माण होईल ती क्षीरसागर—कन्यकेप्रमाणें जन्मसिद्ध सौंदर्यानें व निर्दोष वैभवानें युक्त अशीच असेल.

घोक्याच्या दोन सूचना ध्येयें देऊन ठेवणें अगत्याचें आहे. ज्या मनःस्थितींत प्रथम कृति निर्माण झाली त्या मनःस्थितींत जर पुन्हां जातां येण्याजोगें असलें तरच किरकोळ शाब्दिक सुधारणा करण्याच्याहि पुढें जाव. नाहीं तर सुधारणेच्या भरांत विसंगति उत्पन्न होण्याची भीति असते. त्याचप्रमाणें कलावंतानें जें ज्ञान मिळवावयाचें तें अप्रत्यक्षपणें विविध कृतींच्या तुलनेनें झालेलें बरें. त्यानें अमुक एका मताच्या संप्रदायांत शिरूं नये. सांप्रदायिकांची कृति स्वतंत्र होणें दुर्घट असतें, तरी दुसरी भीति अशी असते कीं, दृष्टि पृथक्करणशील व भेदैकलक्षी झाली कीं, योजक कल्पकता नष्ट होण्याचा संभव असतो. या अतिविचिकित्सक प्रवृत्तीचा परिणाम कल्पनेवरच नव्हे तर रसिकतेवरहि प्रतिकूल घडतो. आधुनिक हिंदी गणितशास्त्रज्ञ रामानुजम् यांची स्फूर्ति, कल्पना हीं शास्त्राच्या तर्कशुद्ध अभ्यासानें नष्ट तर होणार नाहींत अशी भीति त्यांचे गुरु प्रो. हर्डी यांना पडली होती आणि वयाच्या तीस वर्षांपर्यंत ज्या डार्विनला काव्य वाचून मोठा आनंद होत असे त्याला पुढें कवितेची एक ओळहि वाचणें असह्य झालें, आणि शेक्सपियर तर इतका नीरस व असह्य वाटला कीं, त्याला त्याची शिसारीच बसली.

आम्ही स्वतःसाठीं लिहितों; इतरांची आम्हांला पर्वा नाहीं या आत्मप्रौढींतही कांहीं अर्थ नाहीं. "दृष्टीविना दृश्य करील काय" अशी उलट पृच्छा एका कवीनेंच केली आहे. यश अथवा अर्थ संपादन करण्यासाठीं नव्हे तर केवळ आत्म—प्रकटन, मन मोकळें करण्यासाठीं जरी रचना केली असेल तरी कोणाला तरी ती वाचून दाखवून त्याची उक्त वा अनुक्त सहानुभूति मिळविल्याविना समाधानाची पूर्तता होत नाहीं. एखाद्याला बहुजनांची स्तुति हवी असेल तर दुसऱ्याला विशिष्ट वर्गाच्या सहानुभूतीचेंच महत्त्व वाटेल. आपल्या डोळ्यांदेखत आपल्या कृतींचें कौतुक झालें नाहीं तर डोळे मिटल्यावर पुढें केव्हां तरी तें होईल अशी आशा असते. म्हणूनच कवि "कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी" असे उद्गार काढतो. कविता ही एक हृदयाची हांक आहे. तिला उत्तर मिळावें अशीच प्रत्येक कवीची

इच्छा असते. कविता जर वाचली जाऊं शकत नाहीं तर ती कितीहि चमत्कृतिमय व शब्दसंपन्न असली तरीही ती असून नसून सारखीच होय.

ज्या भाषेंत कवि रचना करितो ती एकट्याची नसून लोकांचीहि असते. तिचे जर तो हाल करूं लागला तर त्याला लोकांची सहानुभूति कशी मिळणार ? त्यानें स्वतःला क्रांतिकारक सुखेनैव म्हणवून घ्यावें ! बहुजनसमाज अशिक्षित आहे आणि भाषेस सुसंघटित स्वरूप प्राप्त झालेलें नाहीं, अशा स्थितींत साधारण लेखकाचीसुद्धां भाषा आदरणीय व अनुकरणीय ठरते. ही स्थिति बदलल्यानंतरही असामान्य प्रतिभेच्या लेखकाच्या भाषादोषाकडे कृतज्ञ बहुजनसमाज डोळेझांक करितो. इतकेंच नव्हे तर त्याच्या कांहीं विक्षिप्त वाक्प्रकारांचें, कदाचित् त्यांतच त्याचें वैशिष्ट्य असेल अशा भ्रांतीनें अनुकरण होतें. परन्तु अशा रीतीनें त्यांच्या विक्षिप्त वाक्प्रयोगांना अल्पायुषी चलन मिळालें तरी तेवढ्यानें भाषेंत फारशी क्रांति होऊं शकत नाहीं. सार्वत्रिक शिक्षण आणि शान्तता यांच्या काळांत समाज साधारणपणें स्थितिनिष्ठ व नवविद्वेषी असतो, तेव्हां तेव्हां वाङ्मय विरुद्धींचा स्वैरपणा समाजास थोडा रुचला व पचला म्हणजे लेखनलटपटयांचाही पचेल अशी आशा घरणें व्यर्थ आहे. काव्यकिरीटींचीहि सत्ता जेथें मर्यादित आहे तेथें पद्यपाईकांची प्रतिष्ठा ती किती ?

पण याचा अर्थ कवीनें भाषेंत क्रान्ति घडवून आणण्याचा विचारच करूं नये असा नाहीं. जेणेंकरून भाषा आपल्या वाढत्या गरजा भागविण्यास स्वतः समर्थ होईल, नवनव्या कल्पना प्रगट करण्यास लागणारे नवनवे शब्द निर्माण करण्याची शक्ति, निसर्गशक्ति तिच्यांत येईल, अशा रीतीनें त्या भाषेचें संगोपन करणें हें प्रत्येक लेखकाचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य पाळण्यापासून लेखकाचीही प्रकटनशक्ति वाढेल. काम भागविण्यासाठीं येतील त्या शब्दांचा उपयोग करणें हें असंस्कृत अशिक्षित मनुष्याचें काम आहे. संस्कृतांतून उचलावयाचा शब्दही पारखून घ्यायला पाहिजे. बङ्गाली–हिंदींत मौलिक शब्द Original या अर्थी वापरतात म्हणून मराठींत तसा तो वापरणें न्याय्य होणार नाहीं. Original हा शब्द इंग्रजींत origin पासून निघाला असला तरी त्याचा अर्थ अमूल असा आहे ! अर्थात् ' अमूल ' हा प्राचीन शब्द असतांना, ' स्वतंत्र ' हा रूढ

आधुनिक शब्द असतांना, ' मौलिक ' (मूलासंबंधीं) हा शब्द विपरीतार्थानें वापरणें हें असमंजस हटवादीपणाचें द्योतक आहे. गुरुकिल्ली, गूढवाद, नक्राश्रु, नाट्यगीत इत्यादि शब्द याच मानसिक दास्याचे द्योतक आहेत. कवि हे जर शब्दसृष्टीचे ईश्वर असतील तर त्यांनीं अशा शब्दांची निर्मिति व योजना केली पाहिजे कीं जी चिकित्सक अचिकित्सक दोघांनाही पटली पाहिजे. योडींशी दुर्बोधता पत्करूनहि भाषेची सेवा कवींनीं व साहित्यसेवकांनीं करावीच अशी दूरदर्शी लोकांची अपेक्षा आहे.

काव्य लिहायला लागणारी प्रतिभा ही लघुकथा, कादंबरी, नाटक इत्यादि ललित लेखनाचे इतर प्रकार रचायला लागणाऱ्या प्रतिभेहून वेगळी नाहीं. लघुकथा, नाटकें, कादंबऱ्या हीं सरस निपजल्यास लेखकास कीर्ति व धन दोहोंचाही लाभ करून देतात; तीं नीरस टाकाऊ असल्यास आपोआप मागें पडतात, नष्ट होतात. त्यांना धर्मश्रद्धेचा वा सङ्गीतचा पाठिंबा नसल्यामुळें त्यांची योग्यता त्यांच्या केवळ वाङ्मयगुणांवरून ठरविण्यांत येते. गचाळ कादंबरीकार वा नाटककार यांच्या कृतींकडे दुर्लक्ष होईल; पण तो व्यक्तिशः उपहसनीय होत नाहीं. कारण कवीतर ललितलेखक हे प्रभुप्रसादाचा, अलौकिकत्वाचा हक्क सांगतच नाहींत. ईश्वरी प्रेषितत्वाचें सोंग ते आणीत नाहींत व त्यासाठीं त्यांना विक्षिप्तपणाचे चाळेही करावे लागत नाहींत. उलट कवितेचें खेरें मोल प्रकाशक किती करितात हें नुकत्याच घडलेल्या पुढील प्रकारावरून कळेल. चित्रशाळेच्या स्फूर्ति मासिकाच्या सम्पादकाकडून स्फूर्तीच्या घोरणाचा जो मुद्रित खुलासा मला केलेल्या लेखनाविनंतीसंगें करण्यांत आला आहे त्याचीं शेवटलीं दोन वाक्यें पुढीलप्रमाणें आहेत. " लेखकांस योग्य तो मोबदला दिला जाईल; कवितांना मोबदला मिळणार नाहीं " जणूं काय कवि हा लेखकच नव्हे !

काव्यांत असें कांहीं आहे काय कीं जें गद्यांत व्यक्त करितांच येणार नाहीं ? काव्यांत असें कांहीं नाहीं कीं ज्याच्यापुढें गद्य लटकें पडेल. संस्कृत साहित्यकार आपल्या काव्याच्या व्याख्यांत पद्याचा नामनिर्देशही करीत नाहींत. रसात्मक वाक्य, रमणीयार्थ प्रतिपादक शब्द म्हणजे काव्य असें ते म्हणतात. पद्याच्या नियमित आंदोलनामुळें कानाला सुख होऊन वाचकाला एक प्रकारची गुंगी येते; त्या गुंगींत त्याची व्यावहारिक शक्याशक्यता

पाहण्याची मति निष्क्रिय होऊन कल्पनासृष्टीतील आभास वास्तव वाटण्यास साह्य होतें. हें सारें खरें; तथापि काव्याची रमणीयता मूलतः अर्थावर अवलम्बून आहे, हें केव्हांही दृष्टीआड होतां कामा नये. शब्दांच्या अर्थच्छटा परस्परांचा प्रभाव वाढवून कल्पनेला पोषक होतील, अशा रीतीनें शब्दांची निवड व योजना करणें हें ललितलेखनाचें मूलतत्त्व आहे. याचा व्याकरणाशीं जितका संबंध तितकाच पद्यरचनेशीं. परंतु काव्य हें बहुशः पद्यांत असतें; कारण पद्य ही जणूं काय रसार्क अक्षय ठेवण्याची एक कुपी आहे. गद्यांत ललितलेखन करणाऱ्याला आपल्या विषयाची मांडणी विस्तारानें करितां येते. तितकी ती सुबोध झाल्यामुळें वाचकाला, विस्तार असूनहि त्या विषयाचें आकलन सुलभतेनें व त्वरित करितां येतें. कादंबरीइतक्या त्वरेनें काव्य वाचतां येत नाहीं; गद्य वाचावयाला पूर्व तयारी फारशी लागत नाहीं, पण गद्यांत एक दोषही आहे. विस्तार आणि अनियमित आंदोलन यांच्यामुळें प्रकरण स्मृतिगत राहूं शकत नाहीं. कर्मयोग कादंबरींतील चंद्रशेखरानें कॉलेजचा निरोप घेणें हें सर्व प्रकरण नितांतरम्य आहे. परन्तु त्याच्या रमणीयतेवर रोमन्थ करूं म्हटलें तर किती वाक्यें स्मृतींत राहिलेलीं असतात ! पद्य या बाबतींत मोठें सोयीचें असतें. पण तारेच्या भाषेप्रमाणें, वा शब्द सोडलेल्या घड्याप्रमाणें तें वाचायला फार नाहीं, पण थोडी तयारी लागतेच. ज्या ज्या गोष्टी अध्याहृत वा ध्वनित असतात, त्यांचा बोध त्वरित व्हावा लागतो. पद्य हें सरस वाङ्मयाचें आयुष्य वाढवूं शकतें; पण तें स्वतः चैतन्य देऊं शकत नाहीं. पद्यरचना ही जरी फारशी काठिण नसली तरी विचाराचा ओघ खंडित होऊं न देतां, थोडक्यांत थोडके शब्द व प्रसङ्ग घेऊन ललित गद्याइतकी परिणामकारक रचना करणें सोपें नाहीं. पद्यरचना करितां आली तरी कित्येकांच्या मनःप्रवाहाला पद्यांचा पाय जाचक होतो. श्रीयुत वि. स. खांडेकर यांची पद्यरचना शुद्ध व नेटकी असली तरी त्यांचा विशिष्ट वाग्विलास गद्यांतच पहायला मिळतो.

काव्याच्या उत्कर्षास व कवींच्या प्रतिष्ठेस बाधक होणाऱ्या भ्रामक समजुतीचें येथवर निराकरण केलें. हें करितांना कोणास बोंचेल असा एखादा शब्द तोंडांतून गेला असल्यास त्यानें उदार अंतःकरणानें क्षमा

करावी. काव्य कशास म्हणावें याची तात्त्विक चर्चा मी करीत नाहीं. प्राचीन व अर्वाचीन ग्रन्थांतून याचा ऊहापोह सविस्तर करण्यांत आला आहे. आधुनिक मराठी कवितेचा आढावा घेऊन कवींचा गुणानुक्रम मी लावावा अशी कोणाची अपेक्षा असेल; पण हें काम मयंकर कठिण व नाजूक आहे. तें एखाद्या रसिक कवीतरानें केलेलें बरें. या प्रकरणीं मी एवढें सांगूं शकेन कीं, मराठी कवितेचें पाऊल भावगीताच्या क्षेत्रांत निःसंशय पुढें पडलें आहे. पण अनुकरणाप्रियतेचा प्रभाव जिकडे तिकडे दिसून येतो. उत्कृष्ट भाषांतराचीहि मोठी उणीव आहे. उमर खय्यामच्या भाषान्तर-रूपान्तराची एक लाटच उसळलेली दिसते. पण इंग्रजी वाङ्मयांतील इतर उत्कृष्ट काव्यांचें भाषांतर करण्याचें काम कोणी अंगावर घेत नाहीं. इंग्रजी काव्याशीं मराठी कवितेचा संबंध वर्डस्वर्थ शैलीच्या थोड्या भावगीतांपुरताच आलेला दिसतो. इतर आधुनिक भाषांतील काव्यें तर दूर राहोतच पण इंग्रजी वाङ्मयांतील उत्कृष्ट काव्याचा एक सहस्रांशही अद्याप मराठींत सुन्दर भाषांतराच्या रूपानें येऊं नये हें दुर्दैव आहे. सारेच हौशी लेखक प्रतिभासंपन्न नसतात. सामान्य हौशी रसिक लेखकाला भाषांतरासारखी निस्वार्थ साहित्यसेवा नाहीं. अनुकरण करणाऱ्यांना तर भाषांतराची लाज मुळींच वाटूं नये. मी भाषान्तरें केलीं आहेत आणि मला हा व्यापार नीच वाटत नाहीं. जें आपल्याला उत्कृष्ट व जिव्हाळ्याचें वाटतें त्याचें भाषान्तर करण्यांत खरोखर आनन्द आहे. हें अतिशय कष्टाचें काम असलें तरी मूळांत जर आपल्याला मोठा आनंद वाटत असला तर भाषान्तर म्हणजे एक खेळ वाटतो. कष्ट कमी पडत नाहींत, पण त्यांची जाणीव होत नाहीं. पद्य-रचनेची हौस आहे, दांडगा उत्साह आहे तर महाराष्ट्र कवींनीं अनुकरण सोडून भाषांतर हातीं घ्यावें. उत्कृष्ट भाषांतरानें अप्रत्यक्षपणें स्वतंत्र वाङ्मयानिर्मितीसही चालना मिळते.

श्रोतृजनहो, आपण माझें हें भाषण शांतपणानें ऐकून घेतलें याकरितां मी आपला आभारी आहें हें म्हणण्यापलीकडे आतां मला कांहीं सांगावयाचें नाहीं.

तांबे यांची कविता : : २

भास्कर रामचंद्र तांबे हे कवि मूळचे माळव्यांतील, इंदूर-देवासेकडील आहेत; आणि अलीकडे १५ वर्षें ते ग्वाल्हेरीस रहात आहेत. शरीरानें ते असे महाराष्ट्राबाहेर असले तरी आपल्या काव्यगुणांनीं त्यांनीं महाराष्ट्राच्या अगदीं हृदयांत अढळ स्थान मिळविलें आहे. श्रीमंत शिंदे सरकार यांनीं तांबे यांची योग्यता ओळखून, राजकवि म्हणून त्यांची सस्वास्थ्य संभावना अलीकडे केली आहे. परंतु महाराष्ट्रांनें कविराज म्हणून त्यांचा गौरव १०-१२ वर्षांपूर्वीच केलेला आहे. तांबे स्वतः खरोखर प्रसिद्धिपराङ्मुख आहेत. तरीही ही सारी प्रसिद्धी त्यांच्याकडे चालत आली. कारण, त्यांची कविता घडविलेली नाहीं; ती अंतःकरणापासून निघालेली आहे. आणि जी कविता अंतःकरणापासून निघते तींच अंतःकरणाचा ठाव घेऊं शकते. पुन्हां तांबे यांची कविता आबालवृद्धांना चटका लावील अशी आहे. कौमारकालांत बागडत हुरहुरणारें अल्लड जीव हे तर तिच्यावर हुरळून—

" डोळे हे जुलमि गडे रोखुनि मज पाहूं नका
जादुगिरी त्यांत पुरी, येथ उभे राहूं नका " (पृ. ५)

यांसारखे चरण गुणगुणत रहातातच; परतु संसाराच्या ऊनसावलींत कष्टणारे नि विसावणारे जीवहि

" रुणुझुणु ये रुणुझुणु ये झणकारित वाळा,
लुदुलुदुलुदु दुडुदुडुदुडु ठुमकत ये बाळा " (पृ. १६१)

अथवा " फेऱ्या दारावरी कुणी हा फेरीवाला करी " (पृ. १४४)

अथवा "जन पळभर म्हणतिल, 'हाय हाय !'
मी जातां राहिल कार्य काय ?" (पृ. १३४)

इत्यादि कविता कान देऊन ऐकतात नि मन लावून वाचतात. माझ्या कवितांनीं मला गांवोगांव घर मिळवून दिलें आहे असें तांबे कृतज्ञतापूर्वक म्हणतात; पण या कवितांनीं महाराष्ट्राला घरोघर एक निकटचा आप्त, नव्हे जिवलग मित्र मिळवून दिला आहे असें म्हणणें वस्तुस्थितीस अधिक धरून होईल.

आपला फार वर्षांचा, जिव्हाभावाचा मित्र भेटला म्हणजे आपण काय करितों ! मागील संस्मरणीय अनुभवांची उजळणी करितों, वर्तमान काळांतील मनोरंजक घडामोडींची चर्चा करितों, आणि मनांतील पुढील बेतांची रूपरेषा गिरवितों. या हृदयङ्गम चर्चेंत वेळ कसा निघून जातो तें कळतच नाहीं. काव्य वाचतांनाहि हीच स्थिति होते. काव्य हें वाचकांशीं सहकार्य करून, मागील आठवणी, पुढील आशा आणि साम्प्रतचे प्रश्न इत्यादिकांचीं मनोवेधक चित्रें त्यांच्या डोळ्यापुढें उभीं करितें. या चित्रांत जुन्याची तर ओळख पटतेच, पण कांहींतरी नव्याचीहि ओळख होते. जी गोष्ट आपल्या नित्य परिचयाची आहे तिचें यथार्थ ज्ञान आपल्याला झालेलें असतेंच असें आपल्याला वाटतें. पण वस्तुस्थिति अशी नसते. खोलींतील खाम्बांची संख्या निश्चितपणें ठाऊक नाहीं म्हणून साक्षीदाराच्या साक्षीविषयीं शंका घेणाऱ्या न्यायाधीशालाच आपल्या न्यायपीठाला किती पायऱ्या आहेत तें बिनचूक सांगतां आलें नाहीं ही लहानपणीं वाचलेली गोष्ट, मनुष्याचें नित्य परिचयाच्या गोष्टीकडे कसें दुर्लक्ष होतें हेंच दाखविते. नेहमींच्या परिचयाच्या स्थानाचें छायाचित्र आपण पाहूं लागलों कीं मग मात्र आपलें कुतूहल जागृत होतें. आपण तें न्याहाळूं लागतों; आणि त्यांत आपल्या ओळखीचें काय काय आहे हें पाहतां पाहतांच ओळखीचें जें नव्हतें त्याचा परिचय होतो. संसारांतील विविध प्रसंगांचें, हृदयांच्या निरनिराळ्या संबंधाचेंहि असेंच आहे. काव्यांत आपण त्यांचीं रंगीत चित्रें पाहतों. तीं पाहतांना आनन्द वाटतो इतकेंच नव्हे तर संसारांतील नावीन्य आपल्याला दिसतें आणि संसारांतील स्वारस्य हें आपल्याला थोडेंफार पटतें.

तांबे यांची कविता कुटुम्बवत्सल आहे. कुटुम्ब म्हटलें कीं पतिपत्नी नि त्यांचीं मुलें इतक्यांचा त्यांत समावेश होतो. इतक्यांच्या परस्परांवरील प्रेमाच्या कविता तांबे यांनीं लिहिल्या आहेत. मुलांच्यावर त्यांचा जीव कीं प्राण आहे. कुटुम्बांत मुलें नाहींत तर कांहींच शोभा नाहीं. मुलांबाळांत रमणारी नि रमणारी आई वान्झोट्या श्रीमन्तीस उद्देशून म्हणते—

श्रीमन्ती बाई
तुझा शृंगार काट्याचा
मानितें गरीबीचा
संसार झपाट्याचा

* * *

शितं तिथं भुतं
दारीं एक गजबज
बोबडा बोल नाहीं
नाहीं कानीं कुजबूज (पृ. १९३–१९४)

मोठीं माणसें मुलांच्या भावी संसारसुखाचीं मनोराज्यें करितात, तर मुलें भातुकलीच्या खेळांत संसाराचीं सोंगें सजवितात. मुलें जशीं खेळतात तशीं माण्डतातहि. भाण्डखोर बहुशः मुलगेच असतात. अशा एका मुलाला सम्बोधून, त्याच्या बहिणीची कड घेऊन आई म्हणते कीं पुढें—

" भ्रताराच्या राज्यीं
ऊणें ठेवीना रे देव
बहिणीच्या मनीं
चोळीची आशा ठेव " (पृ. १९६)

बहिणीचें लग्न कुठें झालेलें असतें ? पण त्या चिमण्या पोरींची आई कौतुकानें म्हणते—

" कुणि असेल ग असेल बोबडकांदा
खुदु खुदू हंसत एखादा
* * *
कुणि येईल ग येइल ग न्यायाला
या नाजुकशा कमळाला " (पृ. २००)

बहिणीला तिच्या लग्नावरून भावानें चिडवायचें, म्हणजे तिची गम्मत करायची, तिनें रुसायचें नि शेवटीं पुन्हां दोघांनीं गट्टी करून हंसायचें हा तर बाळपणांतला नित्याचा क्रम. तिनें म्हणावें—

" आतां गाडि फू दादाशीं ! "

आणि भावानें तरीहि पिच्छा न सोडतां विचारावें—

" तर मग गट्टी कोणाशीं ? " (पृ. ८४)

हीं शिशुगीतें वाचून कोणाला जुन्या आठवणी होत नाहींत !

मुलें हळुहळू मोठीं होतात, आणि प्रणयाच्या इन्द्रजालांत सांपडतात. जें आहे त्याचा घड विचार न करितां, जें नाहीं तें कल्पून त्याच्यासाठीं झुरणाऱ्या काव्यात्मक प्रणयाला ताम्बे हे पारखे नाहींत. त्यांनीं आपल्या परजनांविषयींच्या म्हणजे पारजनिक कवितांत, निरनिराळ्या पात्र-गीतांत या प्रणयाचीं रंगीत चित्रें काढिलीं आहेत. या प्रणयाचीं शब्दचित्रें बहुतेक कवी रेखाटतातच. नाहीं कोणी रेखाटत पतिपत्नीप्रेमाचीं शब्दचित्रें. हीं ताम्ब्यांनींच काढावींत. आपल्या बायकोच्या हौशी पुरवाव्यात असें कोणत्या सद्गृहस्थास वाटत नाहीं ! आणि दारिद्र्यामुळें त्या पुरवितां येत नाहींत म्हणून कोणता प्रेमळ पति हळहळत नाहीं ?

" जिवलगे, सांगे मम सारा दुःखाचा मात्र पसारा
जुम्पलिस सदा संसारा ठावा न सुखाचा वारा !
सासळी, सरी, पाटली आणुं कोठली तुझ्या शृंगारा ?

* * *

हृदयाहुनि दुसरें काय द्यावया ? हाय ! तेंहि अङ्गारा ! " (पृ.२९)

अङ्गार म्हणजे राखच, पण चुलींतील राख नव्हे तर यज्ञकुण्डांतील पवित्र भस्म-विभूति. आडव्या आलेल्या डोङ्गराला त्रिधा भेदून एकमेकांना भेटणाऱ्या क्षिप्राचम्बळांचा सङ्गम हा ताम्ब्यांना भिन्न कुलांत जन्मून विवाहित होणाऱ्या पतिपत्नींच्या 'जीवसंयोगा' सारखा रम्य वाटतो. हा योग पार्थिव आहे, तसाच अपार्थिवहि आहे.

" जन खुळे म्हणति तर आपण खुळे !
त्यांचें आपुलें कधिं न जुळे ॥ ध्रु०
हपापलें जन वस्त्राभरणा
विटलों मधल्या देहावरणा;
वस्त्रें रत्नें काय आपणा ?
दो जीवांतिल पटच गळे " (पृ. १०५)

विवाहाच्या मङ्गल मुहूर्तावर वधूवरांमधील अन्तःपट दूर करितात त्याचें रहस्य ताम्बे यांनीं वर सांगितलें आहे. पतिपत्नींचीं मनें मिळालीं कीं जो चमत्कार घडतो, या संगतींत जी रम्य विसंगति दृष्टीस पडते तिचें वर्णन ताम्बे करितात :—

" कुणि कोडें माझें उकलिल का ?
कुणि शास्त्री रहस्य कळाविल का ? ध्रु०
हृदयिं तुझ्या सखि, दीप पाजळे,
प्रभा मुखावरि माझ्या उजळे;
नवरत्नें तूं तुज भूषविलें
मन्मन खुललें आंतिल कां ? १
गुलाब माझ्या हृदयीं फुलला,
रङ्ग तुझ्या गालांवर खुलला.
काटा माझ्या पायीं रुतला
शूल तुझ्या उरिं कोमल कां ? २

माझ्या शिरिं ढग निळा डवरला,
तुझ्या नयानिं पाउस खळखळला;
शरच्चन्द्र या हृदयिं उगवला
प्रभा तुझ्या उरिं शीतल कां ?" २(पृ. १०६–७)

प्रेमकाव्य म्हणजे एक प्रकारच्या अतृप्तीचा निःश्वास होय असें कोणी म्हणतात; पण ताम्बे तृप्तीतूनहि रंगून गाऊं लागतात—

सुफलित झालें गे सखि जीवित । धृ०
जन्मजन्मिचें क्षुधाव्यथित मन लाभुनि तुज आकण्ठचि धालें.
काय मय जरी मरण ये आतां ? विषवृक्षा फळ अमृतचि आलें !
(पृ. १३९)

प्रेमाच्या परिसानें जीविताचें सोनेंच झालें आहे; आणि गाढ परिचय होऊनहि प्रेमाची मोहनी उणावलेली नाहीं. साठीच्या घरांत आलेले ताम्बे प्रौढ रसिकतेनें म्हणूं शकतात :—

सहज तुझी हालचाल मन्त्रें जणुं मोहिते । धृ०
सहज चालणेंहि तुझें,
सहज बोलणेंहि तुझें,
सहज पाहणेंहि तुझें
मोहानि मज घालितें.

ते अभिमानानें म्हणतात :—

ही अपूर्व शक्ति सगुण
झाडितसे मम अज्ञाण
हें माझें भाग्य बघुन
जळफळतिल देव ते. (पृ. १६८)

प्रेमाच्या या मादक सौभाग्यांत आपल्यावर ज्यांनीं प्रेम केलें त्या मोठ्या माणसांचा विसर पडलाच पाहिजे असें नाहीं. ताम्बे यांनीं आपली सारी काव्यकृति त्यांच्या परमपूज्य मातामही श्री. मथूताई डोंगरे यांच्या पुण्य-

स्मृतीस समर्पण केली आहे ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. सौभाग्यवती मुलीला माहेराची आठवण कशी होते, याविषयी तांबे यांनी लिहिलेल्या ओव्या फारच हृदयंगम आहेत.

" फळां आली भाळीं
तीर मायेच्या हाताची
भरलं घर माय
किलबिल पाखरांची

* * *

उचकी लागे माय,
कांहीं केल्यानं राहीना
काढिशी आठवणी
सुखी माय तुझी मैना ! (पृ. १९५)

या बोलांतून प्रेम, कृतज्ञता नि समाधान यांची त्रिवेणी कशी दुथडी भरून वहात आहे !

तांबे हे केवळ आत्मलक्षी नाहीत. ते आपल्याच सुखदुःखांचें कौतुक करीत बसले असते तर त्यांच्या चहात्यांची संख्याहि मर्यादित झाली असती. परंतु ते परक्यांचीं सुखदुःखें आपुलकीनें पाहातात आणि स्वतः रंगून रेखाटतात. त्यांचीं कित्येक गीतें प्रथमपुरुषी असलीं तरी पारजनिक आहेत. कांहीं गीतें उघड संवादरूप आहेत. या गीतांत आश्चर्यजनक विविधता आहे. विधवेची मनःस्थिति हाच काव्याचा विषय पण तांब्यांच्या जितक्या विधवाविषयक कविता आहेत तितक्या भिन्न भिन्नप्रकृती आहेत. ' सखे अगे, ऊठ ! रवी उदेला ' (पृ. ७) या कवितेंत प्रियकराला स्वप्नांत भेटून, जागृतीनें त्याला अन्तरल्यावर बावरून रडणारी विधवा दिसते तर ' नदितीरिं उभी ती दाट तृणीं ' या कवितेंत असह्य जिण्याला कंटाळून जीव द्यायला निघालेली पण अर्भकाचा शब्द ऐकतांच त्याच्यासाठीं सारें सहन करून जगूं इच्छिणारी विधवा आहे. ' बघुनि तया मज होय कसेंसें, (पृ. ११२) या कवितेंत निष्फळ एकपक्षी प्रेम करीत

झुरणारी विधवा आढळते; ' निःशब्द आत्मयज्ञ ' (पृ. ८२) या कवितेंत गाढ प्रेम नि तितकाच दृढ संयम यांच्या ओढाताणींत झुरून मरणारी विधवा आहे; तर ' सांगूं, तुम्हांला किती दयाळा ! ' (पृ. १५२) या कवितेंत प्रेमाच्या देवघेवीची सन्धि आली असतांहि धर्मविषयक चुकीच्या कल्पनेनें का होईना पण अलोट स्वार्थत्याग करून ' अभद्र माझ्या मलिन करा-हुन श्रेयस्कर कर देउं तुम्हांला ' अशी प्रार्थना करणारी धीरोदात्त विधवा आहे. आणि ' ते कान्त यापुढें, मीहि तयांची कान्ता ' (पृ. १६५) या कवितेंत आपल्या प्रियकराशीं विवाहबद्ध होणाऱ्या सुधारक विधवेची धीरोदात्तताहि तितकीच परिणामकारक आहे. ताम्ब्यांनीं या भावगीतांत व्यक्तींच्या विशिष्ट स्वभावांचें चित्रण फार कुशलतेनें केलें आहे.

कौमारकालांतील स्वप्नाळू सन्दिग्ध हुरहुरीचें चित्र ताम्बे यांनीं काढलेलें दिसत नाहीं. ' दृष्ट हिला लागली ' (पृ. १४५) या कवितेंत प्रेमानें झपाटलेल्या तरुणीची नि ' गौप्यगोपन ' (पृ. ११३) या कवितेंत त्याच अवस्थेतील तरुणांची स्थिति थोडीशी वर्णिलेली आहे. पण ताम्बे यांच्या कवितेंत प्रेमाचा प्रश्न घसाला लौकरच लागतो. ' तिनी सांजा सखे मिळाल्या देईं वचन तुला ' (पृ. ३९) असें म्हणून काव्यात्म वातावरणांत प्रियकर प्रियकरणीचें पाणिग्रहण करितो, अथवा 'मुशाफर आम्ही, आम्हीं वनवासी,कशास्तव भुललिस आम्हांसी ?' (पृ.४९) असें म्हणून प्रियकर हा सर्वस्वाचा त्याग करायला सिद्ध झालेल्या प्रेमिकेचा त्याग करून निघून जातो. ' कां रे जाशी मज त्यजुनी ? ' (पृ. ३९) या कवितेंत परित्यक्तेची हळहळ आहे. तर ' पन्नास वर्षांनंतर ' (पृ. ८९) या कवितेंत परत गांवीं येतांच वेशीपाशीं प्रेयसीची नात पाहून उडालेली परित्यक्त प्रेमिकाची ताराम्बळ आहे. ' राजकन्या आणि तिची दासी ' (पृ. ७६) या कवितेंतील सरस संवादांत व्यापाऱ्याचें सोंग घेऊन येणाऱ्या खैरपूर नरेशावर जडलेलें प्रेम लपवूं पाहणाऱ्या राजकन्येची आपल्या चाणाक्ष दासीपुढें झालेली गोड त्रेधा आहे; तर ' डोळे हे जुलमि गडे ' या गीतांत, मनांतून पुढें हवा असणाऱ्या परन्तु इतक्यांत भैत्रिणी येतील म्हणूनच नको झालेल्या ग्वोडकर पतीविषयीं लटक्या रागाचें प्रदर्शन आहे. 'कुपित अङ्गनेप्रत' (पृ. ६३) आणि 'क्रुद्ध सुंदरीस' (पृ. ६५) या कवितांत कान्तेच्या कोपास सरस प्रत्युत्तर आहे; तर 'विजली

जशि चमके स्वारी' या कवितेंत वीराङ्गना आपल्या पतीच्या रणशौर्याचें कौतुक करीत आहे. अशा प्रकारची सरस विविधता ताम्बे यांच्या पारजनिक कवितांत आहे.

ताम्बे यांची दृष्टि व्यक्तीवरून सामाजिक हालचालीकडेहि वळलेली आहे. त्यांचीं देशभक्तिपर कवनें व्यक्तिवैशिष्ट्यानें नटलेलीं आहेत. 'उखळांत दिलें शिर, काय अतां !' (पृ. १५४) या कवितेंत अलौकिक स्वार्थत्यागाचें सामर्थ्य दिसतें तर ' रुद्रास आवाहन ' या प्रलय–गीतांत क्रांतीची अपरिहार्य रुद्रता दिसते; आणि ' कोण रोधील ! ' या कवितेंत स्वार्थत्यागी क्रान्तीचा दुर्दम्य आशावाद दिसतो. हीं गीतें सङ्ख्येनें थोडीं आहेत पण तीं बावनकशी आहेत.

ताम्बे हे खरे भावगीतकार आहेत. त्यांचें अन्तःकरण उचम्बळून येईल तेव्हांच त्यांचे काव्यमय बोल बाहेर पडतात. त्यांचीं भावगीतें मधुरगेय आहेत. साध्याच पण अनुरूप रागांतील चाली त्यांना लाविल्या तर त्या विशेष परिणामकारक होतात. परन्तु ही परिणामकारकता चालीपेक्षां अर्थावर अधिक अवलम्बून आहे. पद्यप्रकारांची विविधता त्यांच्याजवळ आहे असें नाहीं आणि मृदुव्यञ्जनांचा नि लघु अक्षरांचा विशेष उपयोग ते करितात असेंहि नाहीं. पण त्यांची कविता गेय रूप घेऊनच बाहेर पडते. म्हणूनच ती दीर्घ नाहीं. ठिकाणच्या ठिकाणीं माडीवर माडी चढवून डोलारा रचावा, उत्प्रेक्षेवर उत्प्रेक्षा रचून, कडव्यावर कडवें रचून कविता दीर्घ करावी तशी त्यांची कविता नाहीं. ' डोळे हे जुलमि गडे ' हें गीत आठच ओळींचें आहे पण आहे अगदीं सम्पूर्ण. ताम्बे यांच्या भावगीतांत आरम्भींची प्रेरणा जेवढी तेवढीच त्याची गति असते. पण त्यांत गति आहे हाच त्याचा विशेष आहे. म्हणून तें सम्पलें कीं चुटपूट लागून राहते, आणि उलटपक्षीं कितीहि घोळलें तरी त्याची रुचि फिकी होत नाहीं.

ताम्बे यांच्या भावगीतांतील भाव जसा प्रामाणिक म्हणजे अन्तःकरणापासून निघालेला आहे त्याचप्रमाणें त्यांची कल्पना ही अव्यक्ताला व्यक्त, मूर्त, सरूप करण्यांत विशेष कुशल आहे. कोणत्याहि आधुनिक कवींत या कल्पनेचा असा हृदयङ्गम विलास नाहीं. त्यांची कविता ही रूपवन्त आहे.

रङ्गीत स्वप्नांच्या जुळणीनें चित्र सिद्ध करावें त्याप्रमाणें अनुभवांच्या अवशेषांनीं ते सूर्यचित्र सिद्ध करितात. पहा—

घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी
न दिसे तुज का न पडे श्रवणीं ? धृ०

धृपदाच्या पाहिल्या दोन चरणांतच विषयाची रूपरेषा दिसते.

पदर गळला, उडे वायुवर,
कुरळे उडती केसाहि मुरमुर,
प्रमदे, बघ त्यां सावर आवर,
कां उभी प्रवाहीं शून्य मनीं ? १

पदराचीहि शुद्ध नाहीं अशा विलक्षण चिन्तनमग्न प्रमदेची मूर्ति उठून दिसावी म्हणून ते पार्श्वभूमि रङ्गावितात.

स्वैरगार या झुळका वाहति
मातीचा ये वास सभोवति,
क्षितिजीं बघ ढग वरवर चढती,
बघ घरा निघाल्या सोबतिणी. २

पुन्हा तिचें रूप अधिक बारकाव्यानें रेखाटतात.

सळ डोळ्यांवर, काय पहाशी ?
कान देउनी काय ऐकशी ?
अचञ्चळ उभी व्याकुळ दिसशी
का उचलिल घट येऊन कुणी ? ३

ती भुवया जवळ आणून दूर कोठेंतरी कांहीं तरी पाहत आहे. शेवटल्या चरणांत ताम्बे तिच्या मनांतील विषय सूचित करितात न करितात तोंच ते तिला होणाऱ्या भासांचें निराकरणहि करितात.



पाऊल नच, तें शेत सळस[illegible],
शब्द न मानवि, वारा बोले
शीळ न वायुच वंशीं खेळे
कां विरघळशी भ्रमिं फिरफिरुनी ? ४

तिची अवस्था पाहून नेणतें कौमार्य थरारतें आणि जाणतें वय स्मित करतें.

कवळुनि पद जल थरारुनि हले
स्पर्शुनि शरिरा वारा बरळे;
वेलि हसति तुज फुलुनि बघ फुलें,
डोलती विनोदें तरु बघुनी ! ५

अहा रे वेडी !

या कवितेंतील गोष्टी कशा इन्द्रियगोचर आहेत पहा. गळलेल्या पदराचें ध्यान नसणारी, भुरुभुरु उडणारे केस न सावरणारी, निश्चलपणें डोळ्यांवर सळ आणून कांहींतरी पहाणारी नि ऐकणारी प्रमदा ही दृगोचर होते. त्याचप्रमाणें चढणारे ढग, थरारणारें पाणी, फुललेल्या हंसऱ्या वेली आणि डोलणारे वृक्ष हीं दृग्गोचर आहेत. शेताची सळसळ नि वायूची शीळ या गोष्टी श्रुतिगोचर आहेत; गार झुळका या स्पर्शगोचर आहेत आणि मातीचा वास हा घ्राणेन्द्रियगोचर आहे. याप्रमाणें निरनिराळ्या इन्द्रियांनीं घेतलेल्या ज्ञानाच्या अवशेषांच्या जुळणीनें नवीन सजीव चित्र निर्माण करणें हेंच कल्पनेचें प्रमुख कार्य असतें. हीच कल्पना अर्थ बिम्बवूं शकते. नाहीं तर शब्द काय वरच्यावर वाऱ्यावर विरून जातात.

ताम्बे सौन्दर्याकडे रसिकतेच्या दृष्टीनें पाहतात, आसक्तीच्या दृष्टीनें पहात नाहींत. शुक्राच्या चान्दणीसारखी जी वस्तु प्राप्तीच्या शक्यतेच्या पलीकडे असते तिच्याकडे पाहतांना प्रत्येकालाच ही रसिकतेची दृष्टि येते; पण एरव्हीं माणसाचा आशाळभूतपणा त्याच्या रसिकतेंत दोष उत्पन्न करीत असतो. एकदां एक युवती न्हाऊन, घरांतून बाहेर पडून सडक ओलाण्डून समोरच्या घरांत शिरली आणि त्यांचें निरासक्त सौन्दर्यप्रेम तत्क्षणीं जागृत झालें.—

काळेभोर विशाल केस रुळती तीच्या नितम्बावरी
तैसें भाळ विशाळ गौर झळके चन्द्रापरी तें तिचें;
ते डोळे नच, छे ! विलासगृह कीं माहेर चिच्छक्तिचें,
किंवा काव्यलतेवरी उमललीं हीं दोन पुष्पें तरी.
श्री ही केवळ का वसन्तऋतुची येई नटोनी खरी,
किंवा मूर्तिमती प्रभात उमले कीं फांकली पौर्णिमा,
प्रीतिज्योतिच काय ही उजळली, कीं शारदा कीं रमा !
वाटे ही रचितां, विहार कविता चित्तीं विधीच्या करी.

* * *

गाली ज्या खुलती छटा, वितळती, साश्चर्य त्या पाहतां,
वाटे साठविलें कळे न किति तें सौंदर्य या अन्तरीं.

मूळ दृश्याप्रमाणें हें वर्णन तरुणवृद्ध, स्त्रीपुरुष सर्वांनाच चटका लावील; आणि हें सौन्दर्य निस्सङ्कोचपणें सेवन करावें असेंच उदात्त आहे.

पापाची स्मृति राहली जर नरा पाहून ही सुन्दरी
धिरिधक् ! त्या कळली अगाध हरिची नाहींच कारागिरी.

(पृ. ८८)

व्यावहारिक उपयोगवाद हा ताम्ब्यांना करण्टेपणाचा वाटतो. त्यांत कित्येक गोष्टी अशा आहेत कीं त्या दुरून पाहून मनुष्यानें सुखद संवेदना अनुभवावी यांतच त्याचें सार्थक असतें; पण अर्थज्ञ हा ताजमहाल पाहून असें म्हणेल कीं

किती महामूर्ख तूं शहाजहां !

गुपित पळपुटें पञ्जरिं धरण्या व्यूह काय रचिलास अहा ! ध्रु०

अर्थज्ञ हळहळतो कीं या मन्दिराचें करावयाचें काय ? नाहीं याचें रेल्वेस्टेशन बनवितां येत, नाहीं यांचें प्रवासीगृह वा रुग्णालय होऊं शकत. पण ताम्बे म्हणतात,

पायतळीं ताजाच्या बघुनी
टकमक पाही काळ गुङ्गुनी

जाईना काळ गुङ्गून, अर्थज्ञाला त्याचें कांहींच महत्त्व नाहीं. पण गुङ्ग-ण्यांत कांहींच अर्थ नाहीं का? पण काय?

आदमच्या या खटल्याकारणें
दुनिया बघ बाजारच हा. (पृ. १३९)

फुलें निरपेक्षपणें फुलतात, झरे निराभिलाष वाहतात हें जो पाहील त्यालाच रसिकता, सौंदर्य निरभिलाषपणें अनुभविण्याचें सामर्थ्य येईल.

तांबे आतां वृद्ध झाले आहेत, संसाराच्या झळी त्यांना कांहीं थोड्या-थोडक्या लागलेल्या नाहींत. तथापि संसार असार आहे असें ते थिल्लर वैरा-ग्यानें म्हणणार नाहींत. त्यांनीं मृत्यूच्या दाढेंत कांहीं दिवस काढून मग ते परतलेले आहेत. त्यांची प्रेमनिष्ठा ही स्मशानवैराग्याहून अधिक साचार नि टिकाऊ आहे. ते म्हणतात—

मग विसर हवा तर हा क्षण गे!
क्षण हाच जवळ ये तूं पण गे!
पूर्ण विश्वलयिं अति एकान्तीं
तुझी ज्योति पसरो स्थिरकान्ती,
मिळो त्यांत, मम, फिटुनी भ्रान्ती,
ये करुं आत्मसमर्पण गे. (पृ. १०८)

मरणाच्या कल्पनेनें ते हतबुद्ध होत नाहींत. कारण 'मरणांत खरोखर जग जगतें.'

फूल गळे, फळ गोड जहालें
बीज नुरे, डौलांत तरु डुले
तेल जळे बघ ज्योत पाजळे
का मरणिं अमरता ही न खरी? (पृ. ११८)

फेरीवाल्याच्या रूपानें एकाद्या रजपूत वीरानें राजकन्येला हरण करायला यावें असें मरणाचें स्वरूप त्यांना दिसतें म्हणूनच ते मृत्युशय्येवर फेरीवाला हें सूचक प्रेमगीत रचूं शकले. आतां तोहि काळ गेला. महाप्रस्थानाचींहि गीतें झालीं. आतां मौनाचें प्रमाण वाढलें. एखादे वेळीं ते म्हणतात,

ढळला रे ढळला दिन सखया !
सन्ध्याछाया भिवविति हृदया,
आतां मधूचें नांव कासया ?
लागले नेत्र रे पैलातिरीं. (पृ. १८६)

ताम्बे गम्भीर शान्तपणानें हे शब्द उच्चारतात; त्यावेळीं त्यांच्या कवितेवर नि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांची स्थिति काय होते तिचें वर्णन दाबलेले अश्रु नि दाबलेले हुंदके हेच करूं जाणोत.

कवि ताम्बे : परिचय व गुणनिदर्शन : : ३

महाराष्ट्रांत कवितेची आवड आहे पण रसज्ञता तितकी नाहीं. भ्रमर कमलाकडे आपोआप आकर्षिले जात असतील, पण आज महाराष्ट्रांत गुणी-जनांच्या कृतीचा परिचय करून द्यावा लागतो. कित्येकदां नांव प्रसिद्ध होतें पण कृति अज्ञातच राहते. विद्यमान मराठी कवींत श्रेष्ठ कोण असा प्रश्न केला तर ताम्बे यांचें नांव घेणारे कांहीं निघतील; परंतु त्यांपैकीं कितीजण तांबे यांची कविता वाचून तिच्याशीं समरस झाले असतील कोण जाणे ? प्रसिद्धीचा राजमार्ग आज एकच आहे. शाळा, महाविद्यालयें चालू असतांना विद्यार्थिसंघांपुढें आपल्या बहुजनसमाजास सहज समजतील व रुचतील अशा कविता खड्या व सुरेल आवाजांत म्हणून दाखविणें हा तो राजमार्ग होय. तांबे यांच्या कवितेशीं तरुण पिढीचा जो थोडा परिचय झाला तो याच मार्गानें; म्हणजे प्रो. मायदेव यांनीं ताम्बे यांच्या कविता गाऊन दाखविण्यानेंच झाला; आणि पुढें तांबे यांच्या कवितेचा दुसरा भाग रा. दिनकर गंगाधर केळकर यांनीं प्रसिद्ध करूनहि आज तीन वर्षें तो अज्ञातवासांत आहे. याचें कारण उपर्युक्त राजमार्ग बंद झाला हेंच होय. परंतु सारेच रसिक पढविलेले असत नाहींत. अशा शंभर पढत रसिकांपेक्षां एक जन्मजात रसिक बरा. आणि कांहीं थोडयाच पण खऱ्या रसज्ञांनीं आपल्या काव्यावर लुब्ध झालेलें पाहण्याचें भाग्य तांबे यांस लाभलेलें आहे.

याचें रा. तांबे यांस समाधान आहे; परंतु रसिकतेच्या अभावीं त्यांची काव्यलता कोमेजून गेली असती असें मात्र नव्हे. ते खरे हौशी व तितकेच उदासीन कवि होते. गायन हें स्वाभाविक असतें आणि लहर आली कीं गायिल्यावांचून राहवत नाहीं ही जशी गाणाऱ्या पाखरांची स्थिति असते

तशीच स्थिति या काव्यविहङ्गमाची आहे. स्वरचित कविता स्वतःच्या जीवनक्रमांत किती जरी महत्त्वाच्या असल्या तरी त्या भाषेच्या व राष्ट्राच्या प्रपंचांतही महत्त्वाच्या आहेत असें त्यांस कधींहि वाटलें नाहीं. 'समर्पण' या कवितेंत ते म्हणतात—

"नुरे भान, मी स्वाधिकारा मुलें,
भरूं लागलों सूर वेडे खुळे!
* * *
तुझे लाडके रे, तुझे लाल जे
तयांची करावयास स्पर्धा धजें
करुनी दया रे दया-सागरा,
क्षमस्व प्रभो, या तुझ्या लेंकरा!"

ही त्यांची लीनता औपचारिक नाहीं. आपल्या कविता वस्तुतः कृत्रिम वा नीरस आहेत असा अंतर्यामीं कांहीं तरी समज झाल्यामुळें नव्हे, तर ध्येय उच्च ठेवल्यामुळें व त्यांच्याहून जे कवि खरोखर थोर आहेत त्यांची थोरवी निर्मत्सर बुद्धीनें जाणल्यामुळेंच ही अभिजात लीनता त्यांच्या ठिकाणीं आलेली आहे. स्फूर्ति झाली म्हणजे कविता रचावी; तोंडपाठ येत आहे तोंपर्यंत फारसा आग्रह करून न घेतां व उलटपक्षीं परिचयाच्या जोरावर जुलुम न करितां रसिक मित्रमण्डळीस ती म्हणून दाखवावी; कधीं स्वतः तर कधीं एखाद्या ओळखीच्या मनुष्यानें ती कागदावर उतरून ठेवावी; नकलांच्या अभावीं ती कधीं गहाळ व्हावी आणि कालावधीमुळें कवीसही तिची विस्मृति होऊन ती कायमची नष्ट व्हावी असा त्यांच्या काव्यलेखनाचा प्रकार आहे आणि त्यांच्या कित्येक कविता अशा रीतीनें नष्ट झाल्या असूनही त्या हानीचें कवीस कांहीं वाटूं नये अशी त्यांची उदासीन काव्यमय वृत्ति आहे.

खरोखर त्यांच्या इतका काव्यांत रंगून गेलेला मनुष्य क्वचितच आढळेल. स्वतः कवि आहोंत; काव्यमय वेडेपीर आहोंत याची जाणीव जगाला पटवून देण्यासाठींच विक्षिप्तपणाचें व आचरटपणाचें प्रदर्शन करणाऱ्यांची ओळख महाराष्ट्रास नाहीं असें नाहीं. कोणी म्हणतो माझीं बोटेंच पहा, मृदुल-मधुर कविता लिहून कशीं कुसुमसदृश झालेलीं आहेत! दुर्दैवानें या मोळ्या

भाबड्या महाराष्ट्रांत वेडसरपणावर साधुत्वाचें शिक्कामोर्तब होतें, परंतु विक्षिप्तपणावर कवित्वाचा आरोप अद्यापि होऊं लागला नाहीं ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. तांबे हे लोकांतून उठून गेले नाहींत व उठून गेल्याचा ते बहाणाही करीत नाहींत. आपण समाजाचे एक जबाबदार घटक आहों याची त्यांस पूर्ण जाणीव आहे. त्यांनीं निरनिराळ्या संस्थानांतून राजकारणाचीं आणि मानवजातीचें दुष्ट अंतरङ्गच बहुधः जियें पाहावयाला मिळतें अशा न्यायमंदिरांतून न्यायाधीशाचीं कामें तत्त्व-निष्ठेनें व बाणेदारपणानें केलेलीं आहेत. एकदां एका पोलिटिकल एजंटा-बरोबर चहा घेण्याचा प्रसंग आला असतां तो ते घेईनात. तिसरें कोणी नव्हतें, बाहेर समाजास कळणें शक्य नव्हतें. चहा पिण्यासारखी गोष्ट म्हणजे क्षुद्र होती. पण तांबे म्हणाले, "या साऱ्या गोष्टी खऱ्या, पण माझ्या नातलगांचें मन दुखेल म्हणून जी गोष्ट जाहीर रीतीनें करण्याचें धैर्य माझ्यांत नाहीं ती गोष्ट गुप्तपणें तरी मी कां करावी ?" तांबे तसे व्यावहारिक व व्यवहाराला चोख आहेत.

तशी वेळ पडली तर ते आपली कविता जाहीर रीतीनें म्हणून दाखवितात; परन्तु खरा रंग भरावयाला बैठक खाजगी व लहान पाहिजे. मग कवितेचा खरा नशा चढतो. ते कविता गाऊन दाखवीत नाहींत, तर म्हणून दाखवितात. त्यांच्या कवितेंत चालींचें वैचित्र्य व नावीन्य हीं नाहींत. काव्यगुणाच्या अभावींही भुरळ पाडूं शकणारी स्वरमाधुर्याची मोहिनी नाहीं. नाटकी अंग-विक्षेपांचा नखरा नाहीं. रवीन्द्रनाथासारख्यांचा कष्टासिद्ध साधेपणा व निसर्ग-दत्त अभिजात सुन्दर रुबाबही नाहीं. प्रथमदर्शनीं त्यांचे अंगविक्षेप विचित्र, हास्यास्पदच वाटतात; पण एकदां का रङ्गांत येऊन त्यांची तार व श्रोत्यांची तार यांचा सूर जमला आणि त्यांच्या रोखलेल्या विशाळ डोळ्यांत भावनेचें विशाल तेज चमकूं लागलें कीं ती कृशयष्टि, ते स्वाभाविक पण चमत्कारिक वाटणारे हावभाव, त्या दृष्टीचें तें किंचित् चकणेपण या साऱ्यांचा विसर पडतो; आणि 'दोषांचेही गुण करणारें जें प्रेम' त्याची मोहिनी पैलावून मूर्तिमन्त काव्याचा साक्षात्कार होतो. मग त्यांनाही काव्याखेरीज इतर कशाचें भान राहत नाहीं. बैठक निर्भेळ पुरुषांची असो वा स्त्रीपुरुषसंमिश्र असो, त्यांची वृत्ति एकच असावयाची. 'बुडव लाव वा पैलथडी' या कविता

ते सारख्याच विशद करून म्हणतील. त्यांची रसाळ व पवित्र काव्यमय वाणी ऐकून कोणीही असेंच म्हणेल—

"पापाची स्मृति राहिली जर नरा पाहून ही सुंदरी
धिग्धिक्! त्या कळली अगाध हरिची नाहींच कारागिरी"

खाजगी संमिश्र समाजांत जे स्पष्टोक्तीनें वा व्यङ्ग्योक्तीनें ग्राम्य वाक् पाटवास लालुचलेले असतात तेच मित्र वा सार्वजनिक समाजांत विशेषतः सङ्कोची बनतात व शिष्टपणाचा फाजील आव आणतात!

त्यांच्या कवितेची बैठक म्हणजे मधून मधून टाळ्यांच्या कडकडाटांनीं खण्डित होणारी सङ्गीतवाहिनी नव्हे. "कवळुनि पद, जल थरारुनि हले" ही ओळ म्हणतांच "At the touch of thy feet the water feels a thrill" असें इङ्ग्रजींत ते भाषान्तर साङ्गतील; किंवा "जन पळभर म्हणतिल 'हाय हाय!'" ही ओळ म्हटल्यावर "Alas! Poor fellow—he is gone!" अशी इङ्ग्रजींतच ते पुस्ती जोडतील. "पुकार करितां खिडकीवरूनी" ही ओळ म्हटल्यावर यांबून "जरी ऽऽ पल्ले ऽऽ!" अशी ते इन्दुराकडील फेरीवाल्याची आरोळीच मारतील. "डोलती विनोदें तरु. बघुनी" या ठिकाणीं आपले दोन्ही हात जुळवून नागाच्या फणेसारखे करून डोलवून दाखवितील. "काळेभोर विशाळ केश रुळती जीच्या नितम्बावरी" ही ओळ म्हणून यांबतील आणि लगेच इन्दुरांत जुन्या तोफखान्याजवळ एका स्नेह्याच्या घरीं जात असतांना, नुकतीच न्हाल्यामुळें जिची मूळचीच सुवर्णकान्ती अधिकच उजळ दिसत आहे व जिचे काळेभोर लांब सडक केंस आनितम्ब रुळत आहेत, जी अव्याज बाल्य व मादक तारुण्य यांच्या सीमेवर उभी आहे अशी एक बाला एका घरांतून निघून समोरच्या ओळींतील समोरच्याच घरांत शिरतांना कशी दिसली व तीस पाहून संस्मरणीय असा परिणाम मनावर कसा झाला याचें वर्णन तांबे, कोणी गैरसमज करून घेईल कीं काय याची यत्किंचितही भीति न बाळगतां करितील. फार काय, अहमदाबादेंत एका अनोळखी गृहस्थाकडे कामानिमित्त गेलों असतां व तो मनुष्य बाहेर गेला असतां मामुली चौकशीसाठीं पुढें आलेल्या स्त्रीनें

"तुम्ही कवि तांबेच काय ?" असा प्रश्न कसा केला आणि होकारार्थी उत्तर मिळतांच मुळींच परिचय नसतांही किती अगत्य दाखविलें, दुसऱ्या दिवशीं कामानिमित्त जावें लागलें असतां पाहुणचाराचा भडिमार कसा केला आणि या अकारण आपुलकीच्या उपचारानें स्वतः कसे स्तिमित झालों या खाजगी गोष्टीसुद्धां ते सांगतील. मध्येंच शेली, टेनिसन्, ब्राऊनिङ्ग यांच्या कविता म्हणून दाखवायला लागतील. इङ्ग्रजी भावगीतें म्हणून दाखविण्याची त्यांची पद्धत खरोखरच हृदयङ्गम आहे. अर्थ कळतो इतकेंच नव्हे तर चित्र डोळ्यांपुढें उभें राहतें, तें हृदयावर ठसतें आणि कांहीं तरी कायमनिधि लाभल्याचा आनन्द होतो. ताम्बे मध्येंच अस्खलित व सुन्दर इङ्ग्रजींत अर्धा अर्धा तास काव्यप्रवचन करितील. रात्र फार झाली तरी ते थकणार नाहींत. मधून मधून सिगारेटचा झुरका व एकादा चहाचा पेला मिळाला कीं त्यांचा थकवा जातो. आजारी असले तर त्याचा त्यांना विसर पडतो. त्यांची वाणी श्रिणत नाहीं. श्रोत्यांचे कर्ण तृप्त होऊनही अतृप्तच राहतात. खरोखर ताम्बे यांचें कवितापठण म्हणजे काव्यरहस्यग्रहणाचा वस्तुपाठच होय. विद्यमान मराठी कवींत ताम्ब्यांच्या सारखा सहजोद्गारी कवि दुसरा नाहीं. त्यांच्या कविता कशा सहजस्फूर्त आहेत, कल्पना व भावना योग्य शब्दांचें लयबद्ध स्वरूप घेऊन कशा जन्माला आलेल्या आहेत, हें त्यांच्या आरम्भींच्या पङ्क्तीवरून स्पष्ट दिसून येईल—

"तूं हुबेहूब साउली त्याच मूर्तिची,
हरपली दिवंगत झाली, आकृती साउली तिची"
(१।१०३)

"जन खुळे म्हणति तर आपण खुळे
त्यांचें अपुलें कधिं न जुळे !" (१।११५)

"मग विसर हवा तर हा क्षण गे
क्षण हाच जवळ ये तूं पण गे !" (२।३)

"डुमडुमत डमरु ये, खणखणत खड्ग ये
शिंग फुंकीत ये येई रुद्रा !" (२।२४)

"जन पळभर म्हणतिल, 'हाय हाय!'
मी जातां राहिल कार्य काय?" (२।३३)

त्यांच्या अशा कित्येक ध्रुवपदांत भावनेच्या उद्रेकाबरोबरच कमालीची सहजता असते. एकदांच वाचल्यानें वा ऐकल्यानें ओळी ध्यानांत ठसतात. शिवाय भाषा अशी पडते कीं एका अक्षरानेंही तींत फिरवाफिरव करितां येत नाहीं.

गोचरवर्णनपद्धति हा त्यांच्या कवितेचा विशेष आहे. ज्या स्थळींचें वर्णन असेल तेथेंच ते वाचकाला नेऊन उभा करितात; आणि त्याला स्वतःलाच त्या त्या गोष्टीचा अनुभव आणून देतात. त्यांची 'फेरीवाला' ही कविता पाहा. ओळी मागून ओळींत चित्रामागून चित्रें डोळ्यापुढून सरकतात. 'प्रभातकाळीं' पुढें 'दीपविसर्जनीं,' 'सायंकाळीं' पुढें 'दीपदर्शनीं' असें गोचरवर्णनाचे शब्द आहेत. झरोक्याच्या आंत गोंधळलेला प्रेमाविवश राजकन्या, नदीपलीकडे टापांनीं जमीन फोडून आपली अधीरता व्यक्त करणारी बिजलीसारखी घोडी, जवळच पारम्ब्यांची जाळी झाली आहे अशा वटवृक्षाजवळ उभा असलेला निश्चयी व बलाढ्य रजपूत प्रेमावीर—कसें मूर्तिमंत चित्र डोळ्यांपुढें उभें राहतें! अनन्त शत्रूंना तो वीर लीलेनें उघळून लावील असें ताम्बे म्हणत नाहींत, तर "टोळांपरि मग शत्रू येऊं। उडविल माशापरी" असें ते वर्णन करितात. क्रान्ति-प्रळयाच्या वर्णनांत राजांना गतविभव करून रङ्कांचें राज्य स्थाप असें न म्हणतां पुढील प्रमाण ते वर्णन करितात—

"पाड सिंहासनें दुष्ट हीं पालथीं
ओढ हत्तीवरुन मत्त नृप खालती
मुकुट रंकास दे करटि भूपाप्रती
झाड खद्खद् तुझें खड्ग क्षुद्रां!" (२।२४)

अनुप्रास साधण्याकरितां 'किरिट रंकास दे करटि रावाप्रति' अशा रीतीनें संस्करण करण्याकडे त्यांचें लक्ष नसतें. "शब्द तर खरोखरच फार वेंचक व विषयवर्णनाला उचित असेच पडतात; कृत्रिमपणा असा कोठेंही दिसत नाहीं." हे रा. नरसोपन्त केळकर यांचे प्रस्तावनेंतील उद्गार अक्षरशः खरे आहेत. 'रुद्रास आवाहन' ही कविता वाचतांना प्रळयकाळींचेच कर्कश

व मयंकर आवाज कानावर पडत आहेत, असें वाटतें. हा केवळ भावनेचा प्रभाव नाही; हा उत्तम कल्पनाशक्तीचा विलास आहे.

उदात्तता हा त्यांचा आणखी एक विशेष आहे. ते वाचकाला स्वतःच्या उच्च व पवित्र अशा विशिष्ट भूमिकेवर नेतात आणि तेथून आपल्या दृष्टीनें त्याला जगाकडे पाहावयाला लावितात. गोचरप्रचुरतेप्रमाणेंच हाही गुण अत्यन्त दुर्मिळ आहे. आधुनिक मराठी कवींमध्यें हा ताम्ब्यांखेरीज जर कोणांत आढळत असेल तर तो फक्त विष्ठलराव घाटे यांच्यांतच. स्त्री जातीची पायमल्ली चाललेली पाहून ताम्बे यांचें उदात्त स्त्रीदाक्षिण्य कसें व्यक्त होतें तें पाहा—

" भय–चकित नमावें तुज रमणी,
जन कसे तुडविती तुज चरणीं !
महाकवी, तत्त्वज्ञ, भूपती,
समरधुरंधर वीर धीर–गति,
स्थितप्रज्ञ हरि उरीं कोंडिती
प्रसव तयांचा तूं जननी ! १
भत निघाला तव उदरांतुन,
वर्तमान घे अंकीं लोळण,
भविष्य पाही मुली ! रात्रदिन
तव हांकेची वाट मनीं ! " २ (२।१०)

एका कुमारीस ' तूं सुपुत्रा सौभाग्यवती हो ' हें सुचवितांना तर

" स्वर्गस्थ ज्योति अस्वस्थ धरेवर याया
अति आतुर तुजला ' आई ! ' सम्बोधाया "

अशी जी भाषा ताम्ब्यांच्या तोंडून निघते तिचें कारण त्यांची उदात्तता होय.

देशभक्तिपर कविता लिहितांना सुद्धां त्यांची भूमिका उच्चच असते. ते संस्थानी स्वराज्यांत असल्यामुळेंच कीं काय कित्येक वर्षेंपर्यंत देशभक्ति त्यांच्या हृदयांत विशेष उत्कटतेनें उसळली नाहीं, ते मुग्ध राहिले. कवितेच्या क्षेत्रांत त्यांनीं उपयुक्ततावाद येऊं दिला नाहीं. अर्थातच जयन्ती–पुण्य–

तिथीला म्हणण्यासाठीं दिनमाहाम्यामुळेंच फार फार तर दिनभर जगणारीं पद्यें रचण्याचा मोह त्यांना झाला नाहीं. शिवाय सध्यां कोणत्या मालाला मागणी आहे याचा विचार करून ऐतिहासिक विभूतींच्या नाममाहात्म्याच्या जोरावर ऐतिहासिक टांचणांचीं पद्यें खपविण्यासाठीं त्यांनीं काव्याचा बाजारही केला नाहीं. कच्च्या मालाची पैदास व निर्यात करून पक्क्या मालाची आयात करीत राहण्यानें देशास कशी अवकळा येत चालली आहे याचें विनोदी वर्णन 'घटोत्कचमाया' या कवितेंत आढळतें. आपल्या मुर्दाडपणाचा त्यांना जेव्हां पश्चात्ताप झाला तेव्हां तो 'मातृभूमीप्रत' या कवितेंत जिवंतपणें उमटला. टिळक वारले तेव्हां तांबे यांच्या हृदयाला पहिला धक्का बसलेला दिसतो.

"राजराजेश्वरा ! हो दयाळा !
तातडी कां असे हो निघाला !

* * *

व्याप ज्यासाठिं हा थोर केला
नाहिं भानू अजूनी उदेला ! "

परन्तु ही कविता लिहिण्याच्या वेळीं ताम्बे यांस स्वतःला देवाचा दूत दिसूं लागला होता ! व त्यामुळेंच कीं काय या कवितेंत व्यक्तिवर्णनापेक्षां, विभूतिपूजेपेक्षां मृत्यूची हांक ऐकतांक्षणींच—

"शीघ्र सारा त्यजोनि पसारा
कांहीं केल्याविना हो विचारा"

उठाउठी निघणें कसें अपरिहार्य होतें यांचेच वर्णन विशेष आहे. या कवितेंतील कल्पना "आव्हानशृंग तव तीव्र कसें" (२।१५) या कवितेंत पुनरुक्त झाल्या आहेत. तथापि त्याच संस्मरणीय कालांत असहकारितेचें शिङ्ग फुङ्कून आसेतुहिमाचल जागृति घडवून आणणारा महात्मा पुढें आल्याबरोबर ताम्बे यांच्या हृदयांत विलक्षण खळबळ उडाली. 'तूं वांझ न गे माझी माता' असे धन्यतेचे उद्गार मातृभूमीविषयीं काढून ते

" दुर्गम परबत आडो ठाडो तामे द्वार परो !
द्वारे ठाडो वीर महात्मा नेन सनेह भरो !
आवो आवो अब सब भैय्या काहूसे न डरो !
अब तुम जयजयकार करो ! " (२।७२)

असा बेडर पुकार करूं लागले. याच वेळीं,

" या भविष्याचिया दिव्य कारागिरा
कोण रोधील ? दे कोण कर सागरा ? " (२।७१)

हें दुर्दम्य आशावादाचें ओजस्वी गीत त्यांना स्फुरलें. रुद्रास दारुण आवाहन करीत असतांनाही विभूति पूजेचेंच एक स्वरूप अशा राजनिष्ठेच्या सकरुण स्वरानें " उघड लोचन पहा दूर राजा ! " अशी कळकळीची विनंति करावयाला ते चुकले नाहींत. पुढें असहकारितेपासून अपेक्षित फल प्राप्त झालें नाहीं तेव्हां त्यांना ज्या दारुण निराशेनें ग्रासिलें ती तितक्याच हृदय-स्फोटक व उदात्त गीतांत उमटली—

" वाटलें नाथ हो ! तुम्ही उतरतां खालीं !
दे असहकारिता हांक तुम्हां ज्या कालीं ! ॥धृ०॥
परि हाय ! कोणतें पाप आडवें आलें ?
हा ! कपाळ फुटलें संचित तें ओढवलें !
परतली माउली, स्वार्थानें अडवीलें !
आशेची माती झाली ! ॥ वाटलें० ॥
हा दुणावला हो घोर अतां अंधार !
ह्या दिशा करिति हो भयाण हाहाकार !
जखडंती पाश हो अतां अधिक अनिवार !
हा हाय ! गति कशी झाली ! " ॥ वाटलें० ॥ (२।८७)

तात्ये सुधारक आहेत व त्यांची सुधारणा भूतदयेच्या मूलभूत तत्त्वावर उभारलेली आहे. हिन्दु विधवेविषयीं त्यांना वाटणारी सहानुभूति त्यांनीं स्वार्थी व जुलमी समाजावर निष्ठुरपणानें कोरडे ओढून केली नाहीं तर

स्त्रियांना, विधवा स्त्रियांना पुरुषांसारखेंच, अगदीं विधुर पुरुषांसारखेंच हृदय असतें ही गोष्ट समाजास पटेल अशा रीतीनें विधवांच्या मनोभावांचें हृदयस्पर्शी वर्णन करून त्यांनीं आपली सहानुभूति व्यक्त केलेली आहे. पाहिल्या भागांतील " विधवेचें स्वप्न " (१।११) व " विधवेचा आत्मयज्ञ " (१।६६) हीं करुण-गीतें प्रसिद्धच आहेत. दुसऱ्या भागांतही

" आसन त्यास्तव घालायाला
वसन चुणुनिया ठेवायाला
हस्तांनो, फुरफूर कशाला ?
कळे तया का ? काय तो पुसे ?
बघून तया कां डाळ वळती ?
येतां तो कां पायहि पळती ?
कान लपुनि कां शब्द ऐकती ?
हा रे दैवा ! कां हें धुमसे ? " (२।७)

' शरीर जीवा हो थडगेसें ' अशा जिवन्त मरणांत काळ कण्ठणारी रागिणी विधवा; पुनर्विवाह म्हणजे पाप आहे अशा चुकीच्या समजुतीनें तिचा उद्धार करण्यास आलेल्या प्रियतम सख्यास, त्याची थोरवी जाणूनही

" सांगुं तुम्हाला किती दयाळा ?
न घडे त्याचें नांव कशाला ?
पतित बहिष्कृत अस्पृश्यापरि
धिरटथाघ्याव्या मी बाहेरीं !
दया करा, जा आंत तुम्ही तरि
घेऊन कुणि अनुरूप सखीला !
भगिनी होइन, दासी होइन,
भक्त होउनी चरणां पूजिन !
तुमच्या वाटा केशीं झाडिन
अधिक पत्निपणिं काय कृपाळा ?

बोल न बोला एकहि यावर !
धैर्याचे हो ढळतिल डोंगर !
भलतें जाइल निघून उत्तर !
भागिदार व्हा नच नरकाला " (२।६४)

असें विनवून पुनर्विवाहापासून परावृत्त करणारी स्वार्थत्यागी विधवा; असह्य जिणें नको म्हणून आत्महत्येस प्रवर्तलेली, परन्तु आपल्या मुलाचें रडणें ऐकतांच

" मोलमजूरी करीन बाळा
भिक्षा मागिन रे वेल्हाळा
परि भरीन हीं तोंण्डें चिमणीं " (२।८५)

असें म्हणून मुलासाठीं जिवन्त राहून जन्मभर खडतर तपश्चर्या करणारी सवत्स विधवा; आणि प्रेमाचें मूलभूत पावित्र्य पटून,

" कुणि कसें म्हणा, कुणि करा हवें तें आतां;
ते कांत, यापुढें मीहि तयांची कांता ! " (२।८५)

असें म्हणून जाहीर रीतीनें प्रियकराशीं पुनः विवाहबद्ध होणारी सुधारक विधवा अशीं चार संस्मरणीय चित्रें तांबे यांनीं काढिलीं आहेत. कवीनें याहून निराळी सामाजिक कामगिरी कोणती करावयाची ?

प्रेमविषयक कवितांत ताम्बे अनेकदां सङ्केताकडे, कादंबऱ्यांतून आढळणाऱ्या अद्भुतरम्य प्रेमाभासाकडे वळतांना दृष्टीस पडतात. फक्त ' पन्नास वर्षांनंतर ' (१।१०३) या हृदयस्पर्शी करुण प्रेमगीतांत मात्र आयुष्यास कायमचें एखादें वळण लावून टाकणाऱ्या प्रेमवेडाचा आविष्कार आहे. प्रेमाग्नीची आंच हृदयाच्या राखेंत आमरण कशी राहते हें ती कविता वाचतांच पटतें.

ताम्बे यांच्या प्रेमाचा विविधरङ्गी बहार पत्नीवर लिहिलेल्या कवितांत फुललेला दिसतो. विवाहोत्तर प्रेमांत केवळ तें विवाहोत्तर म्हणूनच एक उणीव राहते. माणूस हक्काचें झाल्यावर सहवासानें त्याच्यावर जें प्रेम जडतें त्यांत सौजन्याच्या, सहकाराच्या व कृतज्ञतेच्या रमणीय छटा दिसल्या तरी कोठीतरी, कोणाचें कोण अशा स्वतंत्र माणसावर जडणाऱ्या भीतियुक्त प्रेमाची ' आन्तरः

कोऽपि हेतु'ची असामान्य, मादक असूनही उद्‌बोधक अशी रमणीय व चिर-स्मरणीय छटा आढळत नाहीं. सांगितल्यावरून केलेली कविता ही जशी बहुशः नीरस तसें पत्नीवरील प्रेम बहुशः अकाव्यमय असतें. या उणिवेची जाणीव सामान्य मनुष्याला राहत नाहीं. सामान्य जनांच्या आशाच आधीं सामान्य व हीन असतात. शिवाय अनेकांच्या बाबतींत तारुण्याच्या उड्या तारुण्याबरोबरच नाहींशा होतात. परन्तु ताम्बे मनानें सदैव तरुण आहेत. त्यांच्या काव्यांत प्रेमाची नव्हाळी आढळते व ती उदात्ततेशीं संयुक्त असते. प्रेमविषयक व्यक्ति ही पत्नीच असल्यानें अन्योक्तीनें प्रेमवर्णन करण्याचा भीरु व शिष्ट सम्प्रदायही त्यांस अङ्गीकारावा लागला नाहीं.

" जन्मजन्मिचें क्षुधाव्यथित मन लाभुन तुज आकंठाचि धालें
गे साखि जीवित सुफलित झालें "

असे पूर्ण समाधानाचे उद्‌गार काढूनही ते मध्येंच नवतरुणाप्रमाणें मोहून जाऊन म्हणूं शकतात,

" सहज तुझी हालचाल मंत्रें जणुं मोहिते;" आणि या मन्त्रमूढतेंत

" एकवार बघं हासुन
डळमळेल सिंहासन !
तळमळतिळ मानिं सुरगण
हास्यास्तव खास ते !
ही अपूर्व शक्ति सगुण
झाडितसे मम अंगण,
हें माझें भाग्य बघुन
जळफळतिल देव ते." (२।८८)

अशी रम्य अतिशयोक्ति त्यांच्या तोण्डून बाहेर पडते.

प्रेम म्हणजे लाज वाटण्याजोगा विषय आहे असें त्यांस वाटत नाहीं. प्रेमांत शारीरिकतेचा अंशही नसतो व नसावा असें म्हणणारे लोक कांहीं तरी अर्थशून्य बडबड करून केवळ आत्मवञ्चना करीत असतात. ताम्बे स्पष्टपणें कबूल करतात कीं,

" कांतेनें पाहिल्या रसोंचि हृदया या टाकिलें व्यापुनी " (१।२०)
" कांते, त्वन्मूर्ति येतां अनुपम शयनागार लागे खुलाया " (१।२२)
मागील एक आठवण होतांच ते आठवतात :—

" ती रम्या रजनी, पयोधवल तें आकाश, तो सौध, ती
प्रीतिज्योति सखी विलोल नयनीं तें वारि, तें चुंबन ! " (१।२१)

इन्द्रियजन्य अनुभव त्यांस अवास्तव वाटत नाहींत. ते नश्वर असले तरी त्यांची सत्यता अनुभवसिद्ध व काव्यप्रेरक असते. ते अनुभव स्पृहणीयच असतात. तांबे म्हणतात :—

" झळक चपल ही व्ययार्थ, हीस्तव प्रणयाचा अपमान न करि गे
शरिरभोग हे भोगुनि सरती, सत्करण सुमुखि, उत्थान न करि गे ! "
(२।७८)

" उद्यांची काय कळे रे गती ?
पळ पळ पळतो काळ पिळित जन करी प्रीति संप्रती !
रंग रतिरसीं ! मृत्युंजय हो ! काळ काळ तो किती ? " (२।२६)

प्रेम ज्या मानानें स्वार्थरहित असेल त्या मानानें तें उच्च व पवित्र समजावयाचें असतें. स्वतःला कामवासनेनें सोडिलेलें नाहीं या गोष्टीकडे कानाडोळा करून काव्यांत 'दिव्य', 'भास' 'अपार्थिव', 'ज्योतिःसंगम', 'चित्कला' असे कांहीं शब्द वापरल्यानें प्रीतीला उचता व पावित्रता येत नसते. उत्कर्षामुळें प्रीतीचा भक्तींत लय होईल तेव्हां होऊं द्या; परन्तु प्रीतिभक्तींचा उत्कृष्ट समन्वय करण्याची यातायात कां ? अशा समन्वयाच्या नीरस कविता सर्व मनुष्यमात्राचें साम्य दाखविणारे हाडांचे सांपळे होत. अशा कवितांपेक्षां मी केवळ रक्त-मांसाचा बनविलेला आहें असें प्रामाणिकपणानें म्हणणाऱ्या ' फ्रा लिप्पो लिप्पी ' च्या चित्रांप्रमाणेंच कमी अध्यात्मभावसूचक पण जिवन्त सेन्द्रिय कविताच अधिक इष्ट होय असें म्हणणें प्राप्त आहे. तांबे यांची प्रेमकविता शुद्ध आहे. प्रयोगशाळेंत निर्मिलेलें पाणी शुद्ध असलें तरी तें बेचव लागतें. तशी ती शुद्ध बेचव नाहीं. डोङ्गरांतून खळखळून वहात येणाऱ्या झऱ्यांतील जीवना-प्रमाणें ती शुद्ध व रुचिकर आहे.

तांबे यांची दृष्टि इन्द्रियगोचरापाशींच यांबत नाहीं.

" अगाध दुर्मिळ जनीं दिसे मज कांहिं तुझ्या लोचनीं
या डोळ्यांच्या खिडक्यांभीतरिं
अफाट अनुमप दिसे माधुरी
प्रिये जिवलगे, काळिज त्यावरि
टाकिन कुरवंडुनी " (२।७१)

प्रेमानें दोन जीव बद्ध झाले म्हणजे शरिरानें ते विभक्त असले तरी त्या दोघांत सहसंवेदना कशी चालूं असते याचें सुन्दर चित्र ताम्बे यांनीं 'माझें कोडें' या कवितेंत काढिलें आहेः—

" माझ्या शिरिं ढग निळा डवरला
तुझ्या नयनिं पाउस खळखळला !
शरच्चन्द्र या हृदयिं उगवला,
प्रभा तुझ्या उरिं शीतल कां ?
कुणि माझें कोडें उकलिल का ? (२।२)

उत्कटतेच्या परमकोटीला पोचलेली प्रीति म्हणजेच भक्ति होय. त्या एकान्तांत श्लीलाश्लीलतेचा विचारच सम्भवत नाहीं.

" रे बुडव, लाव वा पैलथडीं !
साहस म्हण कीं पोरपणा म्हण
भावडेपणा, स्वैरपणा म्हण
नादिपणा, अविचारिपणा म्हण
पण गेली ती परते न घडी.
मोह अचानक पडे मजवरी
सर्कन् पदरचि गळे पळान्तरिं,
नग्नचि झालें न कळत सत्वरि
तूं घाल शाल, टाकीं उघडी.



सातां कांहिं न रे माझ्या करिं
सर्वस्वी रे भार तुजवरी !
मार, तार ! छळ करीं ! प्रीति करीं !
घेतली तुझ्या मी उरीं बुडी ! " (२।३)

प्रणयाच्या मीलनानन्तर जगत्प्रलयाची पर्वाच नाहीं.

" ध्रुव धरणी हो चरणांखालीं,
वितळुन जावो नच पातालीं
तुझिमाझी जों ग्रंथि न झाली;
मग उधळो तीचा कण कण गे !
क्षण हाच जवळ ये तूं पण गे !
मग विसर हवा तर हा क्षण गे ! " (२।४)

किंवा

" तूं राजा, मी राणी कांता !
भीड लाज मग कशास आतां ?
होउन केवळ निसंग नाथा
रंगीं रंग मिसळीं सदया. " (२।२)

लोक वेडे म्हणतील तर म्हणोत बापडे !

" जन खुळे म्हणति तर अपण खुळे !
त्यांचें अपुलें कधिं न जुळे !
ह्रपापले जन वस्त्राभरणा,
विटलों मधल्या शरिरावरणा,
वस्त्रें सुन्दरि, काय आपणां ?
दो जीवांतिल पटच गळे !
कमलदलस्थित जलबिन्दू गे,
दल हललें, जुळलीं तीं दोघें !
माझ्या तुझिया या संयोगें
आकृतिचा गे बांध ढळे ! " (२।११५)

किंवा अनंत जन्मांचें शुभसंचित
क्षणीं याच गे होवो कुसुमित !
दिव्य करो हा क्षण अविलंबित
ये करुं दे आत्मसमर्पण गे ! " (२।३)

आपल्या पत्नीवर ते अशीं उत्कट प्रेमगीतें रचीत असतांनाच फार आजारी पडले व आतां आपली इहलोकची यात्रा सम्पणार असें त्यांस वाटूं लागलें. ही भयङ्कर कठिण वेळ असते; दम्भ, शिष्टपणा, कृत्रिमता हीं सारीं या क्षणीं लटपटतात. मरणोन्मुख मनुष्याच्या ओंठावर सत्यच वसतें, असें मरतांना सोहराब रुस्तुमास बजावतो तें अक्षरशः खरें आहे. त्या स्थितींत ताम्हे म्हणतात :—

" दैत्यशी छातिवर ठेली तुजपुढें रात्र अंधारी !
चल जिवा, चालणें आलें, कां उगा बघसि माघारीं ?
मुरडोन कुणाला बघशी ? ये कोण तुझ्या सांगातीं ?
चल उचल वोचकें अपुलें, जोडिलें तूंच जें हातीं.
या घरीं दिवे लखलखती, तुजपुढें परी अंधार !
परि सराय ही, न मिराशी हें काय खरें घरदार ?
चल चाल मुकाट्या पुढतीं, आठवीं कुलस्वामीला !
डोळ्यांस असंगल पाणी आणी न अशा शुभवेळां.
—ऐक ती क्रूर आरोळी, दरडावुन येती हांका ! "
(२।३०)

हें ' आव्हानशृंग ' इतकें तीव्र असतें कीं ' सुटे पळ भरे पिसें ' अशी स्थिति होते. तथापि क्षणभरतरी मागें पाहत रेङ्गाळणारा जीव विनवितो :—

" आलों, थांबव शिंग ! दूता, आलों थांबव शिंग !
किति निकडीनें फुंकिसि वरिवरि कळला मला प्रसंग !
जरी नाटकगृह हें गजबजलें
जरी नानाविध जन हे सजले,

मजविण त्यांचें कितीहि अडलें,
पहा सोडिला संग.
विसर्जिलीं मीं स्वप्नें सारीं,
आशा लावियल्या माघारीं
दुनियेच्या आतां बाजारीं
माझा न घडे संग " (२।३२)

हें म्हणणें जितकें सोपें तितकेंच करणें कठिण आहे. दुखःपरम्परेमुळें जीविताला उबगलेल्यांनीं मृत्यूचें साभार व सानन्द स्वागत केल्याचीं उदाहरणें जगांत कांहीं नाहींत असें नाहीं. संसार कष्टमय असला तरी जीवित बहुशः प्रियतमच असतें; मग जगाची सुखमयता ज्यांनीं अनुभविली त्यांनीं मृत्यु म्हणजे स्वर्गहीं गमन अशी जरी समजूत करून घेण्याचा यत्न केला तरी प्रत्यक्ष कृतीच्या वेळीं किती अवघड वाटत असेल !

" घरासीहि जातां हुरहूर वाटे । अश्रुपूर दाटे लोचनांत
असें हीन दीन साऱ्यांचा मी ऋणी । उपेक्षिलें कोणी नाहीं दीना "
(२।३४)

या काळांत आशा, निराशा, श्रद्धा, आशङ्कता, विवेक, उद्वेग इत्यादि नाना तऱ्हेच्या भावनांचा झगडा चालू असतो; आणि मनाची अवर्णनीय ओढाताण होत असते.

" कळा ज्या लागल्या जीवा मला कीं ईश्वरा ठाव्या,
कुणाला काय हो त्यांचें ? कुणाला काय सांगाव्या ?
नदी लंघोन जे गेले तयांची हांक ये कानीं,
इथें हे ओढती मागें मला जखडोन पाशांनीं.
भयंकर ओढ ही लागे पुढें मागें मनामाजीं
तटातट् काळजाचे हे तुटति तंतू क्षणामाजीं " (२।४८)

कोणत्या तरी विचारसरणीनें मनुष्याला या स्थितींत समाधान करून घेऊन पुढची तयारी करावी लागते. ही विचारसरणी साऱ्यांसच पटेल असें नाहीं.

उदाहरणार्थ, ताम्बे यांची विचारसरणी मरणोत्तर कांहींच नाहीं असें मानणाऱ्या निर्वाणवादी मनुष्यास पटणार नाहीं. तरी प्रामाणिकपणाचे, जिव्हाळ्याचे बोल सर्वांच्या हृदयाला हालवून सोडतात. योरांच्या दृष्टीनें बाहुली निर्जीव असेल. पण तिला सजीव व संवादी समजून तिच्याशीं सम्भाषण करण्यांत रङ्गून गेलेल्या मुलीचे बोल योरांना गुङ्गावितात, त्याचप्रमाणें भक्तिगीतें हीं तुकारामाच्या अभङ्गांप्रमाणें जिव्हाळ्याचीं असल्यास प्रो. वासुदेवराव पटवर्धनांसारख्या कट्टर अज्ञेयवाद्यासही वेड लावून सोडतात. आतां ताम्बे यांची विचारसरणी पुढीलप्रमाणें आहे. जें चञ्चल व नश्वर आहे त्याचा शोक कशाला !

" जन पळभर म्हणतिल ' हाय हाय ' !
मी जातां राहिल कार्य काय ?
रामकृष्णही आले गेले,
त्यांविण जग कां ओसाचि पडलें ?
कुणीं सदोदित सुतका धरिलें ?
काय अडे माझ्याशिवाय ?
अशा जगास्तव काय कुढावें ?
मोहिं कुणाच्या कां गुंतावें ?
हरिदूतां कां विन्मुख व्हावें ?
कां जिरवूं नये शांतींत काय ? " (२।३३)

पुनः भिणाऱ्या मनाला धीर द्यावा लागतो कीं, तुझ्यांत बळ आहे; तूं धीर कां सोडतोस !

" घाबरूं नको । बावरूं नको !
क्षणभीतीनें गांगरूं नको !
निर्वाणिचें काढ सुदर्शन
तळघरांत जें ठेलें लपवुन,
मार नेम रे अचूक रोखुन
तूं जयश्रीस अंतरूं नको ! " (२।३१)

कोणास ठाऊक मरण म्हणजे नवजीवनाचा आरम्भ असेल; अन्धारांतूनच प्रकाशाचा उदय असेल.

" घन तमीं शुक्र बघ राज्य करी !
फूल गळे, फळ गोड जाहलें,
बीज नुरे, डौलांत तरु डुले;
तेल जळे, बघ ज्योत पाजळे !
कां मरणिं अमरता ही न खरी ?
मना, वृथा कां भीसी मरणा ?
दार सुखाचें तें ! हरिकरुणा !
आई पाही वाट रे मना,
पसरून बाहु कवळण्या उरीं."(२।९०)

ही आई, वस्त्रं जुनीं (' वासांसि जीर्णानि ') झालेलीं पाहून पान्हा फुटून जवळ बोलावून नवा नवा पोशाख देऊन श्रेष्ठतर कार्य करावयाला धाडिते. मरणोत्तर प्रदेश म्हणजे परन्धाम ('God who is our Home') आहे. परमात्मा म्हणजे माता, पिता, सखाच नव्हे तर बन्धूही आहे. मरणाच्या द्वारा अज्ञात व अपरिहार्य अशा या मूलतत्त्वाकडे जाणें म्हणजे नववधूनें यदृच्छया पतित्व–सदाचें पतित्व पावलेल्या, अपरिचित ' कृतान्तो वा कान्तः समजनि न भेदः प्रथमतः ' अशा पुरुषाकडे जाण्यासारखें आहे. माहेरची माया तुटत नाहीं. नव्या घरची भीति सुटत नाहीं. धीर धरून कांहीं पाउलें झपझप पुढें गेलें तरी दारापाशीं पाय एकदम थबकतात. मन माघार घेऊं लागतें. या मनस्थितीचें उत्कृष्ट वर्णन ताम्ब्यांनीं पुढील कवितेत केलें आहे :—

" नववधू प्रिया, मी बावरतें !
लाजतें, पुढें सरतें, फिरतें !
चित्र तुझें घेउन हृदयावरि
हारतुरे घालितें परोपरी

छायेवर संतोष खुळी करिं.
तूं बोलवितां परि थरथरते !
अतां तूंच भय लाज हरी रे,
धीर देउनी ने नवरी रे,
भरून येउत नेत्र जरी रे,
कळ पळभर ! मात्र खरें घर तें ! " (२।१२)

स्त्रीपुरुषसम्बंधांत निर्णयात्मक गोष्ट पुरुषानेंच करावयाची असते. दाट परिचयान्तीं विवाह होऊं लागल्यानन्तर उपर्युक्त कवितेंत रेखाटलेलें चित्र तितकेंसें जिव्हाळ्याचें व परिणामकारक वाटणार नाहीं. तथापि पाश्चात्य समाजांत अजूनही प्रेमाचा आविष्कार करून पाणिग्रहणाची याचना पुरुषानेंच करावयाची असते. स्त्रीच्या मनाला जी गोष्ट अत्यन्त प्रिय व इष्ट ती स्वतः करितांना तिला संकोच व भय हीं वाटावींत; आणि तीच गोष्ट प्रिय माणसानें केली कीं बाह्यतः अनिच्छा दाखवीत अर्धगुप्त आनन्दानें तिचा तिनें स्वीकार करावा यांतच स्त्री-जातीचें निसर्गमोहन आहे. टिळकांनीं म्हटलेंच आहेः—

" 'नको ! नको !' त्रासून म्हणावें परंतु द्यावें द्यावें
हें प्रेमाचें लक्षण नाहीं कुणा प्रेमळा ठावें ? "

मरण म्हणजे परमात्मरूपी रमणानें केलेलें जीवात्मरूपी रमणीचें हरण होय असें वाटूं लागलें कीं, त्या भीषण सङ्क्रमणांत एक प्रकारचें सौभाग्य-सौंदर्य दिसूं लागतें. शेलीला मृत्यु हा निद्रेचा भाऊ वाटून तो तिच्याइतकाच सुन्दर वाटत असे. तांब्यांची 'फेरीवाला' (२।४९) ही प्रेमकविता ज्या काळांत लिहिली गेली त्या काळांतील इतर कवितांकडे पाहिलें कीं ही कवितासुद्धां मरणास सुचवीत असावी असें वाटतें. बाकी या व्यङ्ग्यार्थाकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं तरी ही कविता चित्ताकर्षक वाटल्यावांचून राहत नाहीं. आणि रूपकात्मक कवितांत उत्कृष्ट तीच कीं, जिच्यांतील रस लुटावयाला सूचित विशद करण्याची म्हणजे भाष्य करण्याची जरूरी पडत नाहीं.

वरील परिच्छेदांत जो तर्क व्यक्त केला आहे त्याला आधार 'उडाला पक्षि पिंजऱ्यांतुनी' (२।५०) या कवितेंत आढळतो. ताम्बे म्हणतात :—

"अफाट गगनीं दृष्टी फेंका !
खुशाल मारा हजार हांका !
जीवाहि त्यांच्या मागें झोंका !
येइल का परतुनी उडाला पक्षि पिंजऱ्यांतुनी ?
अनंग कोणी कुमार आला,
हांक मुकी दे कवराणीला
जादूचा मग जोर लाविला,
भरजरि खिडकींतुनी–उडाला पक्षि पिंजऱ्यांतुनी !"

शृङ्गार हा विषय ज्याप्रमाणें मानवजातीला सदैव जिव्हाळ्याचा वाटत आलेला आहे, त्याचप्रमाणें मरण व मरणोन्मुख स्थिति हाही विषय सदैव जिव्हाळ्याचा वाटत आलेला आहे. हीच स्थिति पुढेंही राहील. वयोमानाप्रमाणें या दोन विषयांपैकीं कोणत्या तरी एकाचा जिव्हाळा अधिक निकट वाटतो ती गोष्ट निराळी. तेव्हां मरणावरील सरस भावगीतें हीं प्रणयावरील सरस भावगीतांइतकींच परिणामकारक वाटतात. ताम्ब्यांचीं हीं 'महाप्रस्थान' विषयक भावगीतें नितान्त रमणीय व हृदयस्पर्शी आहेत. या काव्यांचा दर्जा उच्च आहे. पण या उच्चतेचें कारण विषयाची बाह्य श्रेष्ठता हें नसून कवितेची सरसता हें आहे. ताम्ब्यांच्या दुसऱ्या भागांत हीं 'महाप्रस्थान' विषयक गीतेंच विशेष प्राचुर्यानें असल्यामुळें कोणी कोणी म्हणतात कीं, ताम्ब्यांची आध्यात्मिक उन्नति झाली आहे. असें जे म्हणतात त्यांच्या हृदयांत शृङ्गाररसापेक्षां भक्तिरस अधिक शिष्ट, अतएव अधिक श्रेष्ठ अशी गुप्त भावना असते. परन्तु भिन्न भिन्न रसांची तुलना करून नीतिदृष्ट्या श्रेष्ठता ठरविणें हें काव्यदृष्ट्या हेत्वाभासमूलक असतें. विशिष्ट अनुभवांच्यामुळें ताम्ब्यांची उन्नति झालीच असली पाहिजे. परंन्तु महाप्रस्थानाविषयक गीतांच्या प्राचुर्याचा अर्थ इतकाच कीं, ताम्बे यांना आपण तितके मृत्यूच्या सान्निध्य आलों असें वाटल्यामुळें त्याच विषयाचा ध्यास लागून राहिला होता.

मनाची उन्नति व्यक्त व्हावयाला मरणाचीं व भक्तीचींच गीतें नकोत. मनांत उदात्तता असली तर ती प्रणयगीतांतसुद्धां उठावदार रीतीनें प्रतिबिम्बित होईल; आणि कविता नीरस असली तर भक्तीचा विषयसुद्धां तीस सरस करूं शकणार नाहीं. चित्ताला हलवूं न शकणाऱ्या परन्तु भक्तींचें शिष्टरूप धारण करणाऱ्या पद्यांपेक्षां बावनकशी शृङ्गाराच्या सरस कविता—मग लावण्यांप्रमाणें त्या अश्लील असल्या तरी—रसिकांस रुचतात.

ताम्बे हे कल्पनीयवादी आहेत. ताम्बे यांचीं अतीन्द्रियासम्बन्धीं मतें पुढीलप्रमाणें आहेत:—" शान्ताचे ठायीं अनन्तत्व आहे. या रूपांच्या क्षणोक्षणीं सतत अनिवार्य उलाढालीच्या, उलटापालटीच्या बुडाशीं कांहीं अक्षर तत्त्व आहे. अपूर्णतेच्या ठायीं पूर्णता आहे आणि वैचित्र्याच्या ठायीं ऐक्य आहे. ' सूत्रे मणिगणाइव ' या न्यायानें असणाऱ्या या अनन्ताला आपण ' कल्पनीय ' म्हणूं आणि विश्वांतील अगणित नामरूपांना आपण ' वास्तव ' म्हणूं. बाह्य निसर्ग मनुष्यान्तर्गतविषयींचें एक भलें विस्तृत चित्र होय; किंवा उलटपक्षीं मनुष्यान्तर्गतविषयीं मनुष्य बाह्य वस्तूंचें सूक्ष्म चित्र होय. हृदयान्तर्गत आत्म्याचा हृदयबाह्य विश्वाशीं अव्याहत पण गूढ असा व्यवहार चालू असतो. एखाद्या प्रशान्त वेळीं जेव्हां सृष्टिचक्राची घरघर थांबलीशी वाटते तेव्हां आपल्याला हा अन्तर्ध्वनि ऐकावयाला सांपडतो. कल्पनीयाचे ठायीं असलेला आनन्द हा सौन्दर्यरूपानें वास्तवामध्यें विस्तरला आहे. कवींच्या ठायीं स्वभावतःच सहृदयता, उत्कट मनोभावना आणि कल्पना यांचें वैपुल्य असल्यामुळें न कळत वास्तवाचे ठायीं असलेलें सौन्दर्य त्याचें मन ओढून घेतें. परन्तु सौन्दर्याबरोबर हातांत हात घालून कुरूपता ही उभीच असते; कारण सारें विश्वच द्वन्द्वमूल होय. कवि आपल्या सत्यान्वेषणांत कुरूपतेनेंच प्रेरित होऊन अनन्त सौन्दर्याचा पाठलाग करीत जातो; आणि वस्तूचे ठायीं असलेली अशुद्धता आणि अपवित्रता धूत धूत आपला जन्मसिद्ध भाव आणि कल्पना यांच्या पङ्खांवर आरूढ होऊन आनन्दाच्या शिखरावरून कल्पनीयांत लीन होतो. याचा अर्थ असा कीं, हें मर्त्य शरीर मागें राहतें आणि आत्मा आत्मसुखांत बुड्या घ्यावयाला लागतो. इन्द्रियांचें काम इतकेंच आहे कीं वास्तवाची प्रतिमा मनांत नेऊन अन्तःशक्तीच्या स्वाधीन करून द्यावयाची आणि नंतर नम्रपणें परतावयाचें. उच्चतम

सं. सं. नि० ९२५

लोकांतून पुनः एकदां कवि खालीं उतरला म्हणजे अन्तरात आनन्द मङ्गलाच्या आवेशानें खळखळून बाहेर उसळतो. या बहिरोविष्करणास आपण काव्य किंवा गीत असें नांव देतों. निर्भेळ द्वन्द्वातीत आनन्दाच्या आविष्कारास कवि–कल्पना साह्य करते. आतां अनन्तरूपाचे ठायीं, अगणित वैचित्र्याचे ठायीं एका दृष्टिक्षेपानें अद्वयाचें अवलोकन करणारें समीकरणच होय, पृथक्करण नव्हे. नस्तराला वास्तव भिवो, पण कल्पनीय भीक घालणार नाहीं. जिव्हाळा हें समीकरण–मूळ होय. ज्याची दृष्टि केवळ वास्तवापर्यन्तच थबकते आणि वास्तवांत दिसणाऱ्या बाह्य सौन्दर्यानें मात्र मोहित होते, त्याजपाशीं शब्दांचा हवा तितका भरणा असो, अलङ्कारांचें कोथळें हवें तितकें भरलेलें असो त्यास 'अवर' कवीच म्हणावें लागेल. कविता निसर्गाची नक्कल नव्हे तर नित्यापेक्षां अनन्तपट सौन्दर्ययुक्त अशी तसबीर होय. सोहनीराग ही एखाद्या पांखराच्या प्रभातगीताची नक्कल आहे काय ? निसर्गांतील कोणतीही वस्तु कवीच्या हृदयांत प्रविष्ट होऊन तिनें त्याला गदगदा हालवून टाकिलें आणि त्याच्या आवास आणि कल्पनेस वेगानें चालन दिलें म्हणजे कवितेचा सम्भव असतो. वास्तव, हृदयान्तर्गत सत्त्वांत सुस्नात होऊन बाहेर येतें. आपल्या हृदयाच्या गूढ गाभाऱ्यांत अनन्त कल्पनीय वास करीत आहे. त्यांत निसर्गातील रूपांच्या प्रतिमा पोहोंचवून सुस्नात झाल्या म्हणजे त्या द्विजन्म पावून हृदयांतील अनन्त किरणांनीं लखलखत बाहेर पडतात. काव्याच्या राज्यांत अन्तर्मुख दृष्टि हीच खरी सत्ता होय "* ताम्बे यांची काव्यसम्भवाविषयीं व्यक्तिब्रह्मसम्बन्धीं या प्रकारचीं मतें आहेत.

कलेचीं कृति ही वास्तवाहून अधिक सुन्दर कां वाटते, ती कशी निर्माण होते इत्यादि प्रश्नांस समाधानकारक उत्तर देण्याचा प्रयत्न ताम्बे यांनीं वरील अवतरणांत केलेला आहे. हें वाचून त्यांच्या एखाद्या दुसऱ्या ओळीचा अर्थ अधिक विशद होईल. परन्तु तेवढ्यावरून त्यांना गूढार्थवादी किंवा गूढगुञ्जनी कवि म्हणतां येईल काय ! कल्पनीय आणि वास्तव, अथवा प्रतिमा आणि

---

* १९२६ सालीं इंदूर येथें भरलेल्या पहिल्या मालव–कविसम्मेलनाचे अध्यक्ष या नात्यानें ताम्बे यांनीं केलेल्या भाषणांतून हा सारांश त्यांच्याच शब्दांत घेतलेला आहे.

भाव यांच्या सङ्गमापासून त्रिभुवनसुन्दरी कलेचा जन्म आहे हें त्यांनी आपल्या " आरती " त साङ्गितलें आहे :—

" अंबिका लाभतांच संगा
प्रसवे खळखळ भवगंगा !
अनंगहि येई मग रंगा !
सूर्य झळझळाति
चंद्र लखलखति,
उडू लुकलुकाति
रम्यता गति मग प्रेमाची
जय जय सान्त अनन्ताची ! " (२।९२)

त्याचप्रमाणें ' मूक—संगीत ' (२।१६) या कवितेंत

" हाय मना, तव कपाळ फुटलें !
तुझ्याच घरचें तुलाच न कळे !
जन्ममरणिं बघ खेटर न मिळे !
जा फोड ऊर ! तळमळ ! मर रे ! " (२।१७)

असा शोक करितांना व्यक्तीच्या हृदयांत सर्व सौन्दर्याचें सार आहे असा समज गृहीत धरिलेला आहे. " साउली " (२।१२) या कवितेंत साउलीचा सप्तमिरा अर्धविनोदी रीतीनें वर्णून द्वैताची बाधा सूचित केलेली आहे. या तीन कविता वगळल्या तर त्यांच्या कवितेंत विशेष गूढ अर्थ कोठेंही आढळत नाहीं. ते कल्पनीयवादी असले तरी गूढ कल्पनीयाला उद्देशून त्यांनी कविता लिहिलेल्या नाहींत. त्यांच्या कवितांचा अर्थ निराळ्या आध्यात्मिक तऱ्हेनें बसाविण्याची जरूरी पडत नाहीं. कुरूप वस्तु पुढें ठेवून तींत ईश्वरांशाचें गूढ सौन्दर्य आहे, तें प्रतीत करून मात्र द्यावयाला पाहिजे, असें भाष्य ऐकून कोणीही तिच्यावर भाळणार नाहीं; आणि जें स्पष्ट, सुन्दर आहे त्यांत गूढ कांहीं नाहीं असें कोणी बजाविलें तरी रसिक हा आकार्षिला जाणारच. ताम्बे यांच्या कवितेंत गोचर सौन्दर्य आहे, भावनेचा जिव्हाळा आहे, म्हणून

रसिकाकर्षण आहे. ताम्बे यांची कविता गूढ नाहीं; ती भक्तिवादीही नाहीं; कारण नामदेव–तुकारामांच्या भक्तिभावाला जें निश्चित साम्प्रदायिक स्वरूप आलेलें आहे तें ताम्ब्यांच्या कवितेंत आढळत नाहीं. त्यांची कविता अध्यात्मवादीही नाहीं. अमुक एक पन्थाचे ते वेदान्ती नसल्याकारणानें त्यांच्या काव्याला विशिष्ट सिद्धान्तावलीचें सरूपक दृष्टान्तविवेचन असें स्वरूपही प्राप्त होऊं शकत नाहीं. त्यांची कविता समजून आनन्द लुटावयाला ब्रह्मसूत्रांच्या अभ्यासाची जरूरी पडत नाहीं. ते रसिक असल्याकारणानें सौन्दर्य–पार्थिव सौंन्दर्यही दृष्टीस पडतांच ते मोहून जातात व गाऊं लागतात. विरक्तीची छाया त्यांच्या काव्यावर नाहीं. त्यांत प्रसाद आहे, म्हणजे सुबोधताच नव्हे तर आनन्द आहे. ताम्ब्यांचें हृदय इतर मानवांप्रमाणेंच संस्कारक्षम आहे आणि म्हणूनच त्यांच्या कविता नास्तिकांच्याही मनोवृत्तीस उचम्बळून सोडल्यावांचून राहणार नाहींत. ते नीतिपाठही द्यावयाला अवतीर्ण झालेले नाहींत किंवा अनेकांकडून एकाकडे नेणें हें त्यांचें जीवितध्येयही नव्हे. त्यांच्या मतें " काव्य हें आत्यंतिक निरुपयुक्ततेंत जनन पावतें म्हणून तें अत्यंत उपयोगी होय; व तें नीतीविषयीं इतकें बेपर्वा असतें म्हणूनच साऱ्या नीतीचें सार त्यांत सांठविलेलें असतें.

रुद्रास आवाहन (काव्यचिकित्सा) : : ४

रा. ताम्बे यांनीं कितीतरी सुंदर भावगीतें रचिलीं आहेत; परंतु 'रुद्रास आवाहन' हें त्यांचें गीत केवळ अद्वितीय आहे. त्यांच्या एरव्हींच्या अद्भुत-रम्य नर्मशृंगाराचा उल्लास वा गंभीर करुणरसाचा विलास या गीतांत नाहीं. न्यायतृष्णेच्या निराशेची ही शेवटली हृदयभेदकच नव्हे, तर जणूं काय गगनविदारक अशी किंकाळी आहे. ही ऐकतांना जणूं काय प्रलय-मेघाच्या गडगडाटांत क्रांतीचें विराट् स्वरूप थयथयाट करीत आहे असें वाटतें. न्यायाची चाड, जुलमाची चीड, सत्त्वाचा अभिमान, तत्त्वाचें प्रेम, मरणाची बेपर्वाई इत्यादि गुणांचा पराकाष्ठेचा कल्लोल प्रस्तुत गीतांत प्रतीत होतो. यांतील सावेश व कर्कश वज्रानिर्घोषापुढें केशवसुतांच्या 'तुतारी' चा सूर सौम्य व क्षीण वाटतो.

राजकीय जागृति फैलावूं लागल्यापासून देशभक्तिपर कवितांची पैदास आज पंचवीस वर्षें सारखी वाढत्या प्रमाणांत होत आहे. "धन्य शिवाजी तो रणगाजी, धन्याचि तानाजी!" ही ओळ दुमदुमूं लागल्यापासून अगणित शाहिरी कविता रचिल्या गेल्या आहेत. कित्येक पदांना गणपतीच्या मेळ्यांतून व प्रभातफेऱ्यांतून थोडें तरी हंगामी चलन मिळूं शकलें. परंतु बहुतेकांची स्थिति जन्मतांच मेल्यासारखी झाली. निर्घृण काळाच्याहि हृदयाला पाझर फोडतील अशा कृती विरळाच आहेत. रा. ताम्बे यांची प्रस्तुत कृति या प्रकारची आहे. विशिष्ट परिस्थिति निर्माण झालेली व तिला चिकटून राहा-णारी कविता जिवंत असली तरी काळ बदलून ती विशिष्ट परिस्थिति नष्ट झाली कीं नीरस वाटूं लागते व अखेर ती लुप्त झाल्यावांचून रहात नाहीं; मग केवळ टूम म्हणून, खपता माल म्हणून पैदा केलेली कविता किती टिकेल! अज

आणि इंदुमती या जोडप्याविषयीं कुणालाहि नात्याचा जिव्हाळा वाटत नाहीं; तथापि अज-विलाप हें काव्य हिंदु—अहिंदु, हिंदी—अहिंदी सारख्याच जिव्हाळ्यानें वाचतात व वाचीत राहतील. उलटपक्षीं लोकमान्य टिळकांना पाहिलेले आणि त्यांचे स्फूर्तिदायक निश्चयाचे बोल ऐकलेले असंख्य लोक आज महाराष्ट्रांत असूनही टिळकांच्यावर लिहिलेलीं अगणित गीतें नष्ट होऊन गेलीं आहेत. यांचें कारण हेंच कीं, या गीतांत जिवंत स्फूर्ति नव्हती आणि निकट परिस्थितीच्या पलीकडे पाहणारी दृष्टि नव्हती. ही दृष्टि "रुद्रास आवाहन" या कवितेंत आहे. ही कविता एका पौराणिक देवतेस उद्देशून आहे. तेव्हां वीरवैष्णव वगळून हिंदूंस सामान्यतः व लिंगायतादि वीरशैवांस विशेषतः, ती धार्मिक सहानुभूतीमुळें आवडेल. याला काव्यदृष्ट्या महत्त्व नाहीं. ग्रीक, रोमन वगैरे पौराणिक कथा-संबंधीं आमची आज जी भावना आहे तीच भावना हिंदी पौराणिक कथांसंबंधीं ज्यांची आहे अशा परकीय लोकांतील काव्यरसज्ञांसही "रुद्रास आवाहन" ही कविता आवडेल, अशी आमची खात्री आहे. ही कविता पौराणिक असली तरी तिच्यांतील तत्त्व संकुचित क्षेत्रापुरतें व हंगामी मोलाचें असें नाहीं. भूमितीचे सिद्धांतही तसे नाहींत. ते शाश्वत आहेत; परंतु ते नीरस, शुष्क आहेत. "रुद्रास आवाहन" या कवितेंत एखादें त्रिकालाबाधित तत्त्व शास्त्रीय परिभाषेंत वा रूपकाभासी भाषेंत सांगितलेलें नाहीं. माधव-ज्यूलियनकृत "भ्रांत तुम्हां कां पडे ?" या कवितेंत शाश्वत उपदेश सावेश शब्दांत मांडलेला आहे. परंतु त्या कवितेंतही प्रतिभानिर्मित, चालता-बोलता, हलता-हलविता, असा तत्त्वाचा अवतार नाहीं. हें अवतार-नावीन्य, हें शाश्वत हृदयंगमत्व तांबे यांच्या कवितेंत आहे. हिच्यांत चैतन्य आहे. अचा कशीं जो संबंध येतो, तोच क्षचा शशीं येतो असें कोष्टक मांडून येथें रूपकाचें जिवंतपण सिद्ध करून द्यावें लागत नाहीं. पुराणांतील जुन्या कथांकडे प्रतिभेच्या दिव्य दृष्टीनें पाहिलें कीं, त्या पुन्हा सचेतन होऊन नवीन रहस्य कसें सुचवूं शकतात, हें "रुद्रास आवाहन" या कवितेवरून स्पष्ट कळून येईल.

जगांत एक सत्ता स्थापित होऊन बलिष्ठ होते; बळाच्या जाणीवेनें अन्याय होतो. एकंदरीनें पाहतां जोपर्यंत नुकसानापेक्षां फायदा अधिक होतो तोपर्यंत अन्याय ज्यांना होतो त्यांना तो जवळ जवळ निमूटपणें सहन करावा

लागतो. बळाचा पाया मूलतः भलाईवर आहे; परंतु दुराचरणानें बळाचा क्षय एकदम होत नाहीं. दुराचरणाच्या वाढीबरोबर बळाचा ऱ्हास होत असतो आणि अन्यायाच्या वाढीबरोबर त्याच्या प्रतिकाराच्या सामर्थ्याचीही वाढ होत असते. केव्हांतरी झुंज अपरिहार्य होऊन बळानेंच बळाचा पाडाव होतो. केवळ शिष्टाईनें न्याय मिळता तर जगांत युद्धच कधीं झालें नसतें. अखेर दुराचारी सत्ता पदच्युत होऊन संकटांतून तावून सुलाखून निघालेली तत्त्वाभिमानी लोकहितैषी सत्ता अधिष्ठित होते. कालांतरानें तीही सन्मार्गापासून चळून अधोगतीस लागते. चक्रनेमिक्रमानें होणाऱ्या अशा युद्धांत कांहीं लोकोत्तर विभूति पुढें येऊन क्रान्तीच्या जयास कारणीभूत होतात. फाजील भक्तीमुळें या लोकोत्तर विभूतीस लोक अवतार समजूं लागतात. साधूंचें परित्राण करणें व दुष्कृतांचा विनाश करणें हें या भिन्नभिन्न युगीं संभवणाऱ्या विभूतींचें अवतारकार्य असतें. दुष्कृतांचा विनाश सौम्यपणानें, सामोपचारानें होत नाहीं. जशास तसें या तत्त्वाचें स्वरूप रौद्र आहे. न्यायदेवतेला रुद्रावतार धारण केल्यावांचून गत्यन्तर नसतें. हेतुपुरस्सर नाहक दुसऱ्याचा खून करणाऱ्याला देहान्तशिक्षेशिवाय दुसरी शिक्षा न्याय्य होणार नाहीं. न्याय हा परिणामीं हितकर असला तरी तो असा उग्र आहे. शंकर (=शम् करणारा) हा परिणामी हित करणाराच आहे; परंतु तीच लयाची अधिदेवता आहे. तांबे यांची कविता या रुद्रस्वरूपी न्यायदेवतेस उद्देशून आहे. तिचें आवाहन धर्मयुद्धासाठीं आहे. तेव्हां आपलें काम साधण्यासाठीं तिला लपून छपून येण्याची मुळींच जरूरी नाहीं. गाफील शत्रूंस जागें करून मग त्यांच्याशीं धर्मासाठीं झुंज करायचें आहे. म्हणून तांबे म्हणतात:—

"डुमडुमत डमरु ये! खणखणत खड्ग ये!
शंख फुंकीत ये! येइं रुद्रा!
प्रलय-घन-भैरवा, करित कर्कश रवा
क्रूर विक्राळ घे करुद्ध मुद्रा!"

ध्रुवपदाच्या आरंभीं म्, ण्, आणि ङ् या नासिक्य वर्णांची पुनरुक्ति असल्यामुळें एक प्रकारचा तुमुल गंभीर नाद घुमतो; आणि अखेरीस क आणि र् या वर्णांची जी कर्णकर्कश आवृत्ति आढळते, तिच्यामुळें रौद्ररसाचा

एकदम उठाव होण्यास फार मदत होते. तांबे रुद्रास एका पूर्वावतारांची आठवण करून देत म्हणतात :

पूर्वि नरसिंह तूं प्रगटुनी फाडिले
दुष्ट जयिं अन्य गृहिं दरवडे पाडिले
वनुनि नृप, तापुनी चंड जन नाडिले !
दे जयांचे तयां वीरभद्रा !

वामन, परशुराम, राम, कृष्ण वगैरे अवतारांत विशेष भयानक असा नृसिंहावतारच होता. तेव्हां नृसिंहाची विशेष आठवण होणें स्वाभाविक आहे. येथें शिष्टाई करावयाची नाहीं. दक्षप्रजापतीच्या यज्ञांत झालेल्या अपमानामुळें सतीनें स्वतःस जाळून घेतलें. त्या अपमानाचा सूड घेण्यासाठीं, उसनें फेडून टाकण्यासाठीं शंकरानें वीरभद्रास निर्माण करून त्याच्याकडून दक्षप्रजापतीच्या यज्ञाचा विध्वंस करवून त्याचाही अंत करविला. त्या दुर्धर वीरभद्राप्रमाणेंच रुद्रास न्यायदान करावयाचें आहे.

" पाड सिंहासनें दुष्ट हीं पालथीं !
ओढ हत्तीवरून मत्त नृप खालतीं !
मुकुट रंकास दे, करटि भूपांप्रती !
झाड खट् खट् तुझें खड्ग क्षुद्रां ! "

या चार ओळी म्हणजे तांबे यांच्या गोचरवर्णनपद्धतीचा उत्कृष्ट नमुना होय. वैभव, सत्ता हीं मजूरांच्या, बहुजन समाजाच्या हातीं जावोत असें ते न म्हणतां ' रंकास किरीट घाल आणि रावास करटी दे ' असें ते म्हणतात. मदोन्मत्त सत्ताधीशास हत्तीवरून खालीं ओढल्याचें व त्यांचें सिंहासन पालथें घातल्याचें दृश्यही असेंच अतिशय परिणामकारक आहे. तांबे यांना नृपसत्ता नको, त्यांना केवळ प्रजासत्ताक राज्यपद्धति हवी आहे, इतका संकुचित अर्थ या कडव्याचा करावयाचा नाहीं. दुष्ट आणि मत्त हे शब्द 'नृप' शब्दाइतकेच महत्त्वाचे आहेत. लोकसत्ता ही दुष्ट व मत्त झाली तर तीसही उलथून पाडणें हें वीरभद्राचें अवतारकार्य आहेच.

संस्कृतीच्या फैलावाचें आणि बहुजनसमाजाच्या संरक्षणाचें निमित्त पुढें करून ज्याप्रमाणें राज्यतृष्णा लपवितां येते त्याचप्रमाणें शांततावादाच्या पांघरुणाखालीं अभिमानशून्यता, दुर्बलता आणि दीनता हीं कित्येकदां झांकलीं जातात. सर्वनाश करून घेण्यापेक्षां अर्धत्याग करून अर्धसंरक्षण करणें बरें, असें व्यवहारज्ञान सांगणारे दमडीबचाऊ पंडित पुष्कळच असतात. "संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते" असे खरे सम्भावित दुर्मिळ असतात. शांततावादाच्या नांवाखालीं आपलें दैन्य झांकून सांचलेल्या पाण्यांतील कीटकांप्रमाणें बुजबुजत राहणाऱ्या क्षुद्र 'पंडितां' कडे अंगुलि-निर्देश करून तांबे रुद्रास म्हणतात :—

'झाड खट्खट् तुझें खड्ग क्षुद्रा !'
"जळ तडागीं सडे, बुडबुडे, तडतडे
'शांति ही !' बापुडे बडबडति जन किडे !
धडधडा फोड तट, रुद्र ! ये चहुंकडे !
धगधगित अग्निमधि उजळ भद्रा !"

या कडव्यांतील ड्चीं आवृत्ति विचारणीय आहे.

संथ पाण्यावर एखाददुसरा बुडबुडा मध्येंच उठून तडतडावा एवढी हालचाल ज्या शांततावाद्यांस चैतन्यास पुरेशी वाटते, त्या पंडितांचा उद्धार कुणी आणि कसा करायचा ? अशा मृत जीवनापेक्षां जलप्रलयांत मरण आलेलें काय वाईट ! स्वत्वाचा संकोच स्वार्थापुरता करून कोणतीही कार्य-सिद्धि होत नाहीं. तत्त्वासाठीं सर्वस्वाची आहुती देण्यास तयार झाल्याखेरीज उद्धार करणारी यज्ञमूर्ति कुंडांतून वर येत नाहीं. विपरीत परिस्थितीशीं झुंजण्यानें आणि संकुचित स्वार्थांचा त्याग करण्यानेंच बंडाचें स्वरूप शुद्ध होत होत अखेर तप्तकांचनाप्रमाणें दैदीप्यमान होतें.

एखादी वस्तु सुधारून सुधारून कुठवर टिकेल याला कांहींतरी मर्यादा असतेच कीं नाहीं ? सार्वत्रिक अवनति झाली असल्यास आणि सुधारणेचीं बीजेंही नष्ट झालीं असल्यास काय करायचें ? केव्हांतरी आतां हें घर पार पाडून टाकूनच खुल्या जागेवर नव्या योजनेप्रमाणें नवें घर बांधावें असें वाटूं लागण्याची पाळी येतेच. अशा वेळीं हें पूर्वजांचें आहे म्हणून अंधभक्तीनें

त्याला बिलगून रहाण्यांत काय फायदा आहे ! घर पार जमीनदोस्त करणें इष्टच असलें तर धैर्यानें तसें केलेंच पाहिजे. घर पाडण्याची विघातक कामगिरी ही घरबांधणीच्या विधायक कामगिरीची अपरिहार्य पूर्वतयारी आहे. प्लेगाच्या मागून १७ व्या शतकांत लंडन शहरांत जो सार्वत्रिक अग्निप्रलय झाला ती एक या दृष्टीनें इष्टापत्तीच होती. सुधारण्याची आशा नसली तर मृत्यूच बरा; कारण तसें केल्यानें पुनर्जन्म तितका जवळ येईल. नवीन सृष्टि निर्मिल्याखेरीज गत्यंतर नाहीं अशी स्थिति असली तर प्रलय जितका लौकर होईल तितका बरा. मूढ शांततावाद्यांच्या मृत जीवनामुळें चिडून ताम्बे निराशेच्या उद्रेकांत रुद्रास विनवितात कीं आतां प्रळयच कर.

" कडकडा फोड नभ, तोड रविमालिका !
खडबडवि दिग्गजां तुडव दिक्पालकां !
मांड वादंळ, उधळ गिरि जशी मृत्तिका !
खवळवी चहुंकडे या समुद्रा ! "

निराशेनें पण धैर्यानें ते या प्रलयास तयार कां होतात तर " जातस्य हि ध्रुवो मृत्युः ध्रुवं जन्म मृतस्य च " हें पटल्यामुळें, त्यांच्या निराशेच्या पोटीं त्यांना नवीन कल्पाची, नवीन सृष्टीची आशा दिसत आहे.

याप्रमाणें विचारसरणी जुळवितांना कडव्यांचा क्रम मूळाहून भिन्न म्हणजे ४,२,३,१ असा घेण्यांत आला आहे हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. क्रांतीच्या भयंकर अवतारानें पूर्वीप्रमाणें येऊन न्यायपूर्वक दुष्टांचा संहार व सुजनांचा उद्धार करून समाजाची घडी नीट बसवून द्यावी. परंतु समाजाची सुधारण्याची आशाच नसली तर त्याला अप्रतिष्ठित निर्जीव जीवित कंठूं देण्यापेक्षां प्रलयच करून टाकावा असें रा. तांबे यांचें म्हणणें असावें असें आम्हांस वाटतें. न्यायदेवतेनें येऊन दुष्टांना दंडून जावें या कल्पनेपेक्षां समाज सुधारणाक्षम नसला तर त्याचा नाश व्हावा हेंच न्याय्य व इष्ट ही कल्पना आम्हांस अधिक काव्यमय व मोहक वाटते. प्रलयाची कल्पना अभिप्रेत नाहीं असें कुणी म्हणतील आणि प्रलय म्हणजे प्रलयाचा भास म्हणजे बरीच नासाडी करणार! पण समाजास पार नष्ट न करणारा असा एक अनर्थ, प्रकृतिक्षोभ होय असा अर्थ ते करूं पाहतील. परंतु " तोड रविमालिका " याबद्दल

'उडव उडुमक्षिका' असाही पाठभेद आहे. हे शब्द असा संकुचित अर्थ घ्यायला विरोध करितात. रविमालिका तुटून ग्रहतारे एकमेकांवर आपटूं लागले, दिक्पालक तुडवले गेले आणि घुरोळा उडतो त्याप्रमाणें डोंगर उडूं लागले कीं जी स्थिति होईल त्या स्थितींत हत्तीवरून खालीं खेंचला जाऊन करटी घ्यायला राजा जिवंत राहील काय आणि मुकुट घालायला रंक तरी विद्यमान् असेल काय ? मृतांचें परित्राण तरी काय करायचें आणि विनाशही काय करायचा ?

या कवितेच्या ४ कडव्यांपैकीं चौथें कडवें इतर ३ कडव्यांइतकें जोरदार व हृदयदर्शक नाहीं. त्या कडव्यांतील शेवटली ओळ 'दे जयाचें तया वीरभद्रा !' ही मात्र ओजस्वी व संस्मरणीय आहे. ध्रुवपदांतही एक दोष आहे. खड्गांचा खणखणाट करीत ये म्हणजे काय ? लढाईंत तरवारींची खणाखणी होते. परंतु तरवार परजण्यानें खणखणाट कसा होणार ? इंग्लंडांत म्यानही पोलादी असल्यामुळें म्यानाच्या तोंडावर तरवारीची मूठ आपटून आवाज येतो; म्हणून घमकावणीवजा म्यानांतल्या म्यानांतच तरवारीची जी काढघाल होते तिला sword-rattling म्हणतात. ही कल्पना डोक्यांत असल्यामुळें रा. तांबे यांना 'खणखणत खड्ग ये' हे शब्द सुचले असावेत. नाहीं तर शंकराचें विशिष्ट शस्त्र खड्ग नसून त्रिशूल आहे. वीरभद्रही दक्षप्रजापतीच्या यज्ञाकडे धांवला तो हातांत शूल घेऊनच धांवला. शूळाचा दंड मात्र जमीनीवर आपटून खणखणाट होण्याचा संभव अधिक आहे. 'खणखणत शूल ये' हेच शब्द उचित होतील.

ताम्बे यांनीं रुद्राचें जें वर्णन केलें आहे, त्याच्याशीं पौराणिक वर्णनें ताडून पहाणें कुतूहलजनक होईल. शंकरानें दक्षप्रजापतीच्या यज्ञाचा विध्वंस करण्याकरितां पाठविलेला वीरभद्र कामगिरीला निघाला व यज्ञमंडपांत अशुभ चिन्हें होऊं लागलीं, तेव्हां त्या काळीं जमलेल्या मंडळींच्या उद्गारांत रुद्राचें वर्णन आहे. श्रीमद्भागवताच्या ४ थ्या स्कंदाचा पांचवा अध्याय पहा—

" यस्त्वंतकाले व्युप्तजटाकलापः स्वशूलसूच्यर्पितदिग्गजेंद्रः
वितत्यनृत्यत्युदितास्रदोर्ध्वजानुंच्चाट्टहासस्तनयित्नुभिन्नादिक्
अमर्षयित्वा तमसाप्ततेजसं मन्युप्लुतं दुर्विषहं भृकुट्या
करालदंष्ट्राभिरुदस्तभागणं स्यात्स्वस्ति किं कोपयतो विधातुः "

तांबे यांच्या कवितेंतील ' खडबडवि दिग्गजां तुडव दिक्पालका ! ' या वर्णनापेक्षां दिग्गजांना शूलावर अडकून टाकण्याची व अट्टाहासानें दिशांचे तुकडे तुकडे करण्याची कल्पना अधिक रमणीय आहे. तांबे यांच्या कवितेंत मेसूर व्युत्तजटाकलापाचाहि अवश्य असा उल्लेख नाहीं.

त्याचप्रमाणें श्रीमद्भागवताच्या सातव्या स्कन्दाच्यां आठव्या अध्यायांत नृसिंहाचें जें वर्णन आलें आहे, तेंही प्रस्तुत कवितेचा विचार करितांना ध्यानांत घेण्यासारखें आहे.

सटाविधूता जलदाः परापतन्
ग्रहाश्च तद्दृष्टिविमुष्टरोचिषः
अंभोधयः श्वासहता विचुक्षुभु-
र्निर्ह्रादभीता दिगिभा विचुक्रुशुः ३२
द्यौस्तत्सटोत्क्षिप्तविमानसंकुला
प्रोत्सर्पत क्ष्मा च पदातिपीडिता
शैलाः समुत्पेतुरमुष्य रंहसा
तत्तेजसा खं ककुभो न रेजिरे ३३

अर्थः —त्याच्या मानेवरील केसांच्या योगानें मेघ कंपायमान होऊन विरून गेले; त्याच्या नेत्रांच्या प्रखर तेजापुढें ग्रहांचें तेज फिकें पडलें; त्याचा श्वासवेग त्या वेळीं इतका जबर होता कीं, त्यायोगें समुद्रसुद्धां खवळले; आणि गर्जनेच्या योगानें भयभीत झालेले दिग्गज चीं चीं करीत पळत सुटले ! त्याच्या आयाळाच्या योगानें वर फेंकल्या गेलेल्या विमानांची गर्दी होऊन स्वर्ग डळमळूं लागला; आणि त्याच्या पदाघातानें भूकंप होऊन पर्वत कोसळून पडूं लागले; त्याच्या तेजामुळें आकाश आणि दहा दिशा या म्लान होऊन गेल्या.

या वर्णनाहून रा. तांबे यांनीं केलेलें वर्णन अधिक सुंदर आहे असें म्हणणें निःपक्षपातीपणाचें होणार नाहीं. एका विशिष्ट सत्याचें प्रतीक म्हणून रुद्राचा जो रा. तांबे यांनीं उपयोग केला त्यांत त्यांचें सारें नावीन्य आहे. त्या सत्याशीं समरसून त्यांनीं जी हृदयंगम रचना केली तींत त्यांची खरी काव्यकला आहे. परंतु प्राचीन माहितीचा त्यांनीं मागाहून उपयोग करून

चेतला असता तर कविता अधिक रमणीय झाली असती. उदाहरणार्थ, " खवळवी चहुंकडे या समुद्रा " याच्या ऐवजीं " खवळवी श्वासवेगें समुद्रा " असें लिहून त्यांना रुद्राच्या श्वसनप्रभंजनाची कल्पना करून देतां आली असती. आहे त्या स्थितीतही ही कविता म्हणजे एक रत्न आहे; त्याला कांहीं मनोहर पैलू अधिक पडले असते एवढेंच आमचें म्हणणें आहे.

गडकरी—गोविंदाग्रज ! हीं दोन नांवें ज्याला ठाऊक नाहींत असा कोण आहे ! कोणी नाहीं. शहरांतील तरुण विद्यार्थी आणि त्याला हीं दोन नांवें ठाऊक नाहींत म्हणजे काय ! चोळणा टाकून पुन्हां धोतर नेसूं लागलेला तरुण विद्यार्थी भेटेल कदाचित्, पण मला गडकरी—गोविंदाग्रज हीं नांवें ठाऊक नाहींत असें म्हणणारा विद्यार्थी भेटणार नाहीं. स्वतःविरुद्ध अशी मागसलेपणाची साक्ष कोण देईल ! असो. हीं दोन नांवें अेकाच लेखकाचीं आहेत. राम गणेश गडकरी हें त्यांचें व्यवहारांतलें नि काव्याहून निराळ्या क्षेत्रांतलें गद्यवाङ्मयांतलें नांव; आणि गोविंदाग्रज हें त्यांचें काव्यांतलें नांव. हें नांव ते प्रत्येक कवितेंत शेवटीं 'तुका म्हणे'प्रमाणें गोवतातच. 'एकच प्याला', 'भावबन्धन' इत्यादि यशस्वी नाटकें ज्यांनीं लिहिलीं त्यांनींच 'राजहंस माझा निजला', 'प्रेम आणि मरण', 'मुरली' इत्यादि कविता पूर्वी लिहिल्या होत्या. पूर्वी लिहिल्या होत्या असें मी कां म्हणतों तर गोविंदाग्रजांच्या प्रकरणीं एक चमत्कार घडला. रङ्गदेवतेला त्यांनीं नमन करितांच त्यांची कविता त्यांना सोडून गेली. त्यांची बहुतेक कविता—पंचविशी उलटण्यापूर्वी बहुतेकांना ती आवडतेच आवडते, तिच्या विषयींच चार शब्द मी तुम्हांला आतां सांङ्गणार आहें.

याच काळांत तुम्ही सध्यां आहांत. ही आयुष्यांतली सकाळच आहे असें नव्हे; सुकाळहि हाच आहे. तुम्हांला तसें आज वाटायचें नाहीं, कारण तुम्हांला पुढलीं स्वप्नें पडताहेत, आणि तुलना करायला पुढला अनुभव तेवढाच नाहीं. मनुष्यानें हुरळावें नि विव्हळावें असें याच काळांत. आपण

ध्येयांना भजतों, प्रेमांत रंगून जातो. अवर्णनीय अशा नैराश्यानें विव्हळ होतों, मरणाला आनंदानें सज्ज होतों, चमत्कृतीनें नादावतों, जाचक प्रतिबंधांविरुद्ध मनापासून धडपडतों, सहानुभूतीसाठीं तळमळतो, अतिशयोक्तीला उत्कटतेची साक्ष मानतों. हें सारें याच काळांत होतें. या साऱ्या भावनांचे बोल—मनापासून निघालेले बोल ज्या काव्यांत असतात तें आपण ऐकतों, गुणगुणतों नि उराशीं धरितों. गोविंदाग्रजांनीही केशवसुतांची कविता अशीच उराशीं धरिली; आपणहि गोविंदाग्रजांची कविता म्हणजे 'वाग्वैजयन्ती' अशीच हृदयाशीं घट्ट धरून ठेवतों. केशवसुतांनीं 'तुतारी' फुंकली तर गोविंदाग्रज शिलंगणाला चला म्हणून पुकारतात.

"चला रूढिवर आतां घसरा
टाकुनि सीमा मृत धर्मांच्या,
दम्भाच्या या अन्धपणाच्या,
जुनेपणाच्या, अहम्पणाच्या,
सीमोल्लंघन काळाचि दसरा."

का, फुरफुरतात कीं नाहीं दंड? वाटतें कीं नाहीं, कीं कांहीं पराक्रम करावा, कालाच्या पुढें जावें, कांहींतरी करून दाखवावें? त्यांतून साम्प्रत समाजस्थिति न्यायाची नाहीं. तींत सुधारणा अवश्यमेव व्हायला पाहिजे. पहा—

"अन्नावांचुनि सपिण्ड मरती,
मरतां त्यांतें पिण्ड अर्पिती,
सजीव तोंवरि लत्ता देती."
मरतां घेती खान्द्यावरती—उरफाटा सन्मान!

या गोष्टी काय आपल्याला दिसत नाहींत? दिसतात; पण मनांत ठसत नाहींत. समाजाच्या विचारांत नि कृतींत जो विपरीतपणा भरलेला आहे तो आपल्या डोळ्यांना कळत नाहीं. तो कवीला दिसतो नि तो कवि इतरांना दाखवूं शकतो. पहा, आपण भुतांना भितों, त्यांना हीन लेखतों. पण आपल्या दुष्कर्मांनीं सूर्यालाहि झांकून टाकितील अशीं माणसें असतात त्यांचा कुठें आपण विचार करितों? आतां थोडें कवीच्या दृष्टीनें पहा बरें.

मुतें श्रेष्ठ आहेत हें आपल्या कृतीनेंच नाहीं का आपण सुचवीत ? मनुष्य प्रेत झाला कीं त्याचें मनुष्यत्व गेलें, त्याच्यांत राम–पण आलें. प्रेत वाहतांना आपण काय म्हणतों !

" प्रेत आणितां बोले जनता राम कहो श्रीराम "

मघाशीं मी तुम्हांला सांगितलें कीं, या वयांत तुम्हांला उत्साहाच्या, निराशेच्या, उत्कट आनंदाच्या, तीव्र दुःखाच्या लहरी येतात. त्या फार वेळ टिकत नाहींत; पण असतात जितक्या चंचल तितक्याच प्रबळ. मन इतकें चंचळ असणें बरें नाहीं हें खरें. पण कांहीं काळ तें तसें असतें हेंहि खोटें नाहीं. या काळांत तुम्ही आपल्या दृष्टीनें पाहतां, वस्तुस्थितीचा विचारच करीत नाहीं. किंबहुना परिस्थितीचा विचार करून तडजोडीला सिद्ध होणें म्हणजे आपल्या दिव्य भूमिकेवरून खालीं घसरणें होय असेंच तुम्हांला वाटतें. म्हणजे एकीकडे प्रतिसृष्टि निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा असते पण ती थोडीफार सफल करायला लागणारें वस्तुस्थितीचें ज्ञान, प्रयत्नाची पराकाष्ठा, धीर, चिकाटी हीं नसतात. मग तुम्हीच सांगा, निराशा पदरीं पडायला कांहीं वेळ का लागणार आहे ! हुरळणें नि विव्हळणें हीं जुळीं भावंडें दिसतात. केव्हां केव्हां तर निराशा कां वाटते तेंच कळत नाहीं. आत्यान्तिक सहानुभूतीसाठीं जीव तळमळतो. आणि तीहि कांहीं वाटेवर पडलेली नसते. मग निराशेचे बोल ज्या कवितेंत आढळतात ती वाचून कवीशीं म्हणजे आपल्या समानधर्म्याशीं सहानुभूतीची देवघेव करणें हेंच एक विश्रांतीचें स्थान होऊन बसतें. गोविंदाग्रज म्हणतात—

" हातीं संसाराची माती,
मनिंच्या आशा मनाच खाती
भूतकाळचीं भूतें रडती
मिटल्या ज़ाग्या डोळ्यांपुढती, शून्याचें मैदान "

, या ओळी वाचल्या कीं कांहीं काळ स्वस्थ अंधारांत दृष्टि रोंखून पडल्या-सारखें वाटतें आणि मनांतलें वादळ शांत होतें.

या वयांत तुम्हां तरुणांचें ध्येय–तुमचें परब्रह्म म्हणजे प्रेम असतें. प्रेमाचा अर्थ काय ! प्रेम खरें, पण कोणत्या व्यक्तीवरील प्रेम ? या प्रश्नांचा विचार तुम्ही करतांच कशाला ? Love is Heaven and Heaven is Love (प्रेम म्हणजेच स्वर्ग आणि स्वर्ग म्हणजेच प्रेम) अशी एखादी ओळ तुमच्या दृष्टीस पडली कीं फुटलेच तुम्हांला पङ्ख. 'ओढे वहात मिळती पुढती नदीला' या अर्थाच्या ओलेच्या कवितेंतील प्रेममीमांसा म्हणजे तुमची भगवद्गीताच असते. अशा काळांत गोविन्दाग्रजांनीं गाइलेले प्रेमाचे उत्कट पवाडे तुमच्या कानीं पडले तर तुम्ही कां रङ्गून जाणार नाहीं ?:

"प्रेमें बोले, प्रेमें डोले, प्रेमें जग हाले
प्रेमाखातर जगीं आजवर काय नाहिं झालें ?
नव्या दमाचा, नव्या जमाचा ज्याचा अवतार
त्या प्रेमाचा वीर करारी काय न करणार ?"

प्रेमावांचून सौन्दर्यहि टाकाऊच. मोरपिसाच्यावरला डोळा सुंदर असेल पण त्यांत प्रेमाचा रङ्ग कुठें आहे !

"शोभा प्रेमावाचुनि फोल,
जिणेंहि याचें कवडीमोल,
अर्थाविण मेलेले बोल
टाकुनि द्या ना—खेळणें मुलां-बाळांना !"

प्रेम हेंच जीवन, अगदीं प्राणजीवन. गोविंदाग्रज म्हणतात—

"प्राणजीवना, तुज ही शिवतां
मरण हें झूट !"

या वयांत मरणाला झूट म्हणायला कांहींच जात नाहीं. या कौमारकालांत मरण हें तुमच्यापासून शरीरानें नि मनानें इतकें दूर असतें कीं या दूरतेमुळें तें उलट रम्यच दिसतें. 'प्रेम आणि मरण' यांची साङ्गाड घालण्यांत आपण प्रेमाला परमोच्च भूमिकेवर नेऊन ठेवीत आहों असाच अभिमान वाटतो. 'प्रेम आणि मरण' ही कविता तरुणांची आवडती आहे तें उगीच नव्हे.

" तो योग, खरा हटयोग !
प्रीतिचा रोग लागला ज्याला
लाभतें मरणही त्याला हें असें "

पण प्रेम कोणावर हा महत्त्वाचा प्रश्न तर राहूनच गेला. केव्हां तरी हा प्रश्न तरुण जनाला शेकल्यावांचून रहात नाहीं.

" ओठांशीं भिडतें रहस्य मनिंचें साङ्गू कुणाला परी ?
अश्रू हे नयनींहि माळ करुनी घालूं कुणाच्या गळां ?
आलें हें भरुनी रितें हृदयही देऊं कुणाच्या करीं ?
आला दाटुनि कण्ठ–हाय ! रडुनी कोठें करूं मोकळा ? "

कांहीं तरी उच्च, दिव्य, अशावर प्रेम केलें पाहिजे. नाहीं तर तें स्वतः उदात्त कसें होणार ? तो 'वेडा' कसा चान्दणीवर प्रेम करीत नाहींसा झाला ? तसेंच वेडें झालें पाहिजे.

" काळी घोर निशा, उदास हृदयीं तैशी निराशा जडे
तारा तारकल्या नभीं; मानिं कसा तो एक आशाकण ?
पायांखालुनि जाति डोङ्गरनद्या, पाही न मागेंपुढें,
वर्षें कैक असाच चालत तरी लाभे न ताराङ्गण ! "

वृक्षानें विजेवर प्रेम केलें. तिच्या भेटीसाठीं त्यानें युगानुयुग तप केलें. शेवटीं ती त्याला भेटली तों काय ? तो उन्मळून पडला. नव्हे, तो दिव्यत्वाप्रत गेला ! अज्ञान आणि श्रद्धा यांचें काय मोहक इंद्रजाल आहे हें ! पण ज्या ध्येयावर जीव वेडा होतो तें बहुशः त्याचेंच प्रतिबिम्ब असतें. ग्रीक पौराणिक गोष्टींतील नार्सिसस हा नव्हता आपल्या पडछायेवरच अनुरक्त झाला ? जी त्याची गत तीच ओसाड आडांतील त्या एकच फुलाची झाली. अनुभूति, निराशा आणि मरण !

" चुम्बावें जलिंच्या फुलास म्हणुनी तें मान खालीं करी
वाऱ्यानें मुख लागतांच उदकीं छाया विराली जलीं
पाणीमात्र पडे मुखीं सहज तों तैसेंच आशेवरी ! "

काय सुंदर मरण ! आठवत असतील च तुम्हांला ते शेलीचे शब्द : How beautiful is Death !

आतां तुम्ही सदैव थोडेच या कौमार अवस्थेंत राहणार आहां ? मोठे झाल्यावर, प्रपंचाच्या ऊनसांवलींत अनुभविक झाल्यावर तुम्ही गोविन्दाग्रजांच्या कवितेवर काय मत द्याल ? जें मी आज मत देईन तसेंच मत तुम्ही बहुशः द्याल. आज नेणतेपणाच्या डोळ्यांनीं सृष्टीकडे पहात आहां ते तुम्ही जाणतेपणाच्या डोळ्यांनीं पाहूं लागतांच सारी सृष्टि निराळी दिसूं लागेल. 'भू-समुद्रावर कधींच नसलेला तो नूर-तें दिव्य तेज तुम्हांला तेव्हां दिसणार नाहीं. सृष्टिच निराळी दिसूं लागल्यावर पूर्वी आवडलेली कविताहि निराळी भासूं लागेल. आतां कवितेची योग्यता ही जाणतेपणीं म्हणजे जाणत्यांनीं ठरवायची कीं नेणतेपणीं म्हणजे नेणत्यांनीं ठरवायची ? आह्य मत हें केव्हांहि जाणत्यांचेंच मानिलें पाहिजे. मला काच नि हिरा यांतील भेद ओळखतां येत नाहीं, मी रत्नपारख्याचेंच साह्य घेतलें पाहिजे. आतां सारेच लोक कांहीं रत्नपारखी होऊं शकत नाहींत; पण काव्याची थोडी फार पारख करितां येण्याइतकी रसिकता बहुतेक लोकांत असते. अशा काव्यपारख्यांना गोविंदाग्रजांविषयीं काय वाटतें तें आतां पाहूं.

कवितेपुरतेंच बोलावयाचें तर गोविन्दाग्रज हे कौमारकालांतील कांहीं संदिग्ध नि चंचल भावलहरींच्या स्थूल चित्रणापलीकडे कधीं गेले नाहींत. त्यांचें तें वयहि नव्हतें पलीकडे जाण्याचें. त्यांचे प्रेमपाठ ओघवती आहेत; पण ते वाचायला दम पुरत नाहीं; कंटाळा येतो. गोविन्दाग्रजांची जे मुक्तकंठानें स्तुति करीत असतात त्यांची धांव सुप्रसिद्ध ४।५ कवितांच्या पलीकडे गेलेली नसते.

भावगति हें कसें आटोपशीर पाहिजे. तांब्यांचीं भावगीतें पहा कशीं आटोपशीर असून सम्पूर्ण आहेत. पण गोविन्दाग्रजांनीं 'चिमुकलीच कविता' म्हणून जी लिहिली ती १२६ ओळींची ! 'ध्रुवडास' आणि 'मुरली' या कविता मोठेपणीं शेवटपर्यंत वाचवत नाहींत. आपला वाक्प्रवाह आपल्या कह्यांत ठेवून तो वळविण्यापेक्षां गोविन्दाग्रज स्वतःच धारेला लागल्यासारखे वहावत जातात. कदाचित् त्यांना असेंही वाटत असेल कीं एखादी खुणेची गोष्ट सांगून हृदयाला प्रकाशित करण्यापेक्षां आपल्या अप्रतिहत

शब्दौघानें लोकांना गुदमरून टाकावें आणि आपल्या चमत्कृतींनीं त्यांना चकित करावें. थोडक्यांत काय तर आपल्या सामर्थ्याची छाप ठेवून द्यावी वाचकावर. पण ही छाप हृदयावर पडत नाहीं नि फार वेळ टिकत नाहीं.

चमत्कृति शोधून काढून दाखविण्याच्या भरीस ते पडले म्हणजे तिच्या उत्कटतेविषयीं शङ्का येऊं लागते; आणि केव्हां केव्हां विरसही होतो. पाहिल्याची जादु दुसऱ्यांत नाहीं असें आपण पुष्कळदां म्हणतों. तरी पाहिल्या चुंबनाचें उन्मादक चित्र रंगाविल्यानंतर—

" निशिदिनीं, वाटतें मनीं नित्य, जन्मुनि
मरण सोसावें
परि पाहिलें चुम्बन द्यावें फिरुनिही "

अशी अतिशयोक्ति करणें म्हणजे चमत्कृतीसाठीं पाहिल्या चुंम्बनाचें विडम्बन अगदीं तुम्हांला ठाऊक असलेलें इंग्रजीतील Reductio ad absurdum आहे. ' दैवाची निर्दयता ' ही कविता प्रसिद्ध नाहीं; पण सुन्दर हृदयङ्गम आहे. महत्त्वाकांक्षी प्रेमाची समाजांत होणारी कुचम्बणा या कवितेंत वर्णिलेली आहे.

" श्रीहरिसाठीं कुब्जा रडते हेंच हंसें होइल माझें "

या चरणाशीं ही कविता सम्पती तर रसाचा उत्कर्ष झाला असता. पण गोविन्दाग्रजांचें चमत्कृतीचें वेड त्यांना थांबवूं शकत नाहीं. ते पुढें मल्लिनाथी करितात—

" घडेना कार्य या लोकीं भाग्यावांचुनि कोणतें.
हंसायातेंच न परी मरायातेंहि लागतें ! "

हें तात्पर्य पाहून शेवटीं भलताच विषाद वाटतो.

गोविन्दाग्रजांच्या कृतीचें चमत्कृति हें जीवन होय असें त्यांचे एक शिष्य श्री. कमतनूरकर म्हणतात तें अक्षरशः खरें आहे. ' राजहंस माझा निजला ' ही सुद्धां एक कलृप्ति आहे असें स्वतः गोविन्दाग्रजच म्हणत असत. अनपेक्षित साम्यभेद हुडकून काढून ते चमत्कृतिजनक उपमा-उत्प्रेक्षा माण्डीत. पण जें चमत्कृतिजनक असतें तें हृदयङ्गम असतेंच असें नाहीं. " ताराङ्गण " पाहून ते जेव्हां म्हणतात—

किंवा केल्या तारा टिकल्या फोडुनि झुम्बर छान

तेव्हां तें हृदयङ्गम वाटतें. अनाथबालिकाश्रमांतील पांच वर्षांची चिमखडी पोर पाहून ते जेव्हां म्हणतात,—

" कुणा ऋषिचे यानास अडखळून
पडे निखळुनि जणु नील पटांतून
आलि खालीं ही चांदणीच एक
तरिच इतकी ही चमकते सुरेख "

तेव्हां ही उत्प्रेक्षा सरस वाटते. पण जेव्हां ' सत्सुमदाम ' या कवितेंत जनाबाईचें नांव गुम्फिलेंच पाहिजे यार्चे समर्थन करण्यासाठीं

"अक्षरमालेंतुनि काशि वाकडि तरि टाकणें जनाबा 'ई' ?"

ही केवळ यमकावरून सुचलेली कल्पना ते माण्डतात तेव्हां आल्हाद तर वाटत नाहींच; उलट अप्रासंगिक हंसूं मात्र येतें.

चमत्कृतिजनक अलङ्कारांचा पाऊस ते वाळिवासारखा पाडूं शकतात नि मन चकित होतें, पण ही विद्या कष्टसाध्य आहे. मनाला एकदां वळण देण्यांत आलें कीं जशीं यमकें सुचतात तशा उपमाउत्प्रेक्षा सुचतात. पण देहहीन अर्थाला सरूप करणारी शक्ति कल्पना ती ही नव्हे. ती ताम्बे यांच्या कृतींत प्रामुख्यानें दिसते; आणि चमत्कृतीचा तर ताम्बे यांच्या कवितेंत जवळजवळ अभावच आहे. तेव्हां मनाला विशिष्ट वळण मिळाल्यास यमकांप्रमाणें उपमा-उत्प्रेक्षा सुचविणारी कष्टसाध्य कल्पना निराळी, आणि अमूर्ताला सरूप करणारी जी शक्ति ती कल्पना निराळी.

स्फूर्तीच्या अर्थासम्बधींहि असाच घोटाळा होतो. गोविन्दाग्रजांचें मन विलक्षण प्रवाही होतें. त्यांना डोकें खाजवीत बसावें लागत नसे. तें झपझप लिहीत. अेवढ्यावरून त्यांच्या ठिकाणीं स्फूर्ति होती असें आपण म्हणतों, परंतु अेखादा प्रभावी अर्थ अकल्पितपणें मनांत संभवणें आणि आपल्याच बळानें तो वाढून सरूप होणें या क्रियेच्या मुळाशीं स्फूर्ति आहे असें जर आपण मानिलें तर ती स्फूर्ति गोविंदाग्रजांत फारशी नव्हती असें म्हणणें

प्राप्त होतें. ताम्ब्यांच्यासुद्धां प्रत्येक कवितेंत ती स्फूर्ति आहे असें नाहीं; पण 'रुद्रास आवाहन' हें कवन त्याच स्फूर्तीचें स्फुरित आहे याविषयीं शङ्का नाहीं.

गोविंदाग्रज कलाप्रेमी होते. लिहावें तें सुंदर मोहक व्हावें असा त्यांचा कटाक्ष असे. गचाळ लेखन लिहून वाचकांच्या वेळेचा जो नाश करतो तो महाधम पापी होय असें ते म्हणत. नादमधुर शब्द ते निवडून स्मृतिमंजूषेंत ठेवीत. धातुसाधित विशेषणें वापरण्याची टूम काढून त्यानीं आपली भाषा नादमधुर तशी आकर्षक केली होती. त्यांची त्यांना स्वतःला जाणीव होती. ते म्हणतात—

"नव शब्दांचे घुङ्गुर बान्धुनि रसवन्ती माझी
नाचत डोलत करि शिणलेलीं मनें पुन्हां ताजीं."

या दृष्टीनेंच त्यांनीं गोन्धळी कवितेचा अभ्यास केला होता; पण 'विंदान' सारख्या जुन्या शब्दाचें पुनरुज्जीवन करितांना त्यांनी रूढार्थाची चौकशी दक्षतेनें केलेली दिसत नाहीं.

हे अंतके दोष दाखविल्यानंतर तुम्ही सहजच विचाराल कीं मग गोविंदाग्रजांनीं आपल्या गुरूहून सवाशीच नव्हे तर असामान्य अशी लोकप्रियता कशी मिळविली? गौण कारणें सोडून देऊं. त्याची नादमधुर वाणी नि चमत्कृतिजनक विचारसरणी यांचा परिणाम झालाच; पण मुख्य कारण वेगळें होतें. मराठी कवितेंत कामपूर्ण प्रेमाचे पाठ गोविंदाग्रजांनींच प्रथम लिहिले आणि ते योग्य वेळींच प्रकाशित झाले. स्थितीच अशी होती कीं त्याचे पडसाद सहस्रावधि नवतरुणांच्या हृदयांत तत्क्षणीं उमटले. या कामपूर्ण प्रेमाचा परिचय इंग्रजी कवितेच्या द्वारा पूर्वीच होऊं लागला होता. पण त्या वेळीं विद्यार्थ्यांचे विवाह पूर्वी होऊन गेलेले असत. पागोटीं घालून कॉलेजांत जाणारे विद्यार्थी जाऊन टोप्या घालणारे विद्यार्थी आले तरी स्थिति तीच होती. त्यामुळें अज्ञानानें वा अननुभूतीमुळें जें काव्यमय कुतूहल वाटावयाचें, जें आकर्षणस्वारस्य चिंतनांत यावयाचें त्याला संधीच मिळत नसे. पुढें पुरुषांच्या विवाहवयाची मर्यादा वाढली तशी काव्यात्म प्रेमानें हुरहुरणाऱ्या नि वैवाहिक असंतोषानें पछाडलेल्यांची सङ्ख्याहि वाढली. या

वेळीं ही संदिग्ध अस्वस्थता, निराशा गोविंदाग्रजांच्या लालित्यपूर्ण ओघवती कवितेंत व्यक्त होतांच एक पिढीच्या पिढीच त्यांच्या कवितेवर वेडी झाली. तो काळ पुन्हां पालटला. निराशेची संदिग्धता जाऊन तिच्या मागें व्यक्ती दिसूं लागल्या. अर्थात् नवतरुणांच्या हृदयांशीं समरसायला अधिक आधुनिक कवी हवेत. तेवढ्यापुरते गोविंदाग्रज मागसले, आणि यशवंत हे नवतरुणांच्या हृदयांचे प्रतिनिधि म्हणून पुढें आले.



राजकवि 'चंद्रशेखर' : : ६

मार्चच्या १८ तारखेला मी बडोद्यास गेलों आणि नेहमीच्या वहिवाटी-प्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळीं चंद्रशेखरांना भेटावंयाला मी जाणार होतों तों रात्रौ, ते आधल्या दिवशीं पूर्वरात्रींच निवर्तल्याची वार्ता माझ्या कानांवर आणि हृदयावर आदळली ! मी सुन्नच झालों. मरणाची वार्ता सहसा खोटी ठरत नाहीं, पण ती वार्ता मला खरी वाटेना. अडीच महिन्यांपूर्वी जानेवारीच्या पहिल्या तारखेला त्यांची माझी भेट झालेली होती. तेव्हां ते सुखरूप आणि सुप्रसन्न होते. त्या वेळीं ते जसे दिसले तसेच ते वारंवार मनश्चक्षूपुढे येत. ते आतां कधींहि भेटावयाचे नाहींत हें निष्ठुर सत्य पटावयाला एक घटका लागली; आणि मग ज्या अनेक जिव्हाळ्याच्या धाग्यांनीं माझें हृदय माझ्या जन्मस्थानाशीं निगडित झालें आहे त्यांतील एक महत्त्वाचा तन्तु तुटलेला पाहून मला परम विषाद वाटला. बडोद्यास मी गेलों आणि त्यांची भेट झाली नाहीं, असें क्वचितच घडलें असेल. सव्वीस वर्षांपूर्वी 'वसंतमाधव' काव्याला

"आला वसंत, कविकोकिल हाहि आला"

असा ज्यानें आरंभ केला तो 'जगन्मोहन' आतां भर वसंतांत निःशब्दच नव्हे, तर दिवंगत झाला होता !

परंतु त्याचें संस्मरणीय कुंजकूजन अद्यापि मागें उरलें आहे. मानवी मधुर स्वर नष्ट झाला तरी त्यांचें संगीत हें स्मरणांत आंदोलन करीत राहतें, असें आंग्लकवि शेली म्हणतो; आणि 'चंद्रशेखर' या व्यक्तीवर प्रेम करणाऱ्यांनीं

आतां त्यांच्या कविता वाचून आणि त्या ते कशा म्हणून दाखवीत याची आठवण काढून च स्वतःचें समाधान करून घेतलें पाहिजे. त्यांना चंद्रशेखरांच्या कविता साक्षेपानें वाचावयालाहि नकोत. त्यांच्या तोंडून ऐकलेल्या कविता बहुशः श्रोत्यांना तोंडपाठच होत, अशी त्यांची म्हणण्याची पारिणामकारक घाटणी होती. भाविक सुहृदाला काय वाटेल हें चंद्रशेखरांनीं 'दत्तांची कविता' या पुस्तकाला जोडलेल्या 'हृद्गता'च्या शब्दांनींच सांगणें योग्य होईल. तो म्हणेल कीं, "यांतील कविहृदय पाहून मला आनंद होतो. या यशोदेहानें माझा कविसखा भूलोकीं मजपाशीं आहे असें मी मानितों. त्याचा जीवात्मा परमात्म्याशीं मिळून तो येथें सर्वत्र भरून राहिला आहे, हा वेदान्त मला ऐकून ठाऊक आहे; आणि 'व्यर्थं भूतानि शोचन्ति नष्ट आत्मेति शङ्कया' हा वसिष्ठांचा स्पष्ट बोधहि मला कळतो. तरी पुनः ... आपण मला सोडून गेलांत असें हळहळून मी रडतोंच आहें!"

कवीच्या सुहृदास असें वाटेल याविषयीं वाद नाहीं; तथापि व्यक्तिनिरपेक्ष काव्यप्रेमी रसिकांस काय वाटेल? तो चंद्रशेखरांची योग्यता काय ठरवील? चंद्रशेखरांच्या काव्याचें निनचूक महत्त्वमापन करतां यावयाला बराच कालावधि लोटला पाहिजे. परंतु आतां ते दृष्टिआड झाल्यानंतर त्या दिशेनें प्रयत्न करून पाहावयाला कांहीं अडचण नाहीं.

दत्त–केशवसुतादि कवि आणि चंद्रशेखर यांच्या मनोवृत्तींमध्यें एक मोठा भेद आहे तो सहज ध्यानांत येतो. चंद्रशेखरांनीं आपल्या मित्राचें वर्णन ते "रंगले कीं लागले गुंगावयाला" असें केलें आहे; आणि 'केशवसुत' तर स्वतःविषयीं म्हणतातः—

"जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे
गाणें सवेंच मग होय मनांत जागें."

असें चंद्रशेखरांविषयीं मात्र म्हणतां येणार नाहीं. सुंदर दृश्यें पाहून वा स्वरसंगम ऐकून ते रंगत, पण गुंगू लागत नसत. ते आपले विविध अनुभव नीट निरखून स्मृतिमंजूषेंत सांठवून ठेवीत आणि आत्मनिरपेक्ष कविता लिहितांना त्यांचा योग्य वेळीं उपयोग करून घेत.

"प्रसाद घडतां तुझा सहज नाभिमूलांतुनी
अनन्यलहरी उठे, तनुसि टाकिते व्यापुनी;
तिच्या प्रसरणासवें सकळ देह हेलावतो,
क्षणैक चपलौघ कीं जणुं शिरांतुनी धावतो;
मुखामधुनि एकदा गद्गदा तदा ये ध्वनी
स्वयें उचमळोनि ये हृदय, नीर ये लोचनीं !"

हें त्यांनीं केलेलें काव्यस्फूर्तीचें वर्णन वस्तुतः काव्य वाचतांना मध्येंच एखाद्या हृदयंगम स्थळीं त्यांना जी संवेदना होई तिचें असावें असें मला वाटतें. एखाद्या प्रसंगीं जेव्हां मन रंगून जातें, तेव्हां काव्य सुचतेंच कसें याचें त्यांना कोडें पडे; आणि खरोखर प्रत्यक्ष अनुभूतीच्या प्रसंगीं काव्यस्फूर्ति होतच नाहीं असें मलाहि वाटतें. ती प्रत्यक्ष अनुभूति संपल्यावर शान्त अप्रत्यक्ष अनुभूतीच्या वेळीं होते. वैयक्तिक संस्मरणीय स्फुट अनुभूति या चंद्रशेखरांना क्षुद्र वाटत म्हणून त्या त्यांच्या काव्याचे विषय होऊं शकल्या नाहींत. ते संस्कारक्षम होते, पण आपल्याच क्षुद्र सुखदुःखांचें प्रदर्शन बहुजनसमाजापुढें मांडावयाला लागणारा अहंभाव त्यांच्या ठिकाणीं नव्हता. अर्थात् ते स्फूर्तिवादी नव्हते. "बोलविता धनी वेगळाची" याचा भलता अर्थ करून आपल्या कवितांचें प्रस्थ माजविणें त्यांना संमत नसे. "मी वेडा आहें" असें सार्वजनिक आश्वासन देण्याच्या लहरी त्यांना कधीं आल्या नाहींत. वसिष्ठ-शंकराचार्यादिकांच्या पुढें जाऊन आपण कांहीं शिकवूं शकूं अशी आत्मश्रद्धा त्यांच्यांत नसल्यानें एखादा अपूर्व संदेश जगाला सांगण्याचा आव त्यांनीं आणिला नाहीं. मतामतांच्या गलबल्यामुळें त्यांच्या मनःसृष्टींत कांहीं उलथापालथ झाल्यानें नवमताची घोषणा करण्याचें वारें त्यांना शिवलें नाहीं. भोंवतालचा समाज पालटला आणि सुधारला याचा अप्रत्यक्ष परिणाम त्यांच्यावर होऊन त्यांनीं दिसावयाला थोडी आधुनिक, पण अंतरंगानें जुनी अशी कविता लिहिली. थोडेंफार नवाशिक्षण झालें तरी तें कोणाच्या डोळ्यावर न येईल अशा रीतीनें वेषराहणी ठेवून रूढ शहाणपणाचेच बोल मोहक स्वरानें बोलण्याच्या सुंदर पुरन्ध्रीसारखी त्यांची कविता आहे. ते अग्रगण्य नव्हते इतकेंच नव्हे, तर त्यांच्यामध्यें व्यक्तिमत्ताहि विशेष नव्हती. आत्मसंत

गोष्टी रंगवून सांगण्याचा गुण आहे, तेव्हां सजवून कविता लिहून रसिकांना रंजवावें आणि यश मिळवावें यापलीकडे त्यांची दृष्टि नव्हती. रसिकांचें रंजन करतां करतां रूढ हितनीति शिकवावी आणि स्वतःसाठीं यशासंगतीं अर्थ आणि परमार्थ दोन्ही साधावे, अशी त्यांची इच्छा होती. अर्थप्राप्ति त्यांना जवळजवळ झालीच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. "घेणं अस्ति देणं नास्ति, बहुत काय लिहिणें ! लोभ असावा ही विनंति" अशा रीतीचा गोडवा प्रकाशांत असतो, म्हणून ते विनोदानें केव्हां केव्हां म्हणत; पण अर्थ-प्राप्ति झाली नाहीं याची खंत त्यांनीं कधींहि केली नाहीं. परमार्थप्राप्तीविषयीं इहलोकीं कांहींच सांगतां यावयाचें नाहीं, तेव्हां राहता राहिला प्रश्न यशाचा.

"यशःप्राप्ती, तों ती विधिवश, घडे वा नाहि घडे"

असें ते म्हणत. परंतु या यशासाठीं यांनीं खडतर तपश्चर्या मात्र केली होती.

यशाचे अनेक अर्थ करण्यांत येतात. समानधर्मी रसिकानें काव्य वाचून सहजगत्या धन्यवाद दिला कीं यशाची जोड पावली असें कांहीं कवि मानतात; तर कांहीं कवींना वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून आणि सभांतून दुमदुमणारे स्तुतिदुंदुभीचे ध्वनि कानांवर पडल्यावांचून कविता यशस्वी झाली असें वाटत नाहीं. कांहीं कवींचें समाधान या साहित्यिक कीर्तीनें होत नाहीं, त्यांना सामाजिक मानमान्यता हवी असते. चंद्रशेखरांना कोणत्या प्रकारचें यश हवें होतें ? त्यांना कोणत्या प्रकारचें यश मिळालें ? आणि त्या यशाचें मौलिक मूल्य काय इत्यादि प्रश्नांचा आतां विचार करूं.

कै. हरि नारायण आपटे यांच्यासारख्या पहिल्या प्रतीच्या साहित्यिकानें आपल्याला महाराष्ट्राचे नाणावलेले कवि म्हणून गौरविलेलें पाहून चंद्रशेखरांना आनंद आणि उत्साह वाटावा यांत नवल नाहीं. परंतु निवडक जाणत्यांची प्रशंसा ही अशी अधूनमधूनच कानीं यावयाची. तेवढ्यावर संतुष्ट राहून आपलें अंगीकृत कार्य अखंड उत्साहानें चालू ठेवावयाला लागणारी दुर्मिळ आत्मनिष्ठा चंद्रशेखरांच्यामध्यें नव्हती. संपादकांनीं गौरवून केलेली काव्याची मागणी हीच पुष्कळदा त्यांच्या काव्यरचनेस प्रेरक होई. त्यांना सामाजिक कीर्ति आणि बनल्यास राजसंभावना हवी होती. पण आधुनिक लोकमताच्या काळांत करावी लागणारी सामाजिक धांवपळ त्यांच्या भिडस्त

संकोची वृत्तीस रुचणारी आणि झेंपणारी नव्हती. बडोद्यांत शंकर मोरो रानडे यांच्या काळीं, म्हणजे चंद्रशेखरांच्या साहित्यिक जीवनाच्या आरंभीं चांगलीच साहित्यिक चळवळ चालू होती. परंतु चंद्रशेखरांची काव्यशक्ति परिणत होण्याच्या आगेमागें बडोद्यांत साहित्यिकांचा शुकशुकाट झाला होता; आणि बडोद्याबाहेरील साहित्यिकांशीं त्यांचें तसें दळणवळण नव्हतें. याचा परिणाम असा झाला कीं, ते निरुत्साह होऊन एकीकडे पडले.

"वाङ्मोहनी किमपि साधियली जयांनीं
कोठें बसोत मग ते, तरि मानहानी"

अशी त्यांनीं मनाची समजूत काढावी, पण ती तेवढ्यापुरतीच टिके. चंद्रशेखरांना मोठी आशा कीं आपल्याला राजाश्रय मिळेल, संसारांतील उपाधींपासून आपण मुक्त होऊं, आणि मग स्वतंत्रपणें एखादा विषय घेऊन त्यावर प्रौढ, सरस आणि सालंकृत असें एक मोठें काव्य रचूं कीं, जेणेंकरून आपण आणि आपला आश्रयदाता दोघांनाहि अक्षय कीर्ति मिळेल. या आशेनेंच त्यांनीं 'श्रीयुवराजांचा प्रतिहारी', 'युवराजवियोग', 'राजनीतिगीतिका' इत्यादि काव्यें लिहिलीं होतीं. पण ही आशा दीर्घकालपर्यंत अशीच लोंबकळत राहिली. त्यांतच त्यांचें आणि त्यांच्या गौरकाय वरिष्ठाचें तितकेंसें जुळेना आणि त्यांच्या मनावर विषादाची आणि संशयाची घनदाट छाया पसरली. पुढें कालावधीनें श्री. वा. वि. जोशी आणि प्रो. चिं. वि. जोशी हे बडोद्याला आले आणि बडोद्यांतील साहित्यिक नवजीवनाला आरंभ झाला. पण ही नवी पिढी आणि चंद्रशेखर यांच्यांत वयाचेंहि अंतर होतें. त्यांनीं त्यांच्या मनावरील घनदाट छाया दूर करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याला बेताचेंच यश आलें. मध्यंतरीं १९२१ च्या सेप्टेंबरमध्यें म्हणजे चंद्रशेखरांच्या कवितांचा संग्रह प्रकाशित होण्याच्या पूर्वी ११ वर्षें मी 'चंद्रशेखरांची कविता' या विषयावर डेक्कन कॉलेजांत व्याख्यान दिलें होतें, तें पुढें 'नवयुग' मासिकांत आणि 'काव्यचर्चा' ग्रंथांत प्रकाशित झालें. नंतर लौकरच श्री. न. चिं. केळकर यांनीं बडोदें येथील साहित्य संमेलनांतील आपल्या अध्यक्षीय भाषणांत चंद्रशेखरांविषयीं यथोचित गौरवाचे उद्गार काढिले. तेव्हांपासून त्यांची प्रसिद्धि महाराष्ट्रभर सारखी होत गेली; परंतु ही

प्रसिद्धि त्यांना तितकीशी न पटल्यामुळें तितकी परिणामकारक होऊं शकली नाहीं. पुणें–मुंबईसारख्या नगरांत त्यांना एखाद्या कविसंमेलनाचें अध्यक्षपद मिळतें तर त्यांना आपल्या लोकप्रियतेची प्रतीति होऊन हिमकाळीं खुट झालेला हा वेल त्या यशोवसंतांत "द्राक्षांच्या गोडगोड भारांनीं" लवला असता. मुंबईच्या उपनगर–साहित्यसंमेलनानें त्यांना अध्यक्षपद दिलें, पण तें द्रुतविलंबितच झालें! १९३२ मध्यें भारतगौरवग्रंथमालेंतून त्यांचा 'चंद्रिका' हा काव्यसंग्रह सुंदर स्वरूपांत प्रकाशित झालेला पाहून मात्र त्यांना त्यांतल्यात्यांत खरें समाधान झालें. या संग्रहाला श्री. माडखोलकर यांनीं सुंदर गुणग्राहक प्रस्तावना* लिहिली. प्रकाशनसमारंभाला श्री. न.चिं. केळकर अध्यक्ष होते; आणि त्या वेळीं उपवक्ते म्हणून मी आणि विठ्ठलराव घाटे यांचीं भाषणें झालीं. चंद्रशेखरांनीं त्या वेळीं कृतार्थ आणि सद्गदित होऊन 'महाराष्ट्रदर्शन' काव्यांतील कांहीं भाग वाचून दाखविला. त्यांच्या। स्वरांत आतां पूर्वीचा खणखणीतपणा आणि पल्लेदारपणा हे गुण राहिले नव्हते; आणि त्यांचें काव्य ऐकत असतांना आम्हांला जुन्या आठवणी होऊन वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं. 'चंद्रिके'च्या नामपृष्ठावर दिलेल्या

"Oh! the joys that came down shower-like
Of Friendship, Love and Liberty
Ere I was old!"

या कोलरिजच्या अवतरणांतील औचित्य आणि विषण्णता हीं तेव्हांच मनास भेदून गेलीं. आयुष्याचा आणि काव्यशक्तीचा मधुमाधव आतां पार हरपला होता. यानंतर त्यांना राजाश्रय मिळाला. साठी उलटल्यावर मिळालेल्या या राजाश्रयानें व्यक्तिशः त्यांचीं शेवटचीं पांच वर्षें फारच सुखाचीं गेलीं.

---

* पण "समकालीनांकडून ज्याची अशा रीतीनें पद्धतशीर उपेक्षा झाली त्या या थोर कवीचा, नवीन पिढीचा एक प्रतिनिधि म्हणून, आपण यथार्थ गौरव करावा, अशीहि एक कल्पना माझ्या मनांत आली," हें वाक्य लिहितांना प्रस्तावनाकाराला मी बारा वर्षांपूर्वी लिहिलेल्या आणि त्याच्याशीं संबद्ध असलेल्या 'नवयुग' मासिकांत छापलेल्या भाषणाची आणि महाराष्ट्र-शारदा–मंदिरांत वेळोवेळीं मी करून दिलेल्या परिचयाची नेमकी विस्मृति व्हावी, हें दृश्य चिंतनीय आहे.

ते जेव्हां महाराजांच्या गोष्टी सांगत तेव्हां त्यांच्या चर्येवर जी कृतज्ञता आणि कृतार्थता दिसे ती मी कधींहि विसरणार नाहीं. आतां माझ्यानें अमुक होत नाहीं म्हणून ते कुरकुरत; पण ही कुरकुरहि ते मोठ्या कौतुकानें आणि प्रच्छन्न संतोषानें करीत. झालें तें फार उत्तम झालें. पण मराठी कवितेच्या संपदेवर त्याचा विशेष परिणाम झाला नाहीं. " काय हो चमत्कार ! " या नितान्त रम्य खंडकाव्यांत चंद्रशेखरांचें जें सामर्थ्य व्यक्त झालें तें पुढें ओहटतच गेलें.

चंद्रशेखरांना शेवटीं शेवटीं उदंड यशाची प्राप्ति झाली आणि आतां तर ते व्यक्तिशः स्तुतिनिंदेच्या पलीकडे गेले आहेत ! तेव्हां त्यांना मिळालेल्या प्रसिद्धीचें येथें थोडें पृथक्करण केल्यास तें वावगें होणार नाहीं. मला स्वतःला या प्रसिद्धीची प्रतिष्ठा वाटत नाहीं. केवळ कर्णोपकर्णिकेनें ही फुगलेली असते आणि परिणामीं ती कवीला बाधक होते. ज्या गोविंदाग्रजांचे प्रचंड स्मृतिदिनसमारंभ पुण्यांत वर्षानुवर्ष साजरे होत आले, त्या गोविंदाग्रजांचा स्मृतिदिन पुण्यांत गेल्या जानेवारीमध्यें झालाच नाहीं, हा प्रकार पाहून तरी मनुष्यानें प्रसिद्धीला झुकूं नये. जो तो स्तुति करितो, परंतु कवीचें काव्य स्वयंप्रेरणेनें आणि आत्मानंदासाठीं थोडेच वाचतात. त्याचें चिंतन करितात असे तर त्यांहूनहि थोडे निघतात. तेव्हां अशा टुमखुळ्या पुरस्काराहून कविता वाचून करण्यांत येणारा साभार विरोध श्रेयस्कर नाहीं काय ? चंद्रशेखरांच्या किती आणि कोणत्या कविता वारंवार वाचिल्या जातात ? त्यांचे रसिकांच्या मनावर कोणते परिणाम होतात ? विषयाची विशिष्टता, कल्पनेची अभिनवता, भावनेची तीव्रता, सजावटीची कुशलता आणि भाषेची सुंदरता इत्यादि गुणांपैकीं कोणते गुण आणि ते किती प्रमाणांत चंद्रशेखरांच्या कवितेंत दिसतात, या प्रश्नांचें उत्तर द्यावयाला आपण भितां कामा नये. व्यक्तीवर आपलें प्रेम आहे; पण तत्त्वावर-ध्येयावर तें अधिक असलें पाहिजे. खोट्या समाधानासाठीं ध्येयाला खालीं खेचतां कामा नये, मानदण्ड बुद्धया आंखूड करतां कामा नये.

चंद्रशेखरांत केशवसुतांची बौद्धिक अस्वस्थताहि नाहीं आणि ती भावनेची उच्छृंखलताहि नाहीं; पण त्यांच्यांत केशवसुतांत नाहीं अशी शांतसुंदर रमणीयता आहे. चंद्रशेखरांची कविता टिळकांच्या कवितेइतकी

प्रसादमयहि नाहीं; पण ती तितकीच रसाळ असून सुसंस्कृत मनाला अधिक आनंद देणारी आहे. ती विनायकाच्या कवितेइतकी ओघवती नसेल, पण ती तितकीच शुद्ध आणि कथनकुशल असून अधिक विदग्ध आहे. बालकवींची संदिग्ध तन्मयता तिच्यांत नाहीं; पण ती तितकीच नादमधुर असून अधिक सार्थ आहे. गोविंदाग्रजांची गुदमरून टाकणारी शब्दवृष्टि तिच्यांत नाहीं; पण ती गोविंदाग्रजांच्या कवितेहून अधिक अव्याज आणि हृदयंगम आहे.

चंद्रशेखरांची रचनाचातुरी खरोखरीच अनन्यसाधारण आहे. त्यांच्यांत व्यक्तिवैशिष्ट्य नव्हतें आणि ते आत्मपरहि नव्हते. विविध पात्रांचे संसार चितारावयाला लागणारी प्रतिभाहि त्यांच्या ठिकाणीं नव्हती. विषयांची निवड करतांनाहि त्यांनीं दूरवर दृष्टि ठेवून युवराजानिधनासारखे तात्कालिक महत्त्वाचे विषय टाळले असते तर बरें झालें असतें. तथापि सामान्य गोष्टी सजवून सांगण्याची त्यांची हातोटी खरोखरीच असामान्य आहे. या असामान्य कलेच्या मोहकतेमुळें 'घनाभिनंदन' 'वसंतमाधव', 'काय हो चमत्कार!' इत्यादि कांहीं कविताच नव्हे, तर 'युवराजानिधन' यासारख्या प्रासंगिक कवितांहि वाङ्मयांत अढळपद मिळवितील याविषयीं शंका नाहीं. या बाह्य शिल्पकौशल्याला वैयक्तिक तळमळीची जोड मिळाल्यामुळें गोदागौरवां-तील कांहीं भाग तितकेच चिरंजीव पण अधिक प्रभावी ठरतील.

"कौशल्य मोठें रचनेंत आहे। सत्काव्य तेणें नव वाटताहे"

या ओळी प्रथमदर्शनीं हास्यास्पद वाटतात; पण त्यांतील सत्य हास्यास्पद नाहीं याची प्रतीति पदोपदीं येते. जें हृदयंगम आहे आणि ज्यापासून आनंद झाल्यावांचून राहत नाहीं, अशा या रघुनाथपंडिती रचनाकौशल्याचें महत्त्व मी मुळींच उतरवीत नाहीं. परंतु उत्कृष्ट वाङ्मय हें केवळ जडसुंदर असून भागत नाहीं. तें आपल्या व्यक्तिमत्वानें इतरांना चेतविणारें, त्यांना नवीनच गति देणारें असावें लागतें. हें ध्यानांत बाळागिल्यास चंद्रशेखरांच्या कवितेचें चरित्र म्हणेज एक रम्य पण शोकान्त नाटक वाटतें. त्यांचे परमामित्र 'दत्तकवि' निजधामाला अकालीं न.जाते, संस्कृत वाङ्मयाप्रमाणेंच चंद्रशेखरांचा अन्तः-करणांत खळबळ उडवून सोडणाऱ्या नव्या विचारांच्या वाङ्मयाचा दाट

नं. न. ८९

परिचय इंग्रजीच्या द्वारें होता, त्यांचें वैयक्तिक जीवन संस्कृतीच्या कलहापासून दूर असें न जातें, आणि त्यांना अवश्य वाटणारा संशय हा त्यांना त्यांच्या भर उत्साहाच्या काळांत लाभता, तर या शिल्पचातुर्याला ते फार निराळ्या कवित्वाची जोड देते. परंतु काय झालें असतें याचा विचार करून शोक करणें आतां व्यर्थ आहे. प्रातिकूल परिस्थितींत आपल्या मायबोलीची सेवा करून काव्याच्याच नव्हे तर वाङ्मयाच्या प्रांतांत त्यांनीं रचनासौंदर्याचीं महती सोदाहरण पटवून दिली, ही त्यांची कामगिरी संस्मरणीय नाहीं असें कोण म्हणेल ?

"वस्तू नीरस गौणाहि सजवुनि माधुर्य त्यांतुनी भरिते
संजीवनी सुधेचें पोषक हें कार्य चंद्रिका करिते"

असें म्हणून त्यांनीं आपल्या कवितासंग्रहाला 'चंद्रिका' हें अन्वर्थक नांव दिलें आहे. आपलें कर्तव्य करून त्यांनीं देह ठेविला. त्यांची कृति आणि स्मृति या चंद्रिकेप्रमाणेंच शीतल आणि सुखदायक आहेत.

" ही येतांच उठोनि कौतुक जणों नेत्रांतुनि पाहतें,
धांवोनि अवधान ये लगबगा, कानीं उभें राहतें;
देण्याला बहुमान मान लावते, उल्हास ये मानसा;
वाटे आज शरत्प्रभात नटुनी ही येतसे राजसा "

चन्द्रशेखर हें नांव घेतल्याबरोबर तेरा वर्षांमागील प्रथम भेटीचा देखावा डोळ्यांपुढें उभा राहतो.

मामाच्या पोळेंतील एका लाम्ब व अरुन्द दुमजली घरांत डाव्या हातच्या दारानें आंत शिरून बोळवण्डीतून दहा-पंधरा पावलें चालल्यावर एक लहानसा दुसोपी चौक लागतो. चौक ओलाण्डतांच पलीकडे उजव्या हातच्या कोपऱ्यांत मध्यम उजेडशीर परन्तु स्वच्छ व प्रसन्न असें देवघर आहे. मधील दारानें मनुष्य समोर माजघर सैंपाकघराकडे जातो. माडीवर जाण्यास जिना डाव्या हातच्या कोपऱ्यांत आहे. वरून सोडलेल्या दोरीला धरून या लांकडी अरुन्द पायऱ्याच्या मानमोड्या दमछाट गुजराथी दादरानें चढून वर गेल्यावर एक साधारण प्रशस्त असें तीन खणीं लम्बचौरस दालन आहे. दोन्ही लाम्बीच्या बाजूस मधोमध समोरासमोर दारें आहेत; त्यांपैकीं मधल्या माडींत जाण्याचें दार बन्द असून शेजारींच भिन्तीला श्रीशङ्कराची तसबीर आहे. जिन्याच्या बाजूचे बाहेरील लहान आगाशीवर जाण्याचें दार मात्र खुलें आहे. दाराच्या अलीकडे अर्धें दालनभर जाजम अन्थरलेलें असून जिन्याच्या कठड्याकडे तोण्ड करून बसून लिहितां येईल अशी एक लांकडी कप्पेदार मेज-पेटी आहे. डाव्या हातच्या कोपऱ्यांत पटावर व चौरङ्गावर कांहीं ग्रन्थ एकावर एक

रचून ठेविलेले आहेत. कांहींवर धुळीचा पातळ थर बसला आहे. पेटीवरील दगडीपाटीवर तिरप्या टपोर व वळणदार अक्षरांत लिहिलेल्या कवितेच्या कांहीं ओळी दिसत आहेत. पाठीमागील भिन्तींतील फडताळांत हस्तलिखितांचें दप्तर आहे. पेटीशीं एक गोधूम वर्णाचे मध्यम वयाचे गृहस्थ बसलेले आहेत. शरीरयष्टि फार किडकिडीत नाहीं, फार स्थूल नाहीं, फार उन्च नाहीं. घेरेदार लाम्ब काळ्या तुळतुळीत शेण्डीला गांठ मारलेली आहे. गळ्यांत स्वच्छ शुभ्र यज्ञोपवीत शोभत आहे. प्रथम दर्शनीं मुद्रा किंचित् उग्र व त्रस्त दिसून मितभाषित्व दर्शवीत आहे; परन्तु गन्धाविभूषित विशाल भालप्रदेश, मोकळेपणा, दिलदारपणा सुचवीत आहे. फोटोंतील बापू मेहेन्दळ्यांप्रमाणें चष्मा नाकावर खालीं ओढून अर्ध्या अर्ध्या तावावर लिहिलेलें आपलें काव्य कवी दोन काव्यप्रेमी तरुणांस स्पष्ट खड्या आवाजांत म्हणून दाखवीत आहेत. चेहरा सस्मित व उल्लसित झाला असून जलशाला रङ्ग चढला आहे. श्रोत्यांच्या अन्तःकरणांना भेटण्याकरितांच जणू ते आपली प्रसन्न व कौतुकपूर्ण दृष्टि चष्म्यावरून श्रोत्यांवर रोखीत आहेत. आत्मनावीन्याचा खोटा अभिमान नसल्यामुळें मधून मधून आदर्शभूत संस्कृत वाङ्मयांतील सन्मानार्थी वचनें ते म्हणून दाखवून विशद करीत आहेत. लोकांच्या पुढें सद्गदित होणें हें नव्या तऱ्हेदार शिष्टाचाराला सोडून आहे याची दाद–पर्वा नाहीं. चुटक्यामागून कवितेचा चुटका, वर्णनामागून बहारीचें वर्णन, आठवणीमागून हृदयस्पर्शी आठवण-वक्ता व श्रोते सर्वच अतृप्त, सर्वच तल्लीन–इतक्यांत घड्याळांत रात्रींच्या दहाचे ठोके पडतात. भोजनाची वेळ टळलेली पाहून श्रोते चपापतात. भोजनाचा म्हणजे खालीं निवून वाट पहात बसलेल्या अन्नाचा परामर्श घेण्याचा आग्रह कवीच्या मृतमित्राच्या पुत्रास–दत्तसुतास झाल्यामुळें तो थाम्बतो; आणि मी चन्द्रशेखरांस सादर प्रणाम करून स्वतःस धन्य मानीत घराकडे परततों.

असे संस्मरणीय जलसे पुढील तीन वर्षांत किती तरी झाले ! विठ्ठलराव घाटे व मी त्या वेळीं मुलें होतों; त्यांतून माझा त्यांचा नवीनच परिचय. विठ्ठलरावांची ओळख हीच माझी शिफारसपत्रिका आणि काव्यप्रेम हीच काय ती माझी लायकी. परन्तु चन्द्रशेखरांनीं समतेनें वागावें, ममतेनें वागवावें आणि वयवैषम्य कधींहि जाणवूं देऊं नये. विठ्ठलराव रजेत जेव्हां इन्दुराहून

येत तेव्हां तर आमच्या सुवर्ण रात्री होत. रविवारींच त्यांना सुटी म्हणून त्या दिवशीं दुपारीं जे आम्ही त्यांच्याकडे जमायचे ते कित्येकदां रात्रौ तिथेंच जेऊन मध्यरात्र उलटून गेल्यावर विभक्त होऊन घराकडे परतावयाचे. एकदां तर रात्रिरेवव्यरंसीत्; आणि विठ्ठलराव सकाळच्या साताच्या गाडीनें इन्दुरास जायवाचे होते. झुन्जुरका आम्ही उठलों ते तसेंच स्टेशनवर गेलों. अशीं आमचीं काव्यजाग्रणें होत. जाग्रणापासून तुम्हांला त्रास होईल, जातों आतां असें जर आम्ही म्हटलें तर चन्द्रशेखर उत्तर द्यावयाचे, "तुमचें तुम्ही पहा; माझें काय ? आजवर कवितेच्या पायीं मी थोडीं जाग्रणें केलीं आहेत ?" कवितारतींत त्यांनीं कबुलीच दिली आहेः—

निशा दशादिशांसही गवसणी यदा घालिते,
सुषुप्ति निजमोहनी स्थिरचरांवरी टाकिते,
प्रशान्त समयीं अशा भ्रमासि जेथ लीलावती
अतन्द्रिताचि तेथ हा अनुसेर तुझा सोबती.

इतर अर्वाचीन कवींच्या कविता बहुधा आम्ही वाचीत नसूं. केशवसुतांची सिंहावलोकन ही कविता त्यांना फार हृदयस्पर्शी व परिणामकारक वाटे. नैऋत्येकडील वारा व वनवासी फूल या कविता त्यांनीं वाचून दाखविल्या होत्या.

आस्वर्गात् चढती सदोदित महात्म्याचीं अशीं मानसें
या दृष्टीपुढतें पुन्हा ब्रघतसें अद्रीश ते हो तसे

अथवा

ज्यांच्या थोर शिलांतुनी धबधबा जाती तसे निर्झर
वाणीचे कविदुर्दशामधुनिया ते ओघ यावे जसे —

किंवा

जें हृद्गम्य तरङ्गताण्डव मला तैशापरी वाटतें
अज्ञेयावरतीं जसें क्षणिक हें अस्तित्व हो खेळतें ॥

अशीं रम्य अलङ्कारिक स्थळें आलीं कीं ते थाम्बत, अलङ्कार समजावून साङ्गत, संस्कृत उदाहरणें देत आणि नन्तर पुढें वाचूं लागत. टिळकांची

कविता वाचतां वाचतां ते म्हणत : अहो, रे० टिळक एकदां ख्रिस्ती झाले ते झाले; पण संस्कारानें, विद्येनें व मनानें ते अद्याप हिन्दू ब्राह्मणच आहेत. इङ्ग्रजी कविता वाचतांना तत्त्वज्ञानाचा प्रश्न आला कीं चन्द्रशेखर साभिमान विधान करीत, यांत आम्ही हार जावयाचें नाहीं. कुठें आल्प्स आणि कुठें हिमालय ! कै० लेम्भे यांचें शोकावर्त हें एक त्यांचें आवडतें काव्य होतें. या कवीसम्बन्धीं आपला आदर त्यांनीं एक मनोहर कविता लिहून पुढें व्यक्त केला. या लेखाच्या आरम्भीं नमूद केलेला श्लोक त्या कवितेंतील पहिला होय. ले० क० कीर्तिकर यांच्या सहृदयतेचा व रसिकतेचा उल्लेख ते पुष्कळदां करीत. विरहीविलापांत कलेच्या व भाषेच्या दृष्टीनें सदोष स्थलें बरींच आहेत. तत्राप त्यांतील सर्त्ये हृदयाचें पाणी केल्यावांचून रहात नाहींत, काव्यबीज त्यांच्यांतच आहे असें ते भावनापूर्ण भाषेंत साङ्गत. घाट्यांच्या इतर कवितेंपेक्षां 'निज निज माझ्या बाळा' व 'सुटलासी दीन अनाथा' ह्या कविता त्यांस श्रेष्ठ दर्जाच्या वाटत. करुणरस विशेष काव्यमय आहे असें त्यांचें मत होतें व भवभूतीचा 'एको रसः करुण एव निमित्तभेदात्' हा श्लोक आधारादाखल देत आणि सम्भोग शृङ्गारापेक्षां विप्रलम्भ शृङ्गार काव्यपरिपोषक कसा हें दाखवीत. जगन्नाथराय, कालिदास व भवभूती हे त्यांचे आवडते संस्कृत कवी; पण अग्रपूजेचा मान ते वाल्मीकीलाच देत आणि आदि कवि या पदवीनें ते त्यास सम्बोधीत. वसन्तमाधवांत केवळ समाधीचें वर्णन करितांना ते म्हणतात, 'येथोनि आदिकवि कोकिलसा अगा तो, रामायणासम मनोरम काव्य गातो.' ही ओळ वाचतांना रामरक्षेतील 'आरुह्य कविताशाखाम् वन्दे वाल्मीकि-कोकिलम्' या ओळीची सहज आठवण होऊन मनाला आल्हाद वाटतो.

सम्भाषणांत कधीं थोरांच्या आख्यायिका तर कधीं स्वतांच्या आयुष्यांतील आठवणी ते साङ्गत. कृष्णशास्त्री चिपळूणकर–रसज्ञ शास्त्रीबोवा यांचें घरांत कसें वर्तन असे; बाजीरावबल्लाळचरित्रकार आपलें लेखन आठवड्यांतील कोणत्या सुवर्णरात्रीं आणि कशा परिस्थितींत करीत; पान–परायण शङ्कर मोरो रानड्यांची फजीती करण्यासाठीं त्यांच्या स्नेह्यांनीं त्यांस गुन्तवून ठेवून सयाजीविजयाचा अङ्क निघण्याच्यापूर्वी कांहीं वेळ त्यांस सम्पादकीय खुर्चीवर बसविलें असतां त्या रङ्गेल हुशार विद्वानानें एकटाकी मजकूर लिहून होईल तसातसा फाडून कम्पोज करावयास देऊन अङ्क वेळेवर काढून आपल्या

कर्तबगारीची ओळख कशी पटवून दिली; धन्वन्तरी बापू मेहेन्दळे नजरेनें कशी अचूक रोगचिकित्सा करीत व मोठमोठे पाश्चात्य वैद्यककोविद रोग-निदानासाठीं त्यांच्याकडे कशी धांव घेत; डाक्तर विश्राम आपल्या अनुपम हस्तलाघवानें बाळान्तिणीची कशी सुटका करीत वगैरे गोष्टी ते फारच मनोरञ्जक व परिणामकारक भाषेंत साङ्गत. विद्वान्, पद्यभाषान्तरकार गणेश-शास्त्री लेले यांच्या अस्खलित संस्कृत वक्तृत्वाची तारीफ कर्धी ऐकायला मिळे; तर कर्धी गणेशशास्त्री मोडक यांच्या कीर्तनांतील सुरेल वेदान्त-विवरणाचें शब्दचित्र ते रङ्गवीत. कर्धी दत्त कवींच्या रङ्गेल प्रेमळ जात्यभिनिवेषशून्य स्वभावाचें वर्णन करीत, तर कर्धी दत्त कवी जाजमावर पडल्या पडल्या आपल्या पिपीलिकाकृति अक्षरांनीं कशी झरझर कविता लिहीत व लिहिण्याच्या भरांत स्वर—यति—भङ्गादि दोषांकडे कसें त्यांचें साहजिकच दुर्लक्ष्य होई याचा ते बयान करीत. " काय हो हा चमत्कार ! " या काव्यांत ज्या थण्डीचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे—

शिशिर ऋतूची थण्डी फिरकूं दे ना कुणास बाहेर,
काळोख्या रजनीचें विश्व जहालें भयाण माहेर.
तारे बघोनि भासे काळ सहस्राक्ष हे वटारोनी
भोंतीं स्वभक्ष्य शोधी तन्द्रा, आलस्य दूर सारोनी.
खारी हवा सुटोनी कांटा येउनि शरीर हें थरके,
काय शरीरकथा ती त्यांतिल काळीजही जरी चरके !
शकट खड्यांतुनि धावे त्याच्या ध्वनितुल्य दांत खडखडती,
हुङ्कार भरुनि वारा वाहे, ऐकुनि उरेंच धडधडतीं.
सळसळ वाजति पानें, रात्र करी किर्र किर्र सन्ततशी
किङ्काळे टिटवी त्या सटवींना नाहि जरा चसन्त कशी !
लागोनि गाढ निद्रा सुनाट झाली अशेष जनवसती;
कोठें विवळाति कोल्हीं, तों कोठें ग्रामसिंह त्रसवसती.

अशा रात्रींतूनसुद्धां दत्त कवी चाबळी पाङ्घरून आपली लावाच्या आकाराची कविसावही बगलेंत मारून उन्चीपोळ झाप्यावरील आपल्या राहत्या घरून भीम-

नाथाच्या मैदानांत शहराबाहेर प्लेगामुळें उभारलेल्या झोंपड्यांत येत आणि गोऱ्ह्याच्या झोंपडींत शेगडीसमोंवर्ती बसून उत्तररामचरिताचें भाषान्तराचें काम विचारपूर्वक व कसोशीनें करीत. चन्द्रशेखरांचे वडील 'सु-बन्धु' नारायणराव जे जे दोष दाखवीत ते सर्व दूर होऊन 'आल्बेल' होईपर्यन्त ते पुढें कूच करावयाचे नाहींत. बराच वेळ झाला म्हणजे शीण येई, धूम्रपानाची तल्लफ तगादा लावी; परन्तु वडील माणसापुढें धूम्रपान म्हणजे बे-अदबशीर ! नारायणरावही तें ओळखत व हळूंच म्हणत, जा जरा बाहेर जाऊन या कीं. मग कविद्वय बाहेर जावयाचें व झुरके ओढून गरमागरम होऊन झोंपडीत यावयाचें. अशा रीतीनें एक-दीड-दोन वाजेपर्यंत कालक्रमणा केल्यावर दत्त कवी परत जात. या क्रमाची हकीगत चन्द्रशेखरांनीं एकदां सम्भाषणाच्या ओघांत मोठ्या भावनाऽकुल व चटकदार भाषेंत साङ्गितली. कधींकधीं दोघांच्या गृहविषयक नाजूक गोष्टीही ऐकावला मिळत ! असो, ते सहज विश्वासाचे दिवस फार मागें राहिले. कवीची कविता वाचण्यांत मौज आहे; परंतु कवीचें अन्तरङ्ग जाणणें यांतील मजा कांहीं और आहे.

चंद्रशेखरांनीं कवितेसाठीं काय परिश्रम घेतले, कोणता स्वार्थत्याग केला इत्यादि गोष्टी त्यांच्याकडून कवितारतींत हृद्गत-कथनाच्या ओघांत बाहेर पडलेल्या आहेत.

तुझ्यास्तव उपेक्षिल्या बहुविधा सुविद्या, कला,
तुझ्यास्तव न तीं पदें उपपदें मिळालीं मला;
तुझ्यास्तव हुजूरचा जरि गुलाम झालों स्वतां
तुझ्यास्तवचि गान्जलों तरि निबन्धनातें अतां.

चंद्रशेखरांना शिक्षणाचा लाभ मिळण्याचा व विद्यापीठाच्या पदव्या मिळविण्याचा योग नव्हता तरी निराश्र पदवीच्छूप्रमाणें उच्च शिक्षणांत काय आहे, विद्वत्ता काय शिखरी टोप्यांत आणि मानभावी काळ्या चुणीदार फर्गोलांत सांठविलेली आहे, अशा तऱ्हेचे उपहासपर उद्गार त्यांच्या तोंडून कधींच बाहेर पडले नाहींत. इतकेंच नव्हे तर अव्वल इङ्ग्रजींत विश्वविद्यापिठाच्या पदवीधराविषयीं जो असामान्य आदर बहुजन समाजास वाटे तोच आदर यांसही वाटत असे. आपले स्नेही दत्तोपन्त घाटे हे पदवीधर होते याचा

त्यांस अभिमान वाटे. इतकें असूनही विद्येची–शाळेंतील विद्येची–त्यांच्याकडून उपेक्षा झाली. कारण प्रश्नरचनेचें बुद्धिबळाच्या खेळाप्रमाणेंच एक वेड आहे. पुढें प्रापंचिक काळजी दूर होऊन कवितेची सेवा करण्यास मुल्लक फुर्सत मिळावी म्हणून चन्द्रशेखर गायकवाडींत नोकर झाले, सुदैवानें दत्तोपन्त घाटे अधिक जगते व त्या वेळच्या कांहीं उच्च अधिकारारूढ सामान्य व्यक्तींच्या मनांत जर गुप्त ब्राह्मणद्वेष नसता तर आजपर्यंत

ज्या काव्यानें लोकीं तुडुम्बुनी स्वाभिमान राहील,
ज्या काव्यानें त्यांच्या देहीं देशाभिमान वाहील,
ज्या काव्यानें द्वैतें जनहृदयांतुन शीघ्र ओसरतीं,
ज्या काव्यानें येते ऐक्यरसाची तया महा भरती
ज्या काव्यानें मोठे मोठे प्रतिबन्ध तेहि फोडून —
ती सङ्घशक्ति धो धो वाहे सीमा स्वकीय सोडून,
ज्या काव्यानें उसळति त्या शक्तीचे तरङ्ग मोठाले,
देशोद्धार–सुधाकर मग आकर्षी तया यथा कालें

अशीं उदात्त, उज्ज्वल व केवल समाधीनें साध्य होणारीं अनेक काव्यें त्यांच्या हातून लिहिलीं गेलीं असतीं; परन्तु दैवविलसित अतर्क्य आहे. सुधारणेच्छू विद्याभिलाषी महोदार श्रीमन्त सयाजीरावांच्या राजवटींत भाषेला, साहित्याला व ज्ञानाला उत्तेजन व आश्रय देण्यांत लक्षावधी रुपये खर्च झाले आहेत व होत आहेत आणि चन्द्रशेखरांसारखा उच्च दर्जाचा काव्यसेवक राजाश्रयाला मुकावा हा योगायोगच होय. शिशुसम्मेलनोत्सवकाव्य, जयसिंहविवाहकाव्य यांसारख्या भिकारड्या पद्यचोपड्यांना पारितोषिकें लाभावींत, आणि ज्यांचें युवराजनिधनकाव्य वाचून बडोद्याच्या समस्त जनतेनें आणि खुद्द महाराज सर्कारांनीं आसवें ढाळावींत व त्यांतील

प्रख्यात मोंसल्यांची तनया सौभाग्यमण्डिता चिमणा
गुजराथ राजलक्ष्मी, त्या देवीचाच बाळ हा चिमणा,
जननीमुखचन्द्राचें शोभे प्रतिबिम्ब याचिया वदनीं —
खग्रास हाय झालें, न दिसेल श्रीसयाजिच्या सदनीं !

सं. ल. ९७. 1062

या आर्या तर स्मरणांत पुन्हां पुन्हां याव्यात ते चन्द्रशेखर—महाराष्ट्र साहित्याच्या इतिहासांत बडोदें शहराचें नांव चिरायू करणारे चन्द्रशेखर—निराश्रित असावेत हें पाहून हंसावें कां रडावें हेंच कळत नाहीं. कामाचा रगाडा मोठा; उसन्त कमी; गृहचिन्ता वाढत्या प्रमाणांत; महाराष्ट्राकडून उपेक्षेची बिदागी अशी बिकट निराशाजनक परिस्थिति असून ते प्रासादिक कविता मधून मधून लिहीत आहेत हें त्यांच्या जिवन्त स्फूर्तीचें, खऱ्या उमाळ्याचेंच द्योतक होय. " कवितारति " कवितेंत ते पुढें म्हणतातः—

तुझ्यास्तव न लोभतां विभवमार्ग मी टाळले;
तुझ्यास्तव सखे मला स्वजन तेहि कण्टाळले,
तुझ्यास्तवचि हेलना मम गृहावधानीं घडे,
तुझ्यास्तव जनांहुनि विजन हा मला आवडे.
तुझ्यास्तव तुझ्यापरी मृदुलदेहिनी गेहिनी
अनेक समयीं दिली ढकलुनी अये मोहिनी!
तुझ्यास्तव जुमानिलें नहिं सुबन्धु नारायणा,
सदा न सदुपासिलें किमपि सूर्यनारायणा.

सदा व सत् हे शब्द पादपूरणार्थ आलेले नसून महत्त्वाचे आहेत. कारण, चन्द्रशेखर हे धर्मनिष्ठ, कर्मनिष्ठ, सूर्योपासक ब्राह्मण आहेत. त्यांची धर्मनिष्ठा जुन्या वळणाची आहे; पण बावनकशी आहे. आजच्या सुशिक्षित समाजांतील सार्वत्रिक धर्मौदासिन्याकडे पाहिलें म्हणजे ही धर्मनिष्ठा जितकी दुर्मिळ तितकीच अमोल वाटते.

चन्द्रशेखरांची कविता—भक्ती निस्सीम आहे, परन्तु अहेतुक नाहीं. हा दोष समजावयाचा कीं काय? कारण, ईश्वराचीहि अहेतुक उपासना करणारा महात्मा साऱ्या जगतीतलावर एखादाच असेल. त्यांतून चन्द्रशेखरांचा हेतु तर उच्च, जगन्मान्य व स्तुत्य आहे. काव्यं यशसे. 'तारातरङ्ग' काव्यांत चन्द्रशेखर म्हणतातः—

कृती माझी सारी सरसरमणीया उतरुनी
मला सन्तोषानें वरिल कविकीर्ति बुधजनीं,
अशा आशापाशामधिं अडकुनी मी तडफडे;
यशःप्राप्ती ? तों ती विधिवश, घडे वा नहिं घडे !
असे गज्जीफांचे धडधडित वाडे वसावेतां
दंवाच्या बिन्दूंचे नवलपरिचे हार करितां
दिगन्तीं धांवोनी रजनिकर चेण्डू कवळितां
मनातें देहातें घडति परिताप श्रम वृथा !

इ. स. १९०७ सालीं पुणें येथें भरलेल्या ग्रन्थकारांच्या सम्मेलनास त्यांनीं 'कविसन्देश' ही कविता पाठविली. त्या वेळीं अर्वाचीन कवींची स्थिति कशी होती याचें त्यांत निदर्शन आहे.

अर्वाचीन कवींचा आदर नाहीं. नसो ! परी लोकीं
त्यांच्याविषयीं सम्प्रति अनुकम्पाही नसेच अवलोकीं.
सम्भावना तयांची दुसरी ऐकूं न येतसे खास,
परि गरलासम टीका, व्याजस्तुति, वा यथेष्ट उपहास.
प्राचीन कवींवासुनि कोणी लागति पिढ्याच तोडाया
अर्वाचीन कवींच्या; पिढ्या न वाटे उरेंच फोडाया.
वर्तावितात भविष्यहि, कोणी जोशी जसें खुलाशाचें
कीं कवि साम्प्रत कालीं पूर्वींच्या सारखे न व्हायाचे !

आणि तींत पुढील होणाऱ्या प्रकाराचें स्वप्न पडूनच कीं काय ते म्हणतातः—

नुसती सहानुभूती नाहीं ! आश्रय कशास बोलावा ?
टीका उपहासांनीं उलटा तत्पृष्ठभाग सोलावा !
काबाडकष्ट दिनभरि करोनियां रूक्ष अन्न सेवावें,
रात्रींहि जागुनी निज कवितांनीं देशबन्धु सेवावें,—
आणि तयाचा विनिमय घ्यावा पूर्वोक्त ! बान्धवाकरवीं
किति कठिण ही कसोटी ! तुमच्या हृदयां न काय पाझरवी ?

यांत ज्याला अतिशयोक्ति वाटत असेल त्यानें इ. स. १९०७च्या मे महिन्यांत इन्दुप्रकाशांत 'प्राचीन व अर्वाचीन कवी' या विषयावर रा. आजगांवकर यांनीं लिहिलेल्या निबन्ध व काव्यदोहनाच्या प्रस्तावनेंत रा०बाळकृष्ण अनन्त भिडे यांना अर्वाचीन कविद्वेष्ट्यांच्या खोडसाळ व वेडगळ आक्षेपांचें करावें लागलेलें निरसन ही वाचण्याची तस्दी घ्यावी. आणि त्याच वेळीं चंद्रशेखर अहृदय टीकाकारांस कळकळीनें विनवीत होते :—

सम्प्रति अवर्षणानें, तापानें कोळपून जे गेले,
त्यां पारिजातकांवरि फुलतिल वर्षाऋतूंत हो झेले !
जाया करूं नका हो हिमकालीं खुण्ट हे प्रहारांनीं !
लवतिल हेच वसन्तीं द्राक्षाच्या गोड गोड भारांनीं !

या ओळी लिहिल्या गेल्या त्याला आतां सत्रा वर्षें होत आलीं. जङ्गल तोडून रस्ता करणाऱ्या बहादूर बेल्दार-तबल्दारांपैकीं आपल्या मर्दुमकीची यशस्विता पहायला आज फारच थोडी मंडळी हयात राहिली आहेत. त्यांनीं तयार केलेल्या रस्त्यानें जनतासहानुभूतीची हवा खात सहलणाऱ्या तरुण कवींना आज त्यांच्या कामगिरीची जाणीव नसेल, परंतु तो रस्ता सम्पून पुढें नवीन रस्ता तयार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडली कीं कृतज्ञतेनें त्यांचे डोळे भरून आल्यावांचून राहणार नाहींत आणि ते पूर्वजांच्या यशस्वितेमुळें उत्तेजित झाल्यावांचूनहि राहणार नाहींत. आज जरी अर्वाचीन मराठी कवितेची चहा वाढली आहे तरी सर्वाङ्गीण रसिकतेची उणीव व नव्या नव्या तऱ्हांची गुलामगिरी म्हणूनच कीं काय चंद्रशेखरांना महाराष्ट्रसरस्वतिमंदिरांत उच्च पीठावर खुर्ची देण्याचा प्रयत्न कोणी केलेला दिसत नाहीं. कदाचित् आजचा काल समतास्वतंत्रतेचा असल्यामुळें जागा राखून ठेवणें हा अन्याय समजला जात असेल, आणि ज्याला वाटेल त्यानें अगोदर येऊन पाहिजे ती जागा पटकवावी हाच न्याय्य शिष्टसम्प्रदाय असेल! चंद्रशेखर पुण्यापासून दूर एकान्तांत अगदीं एकीकडे राहिल्यामुळेंच कीं काय त्यांच्या कवितेच्या कपाळचा अज्ञातवास, वनवास अजून सम्पलेला दिसत नाहीं.

वाङ्मोहनी किमपि साधियली जयांनीं
कोठें वसोत मग ते, नाहि मानहानी.

असें म्हणत त्यांना स्वतःचें समाधान करून घ्यावें लागत आहे. ते पडले जुन्या जगांतले आणि आजचें जग तर भपकेदार जाहीरातीला व आत्मप्रौढीला वाहिलेलें !

स्वतःच्या कविता स्वतः भावानुसारी स्वरांत म्हणून दाखविण्याचा जो उपक्रम सुमन्तकवींनीं केला त्याचा फैलाव आनन्दराव टेकाडे यांनीं नागपूरापासून राजापूरापर्यंत बृहन्महाराष्ट्रभर केला. देशाभिमानाची लाट सर्व देशभर हेलावत असल्यामुळें त्या भावनेला उत्तेजक–पोषक नव्हे–अशीं गीतें सर्वत्र लोकप्रिय व्हावींत यांत नवल नाहीं. टेकाड्यांचें म्हणणें स्पष्ट, सुबोध व सुरेल; हजारों श्रोत्यांना तल्लीन, निःशब्द करून सोडील असें; त्यामुळें खळखळणाऱ्या कवितेचा प्रसार महाराष्ट्रांत चोहींकडे एकदम झाला. बहुजनसमाजाला आधुनिक कवितेचें अस्तित्व त्यांनीं पटवून दिलें; तिची लोकप्रियता वाढविली. या त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांचें अभिनन्दन करणें जरूर आहे. "राष्ट्र आणि जनता यांच्या जीविताशीं सम्बद्ध असलेले किंवा त्यांशीं तादात्म्य करून देणारे विषय आधुनिक कवी फारसे घेत नाहींत; यामुळें त्यांच्या कवितेला लौकिक पठनाचें विस्तृत अधिष्ठान मिळत नाहीं," अशी तक्रार रा० न० चिं० केळकर यांनीं रे० टिळकांच्या कवितेला लिहिलेल्या उपोद्घातांत केली आहे. आज त्यांना तशी तक्रार करायला आनन्दराव टेकाडे यांनीं जागाच ठेविली नाहीं. पूर्वी "सुरेख सङ्गम किती" हें माधवानुजाचें एकच पद मुलीबाळींच्या तोंडीं ऐकूं येई; आज "आनन्दकन्द ऐसा" वगैरे पदें अनपेक्षित ठिकाणींसुद्धां मुलामुलींना म्हणतांना पाहून साश्चर्य आनन्द होतो. या नवीन प्रघातामुळें मुद्रित कविता मात्र मागें पडूं लागली आहे हें कबूल केलें पाहिजे.

चंद्रशेखर जसे जुन्या राहणीचे व जुन्या वळणाचे सद्गृहस्थ आहेत तशी त्यांची कविता विसाव्या शतकांत हिण्डणारी, वावरणारी परंतु सुसंस्कृत बाळबोध मेळ्यांतील आहे. तिरपा भाङ्ग काढून नखरेदार फुगीर बुचडा न बान्धता ती पिम्पळपान ठेवून तिपेड वेणीचा खोपा बान्धून सरसें करिते. नथ हा तिचा डोळ्यांत भरणारा मुख्य अलंकार आहे. गळेसर, चन्द्रहार वगैरे दागिन्यांनीं तिचा गळा मर्दार दिसून येत आहे. अङ्गांत 'मन्दिली विरल कञ्चुकी' आहे. तिच्या सुकुमार शरीरयष्टीला बुट्टेदार शालूचें ओझें वाटत

६८४१

नाहीं. पायांत सांखळ्या, बोटांत गेन्द मासोळ्या अशून गजगतीनें ती चालत असतांना तिच्या पायांतील नूपरांचा मञ्जु झङ्कार जाणाऱ्या येणाऱ्या काव्य-भक्ताच्या कानांस आल्हाद देऊन त्याचे डोळ स्वतःकडे आकर्षून घेत आहे.

खऱ्या सौन्दर्यसमीक्षकांनीं या जुन्या वेषवैभवाला बुजून जाण्याचें कारण नाहीं. वेष, मूळ सौन्दर्य कमी अधिक प्रमाणांत खुलवून दाखवील; परन्तु त्याला त्याची उणीव भरून काढतां येणार नाहीं. कारण सौन्दर्य हें वेषाच्या तऱ्हेवर नसून शरीराच्या रेखीव सप्रमाण ठेवणीवर आणि नजरेंतल्या चैतन्यांत आहे. तें चन्द्रशेखरांच्या कवितेंत आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. तिचें अन्तःकरण विद्येनें सुसंस्कृत झालेलें आहे. तिचा हिन्दु संस्कृतीवरचा, हिन्दू धर्मावरचा, आर्यतत्त्वांवरचा विश्वास अढळ आहे. देशाभिमान, पूर्वजाभिमान, सौन्दर्यप्रेम, सत्यनिष्ठा इत्यादि गुण तिच्या ठायीं वास करीत आहेत. तिच्या भावना दृढ आहेत, विचार उदात्त आहेत, वाणी मधुर, कोमल व मोहक आहे. तिचा चेहरा गम्भीर, रुबाबदार, सस्मित व प्रसन्न आहे. ती दुसऱ्याला चटका लावील, प्रेम उपजवील; परन्तु आदरही त्याबरोबरच उत्पन्न करील. आणि हें सारें अन्तःसौन्दर्य तिच्यांत मुस्मुसत असून तिच्या नैसर्गिक बाह्य लावण्याची खुलावट तर और आहे.

चन्द्रशेखरांच्या कवितेचा दर्जा ठरवितांना गेल्या पन्नास वर्षांत मराठींत ज्या कविता निर्माण झाल्या त्यांचा तौलनिक दृष्टीनें अभ्यास करायला पाहिजे. काव्यकल्पनेचा विकास कसकसा होत गेला हें पाहिलें पाहिजे आणि चन्द्रशेखरांची काव्यप्रतिभा कोणत्या परिस्थितींत परिणत होत आली हेंहि ध्यानांत आणायला पाहिजे. काव्यचर्चेंत परिस्थितीचा विचार करणें कोणास अनाठायीं वाटेल; कारण काव्यप्रतिभा आणि परिस्थिति यांचा बिल्कूल सम्बन्ध नाहीं असा एक प्रचलित व रूढ समज आहे. खुद्द चन्द्रशेखरच कुञ्जकूजनांत म्हणतात:—

काय म्हणुनी शिकवील मला हो तो ?
आणि शिकवोनी काय कवी होतो ?
कदा नोहे ! रससिद्ध कवी जो कीं
स्वयम्भू तो अवतरत असे लोकीं.

स्वयम् काव्यस्फूर्तीस पावणारा
स्वयम् नादब्रह्मांत गुङ्गणारा
शब्दसृष्टीचा चतुर विधाता तो
जगन्मोहन मा खगापरी गातो.

एका दृष्टीनें हें म्हणणें खरें आहे. नुसती शिकवणूक ईश्वरदत्तबुद्धीची, प्रतिभेची उणीव केव्हांहि भरून काढूं शकणार नाहीं. नुसत्या शिकवणुकीनें एखादा मनुष्य कवीच काय, उत्कृष्ट खेळाडूहि होऊं शकत नाहीं. चेण्डूफळी हातांत धरणारे हजारों, लाखों, कमी अधिक प्रमाणांत प्राविण्य सम्पादन केलेलेहि शेंकडों, तथापि प्रतिभासम्पन्न क्रीडापटू एक रणजितासिङ्गच. त्यांची उपजत आवड व उपजत पात्रता यांचें महत्त्व अव्वल दर्जाचें, तर पद्धतशीर शिक्षणाचें व परिश्रमाचें—अभ्यासाचें—महत्त्व त्याच्या खालीं, परन्तु फार खालच्या दर्जाचें नाहीं. पद्यरचनेची आवड, भाषाप्रभुत्व, भावनामय जीवित, विचारक्षमता, सौन्दर्यसमीक्षकदृष्टि, मानवस्वभावाची व सृष्टि—रूपाची माहिती इत्यादि अनेक गुणांची, उच्च प्रतीचें काव्य निर्माण होण्यास जरूरी आहे. इतकें असूनहि सहानुभवी रसज्ञ जनता कवि-गुणाचें चीज करण्यांत विद्यमान नसल्यास काव्यनिर्मिती किती होईल याची शङ्काच वाटते.

अर्वाचीन कवितेचा जन्म इङ्ग्रजी शिक्षणाच्या वाढीबरोबर झाला. तत्पूर्वी पद्यरचना होत नसे असें नाहीं. कीर्तनकाराला आपल्या धन्द्यांत सामुग्री म्हणून कांहीं आख्यानें व पदें रचिलीं जात. तमाशांत म्हणण्यासाठीं लावण्या, छकडी यांचीहि पैदास होई. गोन्धळी लोक आपल्या देशासाठीं कांहीं पोंवाडेहि रचीत. परन्तु यांत पद्यरचनेचा हेतु गौण असे आणि कविताहि 'तीं तीं पदें नित्य फिरोन येती, त्या त्याच अर्थाप्रति दाविताती' यांत म्हटल्याप्रमाणें गतानुगतिक व तेंचतेंपणाच्या दोषानें दूषित असे. कित्येक साधुपुरुष भक्तिपर अभङ्ग व पदें रचीत आणि त्यांच्या सम्प्रदायांतील मण्डळी यांचें पठण चालवीत. असल्या जरूरी भागविणाऱ्या गौण काव्यांची निपज अजूनहि थाम्बलेली नाहीं. परन्तु अर्वाचीन कवितेंत त्यांचा समावेश कोणीहि करीत नाहीं.

एकोणिसाव्या शतकाच्या तिसऱ्या चरणांत अर्वाचीन कवितेचा जन्म झाला. जुन्या तऱ्हेनें संस्कृताचा अभ्यास केलेली शास्त्रीमण्डळी इङ्ग्रजी भाषा शिकली; आणि मराठींत नावीन्य आणिलें पाहिजे याची तीव्र जाणीव त्यांस झाली. त्याबरोबर वारकरी साम्प्रदायिक अभङ्ग, ओंवीबद्ध सन्तचरित्रकथन, वेदान्तविवरण, तीर्थमाहात्म्यलेखन, बोधपरवचन–ग्रथन–सर्व कांहीं या नवाशिक्षण घेतलेल्या शास्त्रीमण्डळींनीं सोडून दिलें आणि आपला मोर्चा पुराणेतर संस्कृतवाङ्मयाकडे वळविला. त्यांनीं भाषान्तरित व अनुकारी अशी पद्यरचना विशेषतः संस्कृत अक्षरवृत्तांत करायला सुरुवात केली. परशुरामपन्त तात्या गोडबोले यांनीं वृत्तदर्पण लिहिलें आणि संस्कृत नाटकांची मराठींत गद्यपद्यात्मक रूपान्तरें करण्याचा उपक्रम केला. गणेशशास्त्री लेले यांनीं रघुवंश मराठी पद्यांत भाषान्तरिला. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं मेघदूताचें साकीबद्ध रसाळ भाषान्तर केलें; जगन्नाथरायावरहि मराठी पेहराव चढविला. पारखीशास्त्री यांनीं षड्ऋतुवर्णन लिहिलें. कथनपर स्वतन्त्र काव्यनिर्मितीही या काळांत झाली. कृष्णाकुमारीवर पारखी व लेलेशास्त्री या दोघांनीं कविता लिहिल्या. विभूतिचरितकथनालाहि सुरुवात झाली. शिवाजी महाराजांवर गणेशशास्त्री लेले व कुण्टे दोघांनींहि काव्यें लिहिलीं. इङ्ग्रजी काव्याचें भाषान्तर अगर रूपान्तर करण्याचा उपक्रम लौकरच पुढें बजाबा रामचन्द्र प्रधान यांनीं 'लेडी ऑफ दी लेक' या काव्याच्या धर्तीवर देवसेनी काव्य लिहून केला.

जुन्या शास्त्रीमण्डळींनीं अर्वाचीन कवितेला जें हें नवीन वळण लावून दिलें त्याच वळणानें पुढील पिढीनें परिश्रम करून नवीन पद्यवाङ्मय पुष्कळच निर्माण केलें. हें पद्यवाङ्मय बहुतेक कथनपर आहे; भावनेचा ओलावा त्यांत आहे, परन्तु कवींच्या मनाचें वैयक्तिक वैशिष्ट्य त्यांत प्रतिबिम्बित झालेलें नाहीं. विशेष लक्ष पद्याची भाषा सुसंस्कृत, व्याकरणशुद्ध, गोण्डस व लवचिक करण्याकडे आहे. उपमादि अलङ्कारांत संस्कृताची छाया पडलेली आहे. निसर्ग–वर्णनांत हुबेहूब चित्र रङ्गवण्यापेक्षां कथनाकडे व नामावली देण्याकडे कल आहे. काल्पनिक याचा हुबेहूब प्रतिबिम्ब नव्हे इतकाच सङ्कुचित घेतला जात आहे. या पिढींत भामिनीविलास, गङ्गालहरी, मेघदूत इत्यादि संस्कृत काव्यांची मराठींत भाषान्तरें झालीं. इङ्ग्रजी काव्यांचीं रूपान्तरेंहि मागें पडलीं नाहींत. कीर्तिकरांनीं टेनिसन्च्या प्रिन्सेसच्या आधारें

इन्दिराकाव्य लिहिलें, नारायण वामन टिळकांनीं गोल्डस्मिथच्या डेझर्टेड् व्हिलेजचें ओसाड खेड़ें या नांवानें भाषान्तर केलें. याच सुमारास पाल्ग्रेव्हच्या हैमकोशांतील स्फुट भावगीतांचीं मराठींत भाषान्तरें करून महाजनींनी काव्यकुसुमाञ्जलि महाराष्ट्ररसिकांस सादर केली. वासुदेवशास्त्री यांनीं यशवन्तराव महाकाव्य रचिलें; आणि गोविन्दराव कानिटकरांनीं अकबरकाव्य, नारायणराव पेशव्यांचा मृत्यु वगैरे मोठीं काव्यें निर्मिलीं. शोकगीतांत लेम्भे यांनीं शोकावर्त लिहिलें, तर कीर्तिकरांनीं विलापलहरी प्रसिद्ध केल्या व आगाशांनीं बाष्पाञ्जली वाहिली. ऋतुवर्णनाप्रमाणें स्फुट सृष्टिवर्णनें कांहीं कवी लिहूं लागले होते. संस्कृताचें अनुकरण करीत मुजूमदार हंसदूतासारखीं काव्यें लिहीत होते.

इ. स. १८९५ च्या सुमारास इङ्ग्रजी भावगीतांचा परिणाम तरुण मराठी कवींवर जोरानें होऊं लागला होता.

पाश्चात्य कल्पनांनीं नव काव्या लागलें नवें वळण
मुरल्या न कल्पना त्या, गमेल नव काव्य तोंवरी दळण.
जेव्हांहि कल्पना त्या कविहृदयामाजिं पूर्ण पचतील
तेव्हां अधिक मनोहर नवीन कविता कवीहि रचतील.
सम्प्रति भाषावृद्धी, होत असे नव्य कल्पनापचन,
ऐशा स्थितींत कविला कां बोलावें उगीच कटु वचन ?

१९०७ सालीं चन्द्रशेखर नव्यकल्पनापचन होत आहे म्हणतात. परन्तु त्यांचेच स्नेही दत्तोपन्त घाटे इङ्ग्रजी कल्पना पचवून, कांहीं उत्कृष्ट बालगीतें लिहून १८९९ मध्येंच स्वर्गस्थ झाले होते. शिवाय वर्डस्वर्थ-शेलेच्या भावगीतांशीं तल्लीन होऊन इङ्ग्रजी कल्पना आत्मसात् करून घेऊन खडबडीत परन्तु ऊर्जस्वल व जिव्हाळ्याचीं अशीं भावगीतें लिहून मराठी कवितेचा बदललेला मनु सुचवून केशवसुत कैलासवासी झालेले होते. हें मात्र खरें कीं, केशवसुतांच्या लोकप्रियतेला सुरुवात बालकवि व गोविन्दाग्रजांच्या मागून गोविन्दाग्रजांनीं स्वतंस केशवसुताचे चेले म्हणवून घेतल्यावर झाली आणि अखेर अखेरपर्यन्त बडोद्याचे डॉक्टर चिपळूणकर हे वसन्त-व्याख्यानमालेंत केशवसुतांच्या कवितेवर जाहीर हल्ले चढवीतच होते. येथपर्यन्त दिलेला

मराठी कवितेचा त्रोटक इतिहास चन्द्रशेखरांच्या कवितेचा विकास जाण-ण्यास पुरेसा होईल.

चन्द्रशेखरांचा जन्म १८७१ सालीं झाला, म्हणजे ते व माधवानुज समवयस्क म्हणावयाचे. मेघदूत, रघुवंश, भामिनीविलास, गीतगोविन्द वगैरे संस्कृत काव्यांचें त्यांनीं बारकाईनें अध्ययन केलें. रामायणावर तर त्यांचा लोभ आत्यान्तिक जडला. संस्कृत काव्याप्रमाणें इङ्ग्रजी महोदार व विविध सारस्वताचा परामर्श ते घेते तर आज मराठी भाषेवर फार उपकार होते. परन्तु विद्यार्थिदशेंत इङ्ग्रजी काव्य समजावून रहस्याविष्करण करून अवीट गोडी उत्पन्न करून देणारा अध्यापक न भेटल्यामुळें म्हणा अगर मागून मागून दुर्लक्ष झाल्यामुळें म्हणा; पण इङ्ग्रजी सारस्वतांत इतर कवींप्रमाणें यांच्याकडून निमज्जन झालें नाहीं. दत्त व माधवानुज यांचा बङ्गाली साहित्याशीं जसा सम्बन्ध आला तसाही यांचा आला नाहीं. प्रसाद याचा अर्थ साहित्यशास्त्रांत सरळ, सुबोध रचना असा आहे. त्याप्रमाणें आपल्या हातून प्रासादिक मधुर सहृदयानन्ददायी अशी पद्यरचना व्हावी ही त्यांची मातबर इच्छा. ईश्वरकृपेनें दत्तासारख्या भावनामय, रसिक व जातिवन्त कवींशीं त्यांचा अकृत्रिम स्नेह जडला तर अल्पावकाशांतच त्या स्नेह्यावर काळानें झडप घातली. रसिकतासुद्धां उदार व पक्क व्हायला त्यावर भिन्न भिन्न संस्कार व्हावे लागतात. भाषाप्रभुत्व मिळवावें आणि नन्तर एक महाकाव्य सावकाश लिहावें हा त्यांचा पहिल्यापासून हेतु असावा. विषय उदात्त असावा आणि त्यावर विविधरसात्मक असें तें काव्य व्हावें. पोपकृत होमरचें ईलियड ते वाचीत आणि त्यांतील आवेश आणि प्रसाद पाहून ते थक्क होत. विषयाला हिंदुस्थानांत तोटा नाहीं आणि ' कथानुरोधानें त्रोटक सृष्टिवर्णन, मानवस्वभाव–लेखन, सूक्ष्मनिरीक्षणद्योतक ' उपमोत्प्रेक्षादि अलङ्कार, मनोवृत्तीचा खेळ, ओज तेज इत्यादि गुणांची त्यांच्याजवळ वाण नव्हती. तत्रापि ते आणि आर्थिक व वाङ्मयिक परिस्थिती यांचें सख्य कधींच जुळलें नाहीं; आणि ते असन्तुष्ट ते असन्तुष्टच राहिले.

भाषेवर आज जें त्यांना प्रभुत्व प्राप्त झालेलें आहे तें त्यांस अनायासें आलेलें मिळालें नाहीं. गिरेला प्रसन्न करून घेण्याकरितां त्यांनीं अगणित रात्री आलोचन जाग्रणांत घालवून खडतर तपश्चर्या केली. मेन्दूचें 'भजें'

होईपर्यंत मानसिक श्रम घेतले. सार्थ 'चप्खल' शब्द हुडकीत त्यांनीं तासचे तास येरझारा कराव्यात. ते केवळ स्फूर्तिवादी नव्हते. स्फूर्तीच्या भरांत लिहिलें तें लिहिलें, सुधारण्याची बात—अब्रह्मण्यम्; व्याकरणाच्या चुका, वृत्ताचें शैथिल्य, सारे खून माफ; अर्थ असो वा नसो, नसल्यास वाचकानें हुडकून काढावा; त्यांस तो सहज सांपडला तर कवीचें शून्यगुञ्जन तें कसलें! असली खुळचट विचारसरणी त्यांच्या काळीं एकहि कवीला रुचली नसती. चन्द्रशेखरांच्या कवितेला मध्यरात्रीं जाळलेल्या तेलाचा गन्ध येतो अतएव ती खऱ्या स्फूर्तीनें बाहेर पडलेली नाहीं असे बेजबाब्दार विधान, उचलली जीभ लावली टाळ्याला, व स्फुरलें काव्याला या कोटींतील कवी बेलाशक ठोकून देतात. परन्तु कलेचें उत्कृष्ट काम सहज श्वासाबरोवर क्वचित्च निर्माण होत असतें. चन्द्रशेखरांनीं परिश्रमपूर्वक भाषाशैली कमावल्या-वर मग ते वसन्तमाधव, हिन्दवन्दना वगैरे काव्यें घोंसदार भाषेंत एक-टाकी लिहूं शकले.

इतर कांहीं कवींप्रमाणें उमेदवारीच्या दिवसांत त्यांनीं भाषान्तरित व अनु-करणवजा कविता लिहिली. जुन्या परम्परेला अनुसरून विविधवृत्तबद्ध असें श्रियाळ चरित्र लिहिलें. Breathes there the man with soul so dead —या स्कॉटच्या लोकप्रिय उताऱ्याचें भाषान्तर केलें. शङ्कराचार्यकृत एका वेदान्तपर स्तोत्राचा परिश्रमपूर्वक चप्खल व पद्यात्मक असा त्यांनीं तर्जुमा केला त्याचें चीज झालें नाहीं. पुढें कालमानानुरूप अशा, चक्रवर्तिनी विजयिनी व माधवराव रानडे यांच्यावर शोकपर कविता केल्या व त्या बहुधा सयाजी—विजयांत प्रसिद्धही झाल्या. त्यानंतर पुढें आलेली पहिली कविता म्हणजे कुञ्जकूजन होय. या कवितेला शेलीच्या स्कायलार्क या कवितेचा आधार आहे. पुढील ओळी पहा.

गुच्छ जैसा काश्मीर गुलाबाचा
हरितपर्णांमधिं गुप्त असे साचा

अथवा

दिव्य तेजोवलयांत विचाराच्या
लीन होउनियां कवी सुधावाचा

किंवा

काव्य तूझें ज्यांतून उगम पावे
विषय लोकीं ते कोणते असावे ?
लोल सलिलें कोणतीं उपवनें तीं,
माळ किंवा कोणत्या शैलपट्टक्ती ?
रम्य देखावे नभोमण्डलाचे
प्रेम किंवा तूझिया प्रियजनाचें ?
अपरिचय कीं संसार विपत्तीचा
उगम आहे या काव्य-निर्झरीचा ?

आणि पुढें

ठाउका जो आनन्द तव मनाला
लेश त्याचा देशील काय याला ?

यांत कवीनें पुष्कळच भर घालून कविता वाढविलेली आहे. एकन्दर दिण्ड्या ४५ आहेत. ज्या काळीं हें काव्य निर्माण झालें त्या वेळीं याची चहा फार झाली. काव्यरत्नावलीकारांनीं तें आपल्या मासिकांत पर्वानगी घेऊन पुन्हा छापिलें. काव्यदोहन, रसतरङ्गिणी या पुस्तकांत त्यांची निवड झालेली आहे. परन्तु आज हें काव्य मागें पडलें आहे. सरळ सुबोध व्याकरणशुद्ध पद्यरचना आज कितीतरी होतकरू कवी करीत आहेत ! आणि चन्द्रशेखरांची कविता कथनपरच अधिक असून खऱ्या वैणिक तत्त्वाचा त्यांत जवळजवळ अभावच आहे असें म्हटलें तरी चालेल.

चन्द्रशेखर प्रतिभासम्पन्न कवी आहेत यांत तिळमात्र शङ्का नाहीं; तत्रापि त्यांची प्रतिभा वैणिक नाहीं. लिरिक् या शब्दाचा अर्थ वैणिक या शब्दानें व्यक्त करण्यांत अन्धानुकरणाचा किञ्चित् दोष येतो हें नाकबूल करून चालावयाचें नाहीं, पण खण्डकाव्य अगर भावगीत या शब्दानें खरा अर्थ ध्वनित होत नाहीं. एक विशिष्ट अर्थाचा त्याच्यावर आरोपच करावयाचा तर वैणिक शब्दाचा उपयोग करणें अधिक बरें. चन्द्रशेखरांची कविता भावशून्य नव्हे अगर ती गेय श्रुतिमनोहर नाहीं असा माझ्या विधानाचा अर्थ नाहीं.

त्यांच्या कवितेंत त्यांच्या विशिष्ट मनोरचनेचें प्रतिबिम्ब नाहीं. या मुद्यावर विशेष जोर देण्याचें कारण हें कीं, हल्लीं महाराष्ट्रांत ज्या त्रुटित कवितेची पैदास वाढत्या प्रमाणांत होत आहे ती उद्‌गारवाचक असेल परन्तु वैणिक नाहीं. अशी बेगडी वैणिकें लिहिणें आज फार सोपें झालें आहे. सरळ सुबोधपद्यरचनेची कला जुन्या कवींच्या व नव्या कवींच्या परिश्रमामुळें पुष्कळांस हस्तगत झालेली आहे. पदवीघर होईपर्यन्त सहज झालेलें इङ्ग्रजी वैणिकाचें अध्ययन अनुकरणास अगर रूपान्तरास साहाजिक उपयोगीं पडतें. परन्तु आजच्या वैणिकाच्या महामूर पिकावर कृत्रिमतेची कीड पडलेली आहे. किती जरी उद्‌गारवाचक चिन्हांच्या बहुखाम्बी मखरांत कवितेची स्थापना केली तरी जिव्हाळ्याच्या ओलाव्याची उणीव बिचारीं चिन्हें कशीं भरून काढूं शकतील? कवितेची तऱ्हा आज जरी बोकाळलेली असली तरी मराठी जनता व मराठी कविता यांचा जिव्हाळ्याचा सम्बन्ध अजून जडून आला नाहीं आणि त्याचें कारण उपरिनिर्दिष्ट कृत्रिमता–सत्याभाव हें होय. कवीचे वैयक्तिक अनुभव, त्याचे खासगी विचार, त्याच्या जीविताशीं दूरचा अगर जवळचा सम्बन्ध येऊन गेला आहे अशा व्यक्तीविषयीं त्याचे मनोविकार वगैरे मिळून झालेल्या मानसिक रसायनामुळें जनतेकडे–निसर्गाकडे पाहण्याची त्याला आलेली विशिष्ट दृष्टि,–थोडक्यांत साङ्गावयाचें म्हणजे कवीची विशिष्ट अन्तःसृष्टि–तिचें जर प्रतिबिम्ब त्याच्या सहजसम्भव गीतांत पडलें नाहीं तर त्या कवीची प्रतिभा खरी वैणिक नव्हे. चन्द्रशेखरांच्या आयुष्यांत भलेबुरे व काव्यदृष्ट्या महनीय असे अनेक प्रसङ्ग घडले असले पाहिजेत. त्यांतील कांहीं काव्यमय गद्यांत बोलण्याच्या सहजौघांत त्यांनीं वर्णन केलेले त्यांच्या मित्रास अजून आठवतात. परन्तु समजूत व दत्तानिवन यांखेरीज कोणताच प्रसङ्ग काव्यप्रेरक होऊं शकला नाहीं. एका कवीनें आपल्या मृतकाविस्नेह्यावर विलापिका लिहावी हा कविसम्प्रदाय चन्द्रशेखरांस परिचित होताच; तीं कवितासुद्धां अस्सल वैणिकाच्या कसाला उतरणार नाहीं. ती कथनपरच विशेष आहे. चन्द्रशेखर स्वतः उत्कट भावनांचे असतांना त्यांनीं हृदयस्पर्शी वैणिकें लिहिलीं नाहींत याला शिवाय दुसरींहि कारणें आहेत. विदग्ध संस्कृत वाङ्मयाचा उत्कृष्ट संस्कार त्यांच्यावर झाला असल्यामुळें बरेचसे विषय, प्रसङ्ग व अनुभव त्यांच्या कविमनाला हीन, अधम अतएव त्याज्य वाटले असावेत.

दुसरें त्यांची प्रतिभा कथनपरच विशेष आहे. तिसरें कारण हें कीं अव्वल दर्जाच्या वैणिकास कवि अहंवादी अन्तर्मुख असावा लागतो; तसे चन्द्रशेखर आहेत असें वाटत नाहीं.

स्वतन्त्र वैणिकें जरी चन्द्रशेखरांनीं लिहिलीं नाहींत तरी मधून मधून ते इङ्ग्रजी वैणिकांचीं भाषान्तरें करीतच होते. One thousand and one Gems of English Poetry हें पुस्तक त्यांच्याजवळ असे आणि मासिककारानें कविता पाठवा म्हणून निकडीची विनन्ती केली कीं ते एखादी कविता निवडून काढीत आणि त्याचें सुन्दर रूपान्तर अगर भाषान्तर करून पाठवून देत. त्यांच्या कवितेची निर्मिती साधारणपणें मासिककारांच्या मागणीवर असे. लेखकांचे दोन वर्ग पडतात. कित्येक लेखकांचें लेखन वक्त्याच्या वक्तृत्वाप्रमाणें वाचकांच्या मागणीवर व उत्तेजनावर अवलम्बून असतें. याचें कारण कर्तबगारीचा अभाव नसून एक प्रकारचें मानसिक आलस्य होय. कै० वासुदेवराव पटवर्धन यांच्या हातून 'सारेंच विलक्षण' ही सुन्दर कादम्बरी पुरी झाली नाहीं याचें कारण तिच्याविरुद्ध गवगवा झाल्यामुळें मनोरञ्जन ती पुरी छापून काढायला कचरलें व मागणी बन्द झाली हेंच होय. गोखल्यांचें चरित्र लिहिण्याची तयारी त्यांनीं चालविली होती. परन्तु गोखल्यांच्या द्वितीय विवाहसंबंधानें झालेल्या वादविवादांत निष्पन्न एवढेंच झालें कीं, मनोरञ्जनानें केलेली विनन्ती परत घेतली आणि वासुदेवरावांचें काम थाम्बलें. उलटपक्षीं कित्येक लेखक भवभूती, मिल्टन, वर्ड्स्वर्थप्रमाणें तत्कालीन अभिरुचीच्या तऱ्हेकडे व लोकमताकडे लक्ष न देतां कांहीं तरी चिरायु लेखन करावें म्हणून उत्साहानें व धैर्यानें आपलें लेखन चालू ठेवतात. परन्तु भवभूति, मिल्टन यांचा आत्मविश्वास व आशावादी दीर्घोद्योग फार विरळा. साधारणतः बहुतेक लेखक पहिल्याच वर्गातले असावयाचे.

चन्द्रशेखरांची दुसरी परिचित दीर्घ कविता म्हणजे तारातरङ्ग होय. ती कुसुमगुच्छांत प्रसिद्ध झाली. Henry Kirke White यांच्या Man's Littleness in Presence of the Stars या कवितेच्या आधारानें त्यांनीं ती कविता लिहिली. स्त्रग्विणी हें तुटकें व कठीण वृत्त घेतल्यामुळें कवीस परिश्रम अत्यन्त द्यावे लागले असले पाहिजेत. त्या परिश्रमांकडे कोण पाहतो ? रसास्वाद घेणारा वाचक अगर टीकाकार खुश न झाला कीं उपहास

करावयाचाच. तत्रापि ही कविता उदात्त आहे. आणि शिखरिणी वृत्तांत वर्णिलेलें कवीचें क्षाणिक कां होईना पण वैराग्य हृदयस्पर्शी आहे.

किती हो तृष्णा या विफल मरणाधीन मनुजां !
किती दीर्घोद्योग, प्रबलतर आशा तदनुजा !
परी सारीं मिथ्या ! शिव शिव अहो मोहमय तीं—
ठकार्ची काळार्चीं अघटित भुतें कीं मुलवितीं.

तारातरङ्गापूर्वीच त्यांनीं एक प्रासङ्गिक परन्तु जिव्हाळ्याची करुणरस-पूर्ण अशी कविता प्रसिद्ध केली होती. विक्रम संवत् १९५६ मध्यें जो मोठा दुष्काळ पडला त्याची भीषणता व उग्रता हीं त्यांनीं काठेवाडांत डॉ. शम्सु-द्दीनबरोबर मदत-दौऱ्यावर काम करतांना डोळ्यांनीं पाहिली होती. या दुष्काळावर रा. बाळकृष्ण अनन्त भिडे यांनींहि कविता लिहिली आहे; परन्तु तींत काव्यगुण अत्यल्प आहे. त्याच्या पुढील वर्षीं डोळ्यांत प्राण आणून ज्याची प्रतीक्षा करीत दुष्काळांतून जिवन्त राहिलेले लोक बसले होते, तो पहिला पावसाळी मेघ आला त्या वेळीं कवीच्या पिळवटलेल्या जिवांतून घना-भिनन्दन बाहेर पडलें. याचा उत्तरार्ध ज्यांत कवीनें पावसाळ्याचें वर्णन करून असें मला कधीं पहायला मिळेल म्हणून तीव्र उत्कण्ठा प्रगट केली आहे. तो रसतरङ्गिणींत वाचायला मिळतो; परन्तु ज्यांत दुष्काळाचें हृदयद्रावक वर्णन आहे असा शिखरिणी वृत्तांत लिहिलेला पूर्वार्ध १४ जुलै १९०० च्या करमणुकीच्या अङ्कांतच वाचायला हवा. घुळीनें दिशा धुन्द झाल्याबरोबर कवीला स्फूर्ति झाली:—

अहो आला ! आला नव जलद हा अम्बरपथीं !
बसूनी वायूच्या अति चपल वेगान्वित रथीं

* * *

आणि घनाच्या ध्यानानें जग निजपणातें विसरलें
म्हणोनी तें भासें जलधरसम श्याम बनलें.

सृष्टि—चमत्काराचा काव्यमय उपयोग करून ध्यावा तर असा; नाहीं तर निसर्गावर मानवी भावनांचें अवस्त्वारोपण, कारण तर नव्हे पण कारणाभास-सुद्धां नसून कवी करतातच आहेत.

आटलेल्या विहिरी, नद्या, निष्पर्ण खोडें पाहून चन्द्रशेखर म्हणतातः—

पहा गेल्या साऱ्या सुकुनि सरसी आणि सरिता
वियोगें भर्त्याच्या झुरुनि झुरुनी जेंवि वनिता.

भर्ता या शब्दाची योजना किती मौजेची आहे !

जयाच्या पर्णांतें खुडुनिच बहू जीव जगले,
परी आतां ज्यांच्यावरि चुकुनिही पान नुरलें;
वनामाजीं त्यातें रसरहित निष्पत्र बघुनी
मुनी वाटे गेले खरतर तपानेंच सुकुनी.
क्षुधेनें तृष्णेनें कळवळुनियां कर्षक किती
परागन्दा झाले त्यजुनि वतनें आणि घरटीं;
पती पत्नी टाकी, विकिति किति माता स्वतनुजा !
क्षुधा प्रेमाच्याहि क्वचित हरिते सर्व गमजा.

घनाभिनन्दनाचा उत्तरार्ध पूर्वार्धाशीं विरोधात्मक असून पूरक आहे. त्यांतून पुढील दोन चित्रें प्रसन्न आहेत.

वनां उपवनांतल्या भिजुनि भूमि वर्षाजलें,
तयांवरुनि सांचती चहुंकडे कदा पल्वलें !
यथेष्ट जल त्यांतलें पिउनि, पूर्ण आनन्दुनी
विनोदपर केधवां निघति दर्दुरांचे ध्वनी !
अकिञ्चन कृषीवलां मिळुनियां तगाई-धनें
तसें वृषभ, बीज, हीं कृषि करावया साधनें;
फिरोनि इरलीं शिरीं गरम घोङ्गड्या घालुनी
स्वकर्मरत ते असे कधिं बघेन शेतांतुनी !

या छप्पनच्याच दुष्काळांत त्यांनीं सोमनाथाचें दर्शन घेतलें आहे. सोमनाथावर स्वतन्त्र बहुसर्गात्मक काव्य लिहावें अशी त्यांस स्फूर्ति झाली. कांहीं सर्ग त्यांनीं लिहिलेहि. त्यांतील सोमनाथाच्या देवळांतील वास्तुपुरुष-भेटीचें

वर्णन अद्भुतरम्य आहे. ऐतिहासिक माहितीसाठीं सारी भर ते फेरिस्त्यावर टाकीत होते.

खर्ड्याची लढाई हेंहि एक अमुद्रित ऐतिहासिक काव्य आहे. हरिभाऊ आपटे यांचें उषःकाल हें पुस्तक जितकें ऐतिहासिक तितकेंच ऐतिहासिक वरील काव्य असावयाचें. ऐतिहासिक काव्याला काय अगर कादम्बरीला काय ऐतिहासिक माहितीची आणि ऐतिहासिक दृष्टीची जरूर आहे. केवळ कल्पनेवर भर टाकून फक्त उत्कृष्ट वाचनीय असें काव्य निर्माण होईल. त्यांतील कांहीं व्यक्ति ऐतिहासिक असतील परन्तु एकन्दर चित्र ऐतिहासिक सत्याला धरून असेलच असें साङ्गतां येणार नाहीं. ऐतिहासिक काळाची आणि स्थळाची मिळेल तितकी सत्य व सूक्ष्म माहिती मिळवीत बसणें हें खर्चाचें व दग्दगीचें किचकट काम आहे. कल्पनेनें फक्त कमी असलेले दुवे घालावयाचे आणि अनैतिहासिक बाबतींचें मिश्रण घालून प्राचीन काळ हुबेहूब रङ्गवायला मदत करावयाची या दृष्टीनें महाराष्ट्रांत प्रयत्न फक्त एक माधवराव काटदरे, काव्यांत आज करीत आहेत, आणि कै. सहकारी कृष्ण यांनीं कादम्बरीच्या क्षेत्रांत पूर्वी केले.

सोमनाथ, खर्ड्याची लढाई हीं काव्यें ते स्वयंस्फूर्तीनें व सावकाश लिहीत होते त्याच वेळीं मासिकांतून प्रसिद्धीकरतां ते भाषान्तरवजा त्रुटित कविताही लिहीत होते. या भाषान्तरित कवितांना टाकाऊ ठरवणें म्हणजे स्वतःची अरसिकता प्रगट करणें होईल. चन्द्रशेखरांच्या ठायीं अपूर्व कल्पकता हा गुण नाहीं, परन्तु त्यांची सहानुभूति असङ्कुचित व आत्मसात् करून टाकण्याची शक्ती दाण्डगी आहे. भाषान्तर व रूपान्तर करण्याला केवळ द्विभाषीपणाची सामुग्री पुरत नाहीं. उत्कृष्ट भाषान्तराला मुळांतलें काव्यमर्म समजून घेण्यास मेहनतीपणा, आकलनशक्ती, रसज्ञता, स्वभाषाप्रभुत्व इत्यादि अनेक गुण आवश्यक आहेत. शाब्दिक अनुकरण म्हणजे भाषान्तर नव्हे. मूळ भाषेंत कविता वाचणाऱ्याच्या मनावर ती कविता वाचून जो ठसा उमटतो तो फक्त भाषा बदलून विशिष्ट रचना व सौन्दर्य कायम ठेवून उठवणें म्हणजे भाषान्तर. हें काम कमी महत्त्वाचें नाहीं. होमरची किती तरी भाषान्तरें इंग्रजींत आहेत आणि त्यांच्या चपखलपणासम्बंधानें किती तरी तीव्र मतभेद आहेत. उत्तम भाषान्तराला सुद्धां मूळांतली कल्पना पचवावी लागते. विष्णु

मोरेश्वर महाजनी विद्वान् पाण्डित व रसिक असूनही सुमाञ्जलीतील त्यांची भाषान्तरें सुरस उतरूं शकलीं नाहींत. उलटपक्षीं केशवसुतांनीं इङ्गजी काव्य-कल्पना पचनी पाडल्यामुळें त्यांची एका सङ्कुचित दृष्टीनें परपुष्ट अशी कविता ऊर्जस्वल व सरस उतरली. भाषान्तर–रूपान्तरांत चन्द्रशेखरांचा हात धरील असा कोणी आज महाराष्ट्रांत नाहीं. नकली वैणिकांपेक्षां बावनकशी भाषान्तरें अधिक कीर्तिप्रद होत यांत शंका नाहीं.

इ.स. १९०७ पासून चन्द्रशेखरांची भाषा भरगच्च गालिचाप्रमाणें झाली. १९०८ सालीं युवराजनिधनकाव्य मनोरञ्जनांत जाहिरलें. १९०९च्या मनोरञ्जनाच्या प्रथम दिवाळी अङ्कांत कविता-रीति या मोठ्या काव्याचा उपोद्घातवजा पहिला हप्ता प्रसिद्ध झाला. शेलीच्या Ocean या काव्याचें भाषान्तर 'कालार्णव' व जेम्स् रसेल लोवेल यांच्या Fountain चें भाषांतर 'कारञ्जें' हीं याच काळांतलीं. काव्यप्रसवाच्या दृष्टीनें या महत्त्वाच्या काळांत करमणूककर्त्यांनीं वसन्त अङ्क काढावयाचें ठरवून कविता घाडून फार जुना सम्बन्ध पुन्हां चालूं करण्यासम्बन्धीं साग्रह विनन्ति केली आणि हरिभाऊ आपटे यांनीं आपण महाराष्ट्रांतले नाणावलेले कवी आहांत असें त्यांस गौरवून लिहिलें. ताबडतोब 'आला वसन्त, कवि कोकिळ हाहि आला। आलापितो, सुचवितो अरुणोदयाला' अशी चन्द्रशेखरांनीं वसन्त-माधवाची सुरुवात केली. या काव्यांत गुढीपाडव्याच्या दिवशीं जनांत व वनांत चालणाऱ्या मङ्गलाचें जें साम्य दाखविलें आहे तें अभिनव आहे. या काव्याची रचना इतकी हृदयङ्गम आहे कीं, तें एकदां वाचल्यावर त्यांतील मनोहर ओळी कानांत घुमत व जिव्हेवर नाचत राहतात. उदाहरणार्थ एकच श्लोक पहा.

आला गुलाबसुमनांप्रति जो विकास
उल्लास तोच इकडे रमणीसुखास;
एकैक त्यांतुनि जसा निघतो सुगन्धी
उद्गार यांतुनि तसा प्रणयानुबन्धी.

या काव्याच्या उत्तरार्धांत 'वेड्या, अरे तुजसि जो दिसतो वसन्त, तो हा अनन्त भरला, उरला अनन्त' असें म्हणून कवीनें दृष्टि अन्तर्मुख केली आहे

आणि पुढें केवलसमाधीचें स्वानुभूतिपूर्वक नव्हे परन्तु श्रद्धापूर्वक असें वर्णन आहे आणि अखेर सर्व चैतन्याचा उगम अन्तःसृष्टींत, आत्मसाक्षात्कारांत आहे असें प्रतिपादिलें आहे.

या काव्याची स्तुती मोकळ्या मनानें पत्र लिहून रा. विष्णु मोरेश्वर महाजनींनी केली. परन्तु करमणुकीचे मॅनेजर अगोदर पारितोषिक काय पाहिजे म्हणून विचारून नन्तर पञ्चवीस रुपयांत कॉपी-राईट मागूं लागले. अखेर पुढें एखादें काव्य मिळेल या आशेवर त्यांनीं पञ्चवीस रुपये पाठविले; आणि मरपाईला म्हणून चन्द्रशेखरांनीं करमणुकीच्या दर्बारअङ्काला हिन्दवन्दना ही कविता दिली. या कवितेचा पूर्वार्ध शाश्वत योग्यतेचा असून उत्तरार्ध प्रासङ्गिक किंमतीचा आहे. तत्रापि उत्तरार्धांत फाजील अगर दाम्भिक राजनिष्ठेचें उधान दृष्टीस पडत नाहीं व त्यामुळें समारम्भ साजरा होऊन रसापकर्ष होत नाहीं. पूर्वार्धांत हिन्ददेवीच्या विराट स्वरूपाचें वर्णन असून हिन्दभक्तीची परमावधी झालेली आहे. 'दुर्लभं भारते जन्म' हें व्यासवचन सुप्रसिद्धच आहे.

इथें गुण अनन्य हा उरतसे गुणातीतता,
इथें परम काव्य हें धरुनि राहणें मूकता,
इथें उटज-वास हा सुखद वैजयन्तीपरी,
इथें मज निजैकता गुणवती, सती, सुन्दरी.
इथें लवणभाकरी अमृत हेंच माझें मला,
इथें मखमला मला गमति माझिया कम्बला,
इथें त्रिविध ताप ही मलयचन्दनाची उटी,
इथें बिकट सङ्कटें सुमनमाळ ही गोमटी.
इथें परम तत्त्व हें निज अजिङ्क्य सम्पन्नता,
इथें सकल लाभलें दिसतसेंच तें लाभतां,
इथें तनुनिपात हा किमपि योग सर्वाङ्गसा,
इथें तनुवियोग हा सहजसा समाधी जसा.

तनूस परमा गती विलय झालिया भारतीं
मनास परमोन्नती विलय केलिया भारतीं,
सुकीर्ति जरि भारतीं तरि कशास रम्भा-रती ?
अशेष भुवनें सुख वसति भारतीं भारतीं !
तुझ्या उदरिं जन्मलों मज नसो पुन्हां जन्मणें,
परंतु असलें तरी जननि हिन्द हो मी म्हणे.

काव्यांत देशभक्ती काव्यमय रीतीनेंच व्यक्त केली पाहिजे. वर्तमानपत्री भाषेंत टाहो फोडून अगर शिवराळ शिव्या देऊन ती व्यक्त होत नाहीं व रसिकांच्या मनावर स्थायी परिणाम करूं शकत नाहीं. चन्द्रशेखरांनीं आपला आर्यत्वाभिमान आणि सहृदयत्व मोठ्या खुबीनें सूचित केलें आहे.

तृणास जरि येथल्या कुणि अनार्यता लाविली,
बसेल हृदयास या तरिहि डागणी तापिली,
आणि पुढें, अहो हृदयशून्य तो पशुहि आर्यदेशीं नसे;
असेंच परिसावया धरुनि लालसा मी असे.

दर्बारीं स्वागतगीत कसें असावें, चाटु स्तुतीचा व स्वाभिमानशून्यतेचा ठपका येऊं न देतां सम्राटांस गम्भीर वाणीनें हितनीति कशी सांगावी हें मनोरंजनाच्या दर्बारअङ्कांतील चन्द्रशेखरांची राजनीतिगीतिका वाचून उत्तम कळेल. सुरवातीचाच श्लोक पहाः—

गणना नसे भुवनांस ज्या अधिराज्य त्यांवरि जो करी
अनुशासनें निज चालवी निज तन्त्र जो तितुक्यांवरी;
महिमा यदीय न जाणवे, बल, कर्म-कौशल, योजना,
स्वकृपेंचि तो प्रभु योजितो तुज सार्वभौम नृपासना,
वरतोनि तो तुज पाहतो, अवनम्र हो प्रभुला नृपा !
करसम्पुटीं तव आदरीं वर, साह्य, ती महती कृपा !
प्रणमोनिया गुरुतात हे निजराजधर्म समाचरी,
प्रभुचेंच आसन थोर !-हें अतिथोर !-मण्डित तूं करीं.

अवधान दे ! जयगान हें सुरसप्तकांतुनि वाजतें,
सुरसङ्घसें दरबार हें मनुजेन्द्र ! आज विराजतें !
क्षितिमण्डलांतुनि लोटलीं अधिराज ! हीं अभिनन्दनें,
करितो पुरातन, जाणता, तुज हिन्द हीं अभिवन्दनें.

या दर्बारचें वर्णन करीतं असतांना कविदृष्टि पुरातन राजांकडे वळल्याशिवांचून रहात नाहीं.

असशी अलंकृत आज ज्या अधिराज ! धर्मपदावरी,
गुण त्या नृपांतिल वेचके रुचतील घे तरि अन्तरीं;
परतोनि तूं बघशील का अभिराम रामपदाकडे ?
नमुनाच तो नृपनीतिचा धरिशील का तुझिया पुढें ?

असल्या सुन्दर राजदर्बारी कवितेचें चीज करणारा आज महाराष्ट्रांत आहे कोण श्रीमन्त ?

याच काळांत त्यांनीं मिल्टनच्या L'allegro व Il penseroso या काव्ययुग्मकाचें रूपान्तर करण्याचें काम हातीं घेतलें. पुढें योडेंसें काम झाल्यावर तें काम परिस्थितीच्या वैषम्यामुळें जें मागें पडलें तें अदमासें दहा वर्षांनीं सुरू होऊन पुरें झालें. रङ्गराव हर्षें व चिन्तोपन्त उदास हें काव्ययुग्मक बडोद्याच्या सहविचारिणी समेनें प्रसिद्ध केलें. हें काव्ययुग्मक कथनपर असून सरस वठलें आहे. रङ्गदेवता व उदासीनता यांची उत्पत्ती देतांना कवीनें फार परिश्रमपूर्वक व चतुराईनें आपलें काम साधिलें आहे. याच काळांत स्वतःसाठीं म्हणून त्यांनीं आपलें सर्वोत्कृष्ट काव्य गोदा—गौरव हें लिहावयास घेतलें.

भवभट्टीमधिं तावुनि तावुनि विजनजलीं जें निवावियलें
मन्त्रघनानें पिटुनि ओढिलें विचार जन्त्रांतून भलें
जें मननामें काञ्चन त्याची सतारही रव काय करी ?
जय सञ्जीवनि जननि पयोदे श्रीगोदे भवताप हरी

या काव्यांत खऱ्या वैणिकाचा उमाळा अपरंपार आहे त्या अर्थी ते सर्वोत्कृष्ट ठरणार यांत शङ्का नाहीं. चन्द्र ख म्हणतात :—

प्रगटुनि येथें मूर्तिमती तूं देशिल दर्शनलाभ जनां
तोंवर माते, एक लयानें करीत राहिन तव भजना,
या भजनामधिं सहजाचि होतिल बालवयींच्या आठवणी
हृदय विदारुनि दावुं कुणाला सुखाऽसुखाच्या सांठवणी ?

संस्कृत वाङ्मयांतील उल्लेख, सृष्टिवर्णनें, जुन्या जिव्हाळ्याच्या आठवणी इत्यादि अनेक गोष्टींचा या काव्यांत अद्भुत असा पाक उतरला आहे. हें उत्तम काव्य अर्धेमुर्धें लिहून झालें नाहीं तोंच दुर्दैवानें हस्तालिखित हरवलें. परन्तु महाराष्ट्र या काव्याला मुकावयाचा नव्हता. दोन वर्षांपूर्वी तें पुन्हां सांपडलें आणि कवी तें लौकरच पुरें करणार आहेत. महाराष्ट्र-साहित्याच्या सहाव्या पुस्तकाच्या ५-६ या जोड अङ्कांत गोदागौरवांतील हिरावाडी हा भाग नुक्ताच प्रसिद्ध झाला आहे. चन्द्रशेखरांच्या स्नेह्यांना, ज्यांना या काव्यांतील शम्भर दीडशें ओळी मुखोद्गत आहेत, त्यांना हें काव्य केव्हां प्रसिद्ध होईल अशी उत्कण्ठा लागून राहणें साहजिक आहे. शास्त्रीय सत्य काव्यमय व कल्पनाप्रधान भाषेंत व्यक्त केल्याचीं दोन सुन्दर उदाहरणें याच काव्यांत आहेत.

हिमऋतुमाजीं प्रभातकालीं बाष्प तवौघावर तरतें,
सकरुण वरुणें शाल धवल ते वाटे घातलि तुजवरतें,
जणु म्हणुनिच तें सुखोष्ण झालें-घे मजला घे त्या उदरीं !
जय सञ्जीवनि जनानि पयोदे श्रीगाद भवताप हरी,
ग्रीष्म ऋतूच्या रम्य दिनान्तीं पवनहि तव जलकेलि करी
जे रवि तेजोग्रहणें करपति ते कर चन्द्र तुझ्यांत धरी;
मासे तळपति, तरङ्ग झळकति, शीकर पळविति दाह दुरी,
जय सञ्जीवनि जनानि पयोदे श्रीगोदे भवताप हरी.

Thomson च्या Pleasures of Retirement या कवितेच्या आधारानें लिहिलेली मनोरञ्जक कविता ' वनवासांतलीं सुखें ' ही विविधज्ञान-विस्ताराच्या काव्यमालेंत प्रसिद्ध झाली. रङ्गराव हर्षे, चिन्तोपन्त उदास याच कोटींत ती कविता समाविष्ट होते. परन्तु त्या कवितेच्या पूर्वीच Sussex Miracle या काव्याच्या आधारें ' काय हो चमत्कार ! ' हें काव्य रचून

त्यांनीं नवयुगांत प्रसिद्ध केलें. रा० अज्ञातवासी यांनीं या दीर्घ काव्याला आपल्या महाराष्ट्रशारदेंत स्थळ देऊन काव्यप्रेमी वाचकांची मोठीच सोय केली आहे. हें काव्य अनेक दृष्टींनीं अपूर्व आहे. कादम्बरी सोडून दिली तर ब्राह्मणेतर अगर सुशिक्षितेतर लोकांना वाङ्मयांत मेऊं दिलेलें कारसें आढळत नाहीं. याच काव्यांत नायिका सचन पाटलाची मुलगी असून नायक एका गरीब कुणब्याचा मुलगा आहे. ही प्रेमकहाणी करूणरसपूर्ण आणि चन्द्रशेखरांची प्रतिभा विशेषतः कथनकुशल, असा योग जमल्यावर उत्कृष्ट काव्य कां निर्माण होऊं नये? प्रेमकहाणी अगदीं साधीच आहे. धनाजी नांवाच्या कुणब्याला एक सुस्वरूप व सद्गुणसम्पन्न अशी मुलगी होती.

गोधूमवर्ण तीचा, हरणाच्या पाडसापरी डोळे;
स्नेहाळ वदन नार्मी, प्रसन्न विधुबिम्ब जेंवि वाटोळें;
तो केशपाश काळा, भाळावरि लाम्ब आडवें कुरुकूं,
जणु म्हणति शब्द तीचे आम्ही कोकिळरवासही जिङ्कूं,
घेती पाटिल साड्या हौसेच्या रेशमी किनारीच्या,
ऐनेदार खडीच्या झळकति चोळ्या तया कुमारीच्या,
साधींच कङ्कणें तीं कदा तदाकार नागमोडीचे,
शोभति शुद्ध रुप्याचे तयावरि गोल गोठ जोडीचे.
येतां सुदिन सणाचा पुतळ्यांची माळ ती गळां घाली;
तेव्हां शृंगाराच्या माहित नव्हत्या नव्या तऱ्हा चाली.
जाई आईसंगें मळ्यांत किंवा खळ्यांत ही कन्या;
साधी निसर्गसुंदर दिसे तदा देवता जणों वन्या.
अपवादास्पद जितकी रूपवती गुणवतीही ती तितकी;
बहुधा गुणरूपाचें व्यस्तचि दिसतें प्रमाण मूर्तित कीं!
कांतीव सूत ऐशा येत तिला शेवया वळायाला,
ह्या फेण्या! म्हणुनि तिच्या लोकभ्रम कुरडयांवरी झाला.
लावोनि गुळवणी वा पुरण, करी सार ती मजेदार

ऐसें कीं तें सेवुनि हुशार व्हावा मनुष्य बेजार.
गुलगुलित मलमलीपरी करी झराझर कशा पुरणपोळ्या !
काढुनि सुन्दर कशिदा तिनें शिवाव्याहि रेखिल्या चोळ्या.
ती निन्दणी, खुरपणी, जाणें भारीक काम शेतीचें
केवळ राजाऊचें वळण जसें उतरलें तसें तीचें.

मुलगी उपवर झाली परन्तु सर्वगुणसम्पन्न असें स्थळ आढळेना आणि कन्या हें परक्याचें धन, विधिलिखिताप्रमाणें नेमल्या ठिकाणीं जाईल म्हणून पाटील बाबा स्वस्थ राहिले. इकडे शिवबा घायाळ हा तरुण पुरुष तिच्यावर आशक झाला. विधात्याच्याच योजनेनें पाटील बाबांनीं त्याला मळ्यांत कामास घेतलें; आणि जिऊ व शिवबा एकत्र आल्यावर

दर्शन, सहवास, पुढें भाषण, अनुनय तयांमधें चाले,
प्रेमाचें परिपोषण अशाक्रमें परिचयासवें झालें.
ती पाडाचे आम्बे मिळता शिवबांस आदरें देई,
ताजा सु-रस उंसाचा शिवबा आधीं जिऊकडे नेई.

एके दिवशीं शेतांतील लोक पाङ्गले असतांना शिवबांनीं प्रेमाचें मागणें केलें; आणि

किन्नरमिथुनासम तीं द्राक्षीच्या रम्य मण्डपाखालीं
कांहीं गुञ्जन करितां अदृश्य तेथेंच दृष्टिआ झालीं;
एक क्षण प्रभावें बनलीं अन्योन्य-मित्र जिवलग तीं
लगबगतां भेटाया भेट न होतां मनांत तगमगती.

एके दिवशीं शेतांत हुळा तयार झाला असतां घांस देण्याघेण्याला उत्सुक झालेली ती—

तेथिल जन दृष्टीला चुकवोनी नव नवाळ ती ताजी
प्रेमी परस्परांच्या घालिती सस्मित अशा मुखांमाजीं.
मुरकोनि कोरड्याला अधरसुधा गोड ! मारिती मुरका,
हाय जिऊ ! हा शिवबा ! नाशाला जाहलांत आतुर कां ?

कारण धनाजीनें पाळत राखून स्वतःच्या संशयाचें निरसन करून घेतलें.

शिवबा ! प्रमदवनांतिल बोराचा जाहलास भक्षक ना ?
तो बघ तुजला डसला, बसला होता तयांत तक्षक ना ?
त्याची परी क्षिती तुज, भान कसें रे न राहिलें राया ?
पण, भवितव्य न येतें ज्ञानी पुरुषासही निवाराया.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं यण्डी म्हणते मी, परन्तु सकाळींच मोटेवर जाऊन बसलेले आशाळभूत शिवबा निराळा प्रसङ्ग पाहते झाले. पाटील आले परन्तु नेहमींची 'कार्भारी' अशी सविनोद हांक नाहीं, विचारल्या प्रश्नाला धड उत्तर नाहीं; पाठीमागून राजाऊ-जिऊ हीं दिसत नाहींत, कोणाला विचारूं म्हटलें तर चोरी, अशा स्थितींत हतबुद्ध झालेले शिवबा गांवाकडे परतले.

जणुं फाटक्या मनामधिं हृदयाचे सर्व बान्धुनी तुकडे
तो मन्द पावलें तीं जिकडे नेतील चालला तिकडे.

जातांना जिऊला तरी पहावें म्हणून पाहतो तों पाटीलबाबांच्या दाराला सायखेडी कुलूप. झालें, तो आशक तिथेंच थिजला व एका वाटसरानें त्याला घरीं पोंचता केला. घरीं जाऊन शिवबा जो अन्थरुणावर पडला तो पुन्हा उठला नाहीं.

इकडे पाटीलबाबांनीं जिऊला तिच्या मामाकडे, दगडू झुन्जाराकडे, दिण्डोरीस पोंचविली होती. तिला शिवबांच्या मृत्यूची खबर नव्हती. शिशिरऋतूच्या यण्डींत महिन्याभरानें मध्यरात्रींच्या समयाला दगडू झुन्जाराच्या दाराशीं एक भिरकें थाम्बलें. जिऊ ! जिऊ ! अशा हांका झाल्या, झुन्जार जागे होऊन पुसतां 'कोन' ?

"उगडा कवाड उगडा ! ह्यो नव्ह परका, मनुक्ष वळकीचा,
मी ओढ्याहुन् आल्वो निरोप घेउन्शनी धनाजीचा"

दगडू झुन्जार कवाड उघडून दिव्याला तिरपा हात लावून पुढें धरितात तों समोर शिवबा; आणि म्हणतात काय तर—

" ह्ये बैल भडकल्येती, वोढा घ्येती घराकडे जाया;
पाटिल मला म्हङ्गाल घ्ये भिरकें जा जिऊस आनाया.
झुन्जाराला दण्ड्वत साङ्गुन् घ्येउन्शनी तिला ये तूं
रात्वोरात घराला जिउवर त्येंचा लईलई ह्येतू !
थण्डी वार म्हुन्सटि बनातबी ह्ये बगा दिली सङ्ग;
आटपा बिगिबिगि आतां " ऐकुनि झुन्जार जाहले दङ्ग.
माणुस पाटलांचा, वस्तू, खाणाखुणा तयां पटल्या.
किन्तू परि वेळेचा ये निकडीचा तसाच शेवटल्या.

परन्तु भाची इतक्यांत जाऊन भिरक्यांत बसलीसुद्धां आणि तींच—

बैल कशाचे ? वारे ! निघोनि गेलेहि भिर्र तें भिरकें !
झुन्जाराचें काळिज मान्जरपाटापरी उभें चिरकें.

वाटेनें जिऊनें आङ्ग 'काल्यावानी जालयां' म्हणतांच तिला उत्तर मिळालें

" या थण्डीवान्यानं माझा गेला परान गे रानीं,
त्येबी स्वोसुन आल्वो धावत न्याया तुला मुतावानी "

डोकें फार दुखतें, बान्धायला कांहीं तरी दे असें म्हणतांच जिऊ, मी चोळी-वांचून बरोबर कांहीं आणलें नाहीं असें म्हणते. त्यावर शिवबा म्हणतातः—

" चालल, घ्ये या वख्तीं च्वोळीबी बान्दत्वो कपाळाला
माझी कपाळपट्टी दिसेल व्हय रातची सकाळाला ? "
प्रेमा, तव राज्यामधिं अघटित म्हणुनि न एकही बाकी;
हृदयत्राण जिऊच करिति शिरस्त्राण तेंच शिवबा कीं !

पाटलिबावांच्या दाराशीं भिरकें थांबल्याबरोबर 'बैल सोंडून येतों, हांक तर मार' असें म्हणून शिवबा जे गेले ते गेले गङ्गथडींतील आपल्या ठिकाणीं. मुलीची हांक ऐकून आईबापें उठलीं, व जिऊ कशी आली याची हकीगत ऐकून डोळ्याला अन्धारी येऊन मटकन् खालींच बसली. इतक्यांत पाटिलांना सुचलें कीं, मुलीला सत्य कळलें तर ती भेदरेल म्हणून त्यांनीं राजाऊला

सङ्केतानें दाबून मुलीला शेकण्यास सांङ्गितलें. गोष्यांत जाऊन पाहतात तों घामानें चिम्ब झालेले, तोंडीं फेंसाळलेले बैल लाम्ब सुस्कारे सोडताहेत. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं मसण्वटींत जाऊन तपास करावयाचा विचार केला. तपासांतीं खरेंच—

दिसली ! ती बघ चोळी कंवचीला करकचून आंवळली
ओळख नीट धनाजी ! प्रेमाची खूण, सत्यता कळली ?

सत्य कोठवर झांकून राहील ? शिवबा एकटीला टाकून गेले असें कळतांच जिऊनें अन्यरुण धरिलें आणि ती आसन्नमरण झाली.

घेवोनि पथ्य कांहीं एके रात्रीस लागला डोळा,
" आल्यें ! आल्यें ! " ऐसा तंव ती उठली करोनि आरोळा !
मुलगी भ्याली म्हणुनी पाटिल दचकुनि उठोनि सांवरती,
तों दार उघडुनी ती वीजचि गेली चतुष्पथावरती.
त्रेधा उडुनि धनाजी धांपा टाकीत जाउनी, पाही
कुत्रीं विवळत असतीं, मनुष्य त्याच्याविना तिथें नाहीं.

या काव्याची तारीफ जितकी करावी तितकी थोडीच. हें काव्य रूपान्तरवजा आहे हें कवीनेंच सांङ्गितलें म्हणून बरें, नाहीं तर हें क्वचितच एखाद्या पण्डिताला उमगतें.

सुलभ बालबोध भाषा लिहिण्याची त्यांची शैली अजब आहे. कांहीं वर्षांपूर्वी सुधारलेल्या मोडी क्रमिक पुस्तकांत घालण्यासाठीं कै० सीताराम विश्वनाथ पटवर्धन यांनीं अगदीं लहान मुलांसाठीं बोधपर व उच्चारसुलभ अशा कविता मागविल्या होत्या. त्यांत जोडाक्षरें नसावींत अशी एक अट होती. ज्या जोडाक्षरांचें पहिलें व्यंजन नासिक्य आहे अशीं जोडाक्षरें वापरण्यास मात्र हरकत नव्हती. चन्द्रशेखरांनीं त्या वेळीं २०–२५ श्लोक लिहून पाठविले होते. त्यांचें पुढें काय झालें तें कळलें नाहीं. स्वतः कवीजवळही त्या कवितेची प्रत नाहीं. तेव्हां रचनाकौशल्याचा नमुना म्हणून आठवत असलेल्या आठ ओळी देतों. कविता लिहिल्याला अदमासें बारा वर्षें होऊन गेलीं. या मुलांकरितां लिहिलेल्या कवितासुद्धां पदलालित्यपूर्ण आहेत; आणि त्यांच्या

रसाळ व सुबोध पदलालित्यानें त्या महाराष्ट्रभाषाचित्रमयूर कृष्णाजी नारायण आठल्ये यांची आठवण करून देतात. त्या ओळी अशा :—

दिशा रङ्गवीतो रवी तो चितारी,
पहा कोम्बडा वाजवीतो तुतारी.
गुणाची मनी ही धुते तोण्ड कैसें,
बघोनी धुवावें मुलांनींहि तैसें.
इमानी टिपू खाउनी भाकरी तो
धन्याची खडी चाकरी हा करीतो.
अरे, जोर काढा, करा बैठकाही,
तयांवाचुनी राम आराम नाहीं.

ही कविता नष्ट झाली हें मुलांचें दुर्दैव होय.

चन्द्रशेखरांच्या कवितेंत अपूर्व—कल्पकता नाहीं; कल्पनेच्या भराऱ्या व उपमेच्या अभिनव चमत्कृती नाहींत. परन्तु ही उणीव त्यांनीं भावनेच्या उत्कटतेनें व अर्थानुरूपिणी भाषेच्या निरुपम सौन्दर्यानें भरून काढिली आहे. "असे गञ्जीफाचे घडघडित वाडे वसवितां" ही एकच ओळ नावीन्यपूर्ण आहे असे उद्गार गोविन्दाग्रजांनीं १९११ सालीं काढले होते. नावीन्यप्रचुर ओळी त्यांच्या काव्यांत थोड्या असतील; परन्तु एक एक काव्य सम्पूर्ण असें पाहिलें म्हणजे त्यांत नावीन्य दिसूं लागेल. काव्यशिल्पकलेंत त्यांच्या इतका तर्बेज निपुण कारागीर महाराष्ट्रांत कोणी नाहीं.

"हंसाचें गति-चित्र दाविति किती नामी पदन्यास हे !
भाषेची सरणी रसज्ञ कविला साधे, न अन्यास हे;
ऐशीं रम्य विशेषणें विलसतां, स्नेहाळ सम्बोधनें
व्हाया सम्मुख चित्त चुम्बक मणी ते कासया शोधणें ?
सारी सुन्दर सौम्य गोड रचना देते प्रसादासवें
प्रेमानन्द मनीं भरोनि, नयनीं ही वाहवी आसवें
ओजानें करुण, प्रधान रसही जीवन्तसा दाखवी,
निर्माता जन जो हिचा निपुण तो आहे कवी हो कवी"

चन्द्रशेखरांनीं लेभ्यांच्या काव्यकृतीसम्बन्धानें काढलेले हे उद्गार त्यांच्याच काव्यकृतीस तन्तोतन्त लागूं पडतात. त्यांचें काम कसें नीटस, सप्रमाण, रेखीव, मनोहर, मूलतत्त्वानुकारी आहे. कवितांची नांवेंसुद्धां सार्थ व नादमधुर आहेत. 'कुटुनिया कटु कण्टक–कल्पना। प्रसवतुल्यहि सोसुनि वेदना। करुनि घाव रदावयवावरी। घडिति अक्षरबन्ध कसा तरी॥' असे कवी पुष्कळ; परन्तु यांच्या कवितेंत छन्दोभङ्ग, यतिभङ्ग वगैरे दोष दुर्मिळ. भाषा संस्कृतशब्द-प्रचुर परन्तु बोजड व दुर्बोध केव्हांही नसावयाची. साधी सुबोध परन्तु ग्राम्य नव्हे अशी भाषा 'काय हो चमत्कार!' या काव्यांत पहावी. भाषा कुठें कशी पाहिजे या सम्बन्धीं त्यांचा हातखण्डा आहे. भाषेचें औचित्य हा त्यांचा मोठा गुण आहे. भाषासौष्ठवाच्या परीक्षकांनीं कवितारतीचा पहिला श्लोक—

अये कवि–मनोभवे! सहजसम्भवे! स्वामिनी!
सुवर्णमयदेहिनी! नवरसात्मके भामिनी!
प्रसादमयजीविते! अनुविचारसञ्चारिणी!
चमत्कृतिविलासिनी! रसिकसन्मनोहारिणी!

केकावलीच्या पाण्डितासच कळेल अशा पाहिल्या श्लोकाशीं ताडून पहावा. चन्द्रशेखरांनीं अक्षरवृत्तावरील व प्राकृत मात्रावरील आपलें प्रभुत्व सिद्ध करून दाखविलें आहे. वृत्तयोजना करितांना औचित्याकडे व रसपरिपोषकतेकडे त्यांचें विशेष लक्ष असतें. रे. टिळक हे पण्डित असूनही "जननी प्रिय हिन्दभूमिमाजीं" ही मनोरञ्जनाच्या दर्बार अङ्कांत प्रसिद्ध झालेली कविता त्यांनीं अनुचित अशा माल्यभारावृत्तांत कशी लिहिली याबद्दल चन्द्रशेखर सखेद आश्चर्य प्रगट करीत. चन्द्रशेखरांच्या आर्या मोरोपन्ती आर्यांपेक्षां अधिक सुश्लिष्ट व मराठी आहेत. या बाबतींत त्यांच्या तोडीचे म्हणजे फक्त विनायक व मोगरे होत. स्वराज्यसङ्घातर्फें प्रसिद्ध झालेल्या स्वराज्यस्तोत्राच्या पोथींत विषय जरी काव्यहीन व शुष्क असला तरी त्याची माण्डणी ठाक-ठिकीची असून ओंव्या रसाळ व श्रुतिमनोहर आहेत. त्यांच्या कृतींत दामयमकें हीं मधून मधून चमकावयाचींच. कटु ग्राम्य शब्दांचा उपयोग ते बहुधा करीत नाहींत. क्वचित् प्रसङ्गीं शब्दावर मनोहर व सुबोध असा श्लेष ते करितात.

चन्द्रशेखरांची सर्व कविता सङ्कलित स्वरूपांत प्रसिद्ध करण्याचा बडोद्याचे वकील व्ही. व्ही. जोशी यांचा विचार आहे असें कळतें. तें काम लौकर होईल अशी आशा आहे. गुणाचें चीज झाल्यावांचून राहूं नये व राहणारही नाहीं. कारण चन्द्रशेखरांनीं म्हटल्याप्रमाणें:—

व्याधींच्या गुरुवेदना शमविते, आधीस नेते लया,
नानाँ चित्तकला प्रसन्न करुनी दे दिव्य दीप्ती तयां,
जें जें शुद्ध उदात्त उज्ज्वल असें हेलाविते तें मनीं
धन्या ती कविता भवार्तहि जनां जी वृत्ति दे उन्मनी!

त्यांची काव्यकृती धन्य आहे.

कवि यशवन्त : : ८

१९२१ मध्यें श्री. नरसोपन्त केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेलें महाराष्ट्र साहित्य सम्मेलन होतें तें. कवींना आपलें कर्तृत्व दाखवायला वाव असा प्रथम याच सम्मेलनांत देण्यांत आला होता. कोल्हापूरच्या सुमन्तांनीं आपल्या कांहीं कविता म्हटल्या. नागपूरच्या लोकांनींहि आपल्या तलवारीचे कांहीं हात करून दाखविले. ते कांहीं अयशस्वी झाले नाहींत. पण छाप पडली नवीनच दोन कवींची. वऱ्हाडांतील गुणवन्त हनुमन्त देशपांडे यांनीं 'कोणता मानूं चन्द्रमा' ही कविता म्हणून सभाजनांना सुखद सम्भ्रमांत तरङ्गत ठेविलें. नंतर चाफळ खोऱ्यांतील एक नव तरुण कवि पुढें आला. त्यानें 'देहाचा पूल' ही आपली कविता म्हटली. मराठ्यांच्याच एका राजघानींत ती कविता विलक्षण रङ्गली.

कां स्वराज्य तेव्हां झालें? कां स्वराज्य सांप्रत नुरलें? हे शेवटले दोन चरण सम्पतांच लोक थरारले. टाळ्यांचा एकच गजर झाला. कवि 'यशवन्त' झाले. वडिलांनीं मोठ्या आशेनें नांव ठेविलें तें चिरञ्जीवांनीं पञ्चविशीच्या आंतच सार्थ करून दाखविलें!

सुशिक्षित गोन्धळ्यांच्या कामगिरीचा काळ होता तो. मराठ्यांच्या पराक्रमाचे पोवाडे गाण्याचें वा लिहिण्याचें कार्य धडाक्यानें चालू होतें; पण नवीन धर्तीच्या प्रणयप्रसङ्गांच्या लावण्या रचण्याला नुक्ताच आरम्भ होत होता. वीरश्रीची निरनिराळ्या चालीची सुबोध गम्य गीतें खडया स्वरानें मोठमोठ्या समाजापुढें म्हणून दाखवून टेकाडे यांनीं लोकांना काव्यश्रवणाची चटक लावून ठेविली होती, आणि स्वतःहि मोठी प्रसिद्धि मिळविली होती. अशींच प्रेमश्रीची गीतें गाऊन लोकांना नवीन चटक लावा-

यची अमोल सन्धि आली होती. भक्तिप्रीतीचा समन्वय वा घोटाळा करूं इच्छिणाऱ्यांचें गूढगुंजन लोकांना कधींच चटकदार वाटलें नव्हतें. यशवन्त रविकिरणमण्डळांत आलेलेच होते. त्यांनीं ती सन्धि उचलली. देहाचा पूल ही कविता ज्या शाटांची आहे त्या थाटाचे वाटेला ते फारसे नन्तर गेले नाहींत. अभिमानी ठसठशीत तोण्डावळा, अंगकाठी सारखाच उंच मरदार खडा स्वर ही सामग्री त्यांच्याजवळ होतीच. नवनव्या प्रेरणा नि नवनव्या चाली हळुहळू भिळत गेल्या; आणि ते प्रेमाचे पाठक बनले. गोविंदाग्रजांच्या मागून यशवन्त यांनीं एक तपभर अनन्यसाधारण लोकप्रियता उपभोगली.

गोविंदाग्रजांच्या कवितेप्रमाणेंच यशवन्तांच्या काव्यांत प्रेमाचे नि निराशेचे हृदयद्रावक सूर आहेत, पण ते अस्पष्टपणाचे नाहींत. तोच वाक्प्रवाह आहे, तीच अलंकारप्रियता आहे; पण ती चमत्कृतिपरायणता नाहीं. यशवंतांच्या कविता तशा आटोपशीर आहेत. त्यामुळें श्रोता वा वाचक गुदमरून, कंटाळून जात नाहीं. यशवन्तांच्यामध्यें एक प्रकारचा व्यावहारिकपणा, पार्थिवता म्हणा हवें तर, ती आहे. त्यामुळें त्यांच्या कविता या पाकोळ्यांच्या अविश्रान्त भराऱ्यांप्रमाणें वायफळपणें मनोवेधक अशा वाटत नाहींत. त्यांचे बोल हे कल्पनेच्या पार्श्वभूमीवर उमटलेले अनुभवाचे पडसाद वाटतात. तितके ते वास्तव, बहुतेक लोकांच्या अनुभवांना पटणारे वाटतात, नि हृदयास अधिक जाऊन भिडतात. कवीनें केवळ एक सोङ्ग सजविलें आहे असें वाटत नाहीं आणि विरस होत नाहीं.

'आई' ही यशवन्तांची पहिली सुप्रसिद्ध नि उत्कृष्ट कविता. ही त्यांनीं बडोद्यास प्रसिद्धि मिळविल्यानन्तर म्हणजे १९२२ च्या जानेवारीच्या २२ तारखेस लिहिली. आईच्या चिरवियोगासारखें दुःख नाहीं. पण यशवन्त एकाएकीं "अन्तरले पाय तुझे हाय हाय माते!" म्हणून टाहो फोडून रडत नाहींत. प्रसंगानें ते आरम्भ करितात:—

'आई!' म्हणूनि कोणी आईस हाक मारी. आणि ही कोणीतरी कोणाला तरी मारलेली हांक कुऱ्हाडीसारखी त्यांच्या हृदयावर बसून त्यांना आपल्या पोरकेपणाची जाणीव करून देते— "आई कुणा म्हणूं मी?"

ते पाहतात कीं चिमणी पिलांना भरवितें, गाई वासरांना चाटतात आणि त्यांना मात्र आई नाहीं. त्यांना अपरिहार्यपणें मागील आठवणी होतात —

शाळेंतुनी घराला येतां धरील पोटीं,
काढून ठेवलेला घालील घांस ओठीं—

तुमच्यापैकीं प्रत्येकाला आठवेल कीं आई, आजी आपल्या वांट्याचें गोडधोड खाऊन टाकीत नाहींत. आपल्या मुलां–नातवंडांच्यासाठीं थोडें तरी–बहुशः सगळेंच राखून ठेवतात ! घरोघरचा अनुभव आहे हा. त्याचा उल्लेख केल्यानें एकंदरीनें कविता जिव्हाळ्याची, वास्तव नि हृदयङ्गम होते.

शाळेंतुनी घराला येतां धरील पोटीं,
काढून ठेवलेला घालील घांस ओठीं,
उष्ट्या तशा मुखाच्या धावेल चुम्बना ती
कोणी तुझ्याविना गे का ह्या करील गोष्टी ?
तूझ्याविना न कोणी लावील सांजवाती
साइंगेल ना कराया आम्हां ' शुभं करोति '

कवीला आईचें प्रेम आठवते म्हणून त्याची उणीव जाणवते. हें दुःख लहानग्या बहिणीला नाहीं, कारण मातृप्रेमाच्या सुखाची तिला जाणीवच नाहीं. भावाच्या डोळ्यांत तरारलेलें पाणी पाहून ती बावरते; पण ' आम्हांला आई नाहीं ' हें खेळायला आलेल्या मुलींना सांगतांना तिला कांहींच वाटत नाहीं. तिच्या तुलनेनें यशवन्तांचा शोक उठावून दिसतो. त्यांना आपल्या आईची असामान्य गुणसम्पदा आठवते. बडोद्याला झालेला आपला गौरव आठवतो आणि ते विव्हळून म्हणतात :—

गुम्फून पूर्वजांच्या मी गाईलें गुणांला,
साऱ्या सभाजनांनीं या वानिलें कृतीला,
आई, करावया तूं नाहींस कौतुकाला.

आणि त्यांना अधिकच एकटे वाटतें. ते आईची खंत घेऊन पूर्वीचा एखादा प्रसंग स्मरून म्हणतात :—

रुसणार मी न आतां जरि बोलशील रागें,
—ये रागवावयाही परि येइ येइ वेगें.

सुंदर रसाळ कविता, अशी कविता पुन्हां होणें नाहीं. केवळ सन्दिग्ध शब्दांचा उमाळा नुसत्या चमत्कृतीची चमक या कवितेंत कोठेंहि नाहीं.

यशवन्तांच्या प्रेमगीतांतहि सत्यसूचक खुणा विखुरलेल्या असतात. प्रेमाची महती ते पृथक्पणें गात नाहींत; ती ते त्या कथानकाच्या ओघांत गाऊन जातात. दुःशीलेचा चारित्र्यविशेष सांगण्याच्या भरांतच ते म्हणतातः—

प्रीती स्त्री हृदयास भूषण खरें, प्रीती जिवा जीवन,
प्रीती हेंच जगत् तथांत रमणें—ना ध्येय त्या वांचुन,
प्रीती दुःसह यातनास बसवी सौख्यासनासन्निध,
जिंकाया सुरभी, सुधा, सुरलता प्रीतीच पुष्पायुध !

त्यांच्या प्रेमाचा विषय कांहींतरी गूढ उदात्त सुंदर असा नाहीं, एखादी दुष्प्राप्य अपार्थिव तारका नाहीं, ती बोलती चालती, हाडामांसाची, तुमच्या माझ्यासारखी व्यक्ति असते; त्यामुळें तिच्याविषयीं अधिक आपुलकी वाटते. आणि यशवन्त नुसत्या सत्यसूचक खुणाच विखरीत नाहींत ते व्यक्तीचें तंतोतंत घवघवीत वर्णन करतात. हा गुण त्यांच्या कवितेंत १९२२ पासून दिसूं लागतो. या वर्षाच्या फेब्रुवारींत लिहिलेल्या पूर्तता या कवितेंतील चटकदार वर्णन पहा.

पूर्वेच्या क्षितिजावरी पसरली लाली उषेची नभीं,
शय्यामन्दिर सोडुनी प्रगटली द्वारीं कुमारी उभी;
होते कुन्तल मोकळे विखुरले स्कंधीं कपाळीं तसे,
ओचे खोंवुनि सांवरी पदर ती, गाली विराजे हसें.
निद्रेची नयनांत धुन्दि भरली, छाया तिची आननीं,
धुन्दी मुग्धपणांतली तनुवरी खेळे मनोल्हादिनी,
ती धुन्दी चरणीं, गती तिजमुळें मन्दावलेली दिसे
ऐशी मोहक धुन्दता बघुनिया लागे न कोणा पिसें ?

या वर्णनांत पहा एकही अलङ्कार नाहीं. एकही चमत्कृतिजनक वक्रोक्ति नाहीं. तथापि चित्र कसें डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभें राहातें आणि मनाला वेधून टाकतें. 'सुधेस' या कवितेंतहि पहा:—

बघ वाकवाकुनी अशीच दारांतून
हें अर्धें दर्शन टाकी मज मोहून
निज ओष्ठसम्पुटीं हळुच तर्जनी धरुन
ती तशीच तिरपी नजर लाव चोरून

मराठी कवितेचें पाऊल गोविंदाग्रजांच्या पुढें पडलें आहे याविषयीं शङ्का नाहीं. यशवन्तांच्या प्रेमगीतांतूनही निराशेचा सूर निघत असला तरी तो आतां एकपक्षी क्षुरणीचा नाहीं. प्रेम हें आतां प्रसङ्गसम्पन्न होत चाललें आहे. प्रेमिक आणि प्रेयसी, तो आणि ती यांची कोठें तरी गांठ-भेट होते. दोघांचीही थोडीफ़ार गोड़ देवघेव होते. आणि मग अपेक्षाभङ्ग होतो. 'ऐनवेळीं' या सुनीतांत पहा. तो तिच्या गायी वळतो, ती त्याला कांहीं तरी बक्षिसी देते; रानांत त्याला दुपारीं झोंप येते तर ती त्याचे डोकें माण्डीवर घेऊन कुरवाळते. तो तिला झाडावर चढवितो नि मागून स्वतः चढतो; आणि मग दोघें एका डाहळीवर झोंके घेतात—शेवटीं कांहींतरी बिनसतें नि तो 'ऐनवेळीं' नाहीं म्हणून चालता होतो.

अशा रीतीनें घडणारे प्रसङ्ग खरोखरीच घडले असावेत असा भास उत्पन्न करण्यापुरत्या सत्यसूचक खुणा यशवन्त पेरून ठेवतात. पहा:—

दृष्टिक्षेपच आजला स्मित उद्यां गालीं जरा चञ्चळ,
लागावा जवळून तूं निसटतां जातां तुझा अञ्चळ,
एखादा दुसराच शब्द अपुरा ओठावरी सेरवा,
लोकांच्या नजरा क्षणीं चुकवुनि द्यावीं फुलें केधवां
एकांतीं मज गाठतां मज तुझ्या गालीं दिसावी खळी,
कोठें चाहूल लागतां परतणें तों मागल्या पाउलीं—

ती त्याला फुलांचा गुच्छ देते, तो गुच्छ तो जपून ठेवितो. हें प्रेमाचें स्मारक गहाळ होण्याच्या कल्पनेनेंच त्याच्या जिवाची काल्हवाकाल्हव होते.

पुढें तिनें केलेल्या वञ्चनेमुळें नित्याचा हताश झालेला तो प्रेमिक पात्रिकांचें हवन करून टाकतो. याप्रमाणें मध्यम स्थितींतल्या तरुण जनांच्या आयुष्यांत घडूं शकणाऱ्या प्रसङ्गांचा यशवन्त उत्तम उपयोग करून घेतात. सत्याचा भास तितका प्रभावी होतो आणि कविता प्रत्यक्ष अनुभवाप्रमाणें हृदयाला जाऊन भिडते.

अशा सत्यसूचक खुणा पेरणें काव्यदृष्ट्या अत्यन्त इष्ट असलें तरी व्यवहारदृष्ट्या तितकेंच अनिष्ट असतें. कवितांत कवीचें चरित्र लोक घुण्डाळूं लागतात आणि त्यावर नाहीं नाहीं ते आरोप करायला प्रवर्ततात, प्रसङ्गविशेषीं त्याला समाजांतून उठवूनहि लावतात. म्हणून या सत्यसूचक खुणा काव्यांतून पेरायला एक प्रकारचें धैर्य लागतें. कवीची स्थिति इतर चारचौघांसारखीच असते. मनुष्याला हृद्गत कोणाला तरी सांगितल्यावांचून रहावतच नाहीं. तो तें आपल्या जिवलग विश्वासू मित्राला तेवढें सांगतो. आतां कवितेंत हृद्गत माण्डावयाचें म्हणजे चव्हाटयावर माण्डण्यासारखें आहे. तेव्हां कवि तें अशा रीतीनें सांगतो कीं त्याला स्वतःला तें सांगून हृदय हलकें केलें असें वाटावें; आणि इतरांना त्या गुपिताचा संशय यावा पण त्याचा पत्ता लागूं नये. कविता ही मयसभेसारखी आहे. दुरून पाहून आनन्द लुटायला कांहींच अडचण नाहीं. पण सत्याचा ठाव पहाल तर फसाल. जिथें पाणी आहे असें मानून घोतर उंच करून सावधपणें चालाल तेथें भुईच असेल; आणि जेथें भुई आहे अशा भावनेनें निःशंकपणें चालत जाल तेथें पाण्यांत पडून नाकातोण्डांत पाणी शिरेल ! काव्यापैकीं सत्य म्हणजे प्रत्यक्ष अनुभवाचा भाग कोणता आणि काल्पित म्हणजे अप्रत्यक्ष अनुभवाचा भाग कोणता हें कवीवांचून दुसऱ्यास कळण्याचा सम्भव नाहीं. आणि काव्यानन्द लुटायला या भानगडींत पडण्याचें कोणाला प्रयोजनहि नाहीं. पण या प्रकरणीं जी काळजी यशवन्तांनीं घ्यायला हवी होती ती त्यांनीं घेतलेली दिसत नाहीं. त्यांचा प्रेमिक हा कवि असतो. रस्त्यानें जातांना सुद्धां

मीहि घेतसे मम कवनांच्या सहज हळू ताना

अशी तो साक्ष देतो. रस्त्यांतल्या भेटीनंतर तो 'हमाल खात्यांत' म्हणजे कचेरींत जातो. इतरत्रहि

मी निज कवनांच्या घेतल्या प्रिय ज्या तुज ताना

असें म्हणतो. मनोमोहिनी या कवितेंत तर ती मनोमोहिनी कवीच्या काव्य-गायनाच्या वेळीं श्रोतृसमाजांत बसून कौतुक करीत आहे असें स्पष्ट वर्णन आहे. तेव्हां सगळाच दोष लोकांच्या मार्थी मारतां येत नाहीं.

यशवन्तांची अलंकारप्रियता, भावनेचा ओघ बहुशः अडवीत नाहीं; उलट ती मधून मधून चमक दाखवून कवितेची गति प्रगट करिते. पहाः—

अम्बाडा घनकृष्ण कीं उतरतां मानेवरी सैलसा
ताजा त्यावरती गुलाब खुलला सम्पूर्ण बालार्कसा
बालेच्या वदनाकृतीस सुचवी, तों कोसळे तेथुनी
तारा जेवि नभांतुनी, अहिमणी वा मस्तकापासुनी

शेवटली अहिमणीची उत्प्रेक्षा सोडली तर उरलेल्या तिन्ही घन, बालार्क, तारा या उत्प्रेक्षा एकाच प्रदेशांतील, एकावरून एक सहज सुचतील अशा आणि अर्थाला हृदयंगम करितील अशा आहेत. अहिमणीची उत्प्रेक्षा मात्र अपकर्ष करणारी आहे; आणि यशवन्त हे आपल्या कृतीकडे चिकित्सक रसिकाच्या दृष्टीनें पाहून दोष काढून टाकणारे नसल्यानें ती टिकून राहिली आहे. असो, आणखी अेक उदाहरण घेऊं.

आहे पङ्कज का म्हणून कमळा देती कुणी त्यागुनी ?
होतें काल गढूळ तें निवळलें पर्जन्य पाणी जर
कां शोधा मग कीं पयोद बनलें तापूनिया सागर ?
होतें लोह, परी सुवर्ण तुमच्या झालें करस्पर्शनें
शुद्धाला मलिनत्व कां डकवितां पूर्वाश्रमींच्या गुणें ?

यांत अभूतपूर्व आणि चमत्कृतिजनक असें कांहींहि नाहीं; पण हे अलंकार अर्थाच्या रमणीयतेंत भरच घालतात.

यशवन्त हे जात्याच भावगीतकार आहेत. ते अहम्भावी आहेत. स्वभावच ते विशेष रङ्गवितात. परजनांचे भाव रंगविण्याइतकी सहानुभूति ही उशिरां सम्भवते. त्यांच्या पारजनिक कवितांत कलंकिता, दुःशीला, मातृपदावीण, घात, न्हारीचा वकत या कविता सरस आहेत. पण सरस स्वभावगीतांची संख्या कितीतरी पटीनें अधिक आहे !

स्वभाव, स्वतःचा भाव मात्र यशवंत मोठ्या आवडीनें नि वारंवार रङ्गवितात. कौमारकालांत उत्कट चाञ्चल्याचें प्राबल्य असतें. क्षणांत मन निराश होतें. समाजाच्या परिस्थितीच्या साध्या आडकाठ्या विलक्षण जाचक वाटतात. पुन्हां उत्साहानें आशा जागृत होतात. पराक्रमाची केवळ घोषणा होते; अथवा मनाची समजूत करण्यांत येते. ती टिकत नाहीं. पुन्हां निराशा होते, असें हें रहाटगाडगें चालू राहतें. या लहरीचे बोल यशवन्तरावांच्या कवितेंत अखंड उमटलेले आहेत. हीं गीतें चटका लावतात. त्यांत वक्तृत्व आहे; अलंकार आहेत; भावनेचा प्रामाणिकपणाहि आहे. मग कौमारकालांत तीं परिणामकारक वाटतात तशीं पुढें कां वाटत नाहींत? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. या गीतांतील भाव साधार नाहींत; म्हणून ते चिरकालिक सहानुभूति उत्पन्न करीत नाहींत. स्वप्नांत मनुष्य भितो. त्याला त्या क्षणीं जी भीति वाटत असते ती त्याच्या पुरतीच खरी असते. बहुजनांना ती खरी वाटत नाहीं. त्यामुळें त्याला तेवढ्यापुरतें आश्वासन कुणी दाखविलें तरी खरोखर भयंकर प्रसंगांतून निभावून आलेल्या मनुष्याविषयीं जी सहानुभूति वाटेल ती त्या स्वप्नीताला मिळणार नाहीं. साप म्हणून भुई बडवणाऱ्याचा पराक्रम जितका प्रभावी तितकाच सराट्याला विंचुकाटा समजून ओरडणाऱ्याचा विलाप प्रभावी ठरणार. हीच स्थिति यशवंतांच्या कित्येक गीतांची आहे. मध्यम-वर्गाच्याही विविध दुःखांची रसाळ कहाणी त्यांनीं सांगितली आहे असें वाटत नाहीं. संसारांत सुख नाहीं हें खरें; पण सेवाधर्माच्या जाचावांचून दुसरा कोणताच जाच त्यांनीं उल्लेखिलेला नाहीं. राजसेवेच्या वा संस्थासेवेच्या वा व्यक्तिसेवेच्या जाचांत बहुतेक लोक आहेत; ते त्यांतल्या त्यांत कालक्रमणा करितांहेत. तेव्हां जाच होत आहे, असह्य कोण्डमारा होत आहे अशी नुसती हाकाटी केल्यानें ती हृदयाला जाऊन भिडत नाहीं. त्या जाचांत कांहीं विशेष पाहिजे, साधार पाहिजे, उदात्त पाहिजे. खपावें एकानें आणि त्या कष्टाचें फळ चाखावें दुसऱ्यानें हा अन्याय उद्वेगजनक आहे खरा. पण

"त्या बक्षिसाच्या पोतड्या हांसूनि मोतद्दार घे
माझ्या तनूच्या चिन्धड्या कोणीहि पाहीना परी."

या ओळींत म्हटल्याप्रमाणें ज्या प्रतीकाच्या द्वारा यशवंत तें मनावर बिम्बवूं पहातात तें प्रतीक संशयास्पद असल्यानें योग्य परिणाम घडून येत नाहीं,

घोड्याचा धनी घोडयाच्या अवस्थेकडे लक्ष देत नाहीं असें क्वचितच घडत असेल; असें जेथें घडत असेल तेथें भयंकर दारिद्र्यामुळें निरुपाय होऊन तें होत असेल. बहुशः प्राण्याची काळजी घेतलीच जाते. पुन्हा घोड्याला चंदी हवी; चांदीची नाणीं मोतद्दाराला मिळालीं तरी त्याचें वैषम्य घोड्याला वाटणें शक्य नाहीं. घोड्याला काय, रुपायांचा तोबरा नि राखेचा तोबरा दोन्ही सारखेच! श्रमाचें आर्थिक फल लुबाडण्यांत येतें त्याचें दुःख नाहीं असें नाहीं, पण फुकटचें जें श्रेय त्याचाहि अपहार होतो तेव्हां त्या दुःखांत कांहीं तरी असामान्य विशेष येतो.

'स्वतःचे सदा जाळुनी घर्मबिंदू, दुजाचा मळा मात्र मी शिंपिला.' असें कोणी सारखें रडगाणें गाऊं लागला तर कंटाळून रसिक उलट विचारील कीं मग वांया घाम कां गाळतोस बाबा! निराधार अतिशयोक्ति ही फोलच ठरते. कल्पनेनें आपलें दुःख वाढाविण्याची संवय लागली कीं वर्णनांतहि ती कसा गोंधळ उडविते तो पहा :—

मी टिकाव कुठवर धरूं? या कवितेंत नदीचे तट ढांसळून पाडणाऱ्या महापुरांत कवि सांपडतो तोंच तेथें संग्रामाचा चक्रव्यूह होतो. हा सौभद्र बाळ चक्रव्यूह भेदीत जातो तोंच चहुंकडून दावाग्नि भडकतो. या वणव्यांत कवि एकटा भुईकोट दुर्ग लढवितो तोंच तेथें समुद्राचें वादळ होतें; आणि आपली बुडती नौका परतीराला पोंचविण्यापूर्वीच कवीचे पाय भुईला लागून कवीवर उमळलेला वृक्ष सांवरून धरण्याची कामागिरी येऊन पडते. कांहीं आश्चर्य नाहीं कीं हतबल होऊन कवी म्हणतो

—ईशा, मी टिकाव कुठवर धरूं?

हीं रूपकें स्वाभाविकपणें एकावरून दुसरें याप्रमाणें सुचलेलीं वाटतात काय? रोगट भावनेच्या करुण कविता संसारांत खरोखरीच कष्ट करणाऱ्यांना चटका लावूं शकत नाहींत.

पहा, रसिकांना केलेल्या विनवणींतहि त्यांचा रोगट अहम्भाव दिसून येतो. पांखरानें पिकलेलें फळ खाऊन तृप्त व्हावें यांतच फळाचें जीवितसाफल्य असतें तर फळानें

पिकलें फळ हें तुझियासाठीं खुपस आपुली चोच

असें म्हणावें का ? ' लाव आपुली चोच ' असें म्हणणें अधिक सहृदयतेचें झालें असतें. कविता वाचणें म्हणजे का चोंच खुपसणें का कट्यार खुपसणें ? आहे तरी काय ? पुन्हां

मज संवेदन असे नसे की हवा तुला कां पोच ?

कवितेच्या रसग्रहणानेंच जर कवीचें मन दुखावत असेल तर रसिकानें काय करावें ? का नुसतें कौतुकच करीत रहावें ?

इतकी टीका करूनहि मी म्हणतों कीं यशवन्तांना मिळालेलें यशोधन अगदीं योग्य आहे. त्यांनीं प्रेमगीतें सुस्पष्ट लिहिलीं; देशभक्तिपर कवनें गाइलीं, जानपद गीतें रचिलीं. त्यांचा यशोगंध उत्तरोत्तर अधिकच दरवळावा. आतां एकच इच्छा—

" गा यशवन्ता आनन्दानें "
गाच गड्या रङ्गीत सुरेलें सुंदरसें कांहीं गाणें
गा यशवन्ता, आनन्दानें

या कवीचे वडील कोण्डोजी राणोजी घाटे हे मोठ्या घाडसानें शिक्षण सम्पादन करून १८७४-७५ च्या सुमारास अहमदनगरास मुख्त्यारी मिळवून लौकरच भरभराटीस चढले. ते उदारमतवादी प्रार्थनासमाजी असून सार्वजनिक चळवळींत कळवळीनें भाग घेत असत. अर्थात् त्यांच्या स्नेही मण्डळांत रे० स्मिथसारखे परदेशीय खिस्तीही असत. कोण्डोजीरावांची पत्नी म्हणजे एक भोळीभाबडी, परोपकारी, सुशील पण टेकीची अशी स्त्री होती. आपल्या फुर्सतीच्या वेळीं ती मधुर व प्रेमळ आवाजांत तुकारामादि सन्तांचे अभङ्ग व प्रार्थनासङ्गीतांतील सुन्दर भजनें म्हणत असे. अशा जोडप्याच्या पोटीं दत्तकवींचा जन्म झाला. जन्मस्थानींच मिशन शाळेंत तीन चार वर्षें अभ्यास करून दत्त १८९० सालीं विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षेंत उत्तीर्ण झाले. याच सुमारास त्यांचें घोसपुरी येथील राजमाने घराण्यांतील चन्द्राबाई नांवाच्या मुलीशीं लग्न झालें. १८९१-९४ या कालांत दत्त पुढील शिक्षणासाठीं मुम्बईस विल्सन महाविद्यालयांत होते. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें व इतरही कांहीं कारणांनीं त्यांचें अभ्यासाकडे दुर्लक्ष झालें; परन्तु आईची प्रेमळ गाणीं ऐकून व भेण्डयाच्या खेळांत यश मिळविण्यासाठीं नवनीतांतील आख्यानें ऐकून सुसंस्कृत झालेली त्यांची काव्यप्रतिभा मात्र या काळांत जागृत झाली. कांहीं इङ्ग्रजी कविताही रचण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. गायनवादनकलाही हस्तगत करून घेतली. १८९५-९६ या सालांत घरीं असतांना सार्वजनिक गणेशोत्सव व परदेशी कपड्यांची होळी यांत त्यांनीं भाग घेतला. याच सुमारास नारायण वामन टिळक या सुप्रसिद्ध खिस्ती कवींशीं दत्तांचा परिचय झाला. १८९६ च्या उन्हाळ्यानंतर दत्त

इन्दुरास मिशन महाविद्यालयांत गेले आणि १८९८ सालीं ते तेथूनच कलकत्ता विश्वविद्यालयाचे पदवीधर झाले. त्याच सालीं ते नोकरी मिळविण्यासाठीं बडोद्यास गेले. बडोद्यास तो काळ बौद्धिक जागृतीचा होता. तेथें शङ्कर मोरो रानडे, यन्दे वगैरे गृहस्थांशीं दत्तांचा परिचय होऊन ते 'सयाजी-विजय' या मराठी पत्रांत लेख लिहूं लागले. कवि चन्द्रशेखर यांच्याशीं त्यांचा अकृत्रिम व असामान्य असा स्नेह जडला तो याच वेळीं. अखेर लष्करी खात्यांत नोकरी मिळाल्याचा हुकूम आला पण तो उशीरां. तत्पूर्वीच दत्त प्लेगनें आजारी पडले होते. त्यांतून ते उठलेच नाहींत.

दत्त हे आपल्या ऐन उमेदींत येण्यापूर्वीच म्हणजे वयाला चोवीस वर्षेंही पुरीं न होतां वारले ही गोष्ट त्यांच्या काव्यकामागिरीचा आढावा घेतांना ध्यानांत ठेविली पाहिजे. बाकी, प्रतिभा ही मोठी आश्चर्यकारक शक्ति आहे. इङ्ग्रजी कवि शेली हा अकालींच वारला परन्तु त्याच्या काव्यसम्भाराच्या पासङ्गालाही अर्वाचीन मराठी कवीचा काव्यसम्भार पुरणार नाहीं. उलट टॉमस हार्डी याची खरी काव्यरचना उत्तर आयुष्यांत म्हणजे कादम्बरी लेखन थाम्बल्यावरच झाली. कवीची श्रेष्ठता ही मुख्यत्वेंकरून कशी कविता लिहिली यावरून, का किती कविता लिहिली यावरून ठरवायची, हाही प्रश्न आहेच. दत्तांनीं कवितालेखन ८ वर्षें केलें. त्यांपैकीं शेवटल्या ४॥ वर्षांत लिहिलेल्या त्यांच्या कविता 'दत्तांची कविता' या त्यांचेच चिरञ्जीव रा. विठ्ठलराव घाटे यांनीं सम्पादिलेल्या पुस्तकांत दिलेल्या आहेत; आणि या ४८ कवितांवरूनच दत्तांच्या कामागिरीचा आढावा घ्यायचा आहे.

दत्त केशवसुती सम्प्रदायांतील होते हें निर्विवाद आहे, परन्तु याचा अर्थ ते केशवसुतांचे चेले होते असा मुळींच होत नाहीं. गोविन्दाग्रजांनीं स्वतःस केशवसुतांचा 'सच्चा चेला' म्हटलें आहे. तरीहि गोविन्दाग्रजांच्या उघड उघड अनुकरणात्मक अशा 'दसरा' या सारख्या दोन तीन कविता सोडल्या तर गुरुशिष्यांच्या कवितेंत फारसें साम्य नाहीं हेंच आढळून येईल. परन्तु केशवसुत हे गोविन्दाग्रजांचे स्फूर्तिदाते तरी होते; परन्तु केशवसुतांची कविता दत्तांना स्फूर्तिदायी झाली असें मानायला पुरावा नाहीं. १९ व्या शतकाच्या चौथ्या पञ्चविशींत इङ्ग्रजींत कवितांच्या आणि विशेषतः पाल्ग्रेव्हसम्पादित हैमकोशांतील इङ्ग्रजी भावगीतांच्या वाचनानें स्फूर्ति

पावून ज्यांनीं पाश्चात्य धर्तीची कविता रचायला सुरुवात केली त्या कवि-मण्डळांतच दत्त समाविष्ट होतात. या कविवर्गांत काळदृष्ट्या व गुणदृष्ट्या केशवसुत अग्रेसर होते म्हणूनच या साम्प्रदायास केशवसुती साम्प्रदाय म्हणतात. दत्तांच्या कवितेंत अखेर अखेरपर्यंत संस्कृतांतील रूढ सङ्केताबरोबरच इङ्ग्रजी कवितांतील केवळ प्रतिध्वनि नव्हे तर पङ्तीचा अनुवाद आढळतो. सृष्टिप्रेम, देशभक्ति, प्रेममाहात्म्य वैगेरे विषय इङ्ग्रजी कवितांच्या वाचनामुळेंच मराठी काव्यप्रान्तांत शिरले व आतां कायमचे रहिवासी बनून राहिले आहेत. नव काव्याविषयीं कौतुक वाटल्यास भाषान्तरित कविता होते; त्याच्याविषयीं प्रीति वाटल्यास अनुकृत कविता होऊन तींत मूळचे प्रतिध्वनि उमटतात. परन्तु कवीच्या वृत्तीशीं नवकाव्य समरसून गेलें म्हणजे जी सहजस्फूर्त कविता होते ती दिसायला थोडी परकी दिसली तरी स्वतन्त्र, पृथगात्म व चैतन्यानें मुसमुसलेली अशी होते. केशवसुतांची कविता या तिसऱ्या उच्च कोटींतील आहे. दत्तांना आपलें वैशिष्ट्य जाणवून त्यांनीं स्व-भावगीतरचनेला आरम्भ केला न केला तोंच काळानें त्यांच्यावर झडप घातली.

दत्तांची बहुतेक कविता सुबोध व करुण असली तरी तिचें वैशिष्ट्य जेवढें त्यांनीं लिहिलें आहे तेवढ्याचाच विचार करितां, शिशुगीतांतच आहे. आणि मराठी काव्य प्रान्तांत नवीन जीवन्त झरा जर त्यांनीं दाखवून दिला असेल तर तो वत्सल रसाचाच होय. त्यांच्या इतर कविता वाचनीय नाहींत असें नाहीं. तरी त्यांतील अपवादात्मक दोन तीन वगळल्या तर उरलेल्यांत जीवन्त भावनेचा विलास प्रतीत होत नाहीं. काव्यांत जें हृज तेंच हृद्य व हृदयङ्गम ठरतें. भावना आणि भावनाभास यांतील फरक ओळखला पाहिजे. यौवनाच्या पूर्व कालांत जें इष्ट वाटतें तें विद्यमान आहेच अशी भावना होते. या काळांत मनुष्य प्रेम करीत नाहीं तर प्रेमाच्या कल्पनेवर भाळून जातो. या काळांतील विषादसुद्धां अनेकदां तीव्र असला तरी सम्भ्रमज व बालरुदना-प्रमाणें चञ्चल असतो. आतां या भावनाभासाच्याच लहरींत झालल्या लेखनांत केव्हां केव्हां पुढें खऱ्या भावनेचा कल्लोळ प्रतीत होऊन चमत्कार वाटतो परन्तु असे प्रसङ्ग विरळा. दत्त एके ठिकाणीं (पृ. ३६) म्हणतात :—

जो त्यागितो निरस मानुनि रम्य सृष्टी
ठेवोनि कल्पित कृतीवर नित्य दृष्टी
तो टाकुनी उदकपूर्ण घटा घरांत
प्याया सदा मृगजळा फिरतो वनांत.

अशी स्थिति त्यांची स्वतःचीच विशेषतः सृष्टिविषयक कवितांत झालेली आहे. त्यांची प्रतिभा १८९७ सालीं खरी जागृत झाली. परन्तु त्याच सालीं लिहिलेल्या ' सख्या वसन्तवाता ' ' बाई लतिके ' ' मुग्धकलिका ' इत्यादि कवितांत सुललित शब्दांच्या गर्द मण्डपांत काल्पितकारण परम्परा वा रञ्जक आरोपावलि करणाऱ्या बुद्धीचा कुतूहलजनक विलास मात्र आढळतो; पण हृदयास हलवून सोडील असें कांहीं आढळत नाहीं. 'कोकिलकूजित' (पृ.३०) व 'प्रभात' (पृ. ५७) या कवितांत तर भिन्न भिन्न काळीं गोचर होणाऱ्या देखाव्यांचा सङ्कर म्हणजे सृष्टीचा विपर्यासच केलेला आहे. नगरास नसेल पण महाराष्ट्रांत कुठेंही वसन्तागमीं ' बालतृणाचे रम्य गालिचे वनांत पसरलेले ' आढळतात काय ? वसन्तागमीं 'दिगङ्गना' दहिवर सिञ्चितात काय ? वायूवर बसून उन्च अम्बरीं तल्लीन होऊन प्रभुगुण गाणारे गगनविहारी खगवैतालिक किती व कोणते आहेत ! ' विश्वामित्रीच्या काठीं ' (पृ. ४९) या कवितेंत मात्र उत्प्रेक्षामाला प्रसविणाऱ्या कल्पनेचा विलास व एका तऱ्हेची गूढ प्रसन्न शान्ति अशी ' द्विगुणित शोभा ' व ' द्विगुणित आनन्दाची भरती ' आहे. परन्तु या रम्य कवितेलाही दोषाचीं गालबोटें आहेतच. ताराङ्गण खालीं पाण्यांत स्पष्ट बिम्बलेलें आहे, त्या अर्थी वातावरण पारदर्शक व आकाश निरभ्र असलें पाहिजे. परन्तु पौर्णिमेची चान्दणी रात्र असल्यामुळें ताराङ्गण फिकट दिसलें पाहिजे व अस्पष्टपणेंच प्रतिबिम्बित व्हायला पाहिजे. वातावरण पारदर्शक असल्यास चान्द्ण्याला बर्फाचा पाऊस म्हणतां येणार नाहीं; कारण तो पिठासारखा पडतो व त्यामुळें हवेंत धुक्यासारखी अपारदर्शकता येते. आकाश निरभ्र असल्यास चन्द्र स्थिर दिसतो, त्याची गति दिसत नाहीं. उन्हाळ्यांत कापशी ढगांच्या गतीमुळेंच चन्द्र गतिमान् दिसतो. अर्थात् चन्द्र जर पौर्णिमेच्या निरभ्र आकाशांत स्थिर आहे तर जो " कलहंसापरि पोहुं लागला " कसा ? तो तडागांतील कमलाप्रमाणें स्थिर दिसेल, पोहूं लागणार

नाहीं. शिवाय, ' वरती खालीं दिसतें गगन, मध्यें लाम्बित अपुलें भवन ' अशा भवनास ' गोजिरवाणी फेकिला चेण्डु हा कोणी ? ' असें म्हणणें समुचित वाटत नाहीं. ही उपमा कुणास क्षुद्र वाटेल, कुणास फाजील मोठी वाटेल. उन्च भूमिकेवरून पाहतां पृथ्वी रजःकणाप्रमाणें सूक्ष्म वाटावयास हवी. वस्तुतः पाण्यांत पाताळाचें प्रतिबिम्ब पहात असतां मध्यें पृथ्वी रहातच नाहीं. या कवितेच्या अन्तीं ' स्मरण शक्तिके जागृत होई ' वगैरे उद्गार म्हणजे याचाच प्रतिध्वनि होय.

शृङ्गारातीत प्रेमाकडे दत्त वळलेले दिसत नाहींत. " दत्तांचा कालिदासी शृङ्गार आधुनिक काव्यांत अपूर्व आहे. तो उत्तम, अदम्य व खुल्या दिलाचा आहे " अशी ग्वाही त्यांचेच पुत्र रा. विठ्ठलराव घाटे हे ' सहज चालतां मार्गी तुजला ' या लावणीवरील टीपेंत देतात. दत्तांवर संस्कृत सारस्वताचे संस्कार चाङ्गलेच झाले होते. जुन्याच कविकल्पना पण दत्तांच्या कवितेंत अशा रीतीनें आलेल्या आहेत कीं त्या त्यांना तरी शिळ्या व नीरस वाटत नसाव्यात. ' सखे सुमनमाले ' (पृ. ७) आणि ' स्वप्न-भेट ' (पृ. ८३) याही कविता या दृष्टीनें वाचनीय आहेत. इङ्ग्रजी कवितांतूनही रुचतील त्या कविकल्पना त्यांनीं घेतल्या, पण इङ्गजी कवितांतील शृङ्गारातीत प्रेमाशीं ते समरसले नाहींत. याच अर्थानें " दत्तांचें काव्य म्हणजे संस्कृत व इङ्ग्रजी काव्याचें एकीकरण आहे " हें रा. विठ्ठलराव घाटे यांचें विधान समजलें पाहिजे. ' बघसी अन्त किती राजसे ' (पृ. ४३) या कवितेंत कविसङ्केत नाहीं असें रा. घाटे (पृ. ५५ प्रस्तावना) ठासून साङ्गतात; परंतु हें विधान पटत नाहीं. कवितेस प्रणयिनी कल्पून तिची आळवणी करण्याची टूम इङ्ग्रजी वाङ्मयांतून मराठींत आली आणि आत्मवेडप्रदर्शनाच्या टुमीप्रमाणें ही टूम कांहीं काळपर्यंत चालू राहिली. शिवाय चालत्या बोलत्या मोहक युवतीवर कवितासुन्दरीचा आरोप करून शिष्टपणानें प्रणयालाप काढण्याची या अभियुक्त टुमींत सोय होती. हा खरोखरीच एक मजेचा कविसङ्केत होता. कविता ही अनन्य प्रिया होणें अस्वाभाविक व अशक्य आहे. कविता ही ज्या जीवनाची छबी तें जीवन केव्हांही अधिक महत्त्वाचें व अधिक प्रेय असणार. कविता हें उघाणलेल्या भावनेला पाट काढून देण्याचें साधन आहे. कविता रचणें हें ध्येय होऊं शकत नाहीं. कवितेंतून

अमूक अमूक विचारविकारांची अभिव्यक्ति करणें हा प्रेमानें पत्करलेला धन्दा होतो; पण ते विचारविकारच प्रेम व महनीय न वाटले तर पद्यरचनेचा कोरडा हव्यास कोण करील ? सङ्केत म्हणण्यांत कमीपणा वाटण्याचें कारण नाहीं. एका काळीं जिव्हाळ्याची व स्वारस्यपूर्ण वाटणारी शब्दरचना अनुकरणपर कवींनीं स्वारस्य न समजून वापरून वापरून शिळी शून्यसूचक केली कीं तिला साङ्केताचें रूप येतें. डोळस रसिक जर भोंवतील सृष्टीचें सूक्ष्म निरीक्षण करून कांहीं संस्कृत उपमांची यथार्थता अजमावून पाहण्याचा प्रयत्न करितील तर त्यांना जुन्यांतच नवीन स्वारस्य दिसून अभूतपूर्व आनन्द होईल; आणि त्याबरोबरच वाटेल त्याला वाटेल त्याची उपमा देऊन साङ्केतिक अतिशयोक्तीच्या व शब्दावडम्बराच्या जोरावर रसिकांस झुलवूं पाहणाऱ्या कविब्रुवांची फार कींवही येईल; असो.

" जा दृष्टिबाहेर " (पृ. ३४) ' लाडके ' (पृ. ३९) ' विनवणी ' (पृ. ५५) ' असन्तुष्ट पति ' (पृ. ६३) या चार कवितांत जी लागणी प्रतीत होते ती ' बघसी अन्त किती राजसे ' या कवितेंत होत नाहीं. ' लाडके ' ही कविता जगन्नाथरायाच्या थाटाची आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं भाषान्तरिलेल्या विरहिविलापाशीं हिचें अन्तःसाम्य आहे. परंतु अन्त्य श्लोकांत मात्र कल्पनेचा विलास नाहीं, तर शोकाचा हृदयस्पर्शी आवेग आहे. ' असन्तुष्ट पति ' या कवितेंतही असन्तोषाची तीव्रता प्रतीत होते. कल्पनेचा नखरा कशाला ? भावनेचा जिव्हाळा असल्यावर भावगीताला इतर कशाची जरूरी नाहीं हें पटायला ' जा दृष्टिबाहेर ' ही एक कविता पुरी आहे. जीवाला वारंवार चाळविणाऱ्या चञ्चल प्रियेविषयीं वाटेणारा सन्ताप (तोही दुर्दैवानें क्षणिकच असतो !) या कवितेंत उत्कृष्ट रीतीनें प्रतिबिम्बित झालेला आहे.

" तें हास्य, ते प्रणयसूचक हावभाव
ती लोल दृष्टि, करि जी हृदयास घाव
तें गोड गोड तव भाषण–सर्व कींहीं
आटोप, नीघ, नलगे तव नांव तेंहि ! "

दत्तांनीं देशभक्तिपर कविता ५।६ लिहिल्या; परंतु त्यांत भावनेचा उद्रेक नाहीं. देशभक्ति ही एक इष्ट भावना आहे असें वाटणाऱ्या कोमल हृदयावरील त्या कविता म्हणजे कुतूहलजनक लहरी वाटतात. त्यांच्या इतर कवितांपैकीं ' फुलें विकणारी पोर ' (पृ. ७४) व ' एका आसन्नमरण दुष्काळपीडितास ' (पृ. ५३) या कविता हृदयद्रावक आहेत. पहिलीस ' लास्ट डेज् ऑफ पॉम्पी ' या कादम्बरींतील आन्धळ्या मुलीच्या गाण्याचा आधार आहे तर दुसरी शेक्सपिअरकृत 'सिम्बेलाइन' मधील चौथ्या अङ्काच्या २ ऱ्या प्रवेशांतील गीतावरून सुचली असावी.

Fear no more the heat o' the Sun
Nor the furious winter's rages;
Thou, thy worldly task hast done,
Home art gone and ta'en thy wages;

तुलना करून पहा—" तुज तीव्र रवीचा ताप
मावळला आपोआप; या पुढें
तुज अदय हिवाचें वारें
झोम्बेल कधींहि न बा रे; या पुढें
सम्पला येथला वास
सरला तव आयुप्रवास शेवटीं " (पृ. ५३)

'नीज नीज माझ्या बाळा' हें करुण निद्रागीत मात्र उत्कृष्ट आहे. याच्या तोडीचें करुणगीत महाराष्ट्र काव्यप्रान्तांत दुसरें नाहींच. पूर्वी चाङ्गले दिवस पाहिलेल्या व नन्तर अन्नान्नगत झालेल्या सुसंस्कृत, स्वाभिमानी, प्रभुश्रद्धघान हिन्दु विधवेचें वात्सल्य या करुणगीतांत ससंय्यम वहात आहे. मूर्तीला अमूर्तीची उपमा देण्याची कल्पना शैलीवरून सुचली असली तरी प्रस्तुत कवितेंत विधवेनें रात्रीची तुलना अपुल्या निराशाजनक स्थितीशीं करून त्यावरून तिला उपमा सुचाव्यात हें अत्यन्त साहजिक आहे. राजहंसांतील हृदयंगम पण परिस्थितीशीं विसदृश अशा (उ. ' मोत्याचा चारा ' व 'कौस्तुभ माळे-मघला ') कल्पना प्रस्तुत नाहींत. यांत संय्यम आहे. म्हणूनच कवितेचे हृदयस्पर्शित्व विशेष आहे. "जोंवरती या कुडींत राहिल प्राण। तोंवरी तुज

संगोपीन" असें आश्वासन देणाऱ्या "तुज जन्म दिला सार्थक नाहीं केलें। तुज कांहीं न मी ठेवीलें" म्हणून हळहळणाऱ्या मातेची 'तदनन्तरची करूं नको तूं चिन्ता। नारायण तुजला त्राता' असें म्हणणारी भाबडी श्रद्धा आणि 'भिक्षेविण धन्दा नाहीं। तरी सोडुं नको सत्याला। धन अक्षय तेंच जिवाला' असा उपदेश करणारी बाणेदार नेकी पाहिली कीं डोळ्याला पाणी आल्यावांचून रहातच नाहीं. या हिन्दु विधवेंत फोल तुफानी आक्रोश नाहीं, 'अनन्त गूढें मनीं वाहण्याला अनन्त दुक्खें हृदयीं धरण्याला' लागणारें असें मूक शौर्य आहे कीं जें पाहून संसारग्रस्तांना दिलासा वाटावा, अंगीं नवीन बळ यावें.

दत्तांनीं 'सायङ्काल' (पृ. २४) 'बोलत कां नाहीं' (पृ. ५६) 'आन्दोलन' (पृ. ६२) 'शहाणी बाहुली' (पृ. ६५) 'अ आ ई' (पृ. ६७) अशा पांचच कविता लिहिल्या. या सर्व एकाच वर्षांतील म्हणजे १८९७ या सालांतील आहेत हें आश्चर्यजनक आहे. पहिली व दुसरी कविता यांच्या रचनाकालांत ७ महिन्यांचें अन्तर आहे. पण या सातच महिन्यांत दत्तांची प्रतिभा परिणत झाली. 'सायङ्काल' या कवितेंत भाषा बालागम्य आहे तर 'बोलत कां नाहीं' यांतील भाषा कोणत्याहि मुलीस समजून तीस आनन्दित करील. 'शेजारिण वेणुचा बाहुला' वगैरे ओळी म्हणतांना लुटूपुटीच्या संसारांत रङ्गून जाणारी मुलीची वृत्ति नेत्रापुढें उभी राहून डोळ्यांत पाणी येऊन सद्गदित झालेले चन्द्रशेखर ज्यांनीं पाहिलेले आहेत त्यांना ही कविता प्रौढांनासुद्धां कशी झुलविते हें सांगायला नको. आन्दोलनांतील बोधक प्रवृत्ति दाखविणारें परन्तु काव्यदृष्ट्या आवश्यक असें शेवटलें कडवें पाहिलें कीं दत्त कांहीं बाबतींत कसे जुने होते हें कळतें. शहाणी बाहुली हें शिशुगीत अप्रतिमच आहे.

एकन्दर आढावा घेतां असें दिसून येतें कीं दत्तांजवळ नादमाधुर्य होतें, शब्दसौष्ठव होतें; पण त्यांना परिष्करणाची जरूरी भासली नाहीं. त्यांच्या कित्येक कविता त्यांनीं जरा आंखूड केल्या असत्या तर त्या अधिक परिणामकारक झाल्या असत्या. संयुक्त व्यञ्जनांतील आद्य व्यञ्जन छन्दोभङ्ग होऊं नये म्हणून कितीदां तरी निसरडें अस्पष्ट उच्चारावें लागतें. परन्तु स्वतःच्या कवितेचे स्वतःच टीकाकार होऊन स्वतःच परिष्करण करायला ते जगलेच फार थोडे.

शिवाय कित्येकांची मनःप्रवृत्ति अशी असते कीं कविता लिहून झाली कीं तिच्याशीं त्यांचा मनःसम्बन्ध तुटतो, ज्या मनःस्थितींत ती कविता लिहिली गेली त्या मनःस्थितींत त्यांना पुन्हां जातांच येत नाहीं; व त्यामुळें पारिष्करणांत त्यांस स्वारस्यच वाटत नाहीं. आणि कविता उपजतांच प्रमाणसुंदर व शुद्ध उपजावयास कवीची पूर्वतपस्या मोठी असायला पाहिजे. दत्त अधिक जगते तर त्यांनीं मराठी कवितेंत कशाची भर टाकली असती हें निश्चयानें सांगतां येणें अशक्य आहे. तरी येवढें मात्र खरें कीं दत्तांच्या मृत्यूमुळें मराठी भाषा केशवसुती जिव्हाळ्याच्या शृङ्गाराच्या – कान्तकान्तोप्रेमाच्या कवितांना आणि अजूनहि कोणास साधलीं नाहींत अशा कांहीं शिशुगीतांना मुकली.

उमर खय्याम हें कांय आहे ? उमर खय्याम हें एक बण्ड आहे, स्तोम आहे आणि गूढाहि आहे. इतिहास त्याच्याविषयीं फारच थोडी माहिती देतो. तो इमाम मुकफ्फकचा शिष्य होता. सुल्तान, मलिक शाहाच्या आश्रयानें त्यानें पंचांग सुधारणेंत कांहीं कामगिरी केली; भूमिति बीज-गणितादि शास्त्रीय विषयांवर कांहीं पुस्तकें लिहिलीं; क्वचित् ज्योतिषी भविष्यें वर्तविलीं आणि प्रसिद्धिप्रकाशांत धामधूम न करतां बरींच वर्षें जगून खिस्ताब्द ११२३ सालीं दुनियेच्या पडद्या सराईंचा निरोप घेतला. यापलीकडे ऐतिहासिक दृष्टीला अंधारच दिसतो. फुरसतीच्या वेळीं त्यानें कांहीं सुभाषितवजा रुबाया लिहिल्या. कवि आपल्या कवितांतून अन्तःस्थ जीवनाचें आविष्करण करतो असें म्हणतात; पण तो असेंहि पांघरूण पांघरतो कीं वाचकांस जें रहस्य कळलें म्हणून वाटतें तें अप्रस्तुत कांहींतरीही असूं शकतें. शिवाय खास उमर खय्यामच्या रुबाया किती व कोणत्या यासम्बंधीं सुद्धां शङ्काच आहे.

एक गोष्ट मात्र निश्चित आहे कीं ही व्यक्ति क्षुल्लक व उपेक्षणीय खास नव्हती. खय्यामच्या मृत्यूनंतर कांहीं वर्षांनीं त्याचें नांव प्रख्यात प्रधान निझामुल्मुल्क व इस्माईली, पाखंडी पंथाचा मुख्य 'पहाडी म्हातारा' हसन-इब्न् सब्बाह यांच्या नांवाशीं निगडित करणारी दंतकथा उद्भवली व फैलावली. असें सांगतात कीं, तिघेही वर्गबंधु होते; जर एखाद्याचा भाग्योदय झाला तर त्यानें इतर दोघांना प्राप्तीचे समान वांटेकरी होऊं द्यावें असा त्यांचा विद्यार्थीदशेंतच करारमदार ठरला; त्याप्रमाणें निझामुल्मुल्कनें

प्रधान झाल्यावर इब्न् सब्बाह यास मानाची सरकारी नोकरी व उमर खय्याम यास नेमस्त स्वास्थ्यवेतन देवाविलें; महत्त्वाकांक्षी इब्न् सब्बाहनें आपल्या उपकारकर्त्यासच टांग मारण्याचा अयशस्वी प्रयत्न केला व त्यास जीव घेऊन परागंदा व्हावें लागलें; पुढें त्याच्या व्यक्तिशः खून करण्याच्या घोरणामुळें तो मुस्लिम व खिस्ती लोकांचा काळ झाला आणि त्याच घोरणाला त्याचा पूर्वीचा मित्र निजामुल्मुल्क हा बळी पडला ! उमर खय्यामच्या नांवावर धकणारी एक रुबाई अशाच प्रसंगास उद्देशून असावी.

" बुद्धिनेत्र तूं उघड ! सर्वथा भिस्त
तुझी जयावर तो तर शत्रु विशिष्ट !
व्यवहारींची सङ्गत दुरूनच बरवी,
क्वचित् करावा मित्र हें अतां इष्ट.

माझें थडगें अशा ठिकाणीं होईल कीं वर्षांतून दोनदां त्यांवर फुलांचा वर्षाव होत राहील असें भविष्य उमरनें केल्याची व तें खरें ठरलेलें पाहि-ल्याची ग्वाही निझामी अरूझी देतो. वस्तुतः उमरचें म्हणून समजलें जाणारें थडगें आज अगदीं एका बाजूला असून त्याच्यावर खालीं कुणाच्या अस्थि आहेत याचासुद्धां उल्लेख नाहीं. परंतु उमरचें भाकित निराळ्या अर्थानें मात्र खरें ठरलें आहे. आपल्या हयातींत त्यानें १५० हून अधिक रुबाया लिहिल्या नसाव्यात; परंतु त्याच्या स्मृतिसमाधीवर एकंदर प्रक्षिप्ताप्रक्षिप्त मिळून १२१३ रुबायांचीं पुष्पें पडलेलीं आहेत ! इतरांनीं रुबाया लिहून त्याच्या नांवावर दडपल्या इतकेंच नव्हे तर स्पष्टीकरणार्थ कथाहि निर्माण केल्या ! परमेश्वर जर कृपास्वरूप आहे तर पापांची भीति कशाला आणि कृपा कर अशी प्रार्थना किमर्थ असे सवाल उमरनें केले आहेत. हें पाहून एकानें पुढील रुबाई रचिली:

" ज्वलनयोग्य जो त्यास्तव जळशी आई,
तपनाहि तूझ्या मुळेंच भडकुन जाई;
' कृपा करी उमरावर ' कुठवर म्हणशी ?
कृपा शिकविशी प्रभूस ? काय धिटाई ! " (५२२)

आणि स्पष्टीकरणार्थ गोष्ट निर्मिली कीं उमर आपल्या भावितव्याबद्दल चिन्तातप्त झालेल्या आईच्या स्वप्नांत आला व त्यानें ईश्वराशीं फाजील घिटाईनें वागणाऱ्या आपल्या आईची वरीलप्रमाणें कानउघाडणी केली !

उमरला ढोंगी मुल्लांबद्दल मुळींच आदर नसे व पुनर्जन्माची कल्पना त्यास या बाह्यतः अन्यायानें भरलेल्या जगांत समाधानकारक वाटत असेल हें पाहून एकानें पुढील रुबाई रचिली:—

" जाउन अवनत होउन येशी परत,
नांव नसे तव अतां जनांना स्मरत;
नखें येउनी जमुनी होती खूर,
दाढी ये कटिपश्चाद्भागीं त्वरित." (५२४)

आणि गोष्ट पसरविली कीं एका ठिकाणीं इमारतीचें काम चाललें असतां एक गाढव अडलें. पूर्वजन्मीचा हा अमुक अमुक मुल्ला आहे हें उमरनें ओळखून वरील रुबाई रचिली आणि गाढवास अंतरींची खूण पटाविल्याबरोबर तें चालू झालें.

उमर खय्यामच्या खासगी आयुष्यासंबंधानें आपल्याला इतकेंच म्हणतां येईल कीं त्यांत विशेष कांहींच घडलें नसावें. वास्तवज्ञान त्यास अशक्य वाटे पण त्याची जिज्ञासा सदैव प्रबल असे. 'न पुरा काफिर, नच मुस्लिमही ठाम' ही त्याची धार्मिक भूमिका होती. पण तो भला माणूस असला पाहिजे. नालस्ती करणें हें त्यास कधीं रुचलें नसावें. जें सिद्ध करून दाखवितां येत नाहीं त्याविषयीं त्याचें मन दोलायमान असे. तो कधीं विश्वास ठेवी तर कधीं संशय व्यक्त करी. ढोंगाचा मात्र तो पुरता तिटकारा करी:—

" प्रगट करूं मी कुठवर मम अज्ञान,
सम्मोहानें होय हृदय हैराण;
कटीस आतां वेढिन मग–कुस्ती कीं
मुसल्मानपण मज लज्जास्पद जाण ! " (४१९)

शास्त्राभ्यासानें तो थोडा रूक्ष झाला असला, परलोकाविषयीं तो साशङ्क असला तरी त्याची मैत्रीची भूक मेली नव्हती आणि सृष्टिसौंदर्याविषयींही तो उदासीन झाला नव्हता. तो म्हणतो,

" सृष्ट होय ज्या हृदयीं मैत्री, प्रीत—
बसो मंदिरीं तें अथवा मशिदींत !
प्रेमपदावर नांवनोंद हो ज्याची
मुक्तच तो नर नरकस्वर्गातीत ! " (२२१)

" माणिक मधुचा बुधला, गज्रल–बाड,
पोटापुरती अर्धी भाकर जाड,
फक्त तूं नि मी स्थानीं शांत उजाड—
साम्राज्याहुन यांत मला सुख वाढ ! " (३५६)

" ये वासंतिक पुष्पमुखप्रिय वात,
हृज्ज्योतिर्मुखदर्शन इष्ट वनांत;
मधु न कथा गत शिंशिराच्या; कर चैन,
आज सुदिन मधु ! नको कालची बात ! " (२४५)

ज्या अर्थी खय्याम बरींच वर्षें जगला त्या अर्थी त्याची रहाणी नेमस्त असलीच पाहिजे. निरनिराळ्या व्यसनांत आयुष्याची उधळपट्टी करायला तो मूर्ख नव्हता; आणि जीवितांतील चञ्चल सुखांचा त्याग करायला तो यति वा जड पाषाणही नव्हता. आपल्या शास्त्रीय ज्ञानाला योग्य मान्यता मिळावी अशी त्याला स्वाभाविक इच्छा होती आणि ती त्याच्या देशांत तृप्तही झाली. तो 'हकीम्' उमर खय्याम झाला ! आपल्या कवितेला तो फारसें महत्त्व देत नसावा आणि एकंदरीनें पाहतां त्याच्या राष्ट्रानेंही तिला फारसें महत्त्व दिलें नाहीं. त्याच्या समकालीन सूफी लोकांनीं त्याचा निषेध केला; परंतु अर्था-विष्करणाच्या कलेंत पारङ्गत झालेल्या त्या पन्थानें मरणोत्तर त्यास आपणांत ओढिलें. आज त्याच्या देशांत कांहीं थोडे लोक त्यास मानतात पण बहुतेक त्याची उपेक्षाच करितात.

पुनर्जन्मांतील त्याचें चरित्र मात्र अत्यंत चमत्कृतिजनक आहे. इंग्लंडमध्यें फित्झ-जेरल्ड नांवाचा एक सुखवस्तु एकांतप्रिय विद्याव्यासङ्गी मनुष्य होता. त्यानें उमर खय्यामच्या रूबायांचें चटकदार रूपांतर करून खिस्ताब्द १८५८ सालीं निनावी प्रसिद्ध केलें. या दोनशें प्रतींच्या आवृत्तीला विकत घेणारा

मिळेना आणि प्रतीची किंमत ५ शिलिङ्गांवरून एक पेनीवर उतरली ! रॉसेटी, स्विन्बर्न, सर रिचर्ड बर्टन् वैगेरे वाङ्मयज्ञांनीं या पुस्तकाचे गुण हळूहळू जनतेस पटवून दिले. व मागणी वाढली तरी या पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघायला दहा वर्षें लागलीं. सुधारून वाढविलेली चौथी आवृत्ति खिस्ताब्द १८७९ म्हणजे पाहिल्या आवृत्तीनन्तर २१ वर्षांनीं निघाली. १८८३ सालीं आपल्या वयाच्या ७५ व्या वर्षी फित्झजेरल्ड निवर्तला. त्याच्या एका स्नेह्यानें खय्यामच्या समाधीचें दर्शन घेण्यासाठीं निशापूरची यात्रा केली व येतांना तेथील गुलाबाचें बीं मिळवून त्यांपासून रोपें तयार करवून तीं फित्झजेरल्डच्या थडग्यापाशीं १८९३ सालीं लाविलीं ! फित्झजेरल्डच्या या रूपान्तरानें त्यास इंग्रजी वाङ्मयांत अढळ पद मिळवून दिलें आणि उमर खय्यामास पुनर्जन्म दिला. उमर खय्यामच्या चहात्याची संख्या इंग्लण्ड–अमेरिकेंत इतकी वाढली कीं रूपान्तराच्या एक कोटीवर प्रति खपल्या असतील. दुर्मिळ झालेल्या पहिल्या आवृत्तीच्या हुबेहूब नकलीला मोठी मागणी आली आणि फित्झजेरल्डची गृहसेविका 'बेसी होव' हिची पहिल्या आवृत्तींतील ज्या प्रतीवर सही होती व शिवाय फित्झजेरल्डनें स्वहस्तानें केलेल्या कांहीं दुरुस्त्या होत्या ती प्रत एका पुस्तक–लिलावांत दोन हजार पन्नास पौण्डांना विकली गेली ! चौथ्या आवृत्तीचे मालकी हक्क मॅक्मिलनकडे असल्यामुळें सार्वजनिक मालकीच्या पहिल्या आवृत्तीच्याच हजारों तऱ्हेतऱ्हेच्या आवृत्त्या निघाल्या. उमर खय्यामविषयीं आवड ही रसज्ञतेची खूण होऊन बसली. आणि मनुष्या–मनुष्यांत तिच्यामुळें स्नेहसम्बन्ध जुळून येऊन आंतरराष्ट्रीय उमर खय्याममंडळें स्थापन झालीं ! मूळ उमर खय्यामच्या हस्तालिखितांचें संशोधन व परीक्षण सुरू होऊन चाळीसाहून अधिक भाषांतून भाषान्तरें झालीं आहेत. खुद्द उमर खय्याम जाड भाकरीवर सन्तुष्ट राहिला असेल; पण आतां त्याच्या नांवावर लेखक, मुद्रक, ग्रन्थबन्धक व चित्रकार हे गब्बर होऊन चैनींत राहूं लागले. कांहीं विडंबनकारांनींही परावर्तित कीर्ति मिळविली. संशयात्म उमरनें कधीं मनास हलकें वाटावें म्हणून तर कधीं स्नेहिसोबत्यांची करमणूक व्हावी म्हणून ज्या शिळोप्याच्या रुबाया लिहिल्या त्यांत कित्येकांच्या जिवाला दिलासा मिळाला तर कित्येकांना गूढ व अद्भुत तत्त्वज्ञान आढळलें ! हकीम उमर खय्यामची मरणोत्तर साडे सहाशें वर्षांनीं जग-

भर कवि म्हणून कीर्ति फांकली. संसारकूटाविषयीं जे विचार रूढ आहेत त्यांच्याविरुद्ध मनांतल्या मनांत असन्तुष्ट रहाणाऱ्यांना अधिकारी सहानुभवी मिळाल्याबरोबर एका सुखद बण्डाची लाट जगभर पसरली; खय्यामचें स्तोमच माजलें ! तथापि निशापूर येथील एकान्तप्रिय सदाजिज्ञासु विद्या-व्यासंगी अल्पसंतुष्ट उमर खय्याम यांचें आन्तरजीवन हें अजून एक गूढच आहे. तो म्हणतो :—

" भूगोलाहुन उंच उंच आ-मन्द
सोडाविलें मी खचक्र-कूट सबन्ध;
कपट-कपाटापलीकडेहि गेलों,
हर बन्ध सुटे, परि न सुटे हर-बन्ध ! " (८२)

" बाळपणीं गुरुपुढती अवनत झालों,
आत्मगुरुत्वें पुढें सुखोद्धत झालों,
ऐक कथेचा अन्त, काय मज पावे ?
धुळींतून येउन वाताहत झालों. " (८४)

विठ्ठलराव घाटे : : ११

माल्थसला पृथ्वीवरील वाढती लोकसंख्या पाहून भविष्यकालाविषयीं चिंता वाटली; कित्येकांना महाराष्ट्रांतील कवितेचीच वाढती संख्या पाहून चिन्ता वाटते. परन्तु ही चिन्ता निरर्थक आहे. सर्वांची काळजी वहाणारा काळ योग्य व्यवस्था लावून जागा रिकामी करून द्यायला समर्थ आहे. काळाच्या चाळणीची वाट पहायला ज्यांना वेळ नाहीं त्यांना मात्र काव्यशुद्धीसाठी इकडचे डोङ्गर तिकडे करणें जरूर आहे. परिश्रम वांया मात्र जाणार नाहींत. कोहिनूर मिळाले नाहींत तरी तेजस्वी हिरकण्या खात्रीनें गवसतील.

आजचा मनु लघुभावगीतांचा आहे. हीं भावगीतें बहुशः जातिरूप असल्यामुळें व ठिकठिकाणीं गाऊन दाखविलीं जात असल्यामुळें मधुर स्वरावलीच्या मोहलहरींत काव्यगुणांचा विसर पडून गेयत्व हाच कवितेचा आत्मा समजला जाऊं लागला आहे. परन्तु कविता ही सङ्गीताची दासी नाहीं. तानबाजीपेक्षां स्पष्ट सुरेलपणा हा जसा श्रेष्ठ त्याचप्रमाणें श्रुतिमधुर रागदारीपेक्षां सहानुकम्प उत्पन्न करणारा काव्यगुण अधिक श्रेष्ठ होय. भावगीतास रसानुकूल चाल लावणें हें हिऱ्यास पैलू पाडण्यासारखें आहे. भावगीतांत जिवन्त पाणी पाहिजे; चालीचा भपका फार दिवस टिकत नाहीं. उत्कृष्ट पैलू पाडलेला कांचेचा लोलक हा अखेर स्वस्त भङ्गुर कांचच; आणि हिरा ओबडधोबड असला तरी तो बहुमोल शाश्वत हिराच ! भाषासौष्ठव व नादमाधुर्य हे गुण मूळ काव्यगुणाचें तेज वाढावितात; पण ते काव्यगुणाची जागा घेऊं शकणार नाहींत. भाषान्तरानें ही बाह्य झळाळी नष्ट होऊन परिणामकारकता थोडी कमी होते; परन्तु भाषान्तरानेंही जो अंश हृदयङ्गम वाटतो तोच काव्यगुण होय.

भावगीतात्मक कविता ही मूलतः कवीच्या विशिष्ट वृत्तीची द्योतक असायला पाहिजे. खऱ्या भावगीताचें रहस्य समजण्यास कवीच्या भूमिकेवर चढून त्याच्या वृत्तीशीं समरस होण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. परन्तु बहुतेक भावगीतांत ठराविक विषय व ठराविक साच्याचें निरूपण असल्यामुळें समरस व्हायला वेळ लागत नाहीं; किम्बहुना समरस होण्याचा प्रश्नच निघत नाहीं. ज्या भावना व कल्पना सर्वसामान्य जनांच्या मनांत कमीअधिक जाणीवेनें असतात परन्तु ज्या त्यांना योग्य, सुंदर व संस्मरणीय भाषेंत व्यक्त करितां येत नाहींत त्याच भावना व कल्पना कमीअधिक नटवेपणानें व्यक्त करणारे कवी पुष्कळच असतात आणि मंताधिक्याच्या जोरावर निवडणूक असती तर असेच कवी उच्चस्थानापन्न झाले असते. परन्तु रसिकतेला वेळोवेळीं वळण मिळत असतें; आणि तज्ज्ञांनीं पसंत केलेल्याला प्रसन्त करण्याकडे बहुजनसमाजाचा कल असतो. यामुळें आडवळणी परन्तु महत्त्वाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाविषयीं कविता रचणाऱ्याला आरम्भीं अज्ञातवास घडला व त्यानन्तर स्वत्व मिळविण्यासाठीं युद्ध करावें लागलें तरी अन्तीं त्याला जनतेच्या हृदयांत उच्चासन मिळाल्याखेरीज रहात नाहीं.

परन्तु याचा अर्थ असा नाहीं कीं प्रत्येक वनवासी अन्तीं छत्रपति होईल. 'कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी' हे शब्द एखाद्या भवभूतीच्याच तोण्डीं शोभतील. ते त्याची वञ्चना करूं शकणार नाहींत. उलटपक्षीं नेणीवपणानें कांहीं तरी लिहिलें व सरळ स्पष्ट शब्दांनीं त्याचें रहस्य सुशिक्षित रसिकासही समजावून देतां येत नाहीं. अतएव तें गूढगुञ्जन थोर वाटून आत्मवञ्चना होण्याची भीति असते. या आत्मवञ्चनेनें मला कोणी विचारीत नाहीं, याचा खेद न वाटतां निदान मनःस्वास्थ तरी लाभतें. मरणोत्तर कुणी काय पाहिलें आहे ? हें खरें; परन्तु या अल्पसन्तोषासाठींच जर कुणाला स्वतःला भवभूति म्हणावयाचें असेल तर तसें त्यानें खुशाल करावें. ज्या परिस्थितींत व ज्या भूमिकेवर कवीनें एखादी कविता केली असेल त्या परिस्थितींत व त्या भूमिकेवर कल्पनेनें वाचकांस नेऊनही त्यांच्यापैकीं कांहींचें हृदय हललें नाहीं तर ती कविता शङ्कास्पद होय; परन्तु त्या वातावरणांत गेल्यावर एकाच वाचकाचें जरी मन तन्मय होऊन गेलें तरी ती कविता कदाचित्

अल्पसङ्ख्य रसिकांची होईल; पण तिच्यांतील चेतना नाकबूल करितां येणार नाहीं.

रा. विठ्ठलराव घाटे–दत्तात्रेय कोण्डो घाटे यांचे ज्येष्ठ पुत्र–यांची कविता अशीच असामान्य आहे. तिच्या बाह्य साधेपणामुळेंच ती चटकन् कुणाच्या डोळ्यांत भरत नाहीं. तथापि तिचा अभिजात मराठमोळा, तिची अर्थपूर्णता हाच तिचा थोर गुण आहे. मागें लोकमान्य पत्रांत रा. श्रीपाद महादेव माटे, एम्. ए. यांनीं मधु-माधवाचें परीक्षण केलें होतें, त्यांत त्यांची बरीच फसगत झाली. माधव ज्यूलियनांची कविता बाह्य नटवेपणामुळें आकर्षक वांटली; परन्तु रा. विठ्ठलराव घाटे यांची कविता रा. माटे यांस, वेळोवेळीं महाविद्यालयांच्या नियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या लघु कवितांहून श्रेष्ठ दर्जाची वाटेना. अतिपरिचय असूनही जो अवज्ञा होऊं देत नाहीं व गुणग्राहकता कमी होऊं देत नाहीं तोच ज्ञानी होय. आकाश आपण रोजच पहातों, त्यामुळें त्याचें गाम्भीर्य व त्याची भव्यता इत्यादि गुण आपल्याला दिसत नाहींत; परन्तु नेहमींची दुर्लक्ष करविणारी घाई सोडून देऊन शान्त विचार केल्यास,

" हा अनन्त पसरला नीलिमा
शान्त गंभीर जयाची सुषमा: "

हें पटायला अडचण पडणार नाहीं. शिवाय

" यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम् "

(भगवद्गीता १० । ४१)

या वचनाची स्मृति असल्यास ' विभूति ' या शब्दाचें स्वारस्य पटून अन्तःकरणाला उन्नत झाल्यासारखें वाटेलच वाटेल.

उदात्तता हाच विठ्ठलरावांच्या कवितेचा विशेष आहे. त्यांच्या एकन्दर कवितांची सङ्ख्या तिसांच्यावर जात नाहीं व ती 'मधुमाधव' (म)'शलाका' (श) आणि ' प्रभा ' (प्र) या तीन पुस्तकांतून प्रसिद्ध झालेली आहे; परन्तु एकही कविता अगदीं टाकाऊ नाहीं. ती साधी आहे. तिच्यांत उपमानैकदृक् बुद्धीचा–एका विशिष्ट कल्पनेचा विलास नाहीं; अर्थात् छेकांच्या बैठकींत

क्षाणिक चमत्कृति उत्पन्न करण्याला तिचा उपयोम होण्यासारखा नाहीं. एकान्तांत हृदयाला हलवून उदात्तता, गाम्भीर्य व भव्यता या गुणांकडे आकर्षीलं अशी जादू तिच्यांत खास आहे. लोकमान्य असलेली इतर कविता नष्ट झाल्यास सम्पत्ति गेल्याइतकें वाईट वाटेल; पण ही नष्ट झाल्यास जिव्हाळ्याचें आधाराचें माणूस गेल्याचा शोक होईल. ही उदात्तता मराठी आधुनिक कवितेंत दुर्मिळ आहे.

विठ्ठलरावांचे काव्यविषय जसे आडवळणी परन्तु हृदयङ्गम आहेत, तसेच त्यांचे मधूनच उद्रेक पावणारे विचार असामान्य पण हृदयस्पर्शी आहेत. " घाव घेई मन पायाशीं तातडी बुद्धि मागें ओढी घालवेना " (प्र. ४७) अशी वृत्तीही " आळन्दीची पालखी " (श ८) पाहून साध्या भाबड्या वारकऱ्याप्रमाणें बेहोश होते. परन्तु ' जात झाली आमुचा देव पक्ष झाला आमुचा देव ' याची जाणीव होऊन देवभक्तींत ज्यांची राष्ट्रप्रीति लुप्त पावली नाहीं असे विठ्ठलराव घाडसी सलगीनें भक्तासाठीं व्यक्तीसाठीं वाटेल तें करणाऱ्या विठोबाला विचारतात,

" महाराष्ट्राचा कळवळा । कां न आला हो दयाळा ?
ज्ञानोबाची जन्मभूमी । नामयाची गानभूमी
तुकोबाची भावभूमी । शिवबाची कार्यभूमी
पुण्यभूमी पुण्यभूमी । करा पुन्हा धर्मभूमी !
सोडा पण्ढरी नगरी । करा महाराष्ट्राची वारी ! "

" प्रेमानें ध्याऊं " (म ३) या स्तोत्रांत जिवन्त भक्तीचा उमाळा आहे म्हणूनच यास भिन्नधर्मीयांच्या महाराष्ट्रीय ख्रिस्तबंधूंच्या—प्रार्थनासङ्गीतांत स्थान मिळालेलें आहे. विठ्ठलरावांची देशभक्ति हीप्रभुभक्तीप्रमाणेंच उन्नत आहे; कारण जनतेंत त्यांना जनार्दन दिसतो. कष्टाचें माहात्म्य न जाणणाऱ्या हिन्दुस्थानांत गुलामगिरींत राबणारे कुळी त्यांना ' आताचे धर्मराज ' वाटतात. त्यांची स्थिति पाहून ' देवाला जखमा झाल्या । देवांना मूर्च्छा आल्या । देवींच्या अश्रू गेल्या ' असेच रक्तोद्गार पिळवटलेल्या हृदयांतून बाहेर पडतात. आणि नामदास हिन्दीजन पाहून ' नावाच्या या अनन्त मूर्ती स्तोत्रपाठ सुरूं झाला ! एकमेव अद्वितीय माता दिसली का कोणाला ' ? (म २२) असा

प्रश्न ते विचारतात. समर्थांच्या करूणाष्टकाच्या तोडीच्या 'श्रीशिवराजस्तोत्रांत (म ११) म्हणावें, " महाराज या एकवेळा। पुन्हा आर्यभू बोलवी आपणांला ! " असें त्यांना म्हटल्यावांचून रहावत नाहीं. इतरत्र ज्यांनीं उच्च दर्जाची संस्मरणीय कामगिरी केली असती अशा महात्म्यांना हिन्दुस्थानच्या निराशाकालांत शुद्ध स्वरूपांचीं कार्यें करण्यांत आपलें आयुष्य वेचावें लागलें हा विचार किती लोकांच्या मनांत येत असेल ! विठ्ठलरावांनीं त्या महात्म्यांची उदात्त मनोवृत्ति सहानुभूतीच्या जोरावर ' आई, आम्हा आठवशील ना ! ' (म १५) या कवितेंत वर्णिली आहे. हिन्ददेवीच्या वैभवदर्शनांत ' अनन्त दुःखें हृदयीं धारिलीं, अनन्त गूढें मनीं वाहिलीं '(म २) अशीं अनन्त कन्यारत्नें त्यांस अचूक दृग्गोचर होतात. ' देह जावो अथवा राहो ! माझा पाण्डुरङ्गी भावो ' अशा श्रेष्ठ भक्तीचीं वर्णनें सन्तांनीं केलीं आहेत, परन्तु ' जिकडे तिकडे ज्ञानरूप परमेश खुणावितो या ! या ! ' हें पाहून अनन्त अज्ञातांचा उलगडा करण्यासाठीं सर्वस्वाची आहुति देण्यास तयार असलेल्या पाश्चात्य ज्ञानहुतात्म्यांची ध्येयनिष्ठा कितीकांना स्फूर्तिदायक झाली आहे ! ' गौरीशङ्कर आणि मानव ' (प्र ४४) या कवितेंत निसर्गाचें अनन्त व भयङ्कर गूढत्व आणि दुर्बल मनुष्याची दुर्दम परन्तु सुविनीत जिज्ञासा यांतील द्वन्द्व विठ्ठलरावांनीं फार मार्मिकपणानें वर्णिलें आहे.

प्रेमप्रान्तांतही विठ्ठलराव आपलें वैशिष्ट्य गमावूं इच्छीत नाहींत. ' माझा अभिसार ' (म ५) या कवितेंत नवतींतील हुरहूर व मीलन यांचा अपूर्व सङ्गम असून ' उसळलें रक्त, तनु रसरसली वेल्हाळा ' अशा स्वभावोक्तीला विठ्ठलराव कचरत नाहींत. ' एक लावणी ' त (म १०) सर्वस्वार्पण करण्याच्या घजणाऱ्या दाण्डग्या श्रद्धेचें वर्णन आहे; तर ' ताई म्हणूं का तुला ? ' (म १४) या द्विश्लोकींत प्रियकरावर प्रियेस ताई म्हणण्याचा प्रसङ्ग आला असतां होणारी अन्तराची कालवाकालव व्यक्त होते. जो नर्मविनोद कान्तेनें मोहक शिरजोरपणानें व सलगीनें आपल्याशीं करावा असें रसिक पतीस वाटतें पण जो हिन्दुसमाजांत स्त्री अशिक्षित, असंस्कृत व दासवृत्ति असल्यामुळें अत्यन्त दुर्मिळ होऊन बसला आहे. त्या नर्मविनोदाचें चटकदार वर्णन ' आलात ते कशाला ? ' (म १४) या कवितेच्या द्वारां कल्पनासृष्टींत अनुभवाला मिळतें.

'प्रेमांतील अद्वैत' (प्र ३४) हें सुनीत अत्यन्त वादग्रस्त होऊन बसलें आहे. 'कान्ते या गुरुवेदना प्रसाविच्या तूं एकली साहशी' हें पाहून अत्यन्त अस्वस्थ व निरुपाय झालेल्या पतीची मनःस्थिती हा काव्यात्म विषय नाहीं व यानें रसापकर्ष होतो असें कित्येकांचें म्हणणें; तर हें सुनीत अत्यन्त हृदय-स्पर्शी आहे असें कांहींचें म्हणणें पडतें. फाजील सम्भावितपणा हा आमचा विशेष दिसतो. 'निर्मितीच्या वेळीं, बाकी खूप गम्मत झाली' असें स्वार्थी अहृदय ग्लूस्टरप्रमाणें उद्गार काढणारे,—जें अपरिहार्य आहे तें (इतरांनींच) शान्तपणानें सहन केलें पाहिजे असा उपदेश करणारे लोकच जिकडे तिकडे! अशा वृत्तीच्या माणसांना रत्युत्सव व जन्मोत्सव यांमधील नवभूतिजन्माचें गूढ व तत्कालीन अतर्क्य अशी दुःखसंवेदना या विषयांचें माहात्म्य न पट-ल्यास व त्यांत त्यांस ग्राम्य गलिच्छपणा दिसल्यास आश्चर्य काय? त्यांचें म्हणणें कीं तुम्ही या पतीच्या अस्वास्थ्याला सामान्यता, सार्वत्रिकता द्या. 'सखे' तुझ्या तापांत मला वाटेकरी होतां येत नाहीं म्हणून मला वाईट वाटतें' या म्हणण्यांत सामान्यता आहे पण क्षुद्रता आहे. तापाचा निदान अनुभव तरी पतीला आहे;पण प्रसूतिवेदनांची तीव्रता परिणामावरून दृष्टीनें पति जाणूं शकेल; पण ती त्याला स्वानुभवातीत वाटून विशेष जाचक होईल. तो विशेष हळू-वार मनाचा असल्यास त्या दुःखास अंशतः तरी आपण कारणीभूत आहोंत ही जाणीव होऊन पश्चात्तापाचीही ज्वाला झळम्बल्यावांचून रहाणार नाहीं. हें सुनीत तर विठ्ठलरावांच्या उदात्त व स्वतन्त्र प्रतिभेचें विशेष द्योतक आहे. त्यांच्या भूमिकेवर जाऊन रहस्यग्रहण केल्यास त्यांचीं 'तीन सुनीतें' (म २६) हीं हृदयांत अभूतपूर्व कालवाकालव केल्याशिवाय रहाणार नाहींत.

त्यांच्या इतर कविताहि वाचनीय आहेत. 'नाट्यरूप महाराष्ट्र' या पुस्तकांत त्यांनीं ऐतिहासिक कागदपत्रांचें मन्थन करून तत्कालीन भाषा, प्रसङ्ग व पात्रस्वभाव इत्यादिकांचें ज्ञान रेंखीवपणानें पण परिश्रमपूर्वक सम्पादून तें कलात्मक दृष्टीनें सम्भाषणद्वारां नाट्यसृष्टींत आणलें आहे. त्याचा परामर्ष घेण्याला आज जागा नाहीं. शलाकेंत 'कारकून' ही अतिलघुकथा लिहून त्यांनीं वाङ्मयांत नवीनच प्रघात पाडला आहे. नगर जिल्ह्याच्या प्राथ-मिक शिक्षणाचे चालक या नात्यानें होणाऱ्या त्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्याचेंही हें स्थळ नव्हे. मराठी कवितेंत त्यांनीं जो नवीन चिमुकला प्रवाह

आणून सोडला तो लघु असला तरी त्याच्या अन्तर्गौरवाची ओळख मराठी वाचकांस करून देण्याच्या उद्देशानें हा लेख लिहायला घेतला. तिकडे महाराष्ट्ररसिकांची नुसती दृष्टि वळली तरी मी स्वत:ला कृतार्थ समजेन. मित्रानें मित्राची स्तुति करूं नये हा शिष्टाचार खरा; पण इतरांना मित्राचे खासगी नव्हेतच पण वाङ्मयिक गुण दिसूं शकत नसले तर पक्षपाताचा खराखोटा आरोप स्वत:वर ओढवूनहि सार्वजनिक कार्य करावयाला नको काय!

झेंडूचीं फुलें : : १२

इसवी सनाच्या विसाव्या शतकांतील ऐन विशीचा काळ, जुने नाणावलेले कवि अस्तंगत झाले होते, किंवा होण्याच्या पन्थाला लागले होते, आणि उदयोन्मुख कवींत केशवकुमार, काव्यविहारी व नेरूरकर हीं नावें प्रामुख्यानें लोकांच्या नजरेसमोर होतीं. मनोरंजनांत यांच्या कविता प्रसिद्ध होत असत. आनन्दराव टेकाडे यांनीं महाराष्ट्रास काव्यगायनाचें वेड लाविलें होतें, परन्तु टेकाड्यांची कविता कितीही लोकांच्या परिचयाची झाली तरी केवळ काव्य-गायनानें रसिक व चिकित्सक वाचकांस भूल पाडून इतर कवींस ते मार्गे सारि-तील ही भीति नव्हती. याच सुमारास कांहीं सरकारी शारदोपासकांनीं पुण्यास शारदा मंदिर ऊर्फ प्रोफेसर लक्ष्मण गणेशशास्त्री लेले यांनीं आपल्या प्रस्ता-वनेंत उल्लेखिलेला ' सरस्वती ' महाल, ही संस्था स्थापन केली. यांत अनन्त-तनय, प्रो. श्रीकृष्ण निळकण्ठ चाफेकर, ना. म. भिडे, भोरकर, प्रो. श्रीधर बाळकृष्ण रानडे, प्रो. मायदेव, यशवन्त, गिरीश, अज्ञातवासी वगैरे मण्डळी रविवारीं जमत असत, व्याख्यानें होत, कवितांचें अथवा निबन्धांचें वाचन होई आणि वाङ्मयांतील निरानिराळ्या प्रश्नांवर चर्चा होऊन बैठक समाप्त होई. या शारदामंदिराच्या पहिल्या वार्षिक संमेलनाला केशवकुमार हजर होते, आणि त्या वेळीं काढविण्यांत आलेल्या फोटोंतही ते उपस्थित आहेत. बडो-द्यास रा. नरसोपंत केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या साहित्यसंमेलनाला पुण्याच्या या शारदा मंदिराचे बरेच सदस्य हजर होते. याच संमेलनांत टेकाडे ऐन भरांत असतांही यशवन्त यांनीं 'देहाचा पूल' 'मालुं नको ग' वगैरे कविता म्हणून दाखवून पहिल्या तडाक्यास आघाडी मारली ! लौकरच यशवन्तांची ' अर्ध्वं ! ' ही कविता प्रसिद्ध झाली. यशवन्त – गिरीश यांनीं श्रवणमधुर व

परिणामकारक पद्धतीनें कविता म्हणून दाखविण्याच्या कलेंत प्राविण्य संपादून पुण्यांतील विद्यार्थी समाजाचीं म्हणजे नव्या पिढीचीं मनें आपल्याकडे आकर्षून घ्यायला सुरुवात केली आणि अल्पावधींतच प्रसिद्धि मिळविली. 'वीणाझङ्कार' व 'अभागी कमल' या पुस्तकाचें प्रकाशन होऊन जनतेनें मोठ्या कौतुकानें त्यांचें स्वागत केलें. माडखोलकरांचें 'आधुनिक मराठी कविपंचक' हेंही फार कुतूहलजनक झालें. माधव ज्यूलियनांच्या काव्यगुणदृष्ट्या सुमारच पण चमत्कारिक नावीन्यानें युक्त अशा कविता नवयुग व महाराष्ट्र साहित्य या मासिकांत प्रसिद्ध होऊं लागून लोकांच्या कौतुकास, कुचेष्टेस वा टीकेस विषयीभूत झाल्या.

माडखोलकर यांच्या नेतृत्वाखालीं ज्ञानप्रकाशांत 'काव्यशास्त्रविनोद' या मथळ्याची साप्ताहिक पुरवणी निघूं लागून तींत कविता आणि सुनीत—गज्जलादि विविध विषयावर चर्चाही येऊं लागली. १९२७ सालच्या सप्टेंबर माहिन्यांत 'किरण' प्रसिद्ध होऊन त्याच्या आधीं अदमासें दोन वर्षें रविवारीं एकत्र जमणाऱ्या कांहीं काव्यप्रेमी गृहस्थांच्या मण्डळास पुस्तक प्रकाशनाच्या निमित्तानें 'रविकिरणमण्डळ' हें नांव मिळालें; आणि कवीमंडळ स्थापनेची एक लाटच उसळली! या चिमुकल्या चोपड्यावर त्याच वर्षाच्या विविधज्ञानविस्ताराच्या डिसेंबराच्या अंकांत बाळकृष्ण अनंत भिडे यांच्यासारख्या नांवाजलेल्या लेखकांनीं विस्तृत, फाजील कडक पण कुतूहलवर्धक अशी टीका लिहिली. रविकिरण मंडळानेंही काव्यविचार व उषा हीं पुस्तकें लागोपाठ प्रसिद्ध करून आपल्या नवीन टुमीचें सोदाहरण समर्थन केलें. वाङ्मयाच्या आकाशांत हीं कोणतीं शेण्डे नक्षत्रें उगवलीं आहेत आणि आतां कोणकोणते अनर्थ होणार अशी पृच्छा साहित्याचे मक्तेदार करूं लागले. प्रेक्षकांचें लक्ष स्वाभाविकपणेंच धूमकेतूंच्याकडे वेधलें; आणि या नवकौतुकाच्या भरांत अधिक देदीप्यमान व स्वयंप्रकाशित अशा तेजोगोलांकडे दुर्लक्ष होतें. या धूमकेतूंच्या आगमनानें अनर्थ तर कांहीं ओढवला नाहींच; उलट मराठी वाङ्मयास एक अदृष्टपूर्व लाभ झाला. केशवकुमार यांना आपलें योग्य क्षेत्र सांपडलें. विडंबन काव्याचा जिवंत झरा वाहूं लागला आणि 'किरणा'च्या प्रकाशनानंतर एक वर्षाच्या आंत 'झेंडूचीं फुलें' हें पुस्तक प्रसिद्ध होऊन केशवकुमारांची प्रतिष्ठा वर्धमान झाली.

इतका प्रास्ताविक विस्तार करण्याचें कारण हेंच कीं 'झेंडूचीं फुलें' कोणत्या मनःस्थितींत व परिस्थितींत निर्माण झालीं याची यथातथ्य कल्पन वाचकांस यावी. केशवकुमारांच्या 'दृष्टीपुढें कोणती सृष्टि होती याचा विचार करणें अप्रस्तुत होणार नाहीं. एवढेंच नव्हे तर तो मनोरंजक व उद्बोधकहि होईल' अशा भरंवशानें प्रोफेसर लेले यांनीं प्रस्तावनेंत ज्या गोष्टींचें रंगून वर्णन केलें आहे त्या प्रोफेसर साहेबांच्या ध्यानींमनीं स्वप्नीं पुन्हां पुन्हां येत असल्या तरी त्यांतील क्वचितच एखादी गोष्ट केशवकुमारांच्या विडंबनेचा विषय झालेली दिसते. 'आम्ही कोण' 'मोहरम मधली मर्दुमकी' 'रस्त्यावर पडलेलें विडीचें थोटूक' 'पाय घसरला तर' 'श्यामले,' 'शृंगाररस' 'करुणरस' 'हास्यरस' 'शांतरस' इत्यादि कवितांचा म्हणजे पाहिल्या आवृत्तींतील बहुतेक कवितांचा विषय रविकिरण मंडळ हाच होता. त्या आवृत्तींत कवितांच्या खालीं 'यशवन्त येरवडे–' सूचक 'भगवन्त मांबुर्डे' आणि 'गिरीश–' सूचक 'फुलीश' अशीं नांवेंही होतीं. दुसऱ्या आवृत्तींत, 'कादरखा' 'पाहुणे' 'कवि आणि चोर' 'एकच वाक्य' 'अरुण' 'प्रेमाचा गुलकन्द' 'मनाचे श्लोक' वगैरे जीं नवीं प्रकरणें घालण्यांत आलीं आहेत यावरून केशवकुमारांच्या स्फूर्तींचें क्षेत्र आतां कसें विस्तृत होत चाललें आहे हें स्पष्ट दिसून येईल; आणि आम्ही जो प्रास्ताविक विस्तार केला त्याची आवश्यकताहि पटेल.

'झेण्डूंच्या फुलां'ची पहिली आवृत्ति चार वर्षांपूर्वींच खपून गेली. या यशाबद्दल आम्हीं केशवकुमारांचें मनःपूर्वक अभिनन्दन करितों. या यशाचें श्रेय जितकें विडम्बनकाराच्या कलेस आहे, तितकेंच बहुजनसमाजाच्या अभिरुचीसही आहे. कुणालाही दुसऱ्याची टवाळी झालेली पाहण्यांत आनंदच वाटतो. स्वतःच्या हास्यास्पद विडम्बनीय लकबांचीही टवाळी बहुशः कुणाला सहन होत नाहीं; मग स्वतःच्या व्यक्तीची नालस्ती सहन करणारे महात्मे कितीसे निघणार? 'स्वराज्य आणि त्यासवें आम्ही गमाविला मोहरा' या प्रोफेसर लेल्यांच्या पद्यांतील 'आणि' व 'आम्हीं' या शब्दांच्या उद्वेगजनक ऱ्हस्वीकरणांचें विडम्बन केशवकुमारांनीं 'आम्हीं असूं परि तूं नसशील' ही निरुपद्रवी ओळ व तिच्यावरील तळटीप लिहून केलें आहे. प्रोफेसरसाहेब म्हणतात कीं, आमच्यासारख्या विडम्बित व्यक्तीनें

या पुस्तकाला लिहिलेला हा प्रस्ताव त्याच्या चाङ्गुलपणाचा प्रबल पुरावा नव्हे काय ? विडम्बनाचे सर्व प्रकार ज्या कवितेंत अवतीर्ण झाले आहेत असें प्रोफेसरसाहेब म्हणतात त्या श्यामलेसारखी एखादी विडम्बनात्मक कविता खुद्द त्यांच्यावर लिहिण्याचा मान केशवकुमारांनीं त्यांना दिला असता तर प्रोफेसरसाहेबांनीं कोणत्या रीतीनें त्यांचा प्रस्ताव नव्हे तर उपसंहार केला असता हें ज्यांनीं त्यांचे लेख वाचले आहेत त्यांस सांगण्याची जरूरी नाहीं.

तें असो. पण केशवकुमारांनीं महाराष्ट्र शारदामान्दिरांत एक नवीनच दालन खुलें करून दिलें आहे ! याबद्दल मराठी वाङ्मयाचे चहाते त्यांचे सानंद आभार मानतील यांत शंका नाहीं. विडम्बनांतील दोषदिग्दर्शन हें नेहमीं काव्यशुद्धीच्या उदात्त हेतूनेंच केलें जातें कीं काय आणि मृदु विनोदास्त्रानें प्रतिपक्षी नेस्तनाबूद होतो कीं नाहीं हे प्रश्न अलाहिदा. पण एकन्दरीनें शोकमय असणाऱ्या या जगात क्षणैक कां होईना पण पोट धरधरून हंसायला लावणाऱ्या विडम्बन-काव्याची कामगिरी कांहीं कमी महत्त्वाची नाहीं.

या द्वितीयावृत्तीला प्रोफेसर लक्ष्मण गणेशशास्त्री लेले यांची प्रस्तावना लाभली आहे या प्रस्तावनेबद्दल केशवकुमारांनीं प्रोफेसरसाहेबांचे आभार मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं व त्यांनीं ते तसे मानिलेही आहेत. परंतु ही अशी प्रस्तावना हस्तगत करून प्रसिद्ध करण्यांतच केशवकुमारांनीं प्रस्तावना-ग्रहणपद्धतीचें प्रच्छन्न विडम्बन तर केलें नाहीं ना अशी आम्हांस शङ्का येते. तशी शङ्का प्रोफेसरसाहेबांस येणें शक्य नाहीं. कारण त्यांना 'झेण्डूचीं फुलें' या नांवांत विडम्बन दिसत नसून 'कवीची शालीनता (?)' दिसत आहे.

केशवकुमारांच्या आधीं विडम्बन मराठींत नव्हतें असें नाहीं; परंतु तें अल्प होतें आणि त्याला वाङ्मयाचा एक भाग मानला जाण्याइतकें महत्त्व प्राप्त झालें नव्हतें. 'कुलकर्णी लीलामृतां'वर केसरींत एक सरस अग्रलेख प्रसिद्ध झालेला होता; नाट्यकलारुक्कुठारांत कोल्हटकरांच्या कित्येक पद्यपंक्तींचें विडम्बन आलें आहे. नाट्यकलारुक्कुठार गडकऱ्यांच्या प्रभसंन्यासावरही

चालविला गेला होता ही गोष्ट प्रो. लेले यांस माहीत नसावी असें दिसतें. एका काळीं पुण्यांत अत्यंत लोकप्रिय झालेल्या 'विनोद' नाटकांतील कांहीं पदांत खाडीलकरी पदांचें हृदयङ्गम विडम्बन आहे. बल्लवदूत हें मेघदूताचें सरस विडम्बन असून या काव्याचें पुनर्मुद्रण दोनदां झालेलें आहे. आणखीही कांहीं किरकोळ उदाहरणें असतील. परन्तु मोठ्या प्रमाणावर विडम्बनाची पैदास ही केशवकुमारांनींच सुरू केली हें निर्विवाद आहे.

विडम्बन म्हणजे हास्योत्पादक अनुकरण होय. हें ज्याचें अनुकरण असेल त्याची माहिती असल्याशिवाय व उपस्थिति झाल्याशिवाय खरी मजा येत नाहीं. विडम्बनीय कृति महत्त्वाची नसेल आणि तिच्यांत एकदम ध्यानांत घेण्याजोगे कांहीं ठळक गुण (सद्गुण अथवा अवगुण) नसतील तर विडंबन तितकें परिणामकारक व टिकाऊ होऊं शकणार नाहीं. इंग्रजी विडंबनकार जॉन्सनच्या गद्याचें विडंबन करील व लोक मोठ्या कुतूहलानें तें वाचतील. एखाद्या क्षुद्र लेखकाच्या विडम्बनाकडे त्याच्या हितशत्रूच्या अत्यन्त मर्यादित कम्पूव्यतिरिक्त कुणीही ढुंकून पाहणार नाहीं. तसेंच मेकॉलेच्या गद्यशैलीचें विडम्बन साधेल, पण वैयक्तिक लकबांच्या अभावीं मोलेंच्या गद्यशैलीचें विडम्बन साधणार नाहीं.

विडम्बनांतील अनुकरण हास्योत्पादक व्हावें लागतें. अगदीं हुबेहूब अनुकरण केल्यास तें हास्योत्पादक होणार नाहीं; मूळ कवीचीच ती एक दुसरी कृति आहे असें वाटेल. तेव्हां विडम्बन करितांना ज्या लकबांचें अनुकरण करायचें असेल त्या विशेष ठळकपणानें मांडाव्या लागतात आणि तसें करण्यांत थोडी अत्युक्ति होते, नाहीं असें नाहीं; पण विपर्यास होतां कामा नये. म्हणून विडम्बन काव्याला विषय बहुशः क्षुद्र घेतात. 'स्थानभ्रष्ट फुलास' या विषयावरील सुनीतद्वयाचें विडम्बन करितांना 'रस्त्यावर पडलेलें विडीचें थोटूक' हा विषय केशवकुमारांनी घेतला त्यांत मौज आहे. अत्युक्ति असावी पण विपर्यास कसा असूं नये तें पाहूं. संस्कृतच शब्द वापरावे. फार्सी वगैरे परदेशी शब्दांवर पूर्ण बहिष्कार टाकावा; या प्रवृत्तीचें विडम्बन करायचें असेल तर विडम्बनकार खुर्चीस 'काष्ठ, वेत्रासन' अथवा माजी बॅरिस्टरास 'विगत विधिविशारद' म्हणेल; परन्तु आधुनिक मराठी कवि संस्कृत शब्दांपेक्षां प्राकृत शब्दांस अधिक महत्त्व देतात याचें विडम्बन करण्या-

साठीं हे कवि आईस ' मम बाबाची ती आवा ' (सुवर्णचम्पक, आधुनिक कवीचा आरसा ही कविता पहा) म्हणतात असें विधान करणें केवळ विपर्यस्त व संस्कृतिविमुख आहे. कारण जन्मदात्री आईविषयीं अशा रीतीचें उद्‌गार कवीनें काढणें अशक्य आहे. अशा विपर्यासाचीं उदाहरणें दुर्दैवानें झेंडूच्या फुलांतही आहेत. ' सखे बोल बोल ' हें एक उदाहरण होय. कवितीचें विडम्बन गमतीखातर होतें आणि त्यांत सहृदयता असल्यामुळें निर्भेळ विनोदाचा उठाव होतो. आतां कवीस आपल्या कृतीबद्दल अत्यन्त आपुलकी वाटत असल्यामुळें निर्भेळ विडम्बनानेंही त्याला थोडेंबहुत दुःख होईल, परंतु तें अपरिहार्य आहे. विडम्बित कवीच्या शीलावर व चारित्र्यावर जोंपर्यंत श्वनीनें शिंतोडे उडविण्यांत आले नाहींत तोंपर्यंत विडम्बन केवळ विनोदात्मक गणलें पाहिजे. एखाद्या कविकृतीच्या विडम्बनानें त्या मूल कृतीचा उपमर्द होतो असें मुळींच नाहीं; उलट मूळ कृति जर महत्त्वाची व सर्वसामान्य परिचयाची नसेल तर विडम्बन फिकेंच पडेल. ' एकच वाक्य ! ' ' कादरखॉ, ' ' मोहरममधील मर्दुमकी ' ' रस्त्यावर पडलेलें विडीचें थोटूक, ' ' पाय घसरला तर—' ' अरुण ' वगैरे कविता निर्भेळ विनोदाचे उत्कृष्ट नमुने होत.

स्वभावदोषदिग्दर्शन ही विडम्बनाची पुढील पायरी होय. यांत टीका एकाद्या वर्गाच्या सामान्य अचरटपणावर अथवा इतर अवगुणांवर असते. या टीकेंत सहृदयता जरी कमी होऊन ती रिकामी पडलेली जागा द्वेष पटकावतो तरी झेंडूच्या फुलांत आधुनिक कवींत आढळून येणाऱ्या अनेक अवगुणांचा समाचार घेतला आहे. 'कवि आणि चोर' 'साङ्ग कसें बसलों' 'फूल, कवि, बाला आणि मासिक' 'आम्ही कोण ?' 'वत्सल रस' 'रौद्र रस' 'कवि आणि कारकून' 'कवींचीं विरामचिन्हें' 'कानगुजला' 'पत्रें लिहिलीं पण !' '—स' 'कवि आणि कवडा' इत्यादि कवितांपैकीं 'कवि आणि चोर' 'साङ्ग कसें बसलो' 'आम्ही कोण' 'पत्रें लिहिलीं पण...!' या कविता खरोखरीच सुंदर आहेत. 'मनाचे श्लोक' 'पाहुणे' आणि या सङ्ग्रहांत नसलेली 'परिटा येशिल कधि परतून' या कवितांत कविवर्गाखेरीज इतर वर्गावर मोर्चा आहे. सामान्य स्वभावदोषाचें

क्षेत्र ज्या मानानें विस्तृत होईल त्या मानानें विडम्बनकाराची कामगिरी विविध व उपयुक्त होईल.

याच्या पुढील पायरी म्हटली म्हणजे वैयक्तिक–दोषदिग्दर्शनाची होय. विडम्बन हें त्या उद्दिष्ट व्यक्तीला उपहासित करण्याचें केवळ साधन होतें. ती व्यक्ति स्पष्ट नव्हे तर फक्त सूचित असल्याकारणानें न्यायमन्दिराची तितकीशी भीति वाटत नाहीं; आणि त्या व्यक्तीची नालस्ती करण्याचा मोह अनावर होतो. ती व्यक्ति बहुजनसमाजाच्या परिचयाची असून कित्येकांच्या मत्सरास पात्र झालेली असली कीं एखादें विडम्बनगीत वाङ्मयदृष्ट्या गचाळ असलें तरी केवळ तें त्या व्यक्तीस अनुलक्षून आहे, म्हणूनच त्याला महत्त्व प्राप्त होतें. 'चांफा' या कवितेला तिच्या नांवावरून विडाम्बित व्यक्तीचा बोध न होता तर कुणीही हातीं न धरता. 'श्यामले' या प्रकरणांतील मौज कांहीं और आहे. "विडम्बनाचे सर्व प्रकार या कवितेंत अवतीर्ण झाले आहेत" असें प्रो. लेले म्हणतात. या त्यांच्या स्तुतींतील इंगितही हेंच आहे. वस्तुतः या कवितेंत कोणत्या कवितांचें विडंबन व विपर्यस्त मिश्रण आहे हें फारच थोड्या लोकांस सांगतां येईल; कारण त्या कविता विशेष प्रसिद्ध व श्रेष्ठ नाहींत. 'सखे बोल बोल' ही कविता केवळ विनोदात्मक मानली तर मजेदार आहे, परंतु पुस्तकाच्या परिशिष्टांत केशवकुमारांनीं दिलेल्या प्रश्नपात्रिकेंतील ७ वा प्रश्न वाचून ही कविता नवरसमंजरीचे लेखक अनंततनय या 'पद्यकारांसच अनुलक्षून लिहिली आहे' असें प्रो. लेले यांच्या-प्रमाणें प्रत्येकांस वाटूं लागणें स्वाभाविक आहे. "उपहासित व्यक्ति (किंवा कृति) वाचकांना पटली म्हणजे उपहास सफल झाला व विडम्बनकार कवीचें काम फत्ते झालें" असें प्रोफेसर साहेबांस वाटतें. त्याप्रमाणें घरांत अठरा विश्वें दारिद्र्य असतांना बड्या बड्या बाता मारीत 'एकच गोड—गोड' मागत अस्पर्शी पत्नीशीं अचरटपणानें सलगी करणारा प्राणी म्हणजे अनन्ततनय हेंच पटविण्याचा जर विडम्बनकाराचा हेतु असला तर आम्हांस ही कविता म्हणजे विपर्यस्त टीका व अनन्ततनयांची अत्यंत गर्हणीय अशी नालस्ती वाटते ! जेथें विडम्बित कविता सुप्रसिद्ध नसते व व्यक्तीचा आक्षेप हाच हेतु असतो तेथें तळटीपांनीं अथवा इतर युक्त्यांनीं ती व्यक्ति सूचित करावी लागते. कारण बिडम्बित कवितेची हास्योत्पादक उपस्थिति होणें हें जें विडम्बनाचें कार्य तें तेथें होत नाहीं.

करुणरस, बीभत्सरस या कविता व्यक्तींसच उद्देशून आहेत; परन्तु त्या अमुक-तमुक व्यक्तींस अनुलक्षून आहेत म्हणून आम्हांस वाचनीय वाटत नसून त्या अज्ञात काल्पनिक व्यक्तींवर आहेत असें मानिलें तरी त्या वत्सल रस या कवितांप्रमाणें अन्तःस्थ विनोदामुळेंच सरस वाटतात. 'कषाय-पेय-पात्र-पतित-मक्षिके-प्रत' ही कविता पुण्यांतील एका वृद्ध व विद्वान् परन्तु क्लिष्ट-काव्य-रचनाकुशल कवि शार्दूलाची (म्हणजे विद्याधर वामन भिडे यांचीच ना ?) थट्टा आहे हें सहज लक्षांत येईल असें प्रस्तावनाकार म्हणतात. पण पहिल्याच श्लोकांतील पहिल्या तीन ओळींतच विडम्बन समाप्त होतें; मग पुढें तें विडम्बन केशवकुमारांना झेपेना कीं काय कोण जाणे ? एकंदरीनें ही कविता स्वतंत्र विनोदीच मानावी लागते.

केशवकुमारांच्या गुणांस स्वतंत्र प्रशंसापत्र देण्याची आवश्यकता नाहीं. दुसरी आवृत्तीही दीड महिन्याच्या आंत अर्धीअधिक खपल्याचें आम्ही ऐकतों. इतक्या तत्परतेनें लोकांनीं केलेलें झेण्डूच्या फुलांचें स्वागत हेंच केशवकुमारांच्या गुणांचें प्रशंसापत्र होय. केशवकुमारांच्या विडम्बनगीतांत मूळ गीताचे ध्वनि एकसारखे प्रतीत होत रहातात; मूळांतील लय ते बरोबर उमटवूं शकतात. त्यांचें भाषेवर प्रभुत्व आहे. त्यांच्या कवितेचा ओघ सहज अस्खलित व अप्रतिहत चालतो. त्यांचें निरीक्षण फार मार्मिक आहे. 'कादरखा' या कवितेंत पठाण लोक कलिङ्गडें चाकूनें कोरून खातात या बारीक गोष्टीचा उल्लेख करायला ते चुकले नाहींत. त्यांच्या मनाच्या श्लोकांत त्यांनीं केलेलें समाजाचें बारकाव्याचें निरीक्षण स्पष्ट दिसून येतें. त्यांची कल्पनाशक्ति ही फार स्तरल आहे. गोविंदाग्रजांनीं एका दृष्टीनें उत्प्रेक्षांची रास उभवून बालकवीच्या अरुणावर ताण करण्याचा प्रयत्न केला तर केशवकुमारांनीं दुसऱ्या दृष्टीनें उत्प्रेक्षांचा ढीग रचून गोविन्दाग्रजांवर खास मात केली आहे. विडम्बनांत ते निर्भेळ विनोद कला आणूं शकतात, हें 'सांग कसे बसले' 'कानगुजला' 'प्रेमाचा गुलकन्द' इत्यादि प्रकरणांवरून स्पष्ट दिसून येतें. केशवकुमारांचा विनोद कुणासही सहज समजेल असा आहे 'चांफा' व 'पाहुणे' अशा क्वचितच त्यांच्या कविता फिक्या वा हठाकृष्ट वाटतात. क्वचित प्रसंगीं त्यांची भाषा व्याकरणदृष्ट्या अशुद्ध व खडबडीत वाटते, अशी दोषस्थळें दूर करणें त्यांच्या विद्वत्तेस व लेखनशक्तीस मुळींच कठीण नाहीं.

'पाखरा, येशिल का परतून्!' : : १३

हें एक आधुनिक मराठी भावगीतांतील चिरस्मरणीय असें गीत आहे. पांखराच्या बोलाप्रमाणें हें अगदीं साधें व सहजस्फूर्त आहे. याची गोडी अवीट आहे. हें घोळूनघोळून म्हणतां येण्याजोगें आहे. साधा भाव, सरळ, सोपी आणि अदीर्घ रचना, आणि गेयता या तीन गुणांनीं युक्त असा जो गीतक (song) नांवाचा काव्यप्रकार आहे, त्या प्रकाराचा हें पद्य म्हणजे एक उत्कृष्ट नमुना आहे. एकदां ही कविता सहृदयतेनें व तन्मयतेनें वाचली तर तिची उपस्थिति आयुष्यांत अनेकदां झाल्यावांचून रहाणार नाहीं. कवितेचे बरोबर तेच शब्द न आठवले तरी याप्रमाणें प्रसंगानुसार आयुष्यांत भावार्थाची उपस्थिति अनेकदां होणें हेंच कवितेचें सार्थक होय.

परंतु ही कविता जितकी सुंदर आहे तितकी ती सुप्रसिद्ध नाहीं. अलीकडे कविता-गायनाचा प्रसार होऊं लागल्यामुळें कांहीं कविता साधारणच असल्या तरी अभिनव चालीमुळें व म्हणून दाखविणाराच्या खड्या सुरेल आवाजीमुळें बहुजनसमाजांत विशेष प्रसृत होतात. उलटपक्षीं म्हणून दाखविणारा न भेटल्यामुळें प्रस्तुत गीतासारख्या कांहीं सुंदर गेय कविता प्रकाशित होऊनही मर्यादितच प्रसिद्धि पावतात. 'पाखरा, येशिल का परतून्?' ही कविता आबालवृद्धांच्या दाट परिचयाची न होण्यास आणखीही एक कारण आहे. मजेदार गेय पद्यरचना म्हणून जरी ती तरुण मनाला क्षणभर आवडली तरी तिच्यांतील गाढ भावार्थी तन्मयता, विशिष्ट अनुभवाच्या अभावामुळें तरुणांना होण्यासारखी नाहीं. ही कविता ऐकून तरुण सकौतुक स्तब्ध बसतील, परंतु वडील माणसें गहिंवरून जातात. त्यांच्या आयुष्यांतील कांहीं अनुभवांचें

त्यांना स्मरण होऊन डोळे पाण्यानें भरून येतात. सभागृहांत गाहिंवर मोठ्या कष्टानें दाबला जातो.

ही कविता बाह्यतः पक्षास उद्देशून आहे. वस्तुतः ती एखाद्या पाखरा-प्रमाणें गोजीरवाण्या व स्वातंत्र्येच्छु तरुणास संबोधून आहे हें उघड आहे. ती बालकवीस अनुलक्षून आहे असें म्हणतात. परंतु या माहितीनें कविता अधिक परिणामकारक होते असें मुळींच नाहीं. शोक दाबण्याचा प्रयत्न करूनही जीं त्याचीं थोडीं पुसट चिन्हें दृग्गोचर होतात, त्यांचा प्रेक्षकांवर परिणाम अधिक खोल होतो. त्याचप्रमाणें अन्योक्तीच्या पडद्यांतून दिसणारा अंधुक पण जिवंत भाव हा वाचकाच्या कल्पनेला चालना देऊन एकंदरीनें कवितेची परिणामकारकता वाढवितो. पांखरें स्वावलंबी होऊन उडूं लागलीं कीं तीं आईबापांना विसरतात व आईबाप त्यांना विसरतात. परंतु मनुष्यप्राण्यांचे संबंध असे मर्यादित नाहींत. मुलें वयांत येऊन मोठीं झालीं तरी वडिलांच्या स्नेहाविकृत दृष्टीला तीं लहानच दिसतात. उपजत आकर्षणाच्या भरीस दीर्घ-कालीन सहवास आणि खाल्लेल्या खस्ता यांच्यामुळें स्वाभाविक ममत्वांत मोठी भर पडते. तरुणाला जगाची चांगली मोहक बाजूच फक्त दिसते, आणि वाढतें बळ त्याच्या मनांत स्वातंत्र्याची, नवे नवे अनुभव घेण्याची इच्छा उत्पन्न करिते. वडिलांना अनुभवामुळें जगांतील धोक्यांची जाणीव झालेली असते. साहजिकपणेंच वडील व तरुण यांच्या इच्छांत एक प्रकारचा अपरिहार्य विरोध येतो. मुलांची इच्छा स्वाभाविक आहे याची जाणीव वडिलांना नसते असें नाहीं; परंतु मुलाविषयीं वाटणारी काळजी त्यांना स्वस्थ बसूं देत नाहीं. अशा स्थितींत मुलें कित्येकदां वडील माणसांस उलट टोंचूनही बोलतात. अखेर स्वतंत्र होऊं इच्छिणाऱ्या मुलांचें जाणें अपरिहार्य झालें कीं वडील माणसें कष्टानें पण आशीर्वादपूर्वक त्याला निरोप देतात. असा निरोप देतांना त्यांच्या मनांत जी विलक्षण कालवाकालव होते तीच प्रस्तुत गीतांत वर्णिलेली आहे. निरोप देत असतांनाही मुलानें परतून यावें अशी जी निराशेंतील आशा मधून मधून वर डोकावते, तीच मोठ्या औचित्यानें ' पाखरा, येशिल का परतून् ? ' या ध्रुवपदांत व्यक्त केली आहे.

आईबापांना वाटतें कीं आपलें मुलाच्या भोंवतीं भोंवतीं घिरट्या घालणारें मन ओळखून मुलानें तो असेल तिथून येऊन भेटावें—

"हवेसवें मिसळल्या माझिया निःश्वासा वळखून"

परंतु हें शक्य नसलें तर निदान कृतज्ञता तरी त्यांनीं व्यक्त करावी—

"मत्प्रेमानें दिल्या खुणांतून एक तरी आठवून"

यांत थोडा स्वार्थ दिसतो, पण तो गईणीय नाहीं. वर्डस्वर्थनें सुद्धां एका कवितेंत आपल्या मित्रास Is there no debt to pay, no boon to grant? अशीच पृच्छा केली आहे. मुलाची आठवण आईबापांना करून द्यायला प्रेमांच्या खुणांची जरूरी नसते. तथापि त्यांच्या स्मृतीशीं निगडित झालेल्या किती गोष्टी घरांत असतातच. जो बाग्बाण सहन करून वेडी ममता जिवंत राहूं शकते; त्या बाग्बाणांचा जखम भरून आल्यावर राहणारा वण हा मागील आठवणी करून द्यायला आजीव विद्यमान असतोच—

"जन्मवरी मजसवें पहा ही तव चंचूची खूण"

मुलाच्या सुखाविषयीं वडिलांना वाटणारी काळजी ही त्यांच्या स्वार्थी ममतेहून अधिक बलवत्तर असते—

"विसर मला; परि अमर्याद जग; राही नित्य जपून्
वाऱ्यावरचा तरंग चंचळ जाशिल तूं भडकून"

आणि वियोगास तयार झालेलें त्यांचें मन पुन्हां शेवटीं म्हणतेंच कीं

"थांव येऊं दे रूप तुझें हें हृदयीं पूर्ण भरून!"

आमच्या मतें भावनेचा उत्कर्ष या ओळींत आहे. खाणें पिणें होऊन निघण्याची तयारी झाली, गाडींत सामान ठेविलें गेलें, मुलगा गाडींत बसला, गाडीवानानें रेना हातांत घेतल्या आणि गाडी आतां चालू होणार तोंच विवेकावर मात करणाऱ्या वेड्या प्रेमानें.

"थांब, घेऊं दे रूप तुझें हें हृदयीं पूर्ण भरून!"

असें म्हणावें यांतच अपत्यप्रेमाची परमावधि आहे!

या विवेचनांत पंक्तीचा क्रम २, १, ५, ६, ३, ४, असा घेतला असून ४ थ्या पंक्तींत भावनेचा उत्कर्ष म्हणून ती शेवटीं घेतली आहे. परंतु 'विसर मला, परि अमर्याद जग राही नित्य जपून' ही स्वार्थत्यागी

प्रेममूलक काळजी व्यक्त करणारी ओळही उत्कर्षदर्शक म्हणून घेतां येईल. तसें करायचें झाल्यास पंक्तीचा क्रम २, १, ५, ३, ४, ६ असा घ्यावा लागेल.

हे फेरफार कविता वाचणाऱ्यानें केवळ स्वतःकरितां म्हणून करून घेण्यासाठीं सुचविण्यांत आले आहेत. कवि आतां परलोकवासी असल्याकारणानें त्याचें आत्मसमर्थन कळणें अशक्य आहे. अशा स्थितींत कवितेंत फेरफार करणें म्हणजे गत कवीचा कांहीं अंशीं अनादरच होतो. तथापि कविता ही बहुजनसमाजाची असल्यामुळें भावनोत्कर्षाच्या दृष्टीनें सुचविण्यांत आलेल्या फेरफाराबद्दल कवीचे आप्त व स्नेही आमच्यावर रागावणार नाहींत अशी आम्हांला आशा आहे.

आतां, 'ये आतां, घे शेवटचे हे अश्रू दोन पिऊन्' ही एकच पंक्ती राहिली. टिळकांच्या रचनेंत ती शेवटीं आहे. हिच्यांत उत्कर्ष तर नाहींच, उलट कृत्रिमतेचा दोष आहे. मुलानें वडिलांचे शेवटचे दोन अश्रू पिणें म्हणजे काय? सबाष्प नेत्रांचें चुम्बन घेणें, का ते अश्रु हातानें पुसणें, का त्या अश्रूची स्मृति ठेवणें? स्मृति शेवटच्या अश्रूंचीच विशेष कां ठेवायची? मुलानें वडिलांच्या नेत्रांचें का होईना चुम्बन घेणें हें मराठी समाजांत अगदीं अस्वाभाविक दिसतें. शिवाय अश्रु पिणें हें जरा ओंगळच वाटतें. एकंदरींत विचार करतां ही पंक्ती नसती तर बरें झालें असतें.

प्रगतीचे कांहीं रसिक वाचक आम्हीं केलेल्या काव्यचिकित्सेचा परामर्श घेतात हें पाहून आम्हांला समाधान वाटतें व त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. त्यांनीं प्रकट केलेलीं भिन्न मतें हीं आम्हांस उद्बोधकच होतील. यांत शंका नाहीं.'पाखरा, येशिल का परतून्' या कवितेंतील उद्गार कुणी कुणाला उद्देशून काढिले असावेत याविषयीं रा. वाळके यांनीं केलेली कल्पना आम्हांला कधींही सुचली नाहीं त्यांच्या मतें एका तरुणतरुणीनें कांहीं काल परस्परांच्या सहवासांत काढल्यानंतर कांहीं आकस्मिक कारणानें परस्परांची ताटातूट होण्याचा समय आला असतांना निरोप देतांना नायकाला उद्देशून नायिकेनें काढलेले उद्गार प्रस्तुत काव्यांत ग्रथित झाले आहेत. या दृष्टीनें ती कविता आम्हीं पुन्हां वाचून पाहिली; परंतु रा. वाळके यांची सूचना पटत नाहीं. प्रेमाच्या खुणा या कुणीही कुणाला दिलेल्या असूं शकतात, चञ्चूच-

उपयोग परिपक्व फळांना क्षतें पाडण्याकरितांच असतो, अशी रा. वाळके यांची समजूत दिसते; परन्तु तें एक पक्ष्याचे शस्त्रही असतें; हें ते विसरलेले दिसतात; शिवाय त्यांच्या इच्छेप्रमाणें चञ्चूच्या खुणेवरून नायक-नायिकेमधील 'उपभोग-भाव सूचित आहे असें मानल्यास त्या ओळींतून ग्राम्य किळसवाणा ध्वनि निघतो व काव्यगुणाचा पार नाश होतो. शिवाय 'राही नित्य जपून' हे शब्द वडील माणसाच्या तोंडीं जितके स्वाभाविक वाटतात तितके नायिकेच्या तोंडीं वाटत नाहींत. नायिका नायकास उद्देशून 'तूं सुखी ऐस' असें म्हणेल; 'स्वत:स जप हं' असें म्हणणार नाहीं. हे शब्द कुणाला उद्देशून उच्चारले जातात, तर ज्याला स्वत:ची काळजी घेतां येत नाहीं असें पोक्तपणामुळें आपल्याला वाटतें त्याला.

प्रस्तुत कविता मूलतः बालकवीस उद्देशून आहे, असा जो समज आहे तो खोटा आहे असें विधान आम्हीं मुळींच केलेलें नाहीं. आमचें म्हणणें एवढेंच कीं, कविता मूलतः जरी बालकवीस उद्देशून लिहिलेली असली तरी त्या माहितीनें कविता अधिक परिणामकारक होते असें मुळींच नाहीं. ज्या व्यक्तीविषयीं आपल्याला वात्सल्य वाटतें, ती आपल्या पोटचीच असली पाहिजे असें नाहीं. तिनें अंत:स्फूर्तीनें दूर जाण्यास झटावें, तीस जवळ ओढण्याचा प्रयत्न करावा, या स्वाभाविक ओढाताणींत त्या व्यक्तीनें रागावून कांहीं तरी वाग्ताडन करून आपला हट्ट शेवटास नेण्याची तयारी करावी व आपण नाइलाजानें आणि रागावून गेल्यास पुन्हां कधींच परत फिरणार नाहीं या भीतीनें साशीर्वाद निरोप देण्यास प्रवर्तावें, हा प्रकार प्रत्येकाच्या आयुष्यांत केव्हांतरी घडतोच. टिळक आणि बालकवी यांच्यांत मित्रभाव असला तरी वयांतील अंतरामुळें टिळकांना वात्सल्यच वाटणें स्वाभाविक आहे; बरोबरी वाटणें शक्य नाहीं. आम्हीं 'वडील' हा शब्द मुद्दामच वापरिला आहे व कवी व काव्य—विषय यांच्यांत पिता-पुत्राचें व माता पुत्राचेंच नातें घेतलें पाहिजे असें आम्हांलाही मुळींच वाटत नाहीं.

रा. प्रधान यांनीं एक चिन्तनीय प्रश्न उपस्थित केला आहे. ते म्हणतात, "श्री. प. यांनीं कवितेच्या ओळींचा क्रम लावण्याचा जो प्रयत्न केला आहे तो तितकासा वाजवी नाहीं. भावनेची प्रस्फुटता ही विशिष्ट प्रकृतीवर अवलंबित राहील. लष्करी शिस्तीनें भावनांची रांग उभी करण्याचा प्रयत्न

क्वचितच हृदयस्पर्शी होईल. जें जें मनीं मुखीं येईल त्यालाच सफाईदार काव्यप्रबंधांत गोंविल्यानें एक तऱ्हेचें गूढ सौंदर्य उत्पन्न करितां येतें. या कविताच सहजस्फूर्त असल्यानें त्या आहेत तशा स्वीकारण्यांतच अधिक रसिकता आहे."

प्रथम हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं 'सहजस्फूर्त' व 'कृत्रिम' या शब्दांची योजना नेहमीं सापेक्ष असते. ज्या वेळीं भावना प्रक्षुब्ध होतात त्या वेळीं कवि इतर माणसांप्रमाणेंच वागतो, तो कांहीं टांक, कागद घेऊन आधीं कविता लिहायला बसत नाहीं. आपल्या आवडत्या माणसाला निरोप देतांना कवीला जें दुःख होतें त्यांत त्याला वृत्तयमकाची उपस्थिति होत नाहीं. कवितेचा उगम भावनेच्या क्षोभापासून असतो हें खरें आहे; परन्तु हा क्षोभ अप्रत्यक्ष असतो.

खरोखरीच्या जगांत एखादा सुधाकर पशु होऊन सिंधूला व तिच्या पोराला मारतांना दिसला तर सहानुभूतीनें आपण धांवून जाऊन मायलेकांना सोडवूं. त्या वेळीं आपली सहानुभूति कर्मप्रेरक असते. परन्तु रंगभूमीवर तोच प्रकार पाहून आपण खुर्चीवर बसूनच राहतों. आपल्याला सहानुभूति वाटत नाहीं असें नाहीं; व वाटते ती सहानुभूति खोटी व कृत्रिम असते असेंही नाहीं. नाटकगृहांत त्या वेळीं जे अर्धस्फुट हुंदके ऐकूं येतात, जे पाण्यानें भरलेले डोळे दिसतात ते त्या सहानुभूतीचा जिव्हाळाच व्यक्त करितात. या सहानुभूतीसच आम्ही अप्रत्यक्ष सहानुभूति म्हटलें आहे. या अप्रत्यक्ष भावनोद्रेकासच वर्डस्वर्थनें शांतपणानें स्मरणांत आलेला भाव (emotion-recollected in tranquillity) म्हटलें आहे. हा अप्रत्यक्ष भावनोद्रेक ज्या गीतांत साधारण सहृदय वाचकास प्रतीत होतो त्या गीतास आपण जिवंत व सहजस्फूर्त म्हणतों; आणि जोंपर्यंत त्या भावनेस विरोधक विसंवादी असें कांहीं आपणांस आढळत नाहीं तोंपर्यंत अस्वाभाविकतेचा व कृत्रिमतेचा आरोप आपण करीत नाहीं. भावनेच्या पहिल्या उमाळ्याबरोबर एखाद्या विशिष्ट आंदोलनांत बसणारी ओळ स्फुरेल; परन्तु त्याच भावनेच्या ओघाबरोबर मागाहून स्फुरणारीं वाक्यें त्याच आंदोलनांत येतील असें नाहीं. तसें नसतें तर अनेकदां प्रत्येक मनुष्याचें भाषण काव्यमय व पद्यात्मकच स्फुरलें असतें, पण तसें प्रत्ययास येत नाहीं. संवयीनें पद्यरचना सफाईनें करितां

आली तरी तिच्यांतील मुलभूत कृत्रिमता नष्ट होऊं शकत नाहीं. स्फूर्तीचे बोल सफाईदार काव्यप्रबंधांत गोंवल्यानें एक तऱ्हेचें गूढ सौंदर्य उत्पन्न करितां येतें, असें रा. प्रधान म्हणतात; पण गोंवणें आणि उत्पन्न करणें हे शब्दच सहेतुक क्रिया व्यक्त करितात. कोणत्याही कलाकृतींत स्फूर्ति आणि विचार यांचा संगम असतो. ती अंशतः सहजस्फूर्त व स्वाभाविक असते आणि अंशतः बुद्धिघटित व कृत्रिम असते. एखाद्या उत्कृष्ट कवीच्या कवितांचीं पूर्वस्वरूपें जर पहायला मिळालीं तर त्यांत त्यानें वेळोवेळीं किती तरी फरक केलेले आढळतील. टेनिसन तर विचार करून किती काळजीनें आपल्या काव्यांचें संस्करण परिष्करण करीत असे. अर्थात् पंक्ति जशा स्फुरल्या तशाच त्या स्वीकारण्यांत अधिक रसिकता आहे असें रा. प्रधान यांस वाटत असलें तरी क्वचितच एखाद्या कवीस तसें वाटत असेल. लष्करी शिस्तीनें भावनांची रांग उभी करण्याचा प्रयत्न क्वचितच हृदयस्पर्शी होईल असें रा. प्रधान यांचें मत आहे. निराळ्या शब्दांनीं सांगायचें म्हणजे टिळकांच्या कवितेंतील पंक्तीचा क्रम बदलला तर त्या कवितेचा हृदयस्पर्शीपणा नाहींसा होईल अशी त्यांस भीति वाटते. ही भीति स्वाभाविक असली तरी निराधार आहे.

एखादी कविता वाचून आपल्याला ती आवडली कीं आपण सामान्यतः तिच्या बाबतींत थोडे अन्ध होतों. आहे त्या स्थितींत आपण तिच्यावर प्रेम करूं लागल्यामुळें आहे त्या स्थितींतच ती आपणास सुंदर वाटते आणि तिच्यांत कुणी कांहीं फेरफार सुचविला तर पारिचयामुळें व आपुलकीमुळें त्या फेरफाराचा तौलनिक दृष्ट्या विचारा करायला आपण असमर्थ होतों. परंतु एखाद्या कवितेचें मूल रूप व सुसंस्कृत रूप अशीं दोन्हीं रूपें एकदम पाहिल्यानेंच एखाद्या नवख्या रसज्ञासभोर ठेविलीं तर तो मात्र सहानुभूतीनें पण निःपक्षपणानें तुलना करून कलादृष्ट्या कोणतें रूप अधिक ग्राह्य हें सांगूं शकेल. लोकप्रिय कवितांच्या बाबतींत बरेच लोक आधींच पूर्वग्रहदूषित असतात. परंतु या पूर्वग्रहाची जाणीव न राहिल्यामुळेंच सहजस्फूर्तीचें स्तोम माजविलें जाऊन 'ह्या कविताच सहजस्फूर्त असल्यानें त्या आहेत तशा स्वीकारण्यांतच अधिक रसिकता आहे' असें वाटूं लागतें. आहे त्या क्रमानें ओळी वाचल्या तर परिणाम फारसा होत नाहीं असें

आमचें म्हणणें नाहीं. आम्हीं सुचविलेल्या क्रमानें ओळी घेऊन कविता वाचली तर ती अधिक परिणामकारक होते, एवढेंच आमचें म्हणणें आहे.

' ये आतां, घे शेवटचे हे अश्रू देान पिऊन् ' या ओळीचें समर्थन करितांना रा. प्रधान म्हणतात, " लाक्षणिक रीत्या अश्रू पिऊन घे म्हटलें म्हणजे अश्रू घ्यावयालाच पाहिजेत असें नाहीं. तर, माझ्या डोळ्यांत प्रेमातिशयानें तरारलेल्या या अश्रूंची जाणीव तुझ्या मनांत कायम राहूं दे, एवढाच हेतु असला पाहिजे. " आतां ' विसर मला परि अमर्याद जग राही नित्य जपून् ' या उक्तीनंतर स्वाभाविकपणें एकच उक्ति सम्भवते. ती हीच कीं, ' जातोस तर जा; पण असा रागावून उपाशीं पोटीं जाऊं नकोस; या घरांत शेवटले चार घांस आनंदानें खा व जा. ' अर्थात् अखेरची जी वस्तु ग्रहण करून जाण्याची विनंति पांखरास होते ती वस्तु ग्राह्य व त्या पांखराच्या विशेष आवडीची असली पाहिजे. अश्रूस अशा इष्ट, ग्राह्य व पोषक वस्तूंच्या कोटींत घालतां येईल काय ? मुलाला सुखानें—महत्यागपूर्वक आपलें स्वाभाविक दुःख क्षणभर आंतल्या आंत दाबून सुखासमाधानानें निरोप देण्यांतच वडिलांच्या गाढ प्रेमाची परमावधि असते. ' मला विसर पण स्वतःला जप ' असें म्हटल्यानंतर ' पण जातां जातां माझ्या शोकाचें विस्मरण होऊं देऊं नकोस हं ' असें करुणास्पद स्वार्थानें विनविणें म्हणजे शुद्ध रसापकर्ष होय. अश्रू-मौक्तिकांचा चारा खाऊन राजहंस निजला ही गोविंदाग्रजांची ओळ वाचून कित्येक त्या कल्पनेंतील चमत्कारिक अभिनवतेवरच भाळून त्या कल्पनेची युक्तायुक्तता पाहण्यास असमर्थ होतात; तोच प्रकार या अश्रू पानाच्या बाबतींत झाला आहे.

"गाई घरा आल्या" : : १४

आधुनिक मराठी कविता महाराष्ट्रीयांच्या हृदयाला सर्वत्र जाऊन भिडलेली कां दिसत नाहीं? महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतही आणि अशिक्षित खेडवळांच्या संभाषणांतही तुकारामाच्या उक्ति जशा मध्येंच आढळतात तशा केशवसुतांच्या अथवा गोविंदाग्रजांच्या कां आढळूं नयेत? आधुनिक मराठी कवितेला कोणत्याही धार्मिक संप्रदायाचें पाठबळ नाहीं, नाहींतर श्री. विठ्ठलराव घाटे यांची 'प्रेमानें भ्याऊं' ही कविता ख्रिस्ती समाजाच्या भजनावलींत जाऊन बसल्यामुळें त्या समाजाच्या परिचयाची झाली आहे त्याप्रमाणें इतर कवींच्या कृतीही फैलावल्या असत्या. पण कोणत्याही धार्मिक संप्रदायाशीं फारकत हें एक कारण झालें; आणि तें तितकें सबळ नाहीं. गणपतीचे मेळे आणि प्रभातफेऱ्या यांच्या साह्यानें कित्येक पदें फैलावतात पण तीं लोकांच्या हृदयांत मूळ धरीत नाहींत. ज्या विद्येच्या अर्जनामुळें आधुनिक मराठी कवितेला सध्यांचें विशिष्ट स्वरूप प्राप्त झालें आहे ती विद्या अजून खेड्यांपाड्यांतून व अगदीं निकृष्ट वर्गापर्यंत जाऊन पोंचली नाहीं, हें दुसरें कारण आहे. पण हें कारणही तितकें सबळ नाहीं. सुशिक्षित आंग्लविद्याविभूषित लोकांतही खास मराठी कवितेचे शोकी वगळले तर आधुनिक मराठी कवितेचे संस्कार दृष्टीस पडत नाहींत. कारण इंग्रजी येत असलें आणि वाचनाची आवड असली म्हणजे इंग्रजी तऱ्हेच्या मराठी फिक्या कविता वाचण्यापेक्षां इंग्रजी कवींच्या कविताच वाचणें अधिक प्रिय वाटतें. आधुनिक मराठी कविता अजून महाराष्ट्राच्या हाडींमासीं भिनून पोषक झालेली नाहीं याचें मुख्य कारण ती अस्सल स्वदेशी नाहीं हें होय.

आमच्या कवींना स्फूर्ति परदेशी ग्रंथांच्या वाचनानें झालेली आहे. राष्ट्रीय व वैयाक्तिक जीवनांतील अनुभूतीच्या क्षेत्रांत ती उगवलेली नाहीं. कवींची दृष्टि, काय आहे यांच्यापेक्षां टूम कोणती आणि खपेल काय यावरच अधिक खिळलेली आहे. आतां कलाकृति ही सुशिक्षित व अशिक्षित, नागर व जानपद साऱ्यांना सारखीच गम्य व रम्य वाटली पाहिजे असें नाहीं. विद्या आणि संस्कृति यांच्या भेदामुळें अभिरुचींत थोडा फार फरक पडतो; पण उत्कृष्ट कलेच्या नमुन्यांत कांहीं तरी तसें असायला पाहिजे कीं, जें अशिक्षित व खेडवळ मनुष्यालाही स्थूलपणें मोहित करील.

प्रो. मायदेव यांची ' गाई घरा आल्या ' ही कविता स्त्री-पुरुष, सुशिक्षित-अशिक्षित, शहरी-खेळवळ सर्व लोकांना रुचेल व पटेल अशी आहे. संध्याकाळ झाली पण बाहेर गेलेला मुलगा अजून कां आला नाहीं म्हणून आईला वाटणारी हुरहूर सार्वत्रिक आहे; आणि या भावनेचें आविष्करण ज्या स्वरूपांत केलेलें आहे तें स्वरूप घरगुती, सर्वांच्या परिचयाचें असूनही काव्यमय आहे. महात्मा गांधी यांचें असें म्हणणें आहे कीं, खेड्यांपाड्यांतून घरोघरीं चरख्याचा प्रसार होऊन तो यशस्वी व्हावा अशी जर इच्छा असेल तर तो चरखा केवळ भरपूर काम देणारा असून भागणार नाहीं. तो इतका साधा असला पाहिजे कीं त्याची निपज व दुरुस्ती हीं खेड्यांतल्या खेड्यांत सहज होऊं शकावींत. त्याचप्रमाणें कविताप्रसार खेड्यांपाड्यांतून व घरोघरीं व्हावा अशी इच्छा असली तर ती कविता केवळ जिवंत वैशिष्ट्य-युक्त असून भागणार नाहीं; ती जानपद अपभ्रष्ट भाषेंतच असली पाहिजे असें नाहीं पण ती सरळ, सुबोध व जिव्हाळ्याची वाटेल अशी असायला पाहिजे. अशा कवितेला जन्म देणाऱ्या प्रतिभेची वाढ जानपद रहाणीशीं निकट परिचयांत व्हायला पाहिजे. नाहींतर इंग्रजींत गोप-गीतें आहेत म्हणून इकडे गोप-गीतें लिहिलीं; मग इकडील गोप-जीविताचा त्यांच्याशीं संबंधही नसेना का, अशा नकलीगोप-गीतांनीं, कृषिगीतांनीं किंवा थोडक्यांत सांगायचें म्हणजे जानपद-गीतांनीं कोणताही कार्यभाग साधारण नाहीं.

' पहिली माझी ओंवी । पहिला माझा नेम । तुळशीखालीं राम । पोथी वाचे ' इत्यादि ओंव्या म्हणत आपल्या भावंडांना घेऊन झोंपाळ्यावर बसलेल्या मुलींना कुणी पाहिलें नाहीं ! प्रो. मायदेव यांनीं आपल्या कवितेसाठीं

याच सुखी बालपणापासून परिचित असलेल्या छंदाची योजना केली आहे. बायकांच्या गीतांतील गोकुळही या छंदाइतकेंच परिचयाचें आहे. प्रत्येक आईला आपल्या दूर गेलेल्या मुलाविषयीं वाटणारी हुरहूर या कवितेंत यशोदेच्या तोंडून वदविली आहे. मुलींच्या ओव्यांतील कांहीं भाग सारखा पुनरुक्त होतो, त्या पद्धतीचें उचित अनुकरण या कवितेंत आहे. गाई घरा आल्या पण अजून कृष्ण आला नाहीं त्यामुळें वाटणारी हुरहूर ज्या गोष्टीमुळें तीव्रपणें प्रतीत झाली ती गोष्ट, म्हणजे 'गाई घरा आल्या' ही गोष्ट, गाण्यातील ठेक्याप्रमाणें सारखी पुनरुक्त होऊन गाण्याच्या बहारींत भरच टाकते. अशा रीतीनें एकीकडे येणारा सारखेपणा कंटाळवाणा होऊं नये इतकेंच नव्हे तर विशेष खुलून दिसावा म्हणून दुसरीकडे प्रत्येक ओंवींत कृष्णासाठीं भिन्न भिन्न नांवाचा उपयोग केला आहे. एकीकडे गाई घरीं आल्यापासून कृष्णासाठीं दूधवाटी काढून ठेवीपर्यंत गोठ्यांत ज्या आनंददायक गोष्टी घडतात त्याचें हृदयंगम वर्णन आहे तर दुसरीकडे हळुहळू वेळ चाललेला पाहून यशोदेची हूरहूर वाढते, तिचें करुणाजनक वर्णन आहे. इतकेंच नव्हे तर गोठ्यातील स्थिती व यशोदेचे उद्गार यांच्यांत साधर्म्य सूचित करण्याचाहि प्रयत्न केला आहे. तो सर्व ओव्यांत मात्र साधला नाहीं. गाईच्या गळ्यांतील घंटा वाजूं लागल्या पण कृष्णा तुला कुठें रे हाक मारूं? घुळीमुळें चहूंकडे श्यामलता पसरली आहे पण घनश्याम कृष्ण कोठें आहे? होतां होता साजवातही झाली. इतक्यांत पालीची चुकचुक कानीं पडल्याबरोबर यशोदेच्या अतिस्नेहामुळें पापशंकी झालेल्या हृदयांत चर्र होतें आणि ती म्हणते 'राख अंबे, माझा हरि असें तेथें' या कवितेच्या शेवटच्या ओळींतच भावनेचा उत्कर्ष आहे.

ही कविता उत्कृष्ट आहे. सहजसंभवता आणि सहेतुक करामत या दोन्ही गोष्टींचा येथें प्रीतिसंगम आहे. या कृषिप्रधान देशांत या कवितेंतील वातावरण सदैव परिचयाचें व हृदयंगम राहील. कांहीं क्षुल्लक बाह्य दोष आढळतात ते मात्र दाखविले पाहिजेत. ते सहज दूर करतां येण्याजोगे आहेत; शिवाय हे दोष न दाखविले तर पक्षपाताचा आरोप होऊन काव्याचिकित्सा संशयास्पद ठरेल. कृष्णासाठीं जीं भिन्न नांवें योजिलीं आहेत त्यांतील 'घनश्याम' व 'घननील' यांतील भेद केवळ शाब्दिक आहे.

एकनाथकालीन कवितेंत कालविपर्यासाचा दोष घडला तरी सामान्य अशिक्षणाच्या काळांत तो जसा सहज पचत असे तसा तो हल्लींच्या चिकित्सक युगांत पचणार नाहीं. अल्पांशानें कां होईना पण तो विरस केल्यावांचून रहात नाहीं. गोकुळांतील कृष्णाला, वासुदेवाला गोविंद, हरी, मुकुंद, हृषिकेशी म्हटलें तर चालेल; पण हीं नांवेंही घनश्याम वनमाळी या नांवांइतकीं उचित नाहींत. यशोदेचा कृष्ण हा वस्तुतः वसुदेवदेवकीचा वासुदेव होता. हें तीस ठाऊक नव्हतें. तें ठाऊक असतें तर कृष्णाबद्दल तिला इतकी पोटाग वाटली नसती. त्यांतूनहि यशोदेनें कृष्णाला यदु—नाथ म्हणावें हें तर अत्यंत अनुचित होय. तथापि यशोदेच्या दधिमंथनाचें वर्णन करण्याच्या भरांत 'घुसळतां कुचकुंभहि हालती। अमृत ज्यांतिल घे कमलापती' या ठिकाणीं वामनपंडितानें बालकृष्णाला कमलापति हें नांव दिल्यानें कमलेचा पति होण्याइतका मोठा कृष्ण डोळ्यापुढें उभा राहून जो विरस होतो तो यदुनाथ या अभिधानानें होत नाहीं.

दुसरा क्षुद्र दोष छन्दाविषयीं आहे. ओवीच्या मधल्या ओळी अष्टाक्षरी आहेत हें उघड आहे. परंतु 'वासरें हंबरती' या ओळींत एक अक्षर कमी आहे तर 'झाली बाई कातर वेळ' या ओळींत एक अधिक आहे.

कविता उत्कृष्ट आहे. दोष क्षुद्र आहेत. प्रेम दोघांचेहि गुण करितें; पण सौंदर्यनिष्ठा तें कार्य करीत नाहीं. दोष क्षुद्र असले तरी पूर्णतेंत तेवढीच उणीव राहते. उजेड पडला तरी त्रयोदशी—चतुर्दशीच्या चंद्राला पौर्णिमेच्या चंद्राची सर येत नाहीं.

काव्यप्रेमी मित्र हो,

या महाराष्ट्र–साहित्य–सम्मेलनांतील काव्यविभागाचें अध्यक्षपद देऊन, आपण जो माझा सन्मान केला आहे त्याकरितां मी आपला फार ऋणी आहें. हा सन्मान कोठेंही झाला असता तरी त्यापासून आनन्दच झाला असता; परन्तु हा सन्मान येथें अनुभविण्यांत मला विशेष आनन्द वाटतो. गेलीं अठरा वर्षें चरितार्थासाठीं जरी निरनिराळ्या ठिकाणीं मी वसणूक केली असली तरी माझा जन्म, माझें शिक्षण आणि संस्करण हीं येथेंच झालीं आहेत. तेव्हां व्यक्तिशः मी मूळचा बडोदेकर आहें हें आपल्यांपैकीं पुष्कळ जणांना विदित नसेल. हें तसें विदित असतें तर हें पद आपण एखाद्या निर्भेळ परस्थाला दिलें असतें आणि तसें करणें उचितहि झालें असतें, पण मग घरच्यांनीं स्वयंस्फूर्तीनें आपलें कोडकौतुक केलेलें पहाण्याचा हा जो दुर्मिळ योग मला लाभला आहे त्याला मी मुकलों असतों. असो; झालें तें माझ्या दृष्टीनें हिताचेंच झालें. तथापि आज आपल्या पुढें उभें राहून हें भाषण करितांना मला खरोखरीच फार सङ्कोच वाटतो. कारण, माझ्यापेक्षां वयानेंच केवळ नव्हे तर वृत्तीच्या सहृदयतेनें आणि कृतीच्या सरसतेनेंहि श्रेष्ठ असे जे एक कविराज आपल्या या राजधानींत राजकवि आहेत, त्यांचा मला विसर पडूं शकत नाहीं; आणि या उच्चपदावर चढल्यावरही डोळे फिरून जाऊं शकत नाहींत.

काव्यप्रेमी जनहो, या स्थानावरून भाषण करायला जरी मला सङ्कोच वाटत असला तरी जें अन्तःकरणाला पटतें तेंच निर्भीडपणानें बोलण्याचें माझें कर्तव्य मी करणार आहें. मी स्वतः पद्यरचना केली आहे, आणि तिच्याच

भाग्यानें मी आज येथें आपल्यापुढें उभा आहें. आधुनिक कवितेविषयीं मीं जें कांहीं म्हणेन तें माझ्याच पद्यरचनेला लागूं पडण्याचा पूर्ण संभव आहे हें मी जाणतों. तेव्हां माझ्याच विचारसरणीचा अवलंब करून उद्यां कोणी जर प्रामाणिकपणानें माझ्या कवितेची संभावना केली तर मला त्याचा राग येऊं नये आणि तो येणारही नाहीं. वैयक्तिक स्वार्थाला केव्हांही तत्त्वचर्चेच्या क्षेत्राबाहेरच ठेविलें पाहिजे.

मराठी कवितेची स्थिति एकन्दरीनें पाहतां असमाधानकारक सुतराम् नाहीं. कादम्बरीच्या क्षेत्रांत जशी एकदम पिछेहाट झालेली दिसते तशी काव्याच्या क्षेत्रांत अगदीं दिसत नाहीं. हळुहळू कां होईना, पण उत्तरोत्तर स्पृहणीय अशी प्रगतीच होत आलेली आहे. याक्षणीं मात्र लघुकथेला पूर आल्यामुळें काव्याचा प्रवाह अरुन्द आणि मन्दावल्यासारखा दिसतो. संस्कृत सारस्वताचा आस्वाद घेतल्यावर तशा प्रकारची प्रौढ, भव्य आणि सालङ्कृत रचना मराठींत व्हायला हवी अशी सदिच्छा, इंग्रजी राजवटीच्या प्रथमावस्थेंत शास्त्रिकवींना होऊन त्यांनीं भाषान्तरित वा स्वतन्त्र रचना केली, परंतु इंग्रजी राजवटींत इंग्रजी वाङ्मयाचा परिचय स्वाभाविकपणेंच अधिक प्रभावी ठरला. खिस्त शकाच्या विसाव्या शतकाच्या पहिल्या पादांतील कांहीं कवींशीं झालेल्या त्रोटक परिचयामुळें हुरळून जाऊन तशाच धर्तीचीं परन्तु मराठींत अभिनव, अशीं त्रुटित भावगीतें, व्यक्तीच्या आणि सृष्टीच्या संसारांतलि सामान्य गोष्टींवर लिहिण्याचा सम्प्रदाय स्थापन झाला; आणि केशव-सुतांच्या कामगिरीमुळें वा सम्प्रदायाला केशवसुतांचें नांव मिळालें.आपल्या भाव-ना भावगीतांत अधिक निर्भींडपणानें अधिक उघडपणानें आणि अधिक खरेपणानें भाण्डणारे कवि १९२०च्या सुमारास पुढें येऊं लागले. यांच्यापैकीं ताम्बे आणि यशवन्त यांनीं अपूर्व यश मिळविलें आणि तें यश अद्यापि अम्लान आहे. गिरीश यांनीं 'अभागी कमल' प्रसिद्ध करून वाचनीय दीर्घ काव्याला पुन्हां चालना दिली. रविकिरणमण्डळांतील कवींच्या भावगीतांचें विलक्षण यश डोळ्यांवर आल्यामुळेंच केशवकुमारांना काव्यप्रान्तांतील आपलें क्षेत्र सांपडलें आणि त्यांनीं 'झेंडूचीं फुलें' फुलविलीं. दत्त, ताम्बे, मायदेव इत्यादिकांनीं शिशु-गीताच्या क्षेत्रांत स्पृहणीय कामगिरी करून कवितेची रंजकता मुलांपर्यंत पोंचविली. निशिगंध कवींनीं आपल्या प्रेमोद्गारांत स्वभावोक्तीची नवलाई

दाखविली आहे. भाषान्तराचें महत्त्व थोडें नाहीं; परन्तु भाषान्तरापासून कार्याच्या बिकटपणाच्या मानानें लाभ होत नाहीं. भाषान्तराकडे कवींचें लक्ष फारसें जात नाहीं. अलीकडील भाषान्तरांत श्रीखण्डेकृत सुश्लोकगोविंद हें गीतगोविन्दाचें भाषान्तर सरस, वाचनीय आहे. आत्मप्रकटीकरणांत अनन्त काणेकर यांनीं हृदयंगम वैशिष्ट्य व्यक्त केल्यामुळें रसिकांनीं त्यांच्या 'चान्दरातीं' त संस्मरणीय कोजागिरी साजरी केली. आजहि कांहीं होतकरू कवि ललितलुलित प्रेमकूजन करून आपल्या भवितव्याविषयीं मोठी आशा उत्पन्न करीत आहेत. होतकरू हें विशेषण कदाचित् त्यांच्या स्वाभिमानाला बोचेल या भीतीनें त्यांचीं नांवें आतां घेत नाहीं. तथापि सुसंस्कृत 'विरहि-विलापा' पासून अशिक्षित 'कोळ्याच्या गाण्या' पर्यंत मराठी कवितेचें पाऊल पुढेंच पडत आलेलें आहे. उत्कृष्ट आधुनिक भावगीतांचा संग्रह छापून प्रकाशित केल्यास तो दोनशें-अडीचशें पृष्ठांचा ग्रन्थ होईल अशी आशा आहे.

छन्दाच्या विविधतेंत तर आश्चर्यकारक वाढ झाली आहे. वृत्तांच्यावरील आपलें प्रभुत्व न गमावितां कवींनीं विविध जातींत, जुन्या नव्या चालींवर म्हणावयाची अशी विपुल रचना केली आहे. अक्षरसंख्यांक छन्दांचाहि योग्य पुरस्कार यवतमाळचे कवि वामन नारायण देशपांडे हे करीत आहेत. मुक्तछन्दासाठींहि श्री. व्यंकटेश शंकर वकील, आत्माराम रावजी देशपांडे, भवानीशंकर पंडित इत्यादि कवि निरनिराळे प्रयोग करून पहात आहेत. कवि टेकाडे, मायदेव, यशवंत, गिरीश, सोपानदेव चौधरी, कु. संजीवनी मराठे इत्यादिकांच्या काव्यगायनाला अलोट जनसमूह, स्त्रीपुरुषांचा मिश्रसमाज लोटतांना दिसत आहे. सारेच रसिक आतां फुकटखाऊ राहिले नाहींत. तीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या एका कविद्वयाच्या काव्यसंग्रहाच्या अवघ्या तीन प्रति तेव्हां खपल्या म्हणजे विकत गेल्या असें ऐकतों; आणि उर्वरित प्रती मग खपवाव्या लागल्या. ती स्थिति आतां पार पालटली आहे. केशवसुत, विनायक, गोविंदाग्रज, मायदेव, यशवंत, गिरीश आणि केशवकुमार यांच्या कृतींना पुनरावृत्तीचें भाग्य लाभलें आहे; आणि जळगांवचे कवि तिवारी, यांच्या संग्रामगीतांची तर सातवी आवृत्ति चालू असून आतांपर्यंत सात सहस्रांवर प्रती खपल्या आहेत. कवितांना मूल्य मिळणार नाहीं असें छाती-

ठोकपणें बजावणाऱ्या मासिकाच्या प्रकाशकाला आतां, क्रमिक शालेय पुस्तकें करितांना का होईना पण आधुनिक कवींना पैका वेचावा लागत आहे. एकीकडे अज्ञात राहून भीतभीत पण उत्कट उत्साहानें व भाषाभिमानानें, आपल्या आणि आपल्यासारख्या चार स्नेह्यांच्या रञ्जनासाठीं कविता रचित रहाण्याचा काळ सम्पून, कवींचा संचार यशस्वी होऊं लागला आहे. राजसभांतूनही कवींची संभावना होऊं लागली आहे. कांहीं महिन्यांपूर्वी औंधास, थोरल्या महाराजांच्या उत्सवांत राजपौत्री कुमारी अक्काराजे पंत यांना आपल्या सुश्राव्य कविता आराजरङ्क श्रोत्यांपुढें म्हणून दाखवितांना पाहून मराठी कवितेचा विजयकाल आला असेंच माझ्याप्रमाणें तेथें बसलेल्या प्रत्येक कवितेच्या कैवाऱ्याला वाटलें असेल.

हें सारें खरें; तथापि एकंदरीनें पाहतां मराठी कविता ही एका मोठ्या दोषानें ग्रस्त आहे आणि त्यामुळेंच तिचा प्रभाव अत्यंत मर्यादित राहिलेला आहे हेंहि कांहीं खोटें नाहीं. ज्यांच्या मनावर इंग्रजी वाङ्मयाचा थोडासा संस्कार झाला आहे आणि जे संसाराच्या झळीपासून दूर अशा कौमार-कालांतील काव्यात्मशीतल वातावरणांत गुंगत आहेत अशा अल्पसंख्य लोकांनाच आधुनिक कवितेची थोडी चटक लागलेली दिसते. या बहुरंगी जीविताचे जे प्रत्यक्ष कडूगोड अनुभव घेत आहेत अशांना आधुनिक कविता अद्यापि जिव्हाळ्याची वाटत नाहीं. ज्यांचा इंग्रजीशीं कांहीं परिचय नाहीं अशांना आधुनिक कवितेंत कांहीं गम्य वाटत नाहीं आणि ज्यांचा इंग्रजी वाङ्मयाशीं दाट परिचय आहे अशांना तींत कांहींच नवीन व रम्य वाटत नाहीं.

याचें कारण काय? परपुष्टता, अनुकरणशीलता हा प्राचीन मराठी कवितेचा मोठा दोष म्हणून दाखविण्यांत येतो. परंतु आधुनिक कविता हाहि या दोषापासून अलिप्त दिसत नाहीं. शास्त्रिकवींनीं संस्कृत आदर्शभूत काव्यांच्या धर्तीवर मराठी काव्यें रचण्याचा प्रयत्न केला. केशवसुतादि कवींनीं कांहीं इंग्रजी कवींच्या थोड्या कवितांच्या धर्तीवर मराठींत रचना करण्याचा उद्योग केला. ही दोन्ही प्रकारची रचना, जेथें ती भाषान्तरित नाहीं तेथें ती भाषान्तरित नाहीं एवढ्या एकाच कारणासाठीं स्वतंत्र मानावयाची असते. परंतु वस्तुतः तिच्यांत पृथगात्मता नाहीं. तिच्यांत ध्वनि नाहीं, प्रतिध्वनि मात्र

आहेत. खेड्यांतील जीवन नागर जीवनापेक्षां अधिक निरामय व सुखकर आहे सृष्टीशीं तादात्म्य पावल्यानें सृष्टि गूढ तत्त्वें शिकविते, बालपणांत व्यक्ति स्वर्गाच्या जवळ असल्यानें तिच्या निष्पाप दृष्टीला स्वर्गातील दृश्यें दिसत असतात, रूढिभंजनाविना तरणोपाय नाहीं, स्त्रियांना पारतंत्र्यांत ठेवून राष्ट्र स्वतंत्र व पराक्रमशील होऊं शकत नाहीं, जगभर समता, बंधुता आणि शांतता या त्रयीचें साम्राज्य स्थापिलें पाहिजे इत्यादि कल्पना इंग्रजी वाङ्मयांतून, कित्येक तर जवळ जवळ शंभर वर्षांच्या शिळ्या आणि टाकाऊ झाल्यानंतर, महाराष्ट्रीय कवींनीं ऊनऊन म्हणून मोठ्या उत्साहानें उचलल्या आणि नव्या जोमानें मराठींत मांडल्या. या कल्पना इंग्रजी वाङ्मयावरून सुचल्या, त्या कवीच्या वैयक्तिक व राष्ट्रीय संसारांतून स्फुरल्या नाहींत. त्या कितपत साधार आहेत, मराठी जीवनाशीं कितपत सुसंबद्ध आहेत याचा विचारच झाला नाहीं. आमचे कवि या कल्पनांना भाळले आणि त्यांनीं त्यांचा अनुवाद केला. ही हुरळणूक ज्या मानानें हार्दिक होती त्या मानानें कृति हृदयंगम वठली; परंतु ज्या मानानें ती बहुजनसमाजाच्या प्रत्यक्ष जीवनाशीं अलग वा विसंगत राहिली त्या मानानें तिचा प्रभाव मर्यादित राहिला. केशवसुतांची हुरळणूक हार्दिक आहे. ते मूळ इंग्रजी कवितेवर खरे भाळले पण त्यांनीं भोंवतालच्या सृष्टीचें थोडें तरी ममत्वानें निरीक्षण केलें होतें हें 'नैऋत्य दिशेकडील वारा' आणि 'वातचक्र' इत्यादि कवितांवरून स्पष्ट दिसतें. पण इतरांनीं केशवसुतांचाच अनुवाद करायला आरंभ केला. पाश्चात्य कल्पनांचा हा प्रवाह आमच्या राष्ट्रीय जीवनांत भिनून नवीन जीवनसृष्टि निर्माण होण्याच्या पूर्वीच बाष्पीभूत झाला; आणि अनुकरणाचीं अनुकरणें होऊं लागलीं. दुथडी समृद्धि पिकविणाऱ्या जिवंत काव्यगंगेच्या ओघाच्या ठिकाणीं मृगजलाचे विलास मात्र दिसूं लागले.

पुस्तकांतून स्फूर्ति घेऊन अनुकरणाचें अनुकरण करण्याची ही संवय फार खोल रुजलेली आणि फार दूरवर पसरलेली आहे. एका कवीनें यशस्वी रीतिनें 'तुतारी' फुंकल्या क्षणीं दुसऱ्याला 'शिंग' वाजवावेंसें वाटलें, तिसऱ्यानें 'चौघडा' बडविला, तर चौथ्यानें 'कंबुनाद' केला! 'झपूर्झा'च्या 'व्यर्थी अधिकाचि अर्थ असे' असें दिसतांच कोणी 'फुगडी' खेळूं लागला, कोणी 'पिंगा' घालूं लागला, तर कोणाला 'झिम्मा' आठवला. केशवसुतांच्या 'घुबडास' या

कवितेनंतर गोविंदाग्रजांना त्याच विषयानें आकृष्ट केलें; आणि लौकरच जिकडे तिकडे स्मशानगीतें हुंकार करूं लागलीं. काव्यनिर्मितिक्रियेच्या गूढ विवेचनांतून गूढगुंजनाची म्हणजे अर्थशून्य नादमधुर गुंजनाची कविता निर्माण झाली आणि तिच्यांतूनच, रवींद्रनाथ ठाकूरांच्या गीतांजलीला जगत्प्रसिद्ध नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर, भक्तिवादी पण भक्ति या शब्दापासून अलिप्त रहाणारी, प्रीतिभक्तीचा समन्वय करूं पहाणारी पण भावनादृष्ट्या मानवी प्रीति आणि ईश्वरी भक्ति या दोन्हींपासून सारखीच दूर भ्रमणारी, आणि फार तर रूपकानें वेदान्त शिकविणारी अशी ठराविक ठशाची कविता रेंदाळकर, सुमंत आणि त्यांचे अनुचर यांच्या हातून निर्माण झाली. कवि माधव केशव काटदरे यांनीं कागदोपत्रीं विखुरलेली ऐतिहासिक माहिती कष्टानें मिळवून, जुळवून 'गोखल्खा लढनेवाला' सारखी ऐतिहासिक कविता लिहिली तर इतरांनीं हाताशीं असलेल्या बखरी पद्यांत उतरून 'गोखलखा बापू है ये' सारख्या कवितेची टांकसाळ चालू केली आणि देशांतील वाढत्या देशभक्तीच्या लाटेचा उपयोग करून घेऊन, आपल्या प्रेमवावडया देशभक्तीचें प्रदर्शन केलें. पुढें युवतींच्या रूपाचें आणि वेषभूषेचें निःसंकोच रसिकतेनें केलेलें यथातथ्य वर्णन रसिकांना मोहून टाकितें हें पाहतांच कोणीकोणी रस्त्यांतील आणि खिडकींतील दृश्यांकडे शोधक दृष्टीनें पाहून पद्यें रचूं लागले तर कोणीकोणी तारीख तक्त्यावरील चित्रांतील सुंदरीची आराधना करण्याचा कमी भयंकर असा मार्ग पत्करिला. अगदीं अलीकडे रशियांतून इकडे आलेले समाजसत्तावाद आणि भौतिकवाद या दोन शब्दांचे मोहक प्रतिध्वनि उमटूं लागले आहेत, आणि नव्या दमाचे कवि 'संवगडी' होऊन तटस्थ राहून भांडवलवाल्यांच्या दास्यांत खितपणाऱ्या जीवांचीं शब्दचित्रें काढूं लागले आहेत. एवढ्च काय तर ज्या वेळीं जें खूळ पिकेल त्या वेळीं त्याचे पडसाद आपल्या कवितेंत न उमटविल्यास यशाच्या घोडदौडींत आपण मागें राहूं या भीतीनें कवि ते ते सूर काढीत आलेले दिसतात. मध्यंतरीं असहकारितेच्या चळवळींत जो तो असहकारी वीर तुरुंगाबाहेरील जनतेला वर्तमानपत्रद्वारा संदेश पाठवी. अशीच दिव्य संदेशकथनाची टूम मागें एकदां मराठी कवींत पसरली होती. एकानें बालकवि ठोमरे यांना तुमच्या कवितेंत कांहीं संदेश नाहीं असें म्हणतांच त्यांना

पराकाष्ठेचा विषाद वाटला. पुढें त्यांच्या एका स्नेह्यानें त्यांना माझ्या कवितेंत कांहीं संदेश नाहीं हाच माझा संदेश आहे असें त्या संदेशसंशोधक टीकाकारास सांगा, असें सांगितल्यावर बालकवींची विषण्णता गेली !

भाषेच्या आणि वृत्तयोजनेच्या प्रकरणांहि हीच अनुकरणशीलता आढळते. राजकवि चंद्रशेखरकृत ' काय हो चमत्कार ! ' हें दीर्घ काव्य प्रकाशित झाल्यानंतर कितीतरी वर्षांनीं, आम्बराईंतील जानपद गीतांच्याहि मागून ' न्यारीचा वकूत ' हें भावगीत प्रकाशित झालें. राजकवींनीं जानपद जीवनांतील एक अद्भुत रम्य चित्र काढलें असून कुणबाऊ भाषेचा उपयोगहि फार मार्मिकपणानें केला आहे. पण कुणबाऊ भाषेंत जानपद गीतें रचण्याची टूमच निघाली ती कवि यशवंतांच्या तोंडून ' न्यारीचा वकूत ' लोकप्रिय झाल्यानंतर ! याच्या थोडें आधीं सुनीतगजलांचीं दोन खुळें आलीं आणि गेलीं. इंग्रजी काव्यांतिल ब्लॅङ्क व्हर्सचें स्थान पाहून निर्यमकतेचा पुरस्कार झाला ; आणि ' फ्री व्हर्स ' ची म्हणजे स्वैरपद्याची टूम दृष्टीस पडतांच बेबंद छंद, मुक्तच्छन्द इत्यादि प्रयोग होऊं लागले. ' राजहंस माझा निजला, ' ' कोठें हा हैदरअल्ली ' या दोन कविता प्रसिद्ध होतांच जो तो कवी या जातीचा पिच्छा पुरवूं लागला. गिरीशकृत ' मनमोहन वाजवुनी सारङ्गी काढी मंञ्जुळ सूर ' ही कविता लोकप्रिय होतांच त्या जातीचीच नव्हे तर यमकबांधणीचींही पद्यें बाहेर पडूं लागलीं. (आतां मनोहरकृत ' भावभेट ' या पुस्तकांतील या जातीच्या कवितांच्या खालीं मूळ कवितेच्या रचनाकाळापूर्वीच्या तारखा आढळतात. तो मुद्रणदोष असावा.) मायदेवांना ' चला सुटी झाली ' या कवितेची जाति 'स्थानिक स्वराज्यां'तील ' मोहतूर झाल्यावरी ' या पदावरून सुचली असावी. याला साक्ष यमकांची घाटणीच देते. ' शिम्मा ' या कवितेच्या छंदांत रचलेल्या बहुतेक कवितांतिल कडव्यांच्या अंतीं अमुक करूं या, तमूक करूं या असेंच म्हटलेलें आढळतें. मुद्रणप्रकरणींहि हिरव्या शाईनें छापलेलें, छोट्या आकाराचें, कविद्वयाच्या कवितांचें पुस्तक ' वीणाझंकार ' हें प्रसिद्ध होतांच, तसेंच हिरव्या शाईनें छापलेलें दोन कवींच्या कवितांचें पुस्तक ' काव्यतुषार ' हें प्रकाशित करण्यांत आलें. ही अनुकरणशीलता इतक्या थराला गेलेली आहे कीं, रविकिरणमण्डळाच्या आठ सदस्यांत एक आचार्य आणि एक स्त्री आहे हें

पाहूनच ' धवलगिरी ' नामक कवितासंग्रहाच्या ग्रंथांत ज्या मंडळाचें प्रकाशन आहे त्याच्या आठ सदस्यांत एक आचार्य आणि एक स्त्री समाविष्ट करून घेण्यांत आलेलीं दिसतात. या मंडळांतील दोन सदस्यांत वासिष्ठ–अरुंधतीचें नातें जोडतां आलें नाहीं त्याला संपादकाचा निरुपाय झाला असावा. याहूनहि हास्यास्पद गोष्ट ही कीं, एका साहित्यिकाला फुरसें चावल्याचा जिकडे तिकडे बोभाटा झालेला पाहून दुसऱ्या एका प्रथितयश साहित्यिकाला मलाहि फुरसें चावलें होतें अशी एक आठवण सोडून द्यावीशी वाटली.

ही जी अनुकरणशीलतेची कीड आपल्या प्रवृत्तीसच लागलेली आहे तिचा बीमोड केल्याविना आपली निरोगी वाढ होणार नाहीं. यावर कोणी असा आक्षेप घेईल कीं, काव्यकला ही जर इतर ललितकलांच्या प्रमाणें अनुकरणात्मक ललितकला आहे तर हिच्या वाढीस अनुकरणशीलताही बाधक कां व्हावी ? एखाद्या कलेच्या प्राथमिक अवस्थेंत जरी निसर्गाची प्रतिकृति उतरविण्यांत मनुष्याला समाधान वाटत असलें तरी पुढें त्याला आपल्या संयोजनेच्या गूढ प्रभावानें नवी सृष्टि निर्माण केल्यावांचून कलेचा उत्कर्ष झाला असें वाटत नाहीं. ही नवी सृष्टि प्रतिबिम्बरूप नसते, वास्तवाचा स्पष्ट आभास उत्पन्न करण्याइतकी ती निसर्गास धरून असावी लागते. त्यांतून, कलेच्या प्राथमिक अवस्थेंतहि निसर्गाचेंच अनुकरण असतें व तेंच कलायुक्त ठरतें. अनुकरणाचें अनुकरण हें अभ्यासासाठीं उपयुक्त ठरलें तरी तें कलेचें विलसित ठरत नाहीं. कलात्मक नवी सृष्टि हीसुद्धां कांहीं शून्यांतून एकदम अवतरत नाहीं. पंचेंद्रियद्वारां मिळणाऱ्या अनुभवाचे जे ठसे उमटलेले असतात त्यांचीच संयोजना एका गूढ रीतीनें होते; म्हणून उत्कृष्ट वाङ्मय हें जसें अननुभूताचें सूचक असतें तसेंच तें अनुभूताचें स्मारकहि असतें. स्वातंत्र्याच्या वातावरणांत कल्पकतेला किती जरी अलौकिक फुलें, फळें लगडलीं आणि तीं किती जरी अज्ञातापर्यंत उंच भरारलीं तरी तिचा उद्गम हा अनुभूतांतूनच होतो.

वाङ्मयाच्या वाचनानें उमटणारा ठसा हा आधींच अस्पष्ट असायचा; कारण तो ठशाचा ठसा असतो, आणि त्याच्यावरून एखादी प्रतिकृति काढली तर ती किती पुसट आणि कदाचित् किती विकृत निघण्याचा संभव आहे याची कल्पनाच करावी. इंग्रजी वाङ्मयांत फुलें, झरे, पक्षी, समुद्र यांच्यावर हृदयंगम कविता लिहिलेल्या आहेत. त्या वाचून मराठींतहि अशी सृष्टिविष-

यक कविता असावी ही इच्छा होणें अगदीं स्वाभाविक आहे. पण To a Skylark ही कविता वाचूनच 'चण्डोलास' नांवाची कविता लिहिली तर तिला अनुभवाचा कोंदीं आधार नसल्यानें ती हृदयंगम वठणार नाहीं.

टेनिसनचा ओढा जिवंत वाटतो, तसा तांबे यांचा झरा वाटत नाहीं. यांचें कारण विशिष्ट अनुभूतीचा अभाव हेंच होय. उलटपक्षीं बालकवींचा निर्झर कसा चैतन्यपूर्ण वाटतो! मराठी कवि ज्या भागांत रहात असेल तेथील विशिष्ट फुलें, झाडें, ओढे, नद्या, डोंगर इत्यादिकांशीं तो जेव्हां समरसेल, त्या सृष्टीचे विशिष्ट ठसे जेव्हां त्याच्या अन्तरंगावर उमटतील तेव्हां त्या ठशांच्या संयोजनेनें जी सृष्टि आपोआप निर्माण होईल ती स्पष्ट, वास्तव आणि इतरांच्या अन्तराचा ठाव घेणारी अशी होईल, तेव्हांच त्या कवीच्या शब्दांत, रसिकांच्या अंतःकरणांत पडसाद उमटविण्याचें सामर्थ्य येईल. सृष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यानें जें ज्ञान होतें तें बहुशः बिनचूक असतें, परंतु ग्रंथद्वारां सृष्टीविषयीं शास्त्रीयज्ञान मिळविल्यानें फार तर वर्णनांत चुका होणार नाहींत; परंतु वर्णन हृदयंगम होईलच असें नाहीं. बालकवींचा 'अरुण' तसा अस्पष्ट आहे; परंतु, त्यांच्या हुरळणुकीच्या प्रभावानें तो हृदयङ्गम वाटतो. गोविंदाग्रजांच्या 'अरुणाला' तर अनुभूताची आवश्यकताच नव्हती, कारण त्यांना केवळ कल्पनाचमत्कार करून दाखवायचा होता. अशा हठाकृष्ठ चमत्काराच्या प्रकरणीं त्यांच्यावर मात करून केशवकुमारांनीं भयंकर अरुण निर्माण केला हें विडम्बन यथायोग्यच झालें. आगरकरांचे लेख वाचून लिहिलेल्या समाजसुधारकी कवितेपेक्षां प्रत्यक्ष सामाजिक अन्याय पाहून अन्तःक्षोभ होऊन जी कविता बाहेर पडेल तीच अधिक प्रभावी होईल. कविता केवळ सृष्टिवर्णनपर वा सुधारकी वा युयुक्षुवादी वा समाजसत्तावादी आहे येवढ्यानें ती हृदयंगम वठतेच असें नाहीं. हृदयंगम व्हायला ती हृदयापासून स्फुरायला हवी. गूढ कवितांत तांम्बे यांचींच गीतें सरस, जिवंत वाटतात. यांचें कारण तीं प्रतीतीचीं स्फुरितें आहेत हेंच होय. भावगीतांच्या प्रचंड राशींत जीं गीतें हार्दिक आहेत, स्वभावगीतें आहेत, तींच तेवढीं चटका लावितात. प्रेम करणें इष्ट आहे आणि प्रेमगीत मिष्ट वाटतें म्हणून प्रेमाच्या कल्पनेनें रचिलेलें भावगीत सुश्लिष्ट दिसलें तरी काय प्रभाव दाखविणार? जेथें कवीला स्वतःच्या अन्तःकरणाचा ठाव घेतां येत नाहीं

तेथें तो परहृदयप्रवेश करून त्याच्याशीं तादात्म्य पावून काय भूमिकागीत लिहिणार ? उत्कृष्ट स्वभावगीतांचीच संख्या जेथें मर्यादित आहे तेथें उत्कृष्ट भूमिकागीतें दुर्मिळ झाल्यास आश्चर्य नाहीं.

यशस्वी दीर्घ काव्य लिहिणें हें तर भूमिकागीत लिहिण्याहूनहि कठिण आहे. दीर्घ काव्यांत भूमिका अनेक असतात. त्या पृथगात्मपणें वठवायच्या आणि त्या सर्वांच्या पराक्रमाला ज्यांत वाव मिळेल असें सरस कथानक निर्माण करून तें पद्यांत वर्णावयाचें म्हणजे कांहीं सोपें काम नव्हे. प्रतिभा असली तरी पुन्हां पद्यरचना ही प्रकृतीला मानवायला पाहिजे. तेव्हां, अनुभव अति-मर्यादित, वाचन थोडें, परिश्रम-शीलता अल्प आणि प्रतिभाहि बेताचीच अशा स्थितींत उत्कृष्ट दीर्घ काव्य कसें निर्माण व्हावें ! तरीहि ' अभागी कमल ' आणि ' आम्बराई ' यांसारखीं सरस वाचनीय दीर्घकाव्यें निर्माण होतच आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. काव्यप्रांतांतील हरिभाऊ आपटे मात्र अद्यापि अवतीर्ण व्हावयाचा आहे. दीर्घ काव्याचा काळ गेला असें मुळींच नाहीं, रसिकांची उणीव नाहीं आणि त्यांना सवडहि आहे. दीर्घ-काव्याचें तंत्र कादंबरीच्या तंत्रापेक्षां साहजिकपणेंच वेगळें असणार; परंतु तीनशें पृष्ठांची म्हणजे पंचाहत्तरशें ओळींची कादंबरी वाचायला जेथें वाचक मिळूं शकतात तेथें पांच सहस्र ओळींचें दीर्घ काव्य वाचायला वाचक मिळणार नाहींत हें संभवनीय वाटत नाहीं. लेखनाचा प्रभाव मात्र असा पाहिजे कीं धारेला लागलेल्या वस्तूप्रमाणें वाचक कथानकाच्या ओघासंगें वहावत गेला पाहिजे.

आधुनिक मराठी कविता वाचकांच्या मनांत पडसाद उत्पन्न करूं शकते कीं नाहीं; आणि ती पडसाद उत्पन्न करीत नसल्यास त्याचें कारण काय असेल याचाच मी येथें विचार केला आहे. सामाजिक वा राजकीय बंधना-विषयीं जे विचार प्रसृत होत आहेत ते मला व्यक्तिशः कितपत मान्य आहेत यावरून मी काव्याचें, ललित वाङ्मयाचें महत्त्व ठरवीत नाहीं. प्रतिपादित विचारांच्या मान्यतेवरून वाङ्मयाचें महत्त्वमापन करणें सुतराम् चुकीचें आहे आणि अमान्य वाङ्मयाला तात्त्विक विरोधच नव्हे तर कायदेशीर प्रतिबंध करणें हें तर अनर्थावह आहे. कालचें मान्य आज अमान्य होऊं शकतें आणि आजचें मान्य उद्यांहि मान्यच

राहील असा भरंवसा नाहीं. हा प्रश्न वैयक्तिक आवंडीनावडीचा न राहतां तो सत्ताधीश पक्षाच्या आवडीनावडीचा राजकीय प्रश्न झाला तर प्रत्येक क्रांतीच्या वेळीं पूर्वीच्या वाङ्मयाला अग्न्यर्पण करण्याचा समारंभ उरकावा लागेल आणि नवीन कांहीं लिहूं इच्छिणाऱ्यांचे हात तोडावे लागतील आणि जिभा उपटाव्या लागतील. कालिदासशेक्सपिअरादि कवींना राजसत्तावाद मान्य होता म्हणून समाज सत्तावाद्यांनीं नामशेष करण्याचा प्रयत्न करणें हें जसें वेडेपणाचें होईल, तसेंच आधुनिक कवितेंत व्यक्तिस्वातन्त्र्यवाद भलत्याच थराला जात आहे, या समजुतीनें तिला अनीतिप्रसारक ठरवून कायद्यानें तिला जिवन्त समाधि देऊं इच्छिणाऱ्यांचे वर्तनहि वेडेपणाचें होईल.

जुन्या नव्या विचारांचें झुन्ज हें प्रवृत्तिनिवृत्तीच्या झुन्जाइतकेंच सनातन आणि शाश्वत आहे. अमूक एक गोष्ट झाली तर स्वैराचार माजून समाजाचा प्रलय होईल ही भीति जितकी स्वाभाविक आहे तितकीच निराधार आहे. हिंदुविधवा कॉलेजांतील वातावरणांत एका समवयी युवकावर प्रेम करिते; वा पतिपत्नींची घटस्फोटास सम्मति आहे, परंतु घटस्फोट कायदेशीर होण्यास अवश्य असणाऱ्या व्यभिचाराचें सोंगही आणणें त्यांस मान्य नाहीं, म्हणून दोघेहि आपआपल्या आवडीच्या योग्य व्यक्तींच्या संगें कर्तव्याची जाणीव ठेवून अलग अलग संसार करितात अशा धर्तीचीं चित्रें वाङ्मयांत आढळलीं तरी त्याच्या योगानें समाजाच्या स्थायित्वाला, चिवटपणाला क्वाचितच ढळ बसतो. अपरिचितपणामुळें आपण नव्या स्थितीला बिचकतों, घाबरतों आणि व्यामूढ होतों. इराण देशांत मुदतीचीं लग्नें धर्मानें विहित आणि कायद्यानें मान्य आहेत व ब्रह्मदेशांत कांहीं ठिकाणीं एका स्त्रीला अनेक पति करितां येतात. या गोष्टी हिंदुसमाजास स्वाभाविकपणेंच भयंकर वाटतील; पण ते ते समाज तेवढ्यानें रसातळास गेलेले दिसत नाहींत, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. समाजांत एक प्रकारचें मूलभूत सौजन्य, सहकारित्व आणि स्थितिनिष्ठता हीं असतात. समाजाचे घटक हे बहुतांशीं अप्रत्यक्षपणें आपआपल्या मर्यादा पाळीत असतात. कायद्यानें स्वातंत्र्य दिलें तरी प्रत्येक मनुष्य स्वैर वागूं लागणार नाहीं, स्वैर वागूं शकणार नाहीं. हिंदु-धर्मशास्त्रानें

पुरुषाला बहुपत्निकत्वाचें स्वातंत्र्य दिलें आहे त्याचा उपयोग किती लोक घेऊं इच्छितात वा शकतात ?

पुन्हा, 'बंधनापलीकडे' वाचून का कोणी बंधनापलीकडे जातो ? अटकेपार जाणारे लोक 'अटकेपार' वाचायला मिळण्याची वाट पहात नाहींत. व्याख्यानानें आणि लेखनानें क्रांति घडवून आणितां येते असें म्हणण्यांत धीर देणारी रम्य अतिशयोक्ति आहे, पण वस्तुस्थिति मोठी निराशाजनक असते. हिंदुस्थानांत तर सत्य ही केवळ बुद्धीनें आकलून नंतर देव्हाऱ्यांत सोंवळ्यांत ठेवून देण्याची गोष्ट असते असें दिसतें. तिचा व्यक्तीच्या चारित्र्यावर आणि प्रचारद्वारां राष्ट्राच्या जीवनावर परिणाम घडलाच पाहिजे असें नाहीं. ही दृष्टी बदललीच पाहिजे. ती बदलेल तेव्हां बदलो पण तोंपर्यंत तरी नवमतवाद्यांच्या लेखनाला भिण्याचें कारण नाहीं. त्यानें समाजस्वास्थ्य यत्किञ्चितहि बिघडणार नाहीं. पुन्हां नवमतवाद्यांनाहि बंधनेंच नको आहेत असें नाहीं. त्यांच्या पृथ्वीवरील स्वर्गांत म्हणजे रशिया देशांत कांहीं बंधनें तर अत्यंत कडक आहेत. नवमतवाद्यांना जुन्या मर्यादा तोडून कांहीं नव्या मर्यादा घालायच्या आहेत. तेव्हां मूलतः ते नीति हवी असेंच म्हणणारे आहेत. शेवटीं या प्रकरणीं सांगायचें तें हेंच कीं, काव्याची, वाङ्मयाची परीक्षा ही त्यांतील मतांच्या मान्यतेवरून करावयाची नसते. त्यांत प्रतीतीचा जिव्हाळा किती आहे तें मनुष्यमात्राला कितपत रम्य व गम्य वाटतें, किती खोल परिणाम करूं शकतें, यावरून वाळावयाचें महत्त्व ठरवायचें असतें.

नवमतवादामुळें अेखाद्या पुस्तकाविषयीं कुतूहल वाटेल. कांहीं प्रती खपतील, परंतु तेवढ्यानें तें पुस्तक चिरायु होणार नाहीं. त्यांत कलेसाठीं कला आहे अशी घोषणा केल्यानें-हि त्या पुस्तकाला संजीवन मिळणार नाहीं. कलेसाठीं कला याचा अर्थ अेवढाच कीं, कलोपासकानें खपावर व लोकप्रियतेवर दृष्टि ठेवूं नये. त्यानें स्वतःला जें पटतें व जें अलौकिक, आनन्ददायक वाटतें त्यापासून व्यावहारिक स्वार्थ संपादण्यासाठीं पराङ्मुख होऊं नये. त्यानें स्वतःशीं प्रामाणिकपणें वर्तावें. अप्रामाणिकपणाचा समावेश नवनीतींतहि होत नाहीं. कलेला कांहीं तसें प्रत्यक्षांत स्वतंत्र 'अस्तित्व नाहीं. केवळ तन्त्रशुद्धता म्हणजे कांहीं कला नव्हे. प्रत्येक ललितकृतींतील चैतन्य हें तिचें विशिष्ट तन्त्र ठरवीत

असतें. म्हणून अत्यंत कलापूर्ण कृतीचाही उद्गम हा प्रत्यक्षाप्रत्यक्ष मानवी अनुभूतींतून संसाराच्या क्षेत्रांतूनच व्हायला हवा. बाह्य तन्त्राच्या दृष्टीनें सदोष अशी हरिभाऊ आपटे यांची कृति वा कित्येकदां, तंत्राचा विचारच न करणारे डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांची कृति, दुसऱ्या कित्येकांच्या तरी तंत्रशुद्ध कृतींहून अधिक प्रभावी वाटते. यांचें कारण तींत अधिक जिव्हाळा आहे, अधिक प्रामाणिकपणा आहे हेंच होय. या जिव्हाळ्याचा अभाव लपविण्याकरितांच कित्येकदां कलेसाठीं कला ही घोषणा करण्यांत येते. काव्यांत प्रसाद म्हणजे सरळ सुबोधपणाआहे; अलंकार आहेत; छन्दोबद्ध सप्रमाण शरीर आहे; घोटीव गुळगुळीतपणा आहे. भिजलेल्या अंगवस्त्राची उरोजादि गूढ अवयवांची झिरझिरीत तलम वर्णनें आहेत, कला आहे पण अर्थाची रमणीयता नाहीं; नेत्र वेधून घेऊन हृदयार्थी संवाद करूं लागणारी अनुभूतिजन्य उत्कटता नाहीं, चैतन्याची चमक नाहीं, तर काय उपयोग? मनुष्यमात्राला जिवंत चालत्या बोलत्या प्राण्याच्या सहवासाची अिच्छा असते. कलेच्या सुकुमार पण काल्याप्रमाणें गार अशा कलेवराला कवटाळून ती इच्छा कशी पूर्ण होणार? आनंद मिळायला वाङ्मयांतहि जिवंतपणा पाहिजे. त्याच्या जोडीस सर्वांग सुन्दरता असली तर दुधांत साखर पडली. पण चुनवर्णीत दुधाचें रङ्गसादृश्य आहे म्हणून त्यांत साखर टाकिली तरी सुधेची गोडी त्या मिश्रणाला कशी येणार?

नवमतवादाची नवलाई वा तंत्रशुद्धतेची कला ही जिवन्तपणाची उणीव भरून काढूं शकत नाहीं, तसेंच काळप्रतिनिधित्वहि ही उणीव भरून काढूं शकत नाहीं. अेखादा कवि आपल्या काळाचा प्रतिनिधि कितपत असावा हें त्याच्या स्वभावावर, त्याच्या प्रवृत्तीवर अवलंबून राहील. परिस्थिति ही न्यूनाधिक प्रमाणांत नेहमींच जाचक असते. नवे नवे प्रश्न, नवे कलह, नित्य उपस्थित होत असतात. कोणी कोणी या कलहापासून दूर अेकीकडे जाऊन त्या कलहाची आंच लागणार नाहीं इतकेंच नव्हे तर त्याची आठवणहि होणार नाहीं अशी रम्य तटबंदी आपल्याभोंवतीं करून घेऊन आंत संतोषानें कालक्रमणा करितात. कोणी कोणी कलहांत प्रत्यक्ष भाग घेत नाहींत, पण ज्या पक्षाविषयीं त्यांना सहानुभूति वाटत असेल त्या पक्षाला गुप्त साह्य करीत तटस्थ, सुखी आणि शांत राहतात. कोणी कोणी वैय-

क्तिक सुखाचीच काय पण यशापयशाचीहि चिंता न करितां तत्त्वासाठीं झुंजांत पडतात. हे अशे प्रकृतिभेद कवींत आणि इतर वाङ्मयसेवकांतहि संभवतात. प्रत्यक्ष झुंजांत पडलेल्या मनुष्याला वाङ्मयनिर्मितीसाठीं अवश्य असणारें स्वास्थ्य आणि सवड ही क्वचितच लाभतात. झुंजांत बौद्धिक भाग घेऊन आपल्या पक्षाचें मंडण, विरुद्ध पक्षाचें खंडन आणि स्वमतांचा प्रसार करण्याचें मोठें कार्य आतां मुख्यतः वक्त्यांच्या आणि वर्तमानपत्रांच्या अंगावर पडलें आहे. एखादा कवि जर पद्यांत हें कार्य करण्याचा अव्यापारेषु व्यापार करील तर त्याची भाषा कितीही उत्कट आणि घोटीव असली, तरी त्याच्या काव्याला वर्तमानपत्राहून अधिक आयुष्य आणि महत्त्वहीं लाभणार नाहींत. प्रचलित प्रश्नांचा निर्णय होण्याच्या आधींच त्या काव्याचा फडशा पडेल. अटीतटीनें झुन्ज खेळतांना एकांगीपणा येतो. दृष्टीला विकृति होते; आणि जेथें विकृति आहे तेथें शाश्वति येऊं शकत नाहीं. संसारांतील विविध कलहांकडे योग्य सहानुभूतीनें पाहून जो संसारचित्रें रंगवील आणि कळकळीचे कां होईना पण नुसते उपदेशपाठ न देतां वाचकांना आपली दृष्टि देईल, आणि आपल्या कलाकृतीच्या करवीं सहानुभूतीच्या बळें वाचकांच्या प्रवृत्तीला नकळत चांगलें वळण देईल, त्याची कृति आदर्शभूत व शाश्वत समजावी. तो कवि धन्य होय. खोल ज्ञानामुळें, व्यापक सहानुभूतीमुळें, सूक्ष्म व दूरवर निरीक्षणामुळें आणि एक प्रकारच्या तटस्थपणामुळें अशा कवीची कृति जितकी मनोरंजक आणि हृद्यंगम तितकीच ती उद्बोधक आणि वास्तव वठते. पण महाराष्ट्रांत या प्रतीचे वाङ्मयसेवक दुर्मिळ आहेत. मराठी लेखक सध्यांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमुळें कांहीं विशिष्ट वर्गांतूनच निर्माण होतात. इतर वर्गाविषयीं त्यांना कितीही सहानुभूति वाटली तरी निकट सहवासाच्या अभावीं, त्यांच्या कृतींत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अनुभूतीचा जिव्हाळा येऊं शकत नाहीं. लेखकाच्या जीवनाचा राष्ट्रीय संसारांतील विविध कलहांत पडलेल्या मनुष्याच्या जीवनाशीं निकट संबंध क्वचितच येतो. म्हणून श्रेष्ठ प्रतीचे प्रतिनिधिक वाङ्मय निर्माण व्हायला,निरनिराळ्या जातींतूनच नव्हे तर निरनिराळ्या वर्गांतून लेखक निघूं शकतील अशी सामाजिक व आर्थिक स्थिति व्हायला हवी आणि असें जेव्हां होईल तेव्हांच आपलें वाङ्मय खरोखर

राष्ट्रीय; खरोखर प्रातिनीधिक होण्याच्या मार्गाला लागेल. बाह्य घडामोडींचा वृत्तांत वर्तमानपत्रांत येतो तेव्हां वर्तमानपत्री लिखाणाचें संकलन केलें तर तें एका दृष्टीनें प्रातिनिधिक दिसेल. पण वर्तमानपत्री लिखाण म्हणजे वाङ्मय नव्हे.

जीवनांतील विविध कलहांपासून शरीरानेंच नव्हे तर मनानेंहि अलिप्त रहाणारे जसे कांहीं लोक असतात तसेच कांहीं कवीहि संभवतात. कोणाची दृष्टि भूतकालावर स्थिरावेल तर कोणाची अंतर्मुख होईल; त्यांच्या कृतीपासून जर प्रत्यक्ष जाचक परिस्थितीचा क्षणिक विसर पडत असेल, श्रमाचा परिहार होत असेल, आनंद होत असेल, आणि काल्पनिक का होईना पण जिवंत व्यक्तीच्या सहवासाचें सुख लाभत असेल तर तिला कविता म्हणून योग्य स्थानमान द्यायला प्रत्यवाय कोणता? असत ना कवितेंत कवीच्याच मनस्तरङ्गांचीं चित्रें? कवितेंत तत्कालीन समाजाचें प्रतिबिंब असलेंच पाहिजे असें नाहीं. असहकारितेची प्रचंड लाट देशभर खळबळ उडवून देत असतांना एखाद्या कवीनें शाकुंतलाच्या प्रतीचें नाटक वा मेघदूताच्या तोडीचें काव्य लिहिलें तर त्यांत विलायती कापडाचा बहिष्कार, खादीचा पुरस्कार इत्यादि कांहीं नाहीं म्हणून त्यास आपण टाकून देऊं काय? अर्थात् नाहीं. रवीन्द्रनाथ टागोरांच्या ज्या गीताञ्जलीचें स्वागत जगभर झालें तिच्यांत आधुनिक सामाजिक वा राजकीय आन्दोलनांचें प्रतिबिम्ब कोठें आहे? मोरोपंताची कविता ही एकंदरीनें पहातां जिवंत नाहीं. याचें कारण, मराठी राऊत तिकडे भीमथडीच्या तट्टांना गंगथडीचें पाणी पाजून अटकेपार हुतूतू घालीत असतांना मोरोपंत इकडे स्वस्थपणानें पौराणिक कथा सयमक पद्यांत रचीत राहिला हें होय असें कांहीं लोक म्हणतात तें युक्त नाहीं. मोरोपंताच्या कवितेची योग्यता, तींत त्याच्या काळाचें प्रतिबिंब किती उमटलें आहे यावरून ठरविणें हें, ती पद्यसङ्ख्येवरून, यमकदीर्घतेवरून वा संस्कृतशब्दप्राचुर्यावरून ठरविण्याइतकच चुकीचें होईल. कवितेची योग्यता अंतर्गत जिव्हाळ्यावरून, वैशिष्ट्यांवरूनच ठरवायला पाहिजे.

जीं आधुनिक भावगीतें आज चटका लावून सोडीत आहेत त्यांच्यांत एका सामाजिक असमाधानाचें मात्र प्रतिबिंब दिसतें. सुशिक्षित समाजांत जिकडे तिकडे स्त्रीपुरुषसंबंधविषयक, विशेषतः पुरुषाचें स्त्रीसहवासविषयक

असमाधान पसरलेलें दिसतें. सामान्य मनुष्यसृष्टि, तत्त्वविचारांची दृष्टि, वैवाहिक व्यवहारापलीकडे क्वचितच जाते. परंतु ज्या व्यक्तिसमूहाला आधुनिक मराठी कविता ही गम्य व रम्य वाटते त्याला कांहीं तरी निराळें, रूढीच्या बन्धनापलीकडील रम्याद्भुत हवें आहे. परंतु पराक्रम नाहीं आणि सहिष्णुतेचें शान्त सामर्थ्यहि नाहीं, तेव्हां हें असमाधान कविमुखांतून हृदयङ्गम उच्छ्वासितांच्या रूपानें प्रकट होत आहे. दुरून हुरहूर, दबलेली उत्कण्ठा, क्षयी आशा यांचेच बोल निघत आहेत. काव्यावर एक प्रकारच्या निष्क्रियतेची, क्षैण्यपणाची छाया पडली आहे ! आतां टीकाकारांनीं कवींना विषय नेमून देऊं नयेत आणि कवींनीं आपल्या आवडत्या विषयावरच काव्यें लिहावींत हें उचित आहे; परंतु बहुतेक कवि एखादा विशिष्ट एकच एक सूर काढीत असले तर त्यांना वाचकांनीं. आपल्या आकांक्षा–अपेक्षा कळवायला कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं; अेका सूरानें संगीत सिद्ध होत नाहीं. वैयक्तिक लागणीचीं गीतें अवश्यमेव हवींत; परंतु बहुजनसमाजाच्या सांघिक भावनांना रंजवितील, उत्तेजित करितील, अशींहीं गीतें हवीं आहेत. स्त्री-पुरुषसहवास हा विषय कितीही रम्य असला तरी तो म्हणजे कांही सार, संसार नव्हे. प्रतिसि पराक्रमाची जोड पाहिजे: कष्टाळु उत्साहाची, दुर्दम्य झुंजार विजिगीषेंचीं स्फुरितें पाहिजे आहेत. महाराष्ट्राला मराठी देशगीताची, राष्ट्रगीताची फार उणीव आहे. आम्हीं विचार न करितां अर्धबंगाली ' वंदे मातरम् ' म्हणतों. हें मराठीच्या पुत्रांना अभिमानास्पद नाहीं. मराठीचें मराठपण जोपासून वाढविणारे कवि हवे आहेत. पंचवीस वर्षांपूर्वीं आपल्या ' काव्य आणि काव्योदय ' या निबंधाच्या शेवटीं कै. वासुदेव बळवंत पटवर्धन यांनीं जो कळकळीचा उपदेश केला आहे त्याची आवश्यकता अद्यापि नष्ट झालेली नाहीं. ते म्हणतात " उद्याचे कवी हो ! महाराष्ट्रांचें हृदय तुमचे हातीं आहे. आपल्या प्रतिभासम्पन्न वाणीनें तें नाचूं लावा, त्याची उडी वाढवा, आणि स्वतःच्या जोराची व कर्तृत्वाची त्याला साक्ष पटवा. त्याचें सामर्थ्य आणि भाग्य उर्जितदशेस आणा आणि महाराष्ट्राचा संसार खरोखर संसार होईल अशी गीतें गा ! "

★ मनोवेधक ललित वाङ्मय ★

रु.

प्रतारणा (कादंबरी) —वि. पां. दांडेकर २

चंपी आणि मोत्या—प्रतीकात्मक दीर्घकथा १॥

ससेमिरा—(कादंबरी)—त्र्यं. वि. सरदेशमुख २॥

ठेंगणें अस्मान—(कादंबरी)—श्रीधर देशपांडे ४

राक्षस विवाह—(मनोविश्लेषणात्मक भावकथा)

—श्री. के. क्षीरसागर १॥

हंसरा निर्मात्य व चिमण्या (व्यक्तिचित्रें)

—कमलाबाई देशपांडे २

रानोमाळ—(शिकारी कथांचा संग्रह)—रा. वि. फडतरे २॥

मानसचित्रें—(कथासंग्रह)—गंगाधर गाडगीळ २॥

उपायन—(लेख व कथासंग्रह)-मनोहर महादेव केळकर २॥

सौ. गिरिजाबाई केळकर यांचे कथासंग्रह :

समाजचित्रें भाग १ २॥

समाजचित्रें भाग २ १॥

केवळ विश्रांतीसाठीं १॥

आवडत्या गोष्टी सुप्रसिद्ध लेखकांच्या निवडक ६१ कथा ४

मनोहर ग्रंथमाला, टिळकरोड, पुणें २

REFBK-000684

मनोहर ग्रंथमालेचें नमुनेदार मासिक

सुंदर : स्वल्पमोली : सर्वोत्कृष्ट

वा ङ्म य शो भा

संपादक : मनोहर महादेव केळकर

वा. वर्गणी ६ रु.] [अंकास १२ आणे

* आकर्षक सजावट, विविध प्रकारचा मजकूर व चित्रें.

* भरपूर मनोरंजन करणारें, तुमच्या ज्ञानांत निश्चित भर घालणारें आणि तुमच्या विचारास नवी दिशा दाखवणारें मासिक.

* सर्वत्र प्रसार. त्यामुळें जाहिरातीचें उत्कृष्ट माध्यम.

वाङ्मय शोभा : : : टिळकरोड, पुणें २